ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : अतातुर्क
गाझी कमालपाशा

लेखक : सय्यद अमीन

प्रकाशक : मुस्लिम मराठी साहित्य, सांगली

प्रकाशन वर्ष : १९४२

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

# मुस्लिम मराठी साहित्य

[ १ ]

---

अतातुर्क

# गाझी कमालपाशा

---

लेखकः—

सय्यद अमीन

923·2
Kam/Ami
8051

---

किंमत २ रुपये

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00928

Muslim Marathi Literary Series; Sangli.

मुस्लिम मराठी साहित्य, सांगली.

( १ )

अतातुर्क

# गाझी कमालपाशा

923.2
Kam-Am

लेखकः—

सय्यद् अमीन

" हजरत महंमद पैगंबर चरित्र " व " इस्लाम आणि नीतिशास्त्र "
या मराठी ग्रंथाचे कर्ते.

कै. म. म. द. वा. पोतदार
—×— ग्रंथ संग्रह

किंमत २ रुपये.

लेखक व प्रकाशकः—
सय्यद अहमद अमीन,
सांगली (S. M. C.)

प्रकाशन काळः—जानेवारी १९४२

M | 92298

मुद्रकः—
रतनलाल डी. शहा, एम्. ए.
रत्नाकर प्रेस,
सांगली (S. M. C.)

8051
923.21 Kar...
15/10/93

# मुस्लिम मराठी साहित्य

———*———

## थोरांचे शुभाशिर्वाद

—×—

प्रिय मि. अमीन,

"आपलें कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे व तें कार्य तडीस नेण्यास आपण अत्यंत योग्य आहांत. 'सुबुद्ध राष्ट्राभिमानी व्यक्ति' अशी आपण महाराष्ट्रामध्यें कीर्ति कमाविली आहे आणि या कीर्तीचा आपल्या या नव्या कार्यांत अतिशय उपयोग होईल. आपल्या कार्यास संपूर्ण यश इच्छितो."

**—नेक नामदार, न्यायमूर्ति एम्. आर. जयकर.**

"आपण 'मुस्लिम मराठी साहित्य' सुरूं करून मराठी भाषेची व मुसलमान समाजाची तशीच हिंदु समाजाची फार मोठी सेवा करीत आहांत...आपलें मराठी भाषेवरील प्रभुत्व वाखाणण्याजोगें आहे आणि आपण सुरूं केलेली साहित्यमाला हिंदुमुसलमान ऐक्याच्या दृष्टीनेंही एक मोठा स्तुत्य प्रयत्न आहे. आपलें मी मनापासून अभिनंदन करतो."

**—माजी मुख्य प्रधान, बा. गं. खेर.**

"आपण संपादित असलेल्या 'मुस्लिम मराठी साहित्याच्या' उपयुक्ततेबद्दल व होत असलेल्या कामगिरीबद्दल मला पूर्ण सहानुभूति आहे...एकंदर कार्य उपयुक्त होत आहे यांत शंका नाहीं. आपल्या साहित्य-मालेचें यश दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जावो."

**—साहित्यचार्य, प्रो. वामन मल्हार जोशी, एम्.ए.**

" आपला उद्देश प्रशंसनीय व उत्तेजन देण्याच्या योग्यतेचा आहे. मुस्लिम मराठी साहित्य, जातीय वैमनस्याचा प्रश्न सोडवूं शकेल अशी अपेक्षा आहे. आपल्या कार्यास माझी संपूर्ण सहानुभूति आहे."

—हिज हायनेस, महाराजा ऑफ देवास (ज्यू.)

" ' मुस्लिम मराठी साहित्याची योजना मला अतिशय आवडली व त्या योजनेबद्दल मी आपणांस हार्दिक धन्यवाद देतो. महाराष्ट्रांत राहणाऱ्या प्रत्येक मुसलमान व मुसलमानेतर सद्गृहस्थास तुमची योजना पसंत पडून, प्रत्येकाकडून तुह्मांस आश्रय व उत्तेजन मिळालेंच पाहिजे. ...आपल्या साहित्यास संपूर्ण यश व सर्वत्र मान्यता मिळो आणि त्यास दीर्घायुष्य लाभो असें चिंतितो. "

—खानबहादूर, प्रो. शेख अब्दुल कादिर सर्फराझ,

एम्. ए., आय. इ. एस्.

" मुस्लिम मराठी साहित्याची कल्पना अत्यंत स्वागतार्ह आहे. हिंदुस्थानांतील दोन प्रमुख जातींत समजुतदारपणा उत्पन्न करण्यास मुस्लिम मराठी साहित्यास यश मिळेल, अशी मला खात्री आहे. मि. सय्यद अमीन यांना धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत. "

—खानबहादूर, बदिउझ्झमान काझी, एम्. ए.

" आपण हातीं घेतलेल्या कार्यास स्पृहणीय यश मिळेल आणि 'मराठी भाषेचे पंडित' या नात्यानें आपण करीत असलेल्या मराठी साहित्यसेवेचे, जातिधर्मांचा विचार न करतां सर्वांकडून चीज होईल अशी मला पूर्ण खात्री आहे."

—प्रोफेसर, सय्यद अबदुल्ला, एम्. ए.

( चॅन्सलर्स गोल्ड मेडॅलिस्ट. )

The Muslim Marathi Literary Series

# मुस्लिम मराठी साहित्य.

—*—

## विज्ञप्ति

मानवी जीवनांतील क्षुद्रता, अपुरेपणा व असंतोष यांचे निराकरण करून तें उन्नत व सुखी करण्याचे महत्कार्य साहित्याकडून होत असते. या साहित्यद्वारां हिंदुस्थानांतील सर्वधर्मीय नागरिकांत उच्च विचारसरणी, व्यापक दृष्टि व समाधान निर्माण करणें हें आपल्या राष्ट्रापुढील एक अत्यंत महत्वाचे कार्य आहे.

एक हजार वर्षें एकत्र राहूनसुध्दां परस्परांची अंतःकरणें व्हावीं तशीं एकजीव न होण्यास, परस्परांचा इतिहास, संस्कृति, तत्वज्ञान इत्यादि बद्दल यथायोग्य ज्ञानाचा अभाव हें एक कारण आहे.

इस्लामचें खरेंखुरें स्वरूप, त्याचें तत्वज्ञान, इतिहास, संस्कृति व मुस्लिम विभूतींची चरित्रें इत्यादिबद्दल यथायोग्य कल्पना आल्यास आज घडत असलेल्या अप्रीय गोष्टींस आळा बसून प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होण्यास अनुकूल वातावरण उत्पन्न होईल. मराठी साहित्यद्वारां अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करण्याचा यथाशक्ति प्रयत्न करावा व महाराष्ट्राच्या मायबोलीची-मराठीची कांहींतरी सेवा घडावी, या सद्हेतूनें ' मुस्लिम मराठी साहित्य, सुरू करण्याचें मी धाडस केलें आहे. ' मुस्लिम मराठी साहित्या ' मधून ललित व वास्तववादी वाङ्मयास अवश्य प्रसिध्दी देण्यांत येईल; मात्र ते वाङ्मय जातीय ऐक्यास प्रेरक व पोषक मात्र हवें. अशा ध्येययुक्त व

अधिकारी वाङ्मयाचें प्रकाशन व्हावें म्हणून नाणावलेल्या हिंदु-मुस्लिम विद्वानांचे एक सल्लागारमंडळ निवडण्यांत आले आहे.

मी हातीं घेतलेल्या मुस्लिम मराठी साहित्याच्या अभिनव कार्यास नेक नामदार न्यायमूर्ती एम्. आर. जयकर, हिज हायनेस राजासाहेब सांगली, हरिभक्तपरायण महाराजा ऑफ देवास, मुंबई इलाख्याचे माजी मुख्य प्रधान ना. बाळासाहेब खेर, साहित्याचार्य वामन मल्हार जोशी, सुप्रसिध्द महाराष्ट्रीय मुसलमान पंडित खानबहादूर प्रो. शेख अबदुल कादिर सर्फराझ, एम्. ए., आय. ई. एस., खानबहादूर बदिउझ्झमान काझी एम्. ए., यांच्यासारख्या थोर हिंदुमुसलमान महाभागांनीं शुभाशिर्वाद दिले आहेत.

तरी सर्व महाराष्ट्रीय बंधुभगिनींनी या माझ्या अंगीकृत कार्यास उत्तेजन व उदार आश्रय द्यावा व माझ्या हातून मराठी साहित्याची सेवा यशस्वी रीतीनें करवून घ्यावी अशी नम्र विनंती आहे.

सर्वांचा नम्र,

**सय्यद अ. अमीन**

चालक व संपादक,

**मुस्लिम मराठी साहित्य.**

## सर्व साधारण नियम.

( १ ) एक रुपया आरंभीं प्रवेश फी देणारास मुस्लिम मराठी साहित्याचे कायम ग्राहक समजण्यांत येईल.

( २ ) कायम ग्राहकांस मुस्लिम मराठी साहित्याची प्रकाशित होणारीं पुस्तकें किंवा उद्देशानुसार प्रसार करण्याकरितां पसंत करण्यांत आलेलीं पुस्तकें मूळ किंमतीच्या पाऊणपट (तीन चतुर्थांश) किंमतींत देण्यांत येतील. सदर पुस्तकें कायम ग्राहकांनीं स्वीकारावयाचीं आहेत.

( ३ ) दरवर्षी सामान्यपणें मुस्लिम मराठी साहित्याची दोन किंवा तीन पुस्तकें प्रकाशिलीं जातील.

( ४ ) शंभर रुपये किंवा त्याहून जास्त देणगी देणारांस मुस्लिम मराठी साहित्याचे आश्रयदाते समजण्यांत येईल व त्यांना प्रकाशित होणारीं सर्व पुस्तकें, तहाहयांत मोफत देण्यांत येतील.

( ५ ) पन्नास रुपये किंवा त्याहून जास्त देणगी देणारांस मुस्लिम मराठी साहित्याचे सहाय्यक समजण्यांत येईल व त्यांना बऱ्याच मुदतीपर्यंत प्रकाशित होणारीं पुस्तकें मोफत देण्यांत येतील.

( ६ ) पंचवीस रुपये किंवा त्याहून जास्त देणगी देणारांस मुस्लिम मराठी साहित्याचे हितचिंतक समजण्यांत येईल व त्यांना ठराविक मुदतीपर्यंत प्रकाशित होणारीं सर्व पुस्तकें मोफत देण्यांत येतील.

( ७ ) पांच रुपये आगाऊ वर्गणी देणारांस मु. म. साहित्याचे वर्गणीदार समजण्यांत येईल व त्यांना एक वर्षांत (जानेवारी ते डिसेंबरपर्यंत) प्रकाशित होणारीं पुस्तकें मोफत देण्यांत येतील.

( ८ ) सर्व पत्रव्यवहार "चालक, मुस्लिम मराठी साहित्य, सांगली S. M C." या पत्त्यावर करावा.



## शेठ जे. बी. आरवाडे

एक्स–ऑफिशियो डायरेक्टर

बार्शी स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स लिमिटेड.

श्रीमान जे. बी. आरवाडे

यांस

सप्रेम अर्पण.

# प्रणाम

१९४२ चे नवें साल उजाडले. या नव्या सालीं, ज्याच्या कृपेनें 'मुस्लिम मराठी साहित्याची' मुहूर्तमेढ रोविली जात आहे, त्या सर्व शक्तिमान परमेश्वरास प्रथम अनन्य भावानें प्रणाम करतो.

आतापर्यंत 'हजरत महंमद पैगंबर' व 'इस्लाम आणि नीतिशास्त्र' हे दोन मराठी ग्रंथ स्वतंत्रपणें प्रकाशित करून, मी मराठी साहित्याची अल्पशी व ओबडधोबड सेवा केली आणि ती सेवा महाराष्ट्र जनतेनें मोठ्या दिलदारपणानें गोड करून घेतली. यापुढें कांहीं तरी विशिष्ठ ध्येय ठेवून मराठी साहित्याची सेवा करावी असा विचार आज वर्षभर चालला होता. आज त्या विचारास 'मुस्लिम मराठी साहित्याचे' मूर्तस्वरूप आले याबद्दल मनास अत्यंत धन्यता वाटते.

'मुस्लिम मराठी साहित्यानें' आपल्यासमोर जे उज्वल ध्येय ठेवलें आहे त्याचे विवरण या पुस्तकाच्या सुरवातीस विज्ञप्ती या सदराखालीं केल्यामुळें, त्याची पुन्हा द्विरुक्ति करावयास नको. 'मुस्लिम मराठी साहित्याची' प्राणप्रतिष्ठा करतांना थोर महाभागांचे आशिर्वाद मिळाले याबद्दल अत्यंत धन्यता वाटते.

अखिल महाराष्ट्रास ललामभूत होऊन राहणारे नेक नामदार न्यायमूर्ती एम्. आर. जयकर यांच्यासारख्या विद्वर्षिंचा सुरवातीस शुभाशिर्वाद मिळाला ही भाग्याची गोष्ट होय. त्याचप्रमाणें मुंबई इलाख्याचे माजी पंतप्रधान ना. बाळासाहेब खेर, हिज हायनेस महाराजा ऑफ देवास (ज्यू), साहित्याचार्य प्रो. वामन मल्हार जोशी एम्. ए., मि. बी. एन डे सी. आय्. ई,

आय्. सी. एस्. या थोर गृहस्थानीं 'मुस्लिम मराठी साहित्यास' शुभाशीर्वाद देऊन मला उपकृत केलें आहे.

मला पितृतुल्य असणारे सांगलीचे उदाराधि नरेश, हिज हायनेस राजासाहेब यांच्या ऋणांतून कसें मुक्त व्हावें तेंच मला कळत नाहीं. त्यांचें कृपाछत्र माझ्या शिरावर असल्यामुळें मी मराठी साहित्याची थोडीफार सेवा करूं शकलो. मी एकादा संकल्प करावा आणि हिज हायनेस राजासाहेबांनीं पितृप्रेमानें पाट थोपटून तो संकल्प पुरा करावयास प्रोत्साहन द्यावें, या नेहमींच्या सत्यस्थितीस अनुसरून माझ्या मुस्लिम मराठी साहित्याच्या' संकल्पासही हिज हायनेस राजासाहेबांकडून प्रोत्साहन व आशिर्वाद मिळाला आहे हें कृतज्ञतापूर्वक नमूद करूं इच्छितो.

त्याचप्रमाणें पुण्याचे सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय मुसलमान पंडित खानबहादूर शेख अबदुल कादिर सर्फराज एम्. ए., आय्. ई. एस्.; खानबहादूर बदिउझ्झमान काझी एम्. ए.; खानबहादूर शेख याकूब एम्. बी. ई., सी. एस्.; शेख बाकरअली बी. ई. एस्.; खानसाहेब वाय्. डी. खान; प्रिन्सिपॉल एम्.. बी. हुसेन एम्. ए. बी. एस्सी. ( एडिंबरो ); प्रो. शेख चांद बी. ए. ऑनर्स ( लंडन ), बार-ॲट-लॉ; मुंबईचे सुप्रसिद्ध सर्जन डॉ. एच्. वाय्. ख्वॉजा एफ्. आर. सी. एस्., एल्. आर. सी. पी. ( लंडन ) डी. एल्. आ.; एम्. एन्. खान एम्. ए. एल्एल्. बी.; मि. ए. के. बी. काझी बी. एस्सी. ( एडिंबरो ), एन्. डी. डी. ( स्कॉटलंड ), डी. आय्. सी. ( लंडन ); ए. एल्. काझी बी. ए. एल्एल्. बी.; शेख अबदुल अर्जाझ एम्. एस्सी. ( लंडन ) प्रो. एम्. वाय्. ख्वॉजा, आमदार अजीझ गफूर काझी एम्. एल्. ए. या नामवंत सद्गृहस्थांनीं मला जें प्रेमळ प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

मुंबईचे सुप्रसिद्ध नागरीक शेख अब्दुल कादिर इंजिनीयर; शेठ इब्राहीम हसन मामूजी; ए. एम्. शेख बी. ए; एस. ए. मजीद बी. ए.; ए. आर. नाईक बी. ए.; मीर एम्. आय्. कुरेशी; एच्.ए.करोल; बार्शी स्पिनिंग व विव्हींग मिल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर जे. बी. आरवाडे; हैद्राबादचे कॉंट्रॅक्टर महमद हसन इमाम जाफर; वाईचे काजी साहेब; भाई मास्तर यांनी 'मुस्लिम मराठी साहित्यास' स्वतः सहाय्य केले व मिळवून दिले याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

'मुस्लिम मराठी साहित्यास', माझ्या मुसलमान बांधवांप्रमाणें ज्या ब्राह्मण, मराठा, जैन, लिंगायत, खिश्चन बांधवांनी जातिधर्माचा विचार न करतां मनोभावानें सहाय्य केलें, त्यांचा मला कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे.

'मुस्लिम मराठी साहित्याचें' पहिलें प्रकाशन 'गाझी कमालपाशा' आज महाराष्ट्रीय जनतेच्या सेवेशीं सादर करीत आहे. सदर प्रकाशनाच्या वेळीं चीफ ऑफ इचलकरंजी, हाजी अली महंमद, मि. उस्मानगनी हसन मुल्ला, ए. एम्. खतीब यांनी स्पृहणीय सहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

शेवटीं 'मुस्लिम मराठी साहित्य' कार्यास ज्यांनीं आशिर्वाद, प्रोत्साहन आणि सहाय्य केलें त्यांना व 'मुस्लिम मराठी साहित्य' जगविणाऱ्या असंख्य महाराष्ट्रीय बंधुभगिनींना अत्यंत आदरपूर्वक प्रणाम करून त्यांची रजा घेतो.

**सांगली**
जानेवारी १९४२

सर्वांचा नम्र,
**सय्यद अहंमद अमीन.**

# हिंदी चष्म्यांतून

## " कमाल अतातुर्क "

—*—

" कमालपाशांनीं शुद्ध राष्ट्रीयत्वाचे अत्यंत कडक व्रत स्विकारले होते."

—पंडित जवाहरलाल नेहरू.

" कमालपाशा हे हल्लींच्या इस्लामी जगांतील सर्वश्रेष्ठ मुसलमान होत."

—महंमद अल्ली जीना.

" राजकीय स्वातंत्र्याकरितां तळमळणाऱ्या सर्व व्यक्तींच्या स्मरणांतून, कमालपाशांची आठवण कदापिही नष्ट होणार नाहीं."

—सरोजनी नायडू.

" कमालपाशांच्या मृत्युमुळें जगविख्यात कर्मयोगी नाहींसा झाला आहे."

—सर होमी मोदी.

" धाडसी योद्धा आणि थोर मुत्सद्दी कालवश झाला म्हणून सारें जग दु:खानें हळहळेल."

—न्यायमूर्ति एम्. सी. छगला.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| | उपोद्घात .... .... .... | १ |
| १ | जन्म व बाळपण .... .... .... | ११ |
| २ | लष्करी शाळेंत .... .... .... | २१ |
| ३ | क्रांतिकारक तरूण .... .... .... | २७ |
| ४ | तुरुंगांतून सुटका .... .... .... | ३३ |
| ५ | पुन्हां अटकेचा हुकूम .... .... .... | ३९ |
| ६ | क्रांतीचा ध्यास .... .... .... | ४५ |
| ७ | क्रांतीचा अवेळीं स्फोट .... .... .... | ५१ |
| ८ | इटलीशीं युद्ध .... .... .... | ५९ |
| ९ | बाल्कन राष्ट्रांचा हल्ला ... .... ... | ६५ |
| १० | महायुद्धांत .... .... .... | ७२ |
| ११ | जर्मन राजधानींत .... ... .... | ८४ |
| १२ | युद्ध तहकूब .... .... .... | ८९ |
| १३ | स्वातंत्र्याकरितां धडपड.... .... .... | ९६ |
| १४ | तात्पुरतें सरकार .... .... .... | १०३ |

१५ एकमेव पुढारी .... .... .... १०९
१६ तुर्की कॉंग्रेस .... .... .... ११४
१७ शिरच्छेदाची आज्ञा .... .... .... १३१
१८ ग्रँड नॅशनल असेंब्ली.... .... .... १३६
१९ ग्रीकांचा हल्ला .... .... .... १४४
२० गाझी कमालपाशा .... .... .... १५८
२१ प्रेमपाशांत .... .... .... १६९
२२ प्रशंसनीय तारतम्य .... .... .... १७५
२३ राजकारण व धर्म यांची फारकत .... .... १८०
२४ लॉसेन परिषद .... .... .... १८७
२५ पहिले अध्यक्ष .... .... ... १९६
२६ खिलाफतीचा शेवट .... .... .... २०४
२७ कौटुंबिक आपत्ती .... .... .... २१२
२८ विरोधकांचा निःपात .... .... .... २१६
२९ सुधारणा .... .... .... २२०
३० अतातुर्क .... .... .... २३६
३१ आयुष्याचा शेवट .... .... .... २४९
३२ असामान्य विभूती .... .... .... २५४



अतातुर्क कमाल पाशा

कमालपाशांच्या पत्नी



लतीफा खानम

# अतातुर्क
# गाझी कमालपाशा

## उपोद्‌घात

-*-

**गाझी** कमालपाशासारख्या अद्वितीय महापुरुषास जन्म द्यावयाचें भाग्य ज्या देशास लाभलें, त्या देशाचें नांव तुर्कस्थान.

युरोप व आशिया या दोन खंडांच्या सरहद्दीवर तुर्कस्थान वसलेला आहे; किंबहुना युरोप व आशिया या दोन खंडांमध्यें तुर्कस्थान विभागला गेला आहे असें म्हटल्यास तें अधिक सयुक्तिक दिसेल. तुर्कस्थान हा विख्यात बायझंटाईन राज्याचा महत्वाचा प्रदेश होय. पराक्रमी तुर्कांनीं सदर प्रदेश पादाक्रांत करून त्यावर आपली कायमची सत्ता प्रस्थापित केली.

तुर्कांचें मूळ वसतिस्थान म्हणजे मध्य आशिया होय; पण तुर्कांच्या लढाऊवृत्तीला व पराक्रमाला मध्य आशियाच्या चतुः-सीमा अपुऱ्या पडूं लागल्या. आजुबाजूचा प्रदेश काबीज करीत तुर्कांनीं आशियामायनरांत पदार्पण केलें व एकेकाळीं जगविख्यात

झालेल्या बायझंटाईन राज्याबरोबर जोराची टक्कर दिली. यशो-देवतेनें तुर्कांच्या गळ्यांत माळ घातली आणि बायझंटाईन राज्याच्या पायावर तुर्की साम्राज्याची मुहूर्तमेढ रोविली गेली.

तुर्की साम्राज्याच्या संस्थापकाचें नांव उस्मान. यांचा जन्म १२९८ मध्यें झाला. आशियामायनरमध्यें अल्लाउद्दीन नांवाचा राजा एक छोटेंसें राज्य चालवीत होता. अल्लाउद्दीन राजाच्या पदरीं उस्मान हे एक सरदार होते. अल्लाउद्दीनच्या मरणानंतर उस्मान स्वतंत्र झाले व त्यांनीं आपल्या सैनिकांनीशी बायझंटाईन राज्याचे लचके तोडण्यास सुरवात केली. अडतीस वर्षांच्या अवधींत काळा-समुद्र व बास्फरससामुद्रधुनीच्या जवळचा प्रदेश पादाक्रांत करून त्यांनीं तुर्की राज्याची प्राणप्रतिष्ठा केली. त्यांच्या राज्यांत ख्रिश्चन लोकांचा भरणा होता. त्यांच्या धर्मभावना न दुखवितां उस्मान यांनीं अतिशय न्यायीपणानें राज्य केलें. उस्मान यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव आरखान हे गादीवर आले. त्यावेळीं आरखान यांचें वय बेचाळीस वर्षांचे होतें. यापुढें त्यांनीं बत्तीस वर्षें राज्यसुख भोगलें. आरखान यांनीं आपली राजधानी ब्रुसा येथें नेली. आपल्या वडिलाप्रमाणें त्यांनीं बराचसा ग्रीक प्रांत आपल्या मुलखास जोडला. कॉन्स्टँटिनोपल येथील ग्रीक बादशहाच्या थोरल्या मेहुणीशीं त्यांनीं लग्न लावलें. आरखान यांना वयाच्या बहात्तराव्या वर्षीं १३५८ मध्यें मृत्यू आला.

आरखान मागून मुराद गादीवर आले.अत्यंत पराक्रमी व मुत्सद्दी राजा म्हणून मुराद यांनीं किर्ती मिळविली. आद्रीयानोपलसुद्धां सर्व थ्रेस प्रांत जिंकून त्यांनीं युरोपमध्यें आपला ध्वज फडकावला. त्यांच्या पराक्रमाला भिऊन कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा जॉन मांडलीक बनला. थोड्याच दिवसांत बल्गेरिया व सर्व्हीया या देशांवर तुर्कांनीं स्वारी केली व तुर्कांनीं हे दोन्ही प्रदेश जिंकले. बल्गेरियाच्या राजानें आपली बहीण सिसयन हिचा सुलतान मुराद यांच्याशीं विवाह लावून दिला व तुर्की सुलतानांनीं युरोपियन राजांच्या कन्यकांशीं लग्न लावण्याची कायमची प्रथा पडून गेली! " सर्व आटोमन सुलतानांमध्यें मुराद हा अत्यंत सज्जन व धर्मभोळा होता. तो जसा शूर तसा मुत्सद्दीही होता.*" सुलतान मुराद यांच्या कारकिर्दींत तुर्कीसाम्राज्य पांचपट मोठें झालें आणि म्हणूनच मुराद यांची अत्यंत वैभवशाली तुर्की बादशहांत गणना केली जाते.

मुराद मागून त्यांचे चिरंजीव बायजीद (१३८९-१४०३) वयाच्या ३४ व्या वर्षी गादीवर बसले. बायजीद यांनीं आपल्या कारकिर्दींत आशियामायनरचा बराचसा मोठा भाग, मॅसिडोनीया, उत्तर बल्गेरिया, थिसली हे प्रदेश आपल्या राज्यास जोडले व

---

* श्रीमंत सरकार तात्यासाहेब पटवर्धन, राजेसाहेब मिरजकृत 'आटोमन साम्राज्याचा उत्कर्ष' पान ३९

वालशिया, बोस्निया व ग्रीस येथील राजकर्त्यास आपले मांडलीक बनविले. सर्व्हियाच्या राजानें आपल्या बहिणीचें बायजीदशीं लग्न लावून दिलें. बायजीद यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पांच मुलांत गादीसाठीं तंटे लागले. शेवटीं सर्वांत धाकटा मुलगा महमंद यानें गादी पटकाविली; पण अवघीं ८ वर्षें राज्याचा उपभोग घेऊन तो वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षीं वारला.

त्यानंतर दुसरे मुराद ( १४२१-१४५१ ) गादीवर आले. त्यांनीं दिर्घकाळ सुलतानपद भोगले. त्यांच्या अमदानींत युरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रांनीं एकजूट करून, तुर्कांवर हल्ला केला; पण मुराद यांनीं ख्रिस्ती राष्ट्राच्या सैन्याचा धुव्वा उडवून दिला. मुरादनंतर फत्तेमहंमद ( १४५१-१४८१ ) सिंहासनावर बसले. अत्यंत बुद्धिमान व पराक्रमी सुलतान ह्मणून फत्तेमहंमद यांनीं ख्याती संपादन केली. त्यांनीं कॉन्स्टँटिनोपल, हें अत्यंत महत्वाचे शहर, ग्रीक बादशहापासून जिंकून घेतलें. कॉन्स्टँटिनोपल जिंकल्यानंतर फत्ते-महंमद यांनीं ग्रीक धर्मगुरूला बोलावून आणले व त्याची आचार्य पीठावर स्थापना केली. फत्तेमहंमद यांची परधर्मसहिष्णुता किती श्रेष्ठ दर्जाची होती याची कल्पना खालील उताऱ्यावरून येईल: —

“ मी तुझी पॅट्रीआर्क ह्मणून नेमणुक करीत आहे. ईश्वर तुझे रक्षण करो. तुझ्यावर प्रसंग आला तर

> माझी आठवण कर, ह्मणजे मी तुझ्या सहायार्थ धांवून येईन. तुझ्या पूर्वीच्या पॅट्रीआर्कास जे अधिकार व हक्क होते ते सर्व तुजकडे चालत राहतील, असेंहि सुलतानाकडून त्याला अभिवचन मिळालें. महंमदाच्या उलट विचारसरणी हंगेरीचा देशभक्त हुन्याडी याची होती. ' कॉन्स्टँटिनोपल हस्तगत झाल्यास मी तेथील ग्रीक चर्च मोडून कॅथोलिक चर्च उभारीन ' हें हुन्याडीचे कोते व आत्मघातकी विचार कोठें आणि फत्ते महंमदाचे उदात्त व सर्वसंग्राहक विचार कोठें? तत्कालिन ख्रिस्ती व मुसलमान राजांत अंतर होतें तें हेंच होय. महंमद ह्मणत असे, ' आमच्या प्रत्येक मशिदीशेजारीं तुमचे चर्च बांधले जाईल व त्यांत प्रार्थना करावयास तुम्हांस सदर परवानगी राहील. " जिंकलेल्या प्रजेच्या मनावरील जखमेस सतत चिघळीत बसण्याचें खुनशी व अनुदार धोरण महंमदास पसंत नव्हतें. * "

फत्तेमहंमद यांनीं ठिकठिकाणीं शाळा कॉलेजें उघडलीं; दवाखाने बांधले. विद्वान लोकांना तर त्यांचा कायम उदार आश्रय

* वा. कृ. भावे ' तुर्कांचें साम्राज्य ' पान २७–२८

असे. त्यांच्या मृत्युसमयीं हंगेरी, पोलंड, रुमानिया व सबंध आशिया-मायनर म्हणजे युरोपखंडाच्या १/४ भागावर त्यांचें वर्चस्व होतें.

फत्तेमहंमदनंतर त्यांचे चिरंजीव बायजीद ( दुसरे ) गादीवर बसले. त्यांनीं एकवीस वर्षें राज्य केलें. त्यांच्या मृत्यूनंतर सलीम गादीवर आले. सलीम यांनीं अवघीं ८ वर्षें राज्य केलें; पण त्यांची ८ वर्षांची कारकिर्द अत्यंत दैदिप्यमान ठरली. त्यांनीं आशियाखंडाकडे आपला मोर्चा वळविला. त्यावेळीं आशियामध्यें अजिंक्य समजलीं जाणारीं इराण व इजिप्त हीं राष्ट्रं सलीम यांनीं जिंकलीं. त्याकाळपर्यंत इजिप्तचा बादशहा मुसलमानांचा खलीफा होता; पण सलीम यांनीं खलीफाचा मान त्याच्यापासून काढून घेतला व ते स्वतः खलीफा बनले. सुलतान सलीमपासून खिलाफत तुर्कस्थानमध्यें आली

तुर्की इतिहासांत अजरामर होऊन राहणारे सुलतान सुलेमान यांचा जन्म सलीम यांच्या पोटीं झाला. सुलतान सुलेमान यांनीं बेचाळीस वर्षें राज्यपभोग घेतला. कित्येक नवे प्रदेश जिंकून त्यांनीं तुर्कीसाम्राज्य अत्यंत विस्तृत करून टाकले. ते मोठे मुत्सद्दी, पराक्रमी, न्यायी व दिलदार सुलतान म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत तुर्कांचें वैभव कळसास पोंहोचविलें. इतिहासकारांनीं त्यांना ' वैभवशाली सुलतान ' म्हणून गौरविलें आहे.

सुल्तान सुलेमान यांचे आरमार अत्यंत प्रबळ होतें. त्यावेळीं युरोपमध्यें स्पेनचें आरमार अजिंक्य समजलें जात असें; पण स्पेन व व्हेनीसचे आरमार एकत्रित झालें असतांही त्यावर तुर्कींनीं विजय मिळविला व भूमध्यसमुद्रावर आपल्या आरमाराचें स्वामित्व प्रस्थापित केलें. आपल्या आरमाराच्या जोरावरच सुलतान सुलेमान यांनीं त्रिपोली व अल्जेरिया हे प्रांत मिळविले. त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीस "तुर्की साम्राज्यांत रुमानिया, सर्व्हिया, बोस्निया, बल्गेरिया, ग्रीस, थ्रेस व भूमध्यसमुद्रांतील बेटें मोडूं लागली. इराण, आर्मेनिया, मेसापोटेमिया, इराक, इजिप्त, आल्जे-रया, ट्युनिस, मोरोक्को, अरबस्थान यांवर तुर्की निशाण फडकूं लागलें. युरोखंडाच्या पाऊणपटीएवढें राज्य तुर्की सुलतानांनीं स्थापिलें." *

एवढ्या प्रचंड तुर्की साम्राज्यावर सुलेमानादि तुर्की सुलतानांनीं अत्यंत न्यायीपणानें राज्य केलें. आपल्या प्रजाजनांस न दुखवितां त्यांनीं राज्यशकट यशस्वीरीतीनें हांकला. विशेषतः परधर्मीय प्रजा-जनांचे हक्क पायदळीं न तुडविले जातील याविषयीं त्यांनीं अत्यंत खबरदारी घेतली. तुर्की सुलतान परधर्मीय प्रजाजनांशीं किती न्यायानें वागत होते हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे.

---

* "तुर्कांचे साम्राज्य" पान ३८

" तुर्कांनीं प्रकट केलेल्या उदार राजनीतीपासून सुधारलेल्या युरोपियन राजांनीं अवश्य बोध घ्यावा. प्रजेचा धर्म, जीवित व वित्त यांस धक्का न लावणें, किंबहुना तिच्या द्रव्यार्जनाची आणि योगक्षेमाची जीं जीं म्हणून साधनें असतील तीं तीं प्रजेपाशीं अबाधित राखणें हे धर्मशील, नीतिमान व स्वहित-तत्पर राजे आपलें कर्तव्य समजतात. सुलतानांच्या राज्यांत पॅट्रीआर्क हा ख्रिस्ती धर्माधिपति होताच. ख्रिस्ती धर्माप्रमाणेंच ख्रिस्त्यांच्या कायदेकानूंत, रीतीभातींत, वहिवाटींत व सामाजिक समारंभांत सुलतानांनीं मुळींच हात घातला नाहीं. यामुळें ख्रिस्त्यांस मनसोक्त धर्माचरण करतां आलें, पैसा कमावितां आला आणि संतती वाढवितां आली. " *

तुर्की सुलतानांची उदार राजनीती ही जगांत आदर्शवत् समजलीं जाते. प्रजेचें कल्याण तेंच आपलें कल्याण, प्रजेचा आनंद तोच आपला आनंद, प्रजेचे सौख्य तेंच आपले सौख्य, या महान तत्वाचा तुर्की सुलतानांनीं अवलंब केला होता. तुर्की साम्राज्य

* " तुर्कांचे साम्राज्य " पान ४०-४१

ह्मणजे सौख्य आणि समाधान यांचें साम्राज्य अशी यथार्थ म्हण संबंध युरोपमध्यें प्रसरत होती. युरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांतील प्रजाजन तेथील राज्यव्यवस्थेला कंटाळून तुर्की साम्राज्यांत येऊन राहत व आनंदानें कालक्रमणा करीत. एका प्रसिद्ध इतिहासकाराचे पुढील उद्‌गार अत्यंत मननीय आहेत: —

" हजारों हंगेरियन लोक आपआपल्या झोपड्यांना आगी लावून आपल्या मुलांबाळांसह तुर्की हद्दीमध्यें येऊन राहत. " *

त्याचप्रमाणें खालील उतारा लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

" त्यांच्या राजवटींत साहित्य, संगीत इत्यादि कला; तत्वज्ञान, राजनीति, जोतिष्य, न्याय इत्यादि शास्त्रें प्रकर्षास पोहोंचलीं. त्यांच्या राज्यांत सुखाचा आस्वाद घेण्यास हंगेरी, रशिया इत्यादि परराज्यांतील प्रजाही आनंदानें येऊन राहत होती. ते इस्तंबूलचे सुलतान तत्कालिन ख्रिस्ती राजांपेक्षां अधिक सुसंस्कृत व प्रजाहित तत्पर नव्हते असें कोण म्हणेल ! " ×

पण पुढें या ख्यातनाम तुर्की सुलतानांच्या उत्कर्षाला, पराक्रमाला, औदार्याला, कर्तबगारीला आणि आदर्श राजनीतीला लवकरच दृष्ट लागली. तीनशें वर्षं शुक्लेंदुवत् वाढत जाणाऱ्या उत्कर्षाला

* " The Turks in Europe " by Allen, Page 40

× " तुर्कांचें साम्राज्य " पान ४२

ग्रहण लागलें. पुढील ३०० वर्षांत तुर्कांचा पराक्रम दिवसेंदिवस निष्प्रभ होऊं लागला, त्यांच्या औदार्याचा ओघ अनाठायीं वाहूं लागला, ऐषआराम व पोकळ बडेजाव यांमध्यें आपली कर्तबगारी समाविष्ट झाली आहे असें त्यांना वाटूं लागलें. राजकारण नालायख व ऐदी लोकांच्या हातीं गेलें, जुन्या व बुरसलेल्या विचारांच्या मुल्ला-मौलवींचा पगडा दिवसेंदिवस अधिकाधिक बसूं लागला.

आणि या सर्व अनिष्ट गोष्टींचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सहाशें वर्षांची आयुमर्यादा गांठलेल्या तुर्की साम्राज्याची शकलें उडालीं; सर्व्हिया, रुमानिया, बल्गेरीया, ग्रीस वगैरे युरोपांतील राष्ट्रें आणि इजिप्त, इराण, इराक, सीरीया अरबस्तान वगैरे आशियांतील राष्ट्रें तुर्की साम्राज्यांतून फुटून निघालीं. ज्या राष्ट्रांना तुर्कांनीं एकेकाळीं गुलाम करून टाकलें होतें, त्याच राष्ट्रांच्या पायाशीं लोळण घेण्याचा दुर्धर प्रसंग तुर्कांवर ओढवला! इतकेंच नव्हे तर, युरोपांतील ख्रिश्चन राष्ट्रांच्या कारस्थानास बळी पडून जगांतील आपलें अस्तित्व गमावून बसण्याची पाळी आली.

अशा दुर्धर प्रसंगीं नष्टप्राय झालेल्या आपल्या तुर्की राष्ट्राचा, अपमानित झालेल्या आपल्या मातृभूमीचा, अधोगतीस गेलेल्या आपल्या देशाचा, उद्धार करणारा महापुरुष निर्माण झाला. या महापुरुषाचे नांव **गाझी कमालपाशा.**

## प्रकरण १ लें

—××—

# जन्म व बालपण

तुर्कस्थानच्या इतिहासांत सन १८८१ हें भाग्यशाली साल ठरलें. यासालीं तुर्कस्थानचा उद्धार करणारा महाभाग जन्मास आला. या महाभागाचें नांव, आईबापांनीं मोठ्या प्रेमानें मुस्तफा असें ठेविलें. याच मुस्तफांना, पुढें सारें जग गाझी कमालपाशा या नांवानें ओळखूं लागलें.

सलानिका शहरांतील एक जुनाट किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेल्या एका मोडक्यातोडक्या घरांत मुस्तफांचा जन्म झाला. आणि ते घरही किती अरुंद बोळांत आणि किती अव्यवस्थित; हवा किंवा प्रकाश येण्याकरितां धड खिडकी ना झरोका; एखादा असलाच तर तो जाड जाळीनें व्यापलेला. घराचें दार तर सदैव बंद केलेलें असावयाचें. तेंच घर काय, पण त्या मोहल्यांतील सर्व तुर्की लोकांचीं घरें त्या नमुन्याचीच.

घरांत माणसांची हालचाल आहे किंवा नाहीं याचा थांगपत्ता देखील शेजाऱ्याला लागत नसे. रस्त्यावरही तशीच निस्तब्ध शांतता. कधीं कधीं लहान मुलें रस्त्यावर खेळत असतां किंवा एखादा म्हातारा खोकत घराबाहेर उभा असतां काय ती रस्त्यावरची शांतता भंग व्हावयाची! बायकांत गोषाची चाल अत्यंत कडक असल्यामुळें घराबाहेर स्त्री म्हणून दिसावयाची नाहीं. अगदीं नाईलाज झाला तरच पाणी आणण्याकरितां म्हणून एकादी स्त्री तोंडावर बुरखा घेऊन व फक्त एकच डोळा उघडा ठेवून, झपाझप पावलें टाकीत, तलावाकडे जात असलेली दिसत असे.

अशाच चोवीस तास पडद्यांत राहणाऱ्या व बाह्य जगांशीं संपर्क नसणाऱ्या आईच्यापोटीं मुस्तफांनीं जन्म घेतला. त्यांच्या आईचें नांव जुबेदा खानम. मुस्तफांना जन्म दिला त्यावेळीं त्यांचें वय तीस वर्षांचें होतें. पण वयाच्या ७ व्या वर्षापासूनच त्यांना गोषांत ठेवण्यांत आले होते. आपल्या घराबाहेर त्या सहसा जात नसत. घरांतील मंडळी व शेजारच्या बायकांशींच फक्त चार शब्द बोलत. त्यांना लिहीतां वाचतां अजिबात येत नसे आणि आपल्या घराबाहेर काय जग आहे याची त्यांना कल्पना देखील नव्हती.

पण आपल्या कुटुंबांतील मंडळींवर त्यांचें जबरदस्त वजन असें. त्यांचा शब्द मोडण्याची कोणाच्याही अंगांत हिंमत नव्हती.

त्यांचा जन्म शेतकरी वर्गांत झाल्यामुळें त्यांचें हाडपेर मजबूत होतें. त्यांचा बांधा डौलदार व उंच होता; डोळे घारे व टपोरे होते. त्या वृत्तीनें अत्यंत धार्मिक व जुन्या वळणाच्या होत्या; तल्लख बुद्धी व अचुक निर्णय देण्याची वृत्ती यामुळें त्यांची विलक्षण छाप पडे.

अली रझा हें मुस्तफा यांच्या वडिलांचें नांव. ते सलानिका बंदरांत कस्टम अधिकारी होते. त्यांचा स्वभाव शांत, सरळ व प्रामाणिक होता. त्यांच्या बरोबरचे इतर नोकर व अधिकारी लांच-लुचपत घेत; पण अली रझा यांनीं आपल्या सबंध हयातींत लांच म्हणून एक छदामही कुणाकडून घेतला नाहीं. पवित्र कुराणच्या आज्ञेप्रमाणें, 'लांच देणें हा महाभयंकर गुन्हा आहे' असें ते मानीत. इस्लामचा आधारस्तंभ म्हणविणाऱ्या खलीफाच्या राज्यांत हा गुन्हा सर्रास व बिनधोकपणें चालत आहे हें पाहून त्यांना खलीफाच्या-सुलतानाच्या राज्यपद्धतीची कींव वाटत असे.

लांचलुचपती बरोबर खलीफाच्या राज्यात घडत असलेले इतर अक्षम्य व अनन्वित प्रकार पाहून त्यांना अत्यंत खेद होई. पूर्वींचे ते प्रजाहित तत्पर, न्यायी व थोर अंतःकरणाचे खलीफा आणि आतांचा हा प्रजेच्या हिताविषयीं उदासीन राहणारा

अन्यायी, अजागळ व बुरसटलेल्या मनोवृत्तीचा खलीफा यामध्यें तुलना करतांना ते निराशेचे सुस्कारे टाकीत.

पाश्चात्य राष्ट्रें आपली प्रगति किती झपाट्यानें करून घेत आहे, किती संपन्न व बलवान होत आहेत याची माहिती ते न चुकतां वर्तमानपत्रांत वाचीत. त्याबरोबरच आपल्या राष्ट्रांत मुल्ला मौलवींकडून होत असलेली सुधारणांची गळचेपी, प्रगतीची कुचंबणा व नवविचारांची अवहेलना ते व्यथित अंतःकरणानें पहात व तुर्कांच्या भीषण भवितव्याविषयीं तासचे तास विचार करीत बसत.

'आपले वय झालें. आपल्या हातून आपल्या देशबांधवांची काय सेवा घडणार? अधःपाताच्या धारेस लागलेल्या आपल्या राष्ट्राचें संरक्षण आपल्या हातून कसें होणार?'

इतक्यांत त्यांच्या लाडक्या मुलाची आठवण होई. मुस्तफांची आठवण झाल्याबरोबर त्यांचा निराशावाद मावळून जाई, त्यांचा चेहरा प्रफुल्लित होई, त्यांच्या डोळ्यांत निश्चयाचें तेज चमकूं लागे.

आपल्या लाडक्या मुस्तफास उत्कृष्ट शिक्षण द्यावें, त्याला जर्मनीस पाठवून तज्ज्ञ करावा आणि लाखों तुर्कांचा

आदर्श बनवून टाकावा, अशा उच्च व सुखद आकांक्षानीं त्यांचें हृदय कंपित होत असे.

अली रझांच्या त्या उच्च आकांक्षा खऱ्या होणार असे उद्गार मुस्तफा यांच्याकडे पाहून कुणीही काढले असते. सर्वसाधारण मुलांपेक्षां कांहीं तरी निराळे व्यक्तित्व मुस्तफा यांच्या अंगीं होतें. त्यांच्या पाणीदार व तेजस्वी डोळ्यांकडे पाहील्यानंतर ते कुणीतरी अद्वितीय होणार असें कुणालाही वाटे.

एवढ्या लहान वयांत मुस्तफा यांची वृती गंभीर असे. ते सहसा मुलांमधें खेळत नसत. आपल्या कपड्यांची व्यवस्था टापटीप ठेवींत. मळलेला पोषाख त्याना खपत नसे. अजागळ व बेडौल तुर्की पोषाखाचा त्यांना तिटकारा वाटे. त्यांचे कपडे नव्या पद्धतीनें व व्यवस्थित शिवलेले असत. पेहेराव व आचार विचारांत मुस्तफांनीं आपल्या वडिलांचा कित्ता आपल्या समोर ठेविला होता.

मुस्तफा कमाल यांना ७ वें वर्ष लागलें. त्यांना शाळेंत घालावयाचा दिवस उजाडला मुलास शाळेंत घालावयाचें झालें म्हणजे तुर्की मुसलमान एक विशिष्ट रिवाज पाळीत. त्या रिवाजाप्रमाणें त्यांचें लहानसें घर त्यादिवशीं लतापल्लुवांनीं शृंगारित केलें होतें. मुस्तफांच्या आईनें मुस्तफांना न्हावूं घालून त्यांच्या अंगावर पांढरा शुभ्र पोषाख चढविला व सोनेरी काठांचा फेटा बांधला.

ठरल्यावेळीं एक मुल्ला कांहीं मुलांसह आला व दारासमोर उभा राहून त्यानें प्रार्थना म्हटली. मुस्तफांनीं त्या मुल्लाला अभिवादन केलें व त्याच्या कपाळाचें चुंबन घेतलें. बाजूस उभे असलेल्या आपल्या मातापित्यांचें चुंबन घेऊन शाळेंत जाण्याकरितां घराबाहेर पाय टाकला. मुस्तफांचा हात धरून तो मुल्ला चालला होता व मागून मुलांची फौज चालली होती. ते सर्वजण मशिदींत असणाऱ्या एका शाळेंत दाखल झाले. त्या ठिकाणीं पुन्हां एकवार प्रार्थना केल्यानंतर मुल्ला मुस्तफांना घेऊन एका वर्गांत गेला व आपल्या जवळ बसवून त्यानें मुस्तफांना पवित्र कुराणाचा पहिला पाठ दिला.

मुस्तफा त्या मुसलमानी शाळेंत नियमीत जात असत. बरेच दिवस गेले; पण त्यांची अभ्यासांत प्रगती दिसेना. पुराण्या शिक्षण-पद्धतीमुळें त्यांच्या तल्लख बुद्धीला वाव मिळेना. शेवटीं अली रझानीं त्यांना त्या शाळेंतून काढून इंग्रजी पद्धतीवर चाललेल्या एका खासगी शाळेंत घातले.

जुबेदा खानम यांना मुस्तफास मुसलमानी शाळेंतून काढले याबद्दल प्रथम वाईट वाटलें; पण त्या खाजगी शाळेंतील शिक्षणाची पद्धत व मुस्तफाच्या अभ्यासांतील प्रगति पाहून झालेला बदल योग्य आहे असें त्यांना वाटले. मुस्तफांची कुशाग्र बुद्धि पाहून त्या शाळेच्या शिक्षकास अत्यंत आनंद वाटे व तो मोठ्या उत्साहानें

मुस्तफांस शिकवत असे. शाळेंतून घरीं आल्यानंतर अली रझा मुस्ताफांना अभ्यासांत मदत करीत. फावल्या वेळांत जुबेदा खानम मुस्तफांना उपदेशाच्या व पराक्रमाच्या अनेक रसभरीत गोष्टी सांगत व ते तन्मयतेनें ऐकत.

मुस्तफांचें कौटुंबिक जीवन अत्यंत रेखिव व प्रमाणबद्ध असे. घरीं आल्याबरोबर वडिलांच्या हाताचें प्रेमानें चुंबन घेऊन अदबीनें उभे राहणें व वडिलांची आज्ञा झाल्यानंतरच खालीं बसणें, अशा गोष्टींचें बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळालें होतें. आईबद्दल तर मुस्तफांच्या अंतःकरणांत अनन्यभक्ति होती. वडिलाप्रमाणें किंबहुना त्यांच्यापेक्षां अधिक आदर त्यांना आपल्या आईबद्दल वाटे.

मुस्तफांच्या शाळेचा खर्च वाढूं लागला. अली रझांना पगार भरपूर मिळत नसल्यामुळें खर्चाची तारांबळ उडूं लागली. ते प्रामाणिक असल्यामुळें पगारा खेरिज वर मिळणाऱ्या पैशास शिवत नसत. शेवटीं अली रझांनीं ती नोकरी सोडली व लाकडाचा व्यापार सुरू केला. त्यांचा स्वभाव साधाभोळा असल्याकारणानें व्यापारांत त्यांचा जम बसेना. ते रात्रंदिवस श्रम करीत पण अपेक्षेप्रमाणें प्राप्ती होईना. शेवटीं त्या धंद्यांत त्यांना जबरदस्त खोट बसली.

दुर्दैवानें अली रझांना एकाएकी मृत्यु आला. मुस्तफा व त्यांची बहीण मकबुला पोरकीं झालीं. लाकडाच्या व्यापारात भयंकर नुकसान आल्यामुळें घरामध्यें एक कवडीही शिल्लक नव्हती. जुबेदा खानम धैर्यवान होत्या. त्यांनीं आलेल्या संकटास तोंड देण्याचें ठरविलें. आपल्या दोघां मुलांस बरोबर घेऊन त्या एका खेड्यांत राहणाऱ्या आपल्या बंधूकडे निघून गेल्या. ते खेडेगांव असल्यामुळें, त्या ठिकाणीं शाळेची व्यवस्था नव्हती. मुस्तफांची शाळा आपोआपच सुटली व मामांच्या घरीं गाईचा गोठा साफ करणें, गाईना चारा घालणें व शेळ्या चरावयास नेणें अशीं कामें त्यांच्या गळ्यांत पडली. अंगमेहनत व उघडी हवा यामुळें मुस्तफांची प्रकृति कणखर व सशक्त बनली. जसजसें त्यांचें वय वाढत गेलें तसतसें ते अधिकाधिक गंभीर व एकलकोंडे बनूं लागले. आपला लाडका मुलगा असा वाया जातो आहे असें पाहून जुबेदा खानम यांचे अंतःकरण तीळतीळ तुटूं लागलें. जन्म-भर आपल्या मुलानें गुराखी किंवा काबाडकष्ट करणारा शेतकरी म्हणून राहावें ही कल्पना त्यांना असह्य वाटूं लागली.

जुबेदा खानम यांनीं आपल्या एका बहिणीला गळ घालून तिला मुस्तफांच्या शाळेचा खर्च द्यावयास भाग पाडले आणि अशा रीतीनें पुन्हां सलानिकांतील शाळेंत त्याची रवानगी झाली. यावेळीं

मुस्तफांना अकरावें वर्ष लागलें होतें. आईनें शाळेंत घालवयाचा प्रयत्न केला नसता तर मुस्तफा आयुष्यभर शेतकरी होऊन राहिले असते; तुर्कस्थानच्या हिताहिताची पर्वा न करितां चार चौघा शेतकऱ्यांप्रमाणें त्यांनीं आपलें जीवित कंठीलें असतें. पण आईच्या प्रयत्नामुळें मुस्तफांच्या नशीबास कलाटणी मिळाली, उत्कर्षाच्या सोपानाचा रस्ता दिसला, आपल्या राष्ट्राचें उद्धार करण्याचें भाग्य त्यांना लाभलें.

शाळेंत गेल्याबरोबर मुस्तफांनीं आपल्या बुद्धीमत्तेनें वर्ग बंधूंस दिपवून टाकले. अत्यंत हुषार व क्वचितच हंसणारा विद्यार्थी ह्मणून त्यांची ख्याती झाली. त्यांचे तेजस्वी डोळे व आत्मविश्वास यामुळें ते पुढेंमागें कुणीतरी असाधारण होणार असें भाकित विद्यार्थी वर्ग करूं लागला.

आपला कुणी अपमान केला तर तो मुस्तफांना सहन होत नसे. त्या अपमानाचा बदला ते ताबडतोब घेत. एक दिवस एका विद्यार्थ्यानें निष्कारण आपला अपमान केला म्हणून मुस्तफांनीं त्या विद्यार्थ्याचें थोबाड रंगविलें. हा प्रकार हाफीज नांवाचा शिक्षकानें पाहिला. त्या शिक्षकाचें व मुस्तफांचें बरें नव्हतें. आपल्या आवडत्या विषयाबद्दल मुस्तफा उपहास दर्शवितो याबद्दल त्या शिक्षकाच्या

मनांत मुस्तफाविषयीं राग होता. हा राग काढण्याचा त्या शिक्षकास आयताच मोका मिळाला.

" मुस्तफानें काय म्हणून त्या विद्यार्थ्याचें थोबाड फोडलें ? "

वर्गांत शांतता पसरली

" काय कुणीच बोलत नाहीं " शिक्षक कडाडले.

" माझा निष्कारण अपमान केला म्हणून मीच त्याला मारलें, " मुस्तफांनीं बेडर आवाजांत उत्तर दिलें.

" असें काय ? आतां तुला मार खाल्ला पाहिजे "

" मला मार काय म्हणून ? माझाच अपमान आणि त्याबद्दल मलाच मार. हा निव्वळ अन्याय आहे. मी निष्कारण त्याला मारलें असतें तर आपलें म्हणणें मी योग्य मानलें असतें "

" ते कांहीं नाहीं. बदला हा मिळालाच पाहिजे, " त्या शिक्षकानें मुस्तफाला घट्ट धरून ठेविले व मुस्तफापेक्षां ताकतवान असणाऱ्या एका विद्यार्थ्याकडून मुस्तफांना खरपूस मार देवविला.

मुस्तफा एक शब्दही न बोलतां आपल्या बांकावर जाऊन बसले. वर्ग सुटल्यावर ते निश्चयी मुद्रेनें शाळेच्या बाहेर आले व पुन्हां त्या शाळेंत पाऊल टाकावयाचे नाहीं असें ठरवून ते झपाझप पावलें टाकीत आपल्या घरीं पोहोंचले.

## प्रकरण २ रें

—××—

# लष्करी शाळेंत.

जुबेदा खानम यांनीं मुस्तफास पुन्हां शाळेंत जाण्यास परोपरीनें सांगितलें; पण त्या शाळेंत पाऊल टाकणार नाहीं असें मुस्तफांनीं स्वच्छ उत्तर दिलें. शेवटीं धाकदपटशा देऊन पाहिला पण त्याचा काडीमात्र उपयोग झाला नाहीं. आपल्या लाडक्या मुलाचें पुढील आयुष्य कसें जाणार या विवंचनेंत त्या प्रेमळ माऊलीचे रात्रंदिवस जावूं लागले. निदान दुसऱ्या शाळेंत तरी आपल्या मुलास पाठवावे असा जुबेदा खानम यांनीं विचार केला व त्या शाळेचा खर्च सोसण्यास त्यांनीं आपल्या बहिणीस विनंती केली. पहिल्या शाळेसच जर मुस्तफा जात असेल तर आपण शिक्षणाचा खर्च सोसूं; पण दुसऱ्या शाळेचा खर्च आपण सोसणार नाहीं, असें त्यांच्या बहिणीनें स्वच्छ सांगितलें.

मुस्तफांना शाळेंत न घालतां लष्करी शिपाई बनवावें असें मुस्तफांच्या चुलत्यानें जुबेदा खानम यांना सुचविलें. त्यावेळीं सलानिकामध्यें ' मिलीटरी कॅडेट स्कूल ' नांवाची लष्करी शाळा होती. त्या शाळेचा सर्व खर्च तुर्कस्थानच्या सुलतानाकडून होत असल्यामुळें, त्या शाळेंत मुस्तफांना घातले तर कांहींही खर्च न येतां मोफत शिक्षण मिळेल.लष्करी शाळेंत त्यानें आपल्या बुद्धीची चुणूक दाखविली तर पुढेंमागें मुस्तफा एखादा लष्करी अमलदार होईल. नाहींतर लष्करी शिपाई म्हणून तरी आपले पोट भरेल. तेव्हां त्या लष्करी शाळेंतच मुस्तफास पाठवून देणें योग्य व हितावह आहे, असा मुस्तफांच्या चुलत्यानें युक्तिवाद मांडला.

पण जुबेदा खानम यांना हा युक्तिवाद पटला नाहीं. लष्करांत जाऊन आपला मुलगा हडेलप्पी बनावा हें त्यांना पसंत पडेना. मुलानें धर्मपंडित होऊन किर्ती मिळवावी अशी त्यांची मनीषा होती. त्यावेळीं मुल्ला, मौलवी किंवा धर्मपंडित यांची फार कदर होती. खुद्द सुलतान देखील त्यांचा शब्द मोडत नसे. मुस्तफा अशा तऱ्हेचा धर्मपंडित झाल्यास आपल्या कुळाचें नांव होईल अशी त्यांची ठाम समजुत असल्यामुळें मुस्तफांना लष्करी शाळेंत पाठवावयास त्या तयार नव्हत्या. आपल्या आर्थिक परिस्थितीमुळें मुस्तफांना चुलत्याचा सल्ला योग्य वाटला. त्यांच्या शेजारीं

अहंमद नांवाचा एक नवजवान तरुण रहात होता. तो लष्करी शाळेंत असल्यामुळें, सुट्टींत ज्यावेळीं घरीं येई त्यावेळीं तो लष्करी पोषाखांत वावरे. त्याचा ऐटबाज लष्करी पोषाख, त्याचा तो रुबाब पाहून, आपणही लष्करी शाळेत जाऊन असाच लष्करी पोशाख करावा,असेंच रुबाबानें हिंडावे असे मुस्तफांना वाटूं लागले. त्यांना आपण लष्करी शाळेंत केव्हां दाखल होऊं असे होऊन गेले.कुणालाही न कळवितां, त्यांनीं मेजर कार्द्री नांवाच्या एका रिटायर्ड लष्करी अधिकाऱ्याला गांठले.हा लष्करी अधिकारी त्यांच्या वडिलांचा स्नेही होता. त्या अधिकाऱ्याची विनवणी करून, लष्करी शाळेच्या प्रिन्सिपालजवळ त्याला आपलें वजन खर्च करण्यास भाग पाडलें. झाले; मुस्तफांना लष्करी शाळेंत जाण्यापूर्वीच्या चांचणी परिक्षेला बसण्याची परवानगी मिळाली.सुदैवानें त्या परिक्षेंत ते उत्तम रीतीने उत्तीर्ण झालें. बिचाऱ्या आईला या साऱ्या धडपडीचा थांगपत्ताही नव्हता.

मुस्तफांच्या बुद्धीला कॅडेट स्कूलमध्येंही योग्य वाव मिळाला. बौद्धिक शिक्षणामध्यें त्यांची चालणारी मती अप्रतिहतपणें लष्करी शिक्षणांतही यशस्वी रीतीनें मार्ग आक्रमूं लागली; पण पूर्वीचा एकलकोंडेपणाचा स्वभाव मात्र जशाच तसाच राहील. त्या लष्करी शाळेंत त्यांना मित्र म्हणून कोणी नव्हताच. शाळेंतील मुलांशीं तें

कधींही मिळत नसत. त्यामुळें बहुतेक विद्यार्थी वर्ग त्यांच्यापासून फटकून वागत असे. आपण जरी विद्यार्थ्यांत मिसळलो नाहीं तरी इतर विद्यार्थ्यांपेक्षां आपण सरस आहोंत असें जगानें म्हणावे किंवा चार चौघांत आपला प्रामुख्यानें उल्लेख केला जावा असें मात्र त्यांना मनापासून वाटत असे. "मी तुमच्या चारचौघांसारखा राहावा असें मला वाटत नाहीं. मी कुणीं तरी नांव घेण्यासारखें व्हावें, अशी महत्वाकांक्षा आहे" असे विद्यार्थ्यांना स्पष्ट म्हणत.

सर्व लष्करी विषय, विशेषतः गणीतशास्त्र यामध्यें त्यांची बुद्धि कुशाग्र असल्यामुळें, लष्करी शाळेंत त्यांनीं आपली झपाट्यानें प्रगति करून घेतली. कॅप्टन मुस्तफा नांवाच्या एका शिक्षकाचें त्यांच्यावर अत्यंत प्रेम असें. त्या शिक्षकानें मुस्तफाना विद्यार्थी--शिक्षक, म्हणून निवडून काढून त्यांच्या ताब्यांत एक ज्यूनियर क्लास दिला. थोड्याच दिवसांत तर लष्करी शाळेंत मुस्तफांचा बोलबाला झाला. मुस्तफांचें असामान्य व्यक्तित्व पाहून त्यांच्या शिक्षकांनें त्यांना कमाल, म्हणजे असामान्य असें नांव दिलें. आपणही त्यांना कमाल या नांवानेंच संबोधू.

लष्करी शाळेंतील परिक्षा भराभर व उत्कृष्ट रीतीनें पास होत व त्याचबरोबर मुलांना शिकण्याचें कार्य करित,

कमाल शेवटच्या वर्गांत पोहोचले. या वर्गांत पास होऊन वर नंबर आला तरच ' सिनीयर मिलिटरी स्कूल ' मध्यें प्रवेश मिळणार होता. सर्वांत वर नंबर मिळावा म्हणून त्यांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा चालूं ठेवली होती. एखादा विद्यार्थी आपल्यापेक्षां सरस निघतो आहे असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तर त्यांना फार वैषम्य वाटे. आपल्यापेक्षां कुणी वरचढ असूं नये, असें त्यांना मनापासून वाटत असें. ' जगावें तर सर्वांच्या नजरेंत भरण्यासारखें जगावें, नाहींतर जगून उपयोग तरी काय, ' अशा महत्वाकांक्षी विचाराचा पगडा त्यांच्या मनावर कायम बसला होता.

यावेळीं कमाल यांना १७ वें वर्ष लागलें होते. कॅडेट स्कूलमधील शेवटची परिक्षा ते उत्तम रीतीनें उत्तीर्ण होऊन त्यांचा नंबर सर्वांत वर लागला होता. मोनास्टीरमधील ' सिनीयर मिलटरी स्कूलमध्यें ' त्यांना पाठविण्यांत आले. मोनास्टीर हें त्यावेळीं तुर्कस्थानमधील राजकारणाचें एक केंद्र समजलें जात असें. तुर्कस्थानमध्यें होणाऱ्या चळवळी किंवा जागृती यांचा उगम मोनास्टीरमधूनच प्रथम होत असे. कमाल मोनास्टीर येथें विद्याभ्यासाकरितां गेल्यानंतर सहाजिकच त्यांचें लक्ष नवजवान तरुणांच्या चळवळीकडे गेलें. तुर्कस्थानचा सुलतान अबदुल हमीद याच्या नालायख राज्यपद्धति विरुद्ध तरुणांनीं प्रचार चालविला होता. ऐदी व लांचखाऊ

अधिकारी वर्गांमुळें राष्ट्रामध्यें कसा असंतोष माजला आहे, न्यायाची कशी गळचेपी होत आहे, गरीब प्रजा कशी भरडून निघत आहे, मुल्लामौलवींचें कसें स्तोम माजलें आहे याचें भडक व हृदय-विदारक चित्र जनतेपुढें ठेवावयाचें कार्य तरुणांकडून पद्धतशीर चाललेलें होतें. तरुणांच्या या प्रचाराचा परिणाम जनतेवर होऊं लागला; जिकडे तिकडे सुलतानाबद्दल अप्रीती पसरूं लागली; राज्य व्यवस्थेबद्दल तिटकारा उत्पन्न होऊं लागला; ठिकठिकाणीं क्रांतिकारकांचे अड्डे तयार होऊं लागले; बंडाचीं पूर्वचिन्हें क्षितीजावर दिसूं लागलीं.

कमाल यांनीं अधाशीपणानें सर्व परिस्थिती न्याहाळून पाहिली; लोकमताचा कानोसा घेतला. कमाल निसर्गतः क्रांतिकारक होते; त्यांचें रक्त उसळी खावूं लागलें. सुलतानाची नालायख राजवट उलथून टाकण्याचे विचार त्यांच्याही मनांत जोरानें उसळी मारूं लागले. आपण क्रांतिकारकांचे पुढारी व्हावे, सुलतानाला उखडून टाकून सर्व राष्ट्राची अंतःशुद्धि करावी आणि राष्ट्राचा उद्धारकर्ता म्हणून जगांत किर्ती गाजवावी, अशा उत्तुंग महत्वाकांक्षेनें त्यांच्या अंतःकरणांत कायमचें ठाणें दिलें.

## प्रकरण ३ रें

—xx—

# क्रांतिकारक तरुण

मोनास्टीरहून सुट्टीमध्यें कमाल सलानिकास परत आले.आपल्या गांवीं परत आल्यावर निष्कारण वेळ न दवडतां त्यांनीं पाद्री-लोकांजवळ फ्रेंच भाषेचा अभ्यास केला. त्याचवेळीं फत्तेही नांवाचा एक उमदा व समवयस्क तरूण त्यांना स्नेही म्हणून लाभला. फत्तेहीचें फ्रेंच भाषेवर चांगलें प्रभुत्व होतें. कमाल आणि फत्तेही या दोघांनीं मिळून व्हॉल्टेअर, रूसो, हॉब्स, मिल यांचे ग्रंथ अभ्यास पूर्वक वाचून काढले; याखेरीज आणखी कांहीं फ्रेंच ग्रंथांचे उत्कृष्ट परिशीलन केलें.वरील ग्रंथकारांचे ग्रंथ जवळ बाळगण्याची सरकारनें सक्त बंदी केली होती. त्या बंदीला न जुमानतां कमाल यांनीं हे सर्व ग्रंथ आत्मसात केले. त्या ग्रंथांच्या अभ्यासानें त्यांची दृष्टि प्रगल्भ झाली, त्यांचे विचार अधिकच क्रांतिकारक बनले.

लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि स्वायत्तता या महान तत्वांचें बजिारोपण त्यांच्या अंतःकरणांत झालें.

याचवेळीं ग्रीसनें तुर्कस्थानविरुद्ध युद्ध पुकारलें. ही वेळ अत्यंत आणीबाणीची होती. तुर्कस्थान निःसत्व व कमजोर झालेला पाहून ग्रीसनें मोठ्या आवेशानें व हिरीरीनें तुर्कस्थानवर झडप घातली. आपलें राष्ट्र धोक्यांत आहे असा नवजवान तुर्कांनीं पुकारा केला. राष्ट्राच्या संरक्षणाकरितां सर्व तरुणांनीं संघटणा करावी अशी द्वाही फिरविली. तरुणांचा हा दुर्दम्य उत्साह व देशभक्ति पाहून सुलतानाचें धाबें दणाणलें. त्याला वाटले कीं, राष्ट्रसंरक्षणाच्या निमित्तानें सर्व तरुण तुर्क संघटित होऊन आपले सिंहासन उलथून पाडणार ! त्यानें मागचा पुढचा विचार न करतां तरुणांच्या संघटनेची चळवळ दडपून टाकावयास सुरवात केली; सांपडेल त्या संशयित तरुण तुर्कांना तुरुंगांत डांबावयाचा उपक्रम सुरू केला. ठिकाठिकाणीं गुप्त हेर ठेवण्यांत आले. सुलतानानें सबंध राष्ट्रभर गुप्तहेरांचें इतकें जाळें पसरून ठेविलें होतें कीं, ज्या ठिकाणीं तीन माणसें एकत्र बोलत असतील त्याठिकाणीं एकतरी गुप्तहेर तरंगत असावयाचाच. सुलतान या हेराकरितां दरसाल २० लक्ष पौंड खर्च करूं लागला. या गुप्तहेरांनीं बातमी

दिली कीं, ताबडतोब संशयिताची तुरुंगांत रवानगी व्हावयाला फारसा वेळ लागत नसे.

सुलतानाच्या या कृत्यामुळें जनतेमध्यें असंतोषाच्या ज्वाला अधिकच फैलावूं लागल्या. राष्ट्राच्या संरक्षणाकरितां आत्मार्पण करूं पाहणाऱ्या तरुणांच्या हातापायांत बेड्या पडतांच राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून क्रांतीच्या गर्जना ऐकूं येऊं लागल्या. कमाल यांच्या मनांत लष्करी शिक्षण सोडून देऊन स्वातंत्र्य युद्धांत उडी घ्यावी असें वारंवार येऊं लागले; पण याच लष्करी शिक्षणाचा आपणाला भविष्यकाळीं अतिशय उपयोग होईल, असा विचार करून आपला अभ्यासक्रम पूर्ण करावयाचें त्यांनीं ठरविलें.

'सिनियर मिलीटरी स्कूलमध्यें' सर्व परिक्षा चांगल्या रीतीनें पास झाल्यावर त्यांची 'जनरल स्टॉफ कॉलेज' साठीं निवडणूक झाली व त्यांना सब-लेफ्टनंटचा हुद्दा मिळाला. 'सिनियर मिलीटरी स्कूल' मध्यें अत्यंत बुद्धीमान पण आवरण्यास कठीण असा तरूण अशा तऱ्हेचा शेरा त्यांना मिळाला होता. 'जनरल स्टाफ कॉलेज' मध्यें जाण्याकरितां त्यांनीं कॉन्स्टँटिनोपलचा-तुर्कस्थानच्या राजधानीचा-रस्ता सुधारला. तेथें गेल्यावर त्यांनीं कसून अभ्यास केला आणि तेथील सर्व परिक्षा स्पृहणीयरितीनें पास झाल्यानंतर त्यांना १९०५ मध्यें कॅप्टन करण्यांत आलें.

त्या लष्करी कॉलेजमध्यें त्यांच्यासारखेच तरणेबांड व नव-विचाराचे लष्करी अधिकारी होते. त्यांच्यामध्यें व कमालमध्यें विचारसाम्यता होती. कमालप्रमाणेंच त्या तरुण अधिकाऱ्यांनींही आपल्या राष्ट्राच्या अभ्युदयाची तळमळ लागून राहिली होती. परकीय आक्रमणापासून व सुलतानाच्या ऐदी राजकारभारापासून आपल्या राष्ट्राला सोडवून त्याला कर्तत्ववान व स्वावलंबी करण्याची हिंमत त्यांच्या अंतःकरणांत उचल खात होती. 'तुर्की राष्ट्राचे आम्हीं घटक आहोंत आणि आमच्या राष्ट्राला स्वतंत्र करणें हें आमचें आद्यकर्तव्य आहे,' असे विचार ते उघड उघड बोलून दाखवीत.

कमाल व त्यांचे तरुण सहकारी यांच्या उज्वल ध्येयाबद्दल कॉलेज अधिकाऱ्यांची संपूर्ण सहानुभूती होती; पण सुलतानाच्या भीतीनें त्यांना उघडपणें मदत करावयास किंवा त्यांचा पुढाकार घेण्यास ते धजत नसत. त्यावेळीं कॉलेजमध्यें '**वतन**' नांवाची एक गुप्त क्रांतिकारक संस्था होती. या संस्थेमध्यें गुप्तपणें वादविवाद होत असत व संस्थेचे विचार कागदावर लिहून ते प्रत्येक सभासदाकडे हातोंहात रवाना होत असत. सुलतानाची जुलमी सत्ता झुगारून देऊन राष्ट्र स्वयंशासित करावयाचें त्यांचें ध्येय होतें. त्याचप्रमाणें

राष्ट्राची प्रगति स्थगित करणाऱ्या मुल्लामौलवी आणि धर्मपंडीत यांच्या विरुद्ध त्या संस्थेनें रणशिंग फुंकलें होतें.

" सुलतानांची नालायख सत्ता नेस्तनाबूद करून त्या ठिकाणीं लोकसत्ताक राज्याची प्रतिष्ठापना करूं, सर्व धर्मांच्या लोकांना सारखे हक्क देऊं, मुल्ला आणि मौलवी यांच्या पकडींतून जनतेची मुक्तता करूं " अशी पवित्र कुराणवर हात ठेवून शपथ घेतल्यानंतरच कुणालाही संस्थेचा सभासद करून घेण्यांत येई.

कमाल यांनीं वरीलप्रमाणें शपथ घेतली व त्या संस्थेचे ते सभासद झाले. सभासदांमध्यें ज्या हस्तलिखितांचा गुप्तपणें प्रसार होत असे त्या हस्तलिखितांत कमाल यांचे जळजळीत लेख व कविता प्रसिद्ध होऊं लागल्या. संस्थेच्या वादविवादक मंडळांत त्यांची वक्तृत्वपूर्ण व भावनाप्रधान भाषणें होऊं लागलीं. कमाल यांचें वक्तृत्व अत्यंत प्रभावी होतें. त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचा ओघ सुरूं झाला कीं ऐकणारे मंत्रमुग्ध होत. त्यांचें आवेशपूर्ण भाषण सुरूं झालें कीं श्रोत्यांच्या अंगावर कांटे उभे राहात. त्यावेळीं तुर्की तरुणांमध्यें कमाल यांच्या तोडीचा एकही वक्ता नव्हता असें म्हणतात.

सुलतानाच्या गुप्तहेरांनीं या भयंकर संस्थेचा सुगावा लागला. राजप्रासादांत सुलतानाच्या कानावर ही गोष्ट जातांच

सुलतान क्रुद्ध व अस्वस्थ झाला. सैन्यांत उद्यां अधिकारी होणाऱ्या या तरुणामध्यें जहाल विचारांची पेरणी व्हावी हें अत्यंत अनिष्ट व घातक आहे असें समजून, त्यानें मिलीटरी ट्रेनिंगचे डायरेक्टर जनरल इस्माइल हकी पाशांना योग्य बंदोबस्त करण्याचा हुकूम दिला.इस्माइल हकी पाशा यांनीं त्या कॉलेजच्या मुख्याधिकाऱ्यास कडक ताकीद देऊन, त्या संस्थेच्या सभा कॉलेज आवारांत पुन्हां होणार नाहींत याविषयीं खबरदारी घ्यावयास सांगितलें.

पण, जबरदस्तीनें किंवा धाकदपटशानें क्रांतिकारक विचारांचें निर्मूलन तरूणांच्या मनांतून थोडेच होणार आहे? बिचारा सुलतान! त्याला वाटलें कीं, आपण हुकूम सोडतांच हें तरुणांचें बंड मोडून जाईल.

## प्रकरण ४ थें

—××—

# तुरुंगांतून सुटका

सुलतानाच्या धमकावणीस किंवा गुप्त हेरांच्या हेरगिरीस न जुमानतां, कमाल यांनीं ' वतन' ही क्रांतिकारक संस्था चालविण्याचें निश्चित केलें. एका अरुंद गल्लींत एक खोली भाड्यानें घेऊन त्यांनीं त्याठिकाणीं ' वतन 'चें ऑफीस नेलें. त्या ऑफीसमधून संस्थेच्या हस्तलिखितांचा प्रसार सभासदांमधून होऊं लागला. त्याठिकाणीं संस्थेचे सभासद चोरून येत व वादविवादांत आणि चर्चेंत भाग घेत.

ती राजद्रोही संस्था चालविणें अत्यंत धोक्याचे होतें, तरी ती चालविण्यांत कमाल यांना एक प्रकारचा उत्साह वाटूं लागला. ज्याठिकाणीं संकट किंवा धोका असेल, त्याठिकाणीं बेगुमानपणें कार्य करीत राहणें कमाल यांना अतिशय आवडूं लागलें. ते जात्याच निधडे व बेडर असल्यामुळें असल्या धोक्याची त्यांनीं केव्हांच पर्वा केली नाहीं. शिवाय क्रांतिकारक संस्था कशी चालवावी, तिच्या सभासदांचा प्रामाणिकपणा कसाला कसा लावावा, ठराविक खुणांनीं कार्य कसें चालवावें या गोष्टीचें कमाल यांनीं चांगलें ज्ञान करून घेतलें होतें.

गुप्त हेरांची कमाल व इतर सभासद यांवर कडक नजर होती. ही सर्व मंडळी कशी सांपडतील याचा कसून प्रयत्न त्या हेरांनीं चालविला होता. दुर्दैवानें एका गुप्त हेरानें या संस्थेमध्यें प्रवेश करून घेतला. या सभासदाचा शपथविधि होण्याचा दिवस व वेळ ठरली होती. शपथविधीचा समारंभ चालला असतां पोलीसांनीं एकदम छापा घालून कमालसह सर्व सभासदांना कैद केलें. ताबडतोब त्या सर्वांची इस्तंबूलमधील सुप्रसिद्ध अशा तांबड्या तुरुंगांत रवानगी झाली.

सुलतानविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून मुस्तफा कमाल यांची तांबड्या तुरुंगांत रवानगी केली आहे,हें वृत्त ऐकतांच जुबेदा खानम यांना जबरदस्त धक्का बसला. लष्करी अंमलदार होऊन आपल्या कुळाचें नांव करणार असलेल्या आपल्या लाडक्या व एकुलत्या एक मुलावर भयंकर आरोप आलेला पाहून, त्यांचें हृदय फाटलें. त्या ताबडतोब कॉन्स्टँटिनोपल येथें आल्या. कमाल यांना एकदां भेटण्याची संधी मिळावी म्हणून जुबेदा खानम यांनीं अतिशय प्रयत्न केले. त्या निरनिराळ्या अधिकाऱ्याकडे जात नि त्यांची मनधरणी करीत. दिवसभर त्या वणवण फिरत; पण व्यर्थ! कमाल यांची भेट होण्याचे सोडुन द्या; पण ते जिवंत आहेत कीं नाहीं हे देखील सांगावयास कोणी तयार नसे!

जुबेदा खानम यांची स्थिती वेड्यासारखी झाली. ' आपल्या मुलाचें काय झालें असेल? तो जिवंत असेल कां? त्याचा गुप्तपणें वध तर झाला नसेल? त्याला विषाचा प्याला तर दिला नसेल? त्याच्या छातींत कट्यार तर खुपसली नसेल? त्याला समुद्रांत फेकून तर दिला नसेल?' असें अनेक अमंगल विचार जुबेदा खानम यांच्या अंत:करणाचा ठाव घेऊं लागले. कारण सुलतानविरुद्ध कट करणाऱ्यांचा शेवट अशाच रीतीनें होत असे; न्यायासनासमोर आणण्या पूर्वींच अशा शेंकडो देशभक्तांचे खून गुप्तपणे पाडण्यांत येत असत; आणि हीं अघोर कृत्यें सुलतानाच्या पूर्ण संमतीनें केलीं जात.

दोनचार आठवडे गेले. जुबेदा खानम यांच्या डोळ्यांतला अश्रूप्रवाह सारखा सुरू होता. त्यांच्या दृष्टीला अंधत्व येऊं लागले; चेहऱ्यावर प्रेतकळा पसरली.

कमाल यांची चवकशी सुरू झाली. त्यांच्यावरील आरोप अत्यंत भयंकर होता आणि पोलिसाजवळ त्याबद्दल भरपूर पुरावाही पण होता. चवकशी पूर्ण झाली आणि केमाल यांना सर्व कैद्यापासून अलग करण्यांत येऊन एका अंधार कोठडींत टाकण्यांत आले. पण तेवढ्या वरच निभावलें हें कमाल यांचें नशीबच समजलें पाहिजे! कारण अशा राजद्रोह्याच्या भयंकर गुन्ह्याबद्दल त्यांचा तुरुंगांतल्या तुरुंगांतच मृत्यु आला असता! असे कित्येक राजकीय गुन्हेगार एकदां तुरुंगांत

गेल्यानंतर पुन्हां परत ह्मणून आले नाहींत. पण कमाल यांच्याबद्दल सुलतानाच्या मनांत अद्याप इतके किल्मीष निर्माण झालें नव्हते म्हणा किंवा त्यांच्यासारख्या होतकरू व कर्तबगार तरुणाचा आपल्या कार्याकरितां उपयोग करून घ्यावयाचे सुलतानाच्या मनांत होते म्हणा, कमाल यांना त्यांच्या गुन्ह्याची जाणीव करून देण्याकरितां नुसती अंधारकोठडीचीच सजा देण्यांत आली.

कमाल यांना ज्या अंधारकोठडींत ठेवण्यांत आले ती अत्यंत लहान व दुर्गंधीनें भरलेली होती. हवा येण्याकरितां अगदीं उंचावर एक लहानसा झरोका ठेवण्यांत आला होता. कमाल यांना हा तुरुंगवास अत्यंत असह्य होऊं लागला. आपणास देण्यांत आलेल्या शिक्षेचा सूड आपण केव्हां घेऊं असें त्यांना होऊन गेले. जसजसे दिवस लोटूं लागले तसतसे ते अधिकाधिक संतापी बनूं लागले.

कित्येक आठवडे अंधारकोठडीचा पाहुणचार घेत असतां, एक दिवस अचानक त्या अंधारकोठडीचा दरवाजा उघडला गेला. दोन लष्करी अधिकाऱ्यांनीं कमाल यांना अंधारकोठडींबाहेर काढले व त्यांना जनरल इस्माईल हकी पाशा यांच्यासमोर उभे केले. इस्माईल हकी पाशांनीं कमाल यांच्याकडे एकदां तीक्ष्ण दृष्टीनें पाहिले. कमाल यांनींही न घाबरतां आपली नजर त्यांच्या नजरेस भिडविली. थोड्या वेळानें जनरल हकी पाशा ह्मणाले, " तरूण

मनुष्या, तूं मनांत आणशील तर सार्वभौम सुलतानांची चाकरी इमानेंइतबारें करून आपला उत्कर्ष करून घेशील; पण तूं आपल्या नादान कृतीनें आपल्या कर्तबगारीस व आपल्या लष्करी बाण्यास काळीमा लावून घेतला आहेस. तूं राजकारणांत पडलास व सुलतान यांच्या विरूद्ध असलेल्या बदमाषांच्या टोळक्यांत सांपडलास इतकेंच नव्हेतर आपल्या लष्करी स्नेहयासोबत्यांस तूं त्या टोळक्यांत ओढून घेतलेस. तुझा गुन्हा अक्षम्य आहे. या गुन्ह्याबद्दल तुला देहांत शासन द्यावयाचें ठरलें होतें; पण सुलतान यांनीं कृपावंत होऊन तुझ्यावर दया दाखविण्याचें योजिलें आहे. तुझ्यासासारखा उमदा तरुण वांया जावूं नये म्हणून त्यानीं पुन्हां तुला नोकरींत ध्यावयाचें ठरविलें आहे. दमास्कस येथील घोडदलावर अम्मलदार म्हणून तुझी नेमणूक केली आहे. तूं या सुवर्णसंधीचा व सुलतानांच्या मेहेनरजरेचा अवश्य फायदा घ्यावास अशी माझी इच्छा आहे. तुझी त्या ठिकाणची कामगिरी पाहून, तुला जास्त बढती देण्याचा विचार करण्यांत येईल. तरी आतांपर्यंत केलेला मूर्खपणा विसरून जा आणि आपली नोकरी इमानेंइतबारें कर. पण लक्ष्यांत ठेव, पुन्हां अशा प्रकारची संधि तुला दिली जाणार नाहीं किंवा तुला क्षमा केली जाणार नाहीं. तुला हें माझें शेवटचें सांगणें आहे."

त्याच दिवशीं दमास्कसकडे जाणाऱ्या बोटीवर पोलीसांनीं कमाल यांनीं आणून सोडले. जातेवेळी त्यांना आपल्या मातेला किंवा स्नेहचासोबत्यांना भेटू देण्यांत आले नाहीं.

बोट आस्ते आस्ते निघाली. त्या बोटीकडे एक व्यक्ति निश्चलतेनें पहात उभी होती. त्या व्यक्तीनें नखशिखांत बुरखा पेहेरला होता. बोट दृष्टिआड झाल्याबरोबर त्या व्यक्तीनें हुंदका दिला व धाडकन आपला देह धरणीवर टाकला.

तो हुंदका कमाल यांच्या आईखेरीज आणखी कोणाचा असणार?

## प्रकरण ५ वें

——xx——

# पुन्हां अटकेचा हुकूम !

८० दिवसांच्या खडतर प्रवासानंतर कमाल बैरूत येथें पोहोंचले व तेथून घोड्यावरून मजल दर मजल करीत ते दमास्कस येथील लष्करांत दाखल झाले. त्यावेळीं ते लष्कर, नुक्तेच बंड करणाऱ्या ड्रुस नांवाच्या रानटी डोळ्यांचा बंदोबस्त करण्याकरितां, निघावयास सज्ज झालें होतें. तो प्रदेश डोंगराळ असल्यामुळें त्याठिकाणीं चांगले रस्ते नव्हते किंवा लष्करास उतरावयास ऐसपैस जागा नव्हती. प्यावयाचे पाणी मोठ्या मुष्कीलीनें मिळत असल्यामुळें ड्रुसलोकांच्या पारिपत्याकरितां निघालेल्या तुर्की लष्कराचें अतिशय हाल झालें. लष्करी जीवनामध्यें किती त्रास व हाल असतात याची कल्पना कमाल यांना प्रथमच झाली.

तुर्की सैन्यानें ड्रुस बंडखोरांना पकडण्याची खूप खटपट केली; पण त्यांत यश आलें नाहीं. ड्रुस बंडखोर तुर्की सैन्याच्या समोरा-समोर न येतां गनीमी काव्यानें लढत. तुर्की सैन्य चालून आले म्हणजे ते डोंगरकपारींतून लपत असत. शेवटीं कंटाळून तुर्की

सैन्यानें त्यांच्या लहान लहान खेड्यांना आगी लावून व त्यांचीं शेतें उध्वस्त करून दमास्कसकडे कूच केलें.

दमास्कस येथें आल्यानंतर कमाल यांची त्या ठिकाणीं 'वतन' ची शाखा सुरूं करण्याचें योजिलें. तुरुंगात झालेलें हाल किंवा हकी पाशा यांनीं दिलेली शेवटची धमकी यांचा काडीमात्र परिणाम त्यांच्या मनावर झाला नाहीं. कुठल्याही प्रकारच्या दमदाटीस न जुमानतां,त्यानीं संस्थेची शाखा सुरूं करण्याचें निश्चित केलें. कॉन्स्टँटिनोपल प्रमाणें दमास्कस येथील सर्व तरुण लष्करी अधिकारी कमालप्रमाणेंच राज्यव्यवस्थेवर असंतुष्ट होते. राज्य-व्यवस्थेमध्यें आमुलाग्र क्रांति झाल्याखेरीज तुर्की राष्ट्र सुखी होणार नाहीं ही कल्पना त्यांना पुरेपूर पटली होती.त्या तरुण अधिकाऱ्यांत मुफीद लुत्फी नांवाचा तरुण अधिकारी कमाल यांचा लष्करी शाळेंमधील सहाध्यायी होता. त्यानें कमालबरोबर सहकार्य करणेची शपथ घेतली. त्या दोघांच्या परिश्रमानें संस्थेचें भराभर सभासद होऊं लागले. थोड्याच अवधींत सिरियामधील सर्व लष्करी ठाण्या-तील अधिकारी लोक संस्थेचें सभासद झालेले पाहून, कमाल यांना आनंद झाला. दमास्कस येथूनच क्रांतीचा पुकारा करावा अशी त्यांची फार इच्छा होती. लष्करी अधिकाऱ्याचें त्यांना संपूर्ण सहाय्य होतें;पण सर्व सामान्य जनतेची तितकी तयारी नसल्यामुळें

व सुलतानवर तिची अत्यंत भक्ति असल्यामुळें तो बेत त्यांना रहीत करावा लागला. बंड पुकारावयास योग्य जागा कुठें मिळेल याची कमाल यांना विवंचना लागून राहिली. इतक्यांत सलानिका मधील त्यांच्या स्नेह्यांनीं निरोप पाठवून सलानिकास ताबडतोब निघून या अशी त्यांना विनंती केली.सलानिकामध्यें तर फार असंतोष पसरला होता. त्या ठिकाणीं कमाल यांचे अनेक स्नेही असल्यामुळें व ते सर्व 'वतन' चे सभासद असल्यामुळें सलानिकामधूनच बंडाचा बार उडवून द्यावा असें त्यांनीं ठरविलें.

हें सर्व खरें! पण सलानिकास जावयाचे कसें? कमाल सरकारी नोकर असल्यामुळें, त्यांना तेथून हालतां येत नव्हते. तथापि कमाल यांच्या धाडसी नजरेला ही अडचण दिसत नव्हती. त्यांनीं विश्रांतीकरितां ह्मणून थोड्या दिवसांची रजा घेतली व सलानिकास जाण्याकरितां ते जाफा बंदरावर गेले. त्या बंदरावरचा मुख्य अधिकारी अहंमद हा मुस्तफा कमाल यांचा स्नेही व 'वतन' चा सभासद होता. त्यानें कमाल यांना मदत करावयाचें आश्वासन दिलें. कमाल यांनीं आपलें नांवगांव बदललें व व्यापाऱ्याचा वेष घेऊन इजिप्तला जाणाऱ्या आगबोटींत प्रवेश मिळविला. इजिप्तहून ते अथेन्सला गेले व तेथून सलानिकास पोहोचले. जाफापासून सलानिकापर्यंत त्यांना ठिकठिकाणीं गुप्त संस्था, क्रांतिकारकांचे अड्डे

आढळले; जनतेच्या अंतःकरणांत सुलतानच्या राजवटीविषयीं असंतोष धुमसत असलेला दिसून आला.

सलानिकामध्यें येऊन थोडे दिवस होतात न होतात तोंच सुलतानाच्या गुप्त हेरांनीं त्यांना ओळखले.कमाल यांना ताबडतोब गिरफदार करा असा राजधानीहून हुकूम सुटला. सलानिकामधील मुख्य पोलिस अधिकारी जमील हा 'वतन' चा सभासद असल्या-मुळें, त्यानें सलानिका सोडून जा असा कमाल यांना ताबडतोब निरोप पाठविला. निरोप मिळाल्याबरोबर कमाल यांनीं तुर्की सरहद्द ओलांडली व ग्रीसमध्यें प्रवेश केला; तेथून बोटीनें जाफाकडे प्रयाण केलें. कमाल जाफा बंदरांत पोहोचण्यापूर्वींच त्यांच्या अटकेचा हुकूम जाफास पोहोंचला होता. ही वेळ अत्यंत आणी-बाणीची होती. या वेळीं कमाल पोलिसांच्या कचाट्यांत सांपडले तर त्यांना देहांत शासन हें ठरलेलेंच होतें; पण कमाल यांचें दैव बलवत्तर होतें.त्यांना पकडण्याचा हुकूम त्यांचे स्नेही अहंमद यांचेच हातीं पडला. बोट धक्यास लागल्याबरोबर, अहंमद बोटीवर चढले नि त्यांनीं कमाल यांची भेट घेतली. अहंमद यांनीं आपल्या बरोबर कमाल यांचा पोषाख आणला होता;तो पोषाख घालावयास देऊन त्यांना गुप्तरीतीनें बोटीवरून उतरून घेतले व ताबडतोब शहराबाहेर त्यांची रवानगी केली. तेथून कमाल तडक गाझा येथें

आपल्या छावणींत पोहोचले. त्या वेळीं छावणीचा मुख्य कमाल यांचा स्नेही मुफीद लुत्फी हाच होता.

अहंमद यांनीं कॉन्स्टॅंटिनोपल येथील मुख्य पोलीस अधिकाऱ्यास लिहून कळविलें कीं, 'आपण म्हणतां तो कमाल जाफा बंदरामध्यें आला नाहीं. तो गाझा येथें आपल्या लष्करी छावणींतच आहे असें चवकशीअंतीं समजतें, तरी त्यांना पकडावयास आपण जो हुकूम दिला आहे त्यांत कांहींतरी चूक असली पाहिजे.'

मुफीद लुत्फीनेंही लिहून कळविले कीं, 'अहंमद यांचें विधान बरोबर आहे. कमाल येथून सलानिकास कधींही गेले नाहींत. ते माझ्याबरोबरच या छावणींत आहेत.'

अहंमद व मुफीद लुत्फी या दोन स्नेह्यांमुळें कमाल यांना जीवदान मिळालें.

यानंतर कमालनीं फार दक्षता घेतली. आपल्यामागें पोलीसांचा ससेमिरा आहे हें जाणून कांहीं दिवस स्तब्ध राहणें हेंच कल्याणाचें आहे हें त्यांनीं पूर्णपणें ओळखलें. जवळ जवळ एक वर्षभर त्यांनीं नोकरीखेरीज बाह्य जगांत लक्ष्य घातलें नाहीं.

त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं कमाल हे आपली नोकरी उत्कृष्ट रीतीनें करतात असा रिपोर्ट केला. तो रिपोर्ट वाचून सलानिका-मधील गुप्त हेरांनीं कमाल यांचा विनाकारण संशय घेतला असें सुलतानास वाटलें. कमाल यांच्या नोकरीवर सुलतान निहायत खुष झाले व त्यांची बढतीवर सलानिकास बदली केली. त्यांची नेमणूक नंबर ३ च्या लष्करावर झाली.

## प्रकरण ६ वें

—××—

# क्रांतीचा ध्यास

सलानिकास आल्यावर कमाल आपली आई व बहीण यांच्या समवेत राहूं लागले. त्यांनीं सलानिकास ‘ वतन ’ची शाखा काढण्याचा बेत केला; पण त्याठिकाणीं ‘ संघ आणि प्रगती ’ या नांवाची त्याच नमुन्याची क्रांतिकारक संस्था आहे असें कळल्यावर त्यांनीं तो बेत रहित केला. कुणीकडून तरी जनतेंत व अधिकाऱ्यांत जागृति करण्याचा त्यांचा विचार होता. ‘ संघ आणि प्रगति ’ तेंच कार्य करीत आहे हें ऐकून त्यांना समाधान वाटलें.

या नव्या संस्थेंत बरेचसे तरुण तुर्क अधिकारी होते. सरकारला शंका येऊं नये म्हणून त्या संस्थेंत ज्यू आणि इटालियन लोकांचा समावेश केला होता. इटालियन लोकांना कैद करणें किंवा त्यांच्या घराची झडती घेणें हें त्या दोन देशांच्या तहनाम्या-मुळें सुलतानाच्या शक्तीबाहेरचें होतें. त्यामुळें त्या नवीन संस्थेच्या

सभा इटालियन लोकांच्या घरीं होत. शिवाय बहुतेक इटालियन 'मॅसोनिक लॉज' नांवाच्या संस्थेचे सभासद असल्यामुळे, त्यांच्या घरीं भरणाऱ्या सभा या कुठल्याहि राजकीय संस्थेच्या नसून अत्यंत निरुपद्रवी अशा 'मॅसोनिक लॉज' च्या आहेत, असें ते सरकारास भासवीत. त्यामुळें 'संघ आणि प्रगति' ही गुप्तसंस्था अगदीं अबाधितपणें चालली होती.

या संस्थेनें कमाल यांना सभासद करून घेण्याचें योजिलें व त्याप्रमाणें त्यांना विनंती केली. संस्थेची विनंती मान्य करून कमाल यांनीं संस्थेचें सभासदत्व पत्करलें. संस्थेचा कार्यक्रम पाहतांच त्यांची फार निराशा झाली. आंतरराष्ट्रीय कार्यास वाहून घेतलेल्या संस्थेसारखा या संस्थेचा कार्यक्रम होता. कमाल यांना आंतरराष्ट्रीय कार्यक्रम नको होता. आपल्या राष्ट्राच्या संवर्धनास उपयोगी पडणारा विधायक कार्यक्रम त्यांना हवा होता.आपण तुर्क आहोंत आणि आपल्या तुर्की राष्ट्राचा परकियांच्या आक्रमणापासून व स्वकीयांच्या जबरदस्तीपासून बचाव करून, त्याला कर्तृत्ववान करावयाचा कार्यक्रम त्यांना पाहिजे होता. या नवीन संस्थेचें ध्येय नि कार्यक्रम आजच्या परिस्थितींत टाकाऊ स्वरूपाचे आहेत असें त्यांनीं इतर सभासदांना पटवून दिलें. कार्य थोडे आणि मचमच फार अशी अवस्था असलेल्या त्या संस्थेकडून तुर्कांचें कधींही कल्याण

होणार नाहीं हें त्यांनीं पूर्णपणें ओळखिलें होतें. कुणाचीहि पर्वा न करितां, त्यांनीं संस्थेवर बेधडक टीका करावयास सुरवात केली. संस्थेच्या पुढाऱ्यांबद्दल त्यांना काडीमात्र आदर नव्हता. त्या सर्वांशीं कमाल यांचे वारंवार खटके उडत. अनवर, जमाल, जवीद, नियाझी ही या संस्थेची प्रमुख पुढारी मंडळीं होती. ते सर्व जणूं काय शाळेतील अपरिपक्व बुद्धीचे विद्यार्थी आहेत व आपण शिक्षक आहोंत अशा भावनेनें कमाल त्या संस्थेच्या पुढाऱ्यांशीं बोलत. त्यांची ही वृत्ती पाहून संस्थेच्या पुढाऱ्यांना त्यांचा तिटकारा वाटत असे. अहंमन्य आणि शिष्ट म्हणून कमाल यांची ते संभावना करीत. कमाल यांच्या सडेतोड वृत्तीमुळें, त्यांना संस्थेच्या अंतर्गत कारभारांत स्थळ मिळालें नाहीं.

तत्वाला धरून कमाल दुसऱ्यावर टीकेचे प्रहार निर्दयपणें करीत; पण त्यांच्यावर कोणी टीका केलेली त्यांना सहन होत नसे. आपण जे करतो ते अगदीं विचारपूर्वक करतो, त्यामुळें आपल्यावर टीका होता कामा नये असें त्यांना वाटत असे. आपल्यावर टीका करावयाचा हक्क फक्त आपल्या आईलाच आहे असें ते म्हणत. त्याचप्रमाणें आपल्या कार्यांत कुणी ढवळाढवळ केलेली त्यांना खपत नसे.

एक दिवस कमाल आपल्या कांहीं क्रांतिकारक स्नेह्यांना बोलावून, त्यांच्याशीं वाटाघाट करीत होते. घरांतील नोकर लोकांनीं त्यांचें चाललेलें ज्वलजहाल संभाषण ऐकून, त्याची वर्दी जुबेदा खानम यांना दिली. जुबेदा स्वतः त्या खोलीजवळ आल्या व दाराशीं कान देऊन त्यांनीं सर्व संभाषण ऐकलें. स्नेहीमंडळी गेल्यावर कमाल यांनीं सर्व कागदपत्र गोळा केलें व एका पेटींत बंदोबस्तानें ठेवून दिलें. हातांतील सिगारेट विझवून ते बिछान्यावर लवंडले. इतक्यांत दरवाजा उघडल्याचा आवाज आला. कमाल उठून पाहतांत तों त्यांची आई समोर उभी. त्यांनीं आईच्या चिंताक्रांत चेहऱ्याकडे न्याहाळून पाहिलें. आपल्या आईला सर्व प्रकार माहीत झाला असला पाहिजे हें कमाल यांनीं चटकन् ताडलें.

" बेटा, मला एक गोष्ट तुझ्याकडून कळली पाहिजे. तूं सुलतानाविरुद्ध बंड करणार आहेस हें खरें कां ? "

" होय, आई ! "

" पण या भयंकर गोष्टीचा तूं पूर्ण विचार केला आहेस कां ? सुलतान म्हणजे कोणी लहानसहान व्यक्ति नाहीं. त्यांच्या अंगांत सात संतांचें सामर्थ्य एकवटलें आहे. "

" तूं म्हणतेस तशा प्रकारचें सामर्थ्य व सत्व सुलतानांच्या अंगीं असतें, तर त्यांच्या विरुद्ध बंड करण्याची आवश्यकताच होती कुठें ! आई, तुझा सुलतान हा पूर्वींच्या सुलतानांसारखा नाहीं. तो अगदीं शक्तिहीन व निःसत्व झाला आहे. त्याच्या हातून आपल्या राष्ट्राची सोडवणूक केली पाहिजे. त्याची हातीं राष्ट्राची सूत्रें ठेवणें म्हणजे राष्ट्राचा सत्यानास करणें होय ! आई, तुला कदाचित माझें म्हणणें पटणार नाहीं; पण माझ्या स्वीकृत कार्यांत तूं अडथळा आणणार नाहींस अशी मला खात्री आहे "

" पण, तुला या कार्यांत यश मिळेल असें मला वाटत नाहीं. तूं माझा एकुलता एक मुलगा आहेस. तुला हातची घालवावयाला मी तयार नाहीं. या कार्याचा शेवट किती भयंकर होईल याची कल्पना देखील मला सहन होत नाहीं."

" मी प्राण गेला तरी माझ्या कार्यापासून च्युत होणार नाहीं. मी तें कार्य करण्याची प्रतिज्ञा केली आहे. आई मी केलेली प्रतिज्ञा मोडावी असें तुला वाटतें कां ? "

" नाहीं ! " जुबेदा निश्चयानें म्हणाल्या.

" बटा, अशा गोष्टींत मला कांहीं कळत नाहीं तुला या गोष्टींचें चांगलें ज्ञान आहे. शिवाय तुझ्या इतकी मी शिकलेलीही

नाहीं. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेव कीं हातांत जें कार्य घेतलें आहेस त्याचा शेवट कसाही कटु होवो, तें सोडतां कामा नये. तुला विजय हा मिळालाच पाहिजे. विजय मिळविण्याकरितां मानवी प्रयत्नांची शिकस्त कर. तुला माझा आशिर्वाद आहे."

आईचा आशिर्वाद मिळाल्यामुळें, कमाल दुप्पट उत्साहानें आपल्या कार्यास लागले. दिवसभर आपली लष्करी नोकरी ते कसोशीनें व उमेदीनें करीत. संध्याकाळ झाली कीं, आपल्या खोलींत क्रांतिकारक स्नेही जमा करीत. कुणालाही सुगावा लागूं नये म्हणून दारांना कडीकुलूप घालीत; इतकेंच नव्हे तर खिडक्या देखील बंद करीत. क्रांति कशी करावी व केव्हां करावी याबद्दल रात्रभर चर्चा चाले. याखेरीज 'संघ आणि प्रगती' या संस्थेच्या सर्व सभांना ते हजर असत. अद्याप त्या संस्थेच्या पुढाऱ्यांनीं आपल्या अंतर्गत वर्तुळांत त्यांना घेतलें नव्हते. कमाल यांना ही परिस्थिती सहन होईना. आपल्या हातीं सर्व सूत्रें आली पाहिजेत किंवा आपण अगदीं अलिप्त तरी राहिले पाहिजे असे विचार त्यांच्या डोक्यांत भ्रमण करूं लागले.

प्रकरण ७ वें

—××—

## क्रांतीचा अवेळीं स्फोट

तुर्कस्थानमधील नवजवान तरूण ज्या क्रांतीची वाट पहात होते, त्या क्रांतीचा स्फोट अकल्पित व अवेळीं झाला. 'संघ आणि प्रगती'च्या एका पुढाऱ्यानें मागचा पुढचा विचार न करतां कांहीं तरुणांना जमा केले व मॅसोडोनियाच्या डोंगराळ प्रदेशांत जाऊन त्यानें सुलतानाविरुद्ध बंड पुकारलें. अनवर नांवाच्या दुसऱ्या पुढाऱ्यानें पूर्व मॅसोडोनियांत तशीच बंडाळी सुरू केली. बंड पुकारण्यापूर्वीं या दोन पुढाऱ्यांनीं जनतेची कितपत तयारी आहे याचा अंदाजही घेतला नव्हता किंवा इतर पुढाऱ्यांशीं वाटाघाटही केली नव्हती.

या चमत्कारिक परिस्थितीकडे लक्ष देत कमाल स्वस्थ बसले होते. तयारी नसतांना पुकारलेल्या बंडांत भाग घेण्याइतके ते उतावळे नव्हते. त्यांना बंड हवें होतें, त्यांना क्रांति हवी होती;

पण ती क्रांति किंवा तें बंड, परिस्थिती न्याहाळून किंवा अभ्यासून पुकारलेलें हवें होतें. या दोन पुढाऱ्यांनीं केलेल्या अवेळीं धाडसाबद्दल कमाल यांना अत्यंत वाईट वाटलें. यदाकदाचित् हा बंडाचा प्रयोग फसला तर क्रांतीचीं पाळेंमुळें खणून निघाल्याखेरीज राहणार नाहींत या विचारानें त्यांचें मस्तक सुन्न झालें. ज्या क्रांतीचा आपण अहोरात्र ध्यास घेऊन बसलों आहोंत, ती क्रांति गर्भावस्थेंतच ठार होणार या विचारानें त्यांना अतिशय दुःख झालें. पुन्हां तोच सुलतान, तीच नादान राजवटी, तेच लांचखाऊ अधिकारी, तोच जर्जर झालेला तुर्कस्थान त्यांच्या डोळ्यासमोर दिसूं लागला.

पण अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे तें बंड यशस्वी झालें. डोंगरांत लपून राहिलेल्या शंभर दोनशें बंडखोरांना पकडण्यास गेलेले सुलतानाचें सैन्य, बंडखोरांच्या सुदैवानें, त्यांना फितूर झालें. सुलतानानें दुसरें सैन्य पाठविलें, त्याचीही तीच अवस्था ! अनेक तुकड्या पाठविण्यांत आल्या; पण त्या सर्व बंडखोरांना फितूर झाल्या. शेवटी राजधानीमधून खास सैन्य पाठविण्यांत आलें; पण तेही फितूर झालें. बिचाऱ्या सैनिकांना कित्येक महीने पगार नव्हता किंवा त्यांची नीट व्यवस्था नव्हती; त्यामुळें ते बंडखोरांना फितूर झाले यांत नवल ते काय ? वाऱ्यापुढें जसा पाचोळा उडून जातो,

तशी सुलतानाची सत्ता बघतां बघतां निघून गेली. सबंध तुर्कस्थान आश्चर्यानें आ वासून राहिला.

सुलतानानें बांका प्रसंग ओळखला व ताबडतोब जबाबदार राजपद्धतीची घोषणा केली; आपल्या अधिकाऱ्यांना राजकारभारांतील गैरव्यवस्थेबद्दल दोष दिला आणि गुप्त हेराचे खाते बंद करून टाकलें. अशारीतीनें बंडखोरांच्या मागण्या सुलतानानें मान्य केल्या. तुर्की लोकांचे थवेच्याथवे बंडखोरांच्या स्वागतार्थ जमूं लागले. सलानिकामध्यें तर एक प्रकारचें उत्साहाचें वातावरण पसरल होतें. तेथील एका प्रसिद्ध चौकांत असलेल्या पॅलेस हॉटेलच्या सज्यांत उभे राहून बंडखोरांचे पुढारी अनवर यांनीं नवीन राज्यघटनेचा पुकारा केला. त्यांच्यामागें ' संघ आणि प्रगती 'चे सर्व सभासद उभे होते. कमाल हेही संस्थेचे सभासद असल्यांमुळें त्या सभासदांत उभे होते. पण प्रचंड जनसमुदायाची दृष्टी अनवरपाशांवर खिळल्यामुळें कमाल यांच्याकडे कुणाचेंही लक्ष्य गेलें नाहीं.

नवीन राज्यघटना अमलांत आल्याबरोबर, तुर्कस्थानमधून इतर देशांत दद्दपार झालेले अनेक मुत्सद्दी भराभर तुर्कस्थानमध्यें येऊं लागले. त्यांनीं ' संघ आणि प्रगती 'चीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. नवीन राज्यघटनेमध्यें मानाची जागा मिळविण्याची

त्यांची धडपड सुरूं झाली. बंड पुकारणारे पुढारी नियाझी यांची अल्बेनियामध्यें मोठ्या हुद्यावर नेमणूक झाली; पण त्याठिकाणीं त्यांचा खून झाला. अनवरपाशांना बर्लीन येथें नेमण्यांत आले. कमाल यांना उत्तर आफ्रीकेंतील ट्रिपोली येथें लष्करी छावण्यांची पाहाणी करण्याकरितां पाठविण्यांत आले.

तुर्कस्थानमध्यें झालेल्या राजक्रांतीचा कमकुवतपणा पाहून आस्ट्रीयानें बोस्नियाचा आणि ग्रीसनें क्रीटचा कबजा घेतला. रशियाच्या चिथावणीवरून बल्गेरियानें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. साम्राज्यामध्यें ठिकठिकाणीं बंडाचें निशाण फडकूं लागलें. अल्बेनिया व अरबस्थानमध्येंही बंडाचा पुकारा झाला. ही बिघडलेली परिस्थिती पाहून सुलतानाच्या अभिमानी लोकांनीं सुलताचें स्थान पूर्वींप्रमाणें स्थिर करण्याचा जोराचा प्रयत्न सुरूं केला. त्यांनीं धर्मवेड्या मुल्लामौलवींना सर्व देशभर पाठवून दिले. ' बंड करून ज्यांनीं नवीन राज्यघटना घडवून आणली ते तरुण लोक धर्मशत्रू आहेत; त्यांना धर्माबद्दल आस्था किंवा अभिमान नाहीं; ते धर्मानें निषिद्ध मानलेल्या सुधारणा करणार आहेत; ते सच्चे मुसलमान नसून इस्लाम आणि खिलापत यांचा नाश करण्याचा त्यांचा बेत आहे, अशा तऱ्हेचा जहरी प्रचार मुल्ला-मौलवींनीं सुरूं केला. मुल्लामौलवींचे व तरुण तुर्कांचें खडाष्टक

असल्यामुळें मुल्लामौलवींनीं मोठ्या आवेशानें लोकांचीं मनें बिथरविण्याचें कार्य सुरू केलें.

या चेतावणीमुळें तुर्की जनता खवळून गेली; इतकेंच नव्हे तर, तुर्की लष्करावर ही तिचा विलक्षण परिणाम झाला. सैनिकांनी बंड पुकारून आपल्या नवमतवादी व सुधारणावादी अधिकाऱ्यांना ठार मारले; पुढाऱ्यांना चेंचून काढलें. ' इस्लाम हा आपला धर्म असून सुलतान हा आपला खलीफा आहे; आपण आपल्या धर्माशीं व खलिपाशीं इमानें इतबारें राहूं, ' अशी घोषणा करून, त्यांनीं तुर्कस्थानची राजधानी आपल्या कबजांत घेतली व ' संघ आणि प्रगतीच्या ' सभासदांचें दिवसाढवळ्या खून पाडण्यास सुरवात केली.

संस्थेच्यां सभासदांनीं मॅसेडोनियामधील सैन्यास आपल्या मदतीकतां पाचारण केलें. या सैन्यावर मुल्लामौलवींच्या प्रचाराचा अद्याप परिणाम झाला नव्हता. ' आपण आमच्या मदतीला आलांत तरच आमची धडगत आहे नाहीं तर पुन्हां सुलतानाची जुलमी राज्यव्यवस्था सुरू होईल असा त्यांनीं निरोप पाठविला. या सैन्याचा प्रमुख अधिकारी महामूद शौकतपाशा, हा सुलतानाच्या कृपेंतील मनुष्य होता. पण त्याच्या हाताखालील सर्व अंमलदार संस्थेचे सभासद होते. काय करावे असा त्याला पेंच पडून तो गोंधळून

गेला; इतक्यांत कमाल हे ट्रिपोलीहून तेथें आले. त्यांनीं व सर्व तरुण अंमलदारांनीं महामूद शौकत पाशास संस्थेच्या सभासदांच्या मदतीस जाण्यास भाग पाडले. या अंतस्थ बंडाळीची हकीकत ऐकून अनवरपाशा बर्लीहून ताबडतोब निघून ते ' संघ आणि प्रगती ' या संस्थेच्या बचावार्थ सज्ज झालेल्या सैन्यास मिळाले. या सैन्याच्या घोडदळाचा ताबा अनवरपाशांनीं घेतला व स्टाफचे सर्वाधिकारत्व कमाल यांनीं पत्करलें.

अनरपाशा व कमाल हे सैन्यासह राजधानीवर चाल करून गेले व राजधानीचा कबजा घेतला. त्यांनीं अंतस्थ बंडाळी मोडून टाकली, मुल्ला मौलवींना पिटाळून लावले, संस्थेच्या सभासदांना तुरुंगातून सोडविले व सुलतानाला कैद करून त्याच्या वयस्क व वृद्ध पुतण्याला गादीवर बसविले. संकटात सांपडलेली व राज्यसूत्रें नुक्तीच हातीं घेतलेली ' संघ आणि प्रगति ' ही पुन्हां एकवार जोरदार व प्रभावी संस्था बनली.

या विजयामुळें अनवरपाशांचा सर्वच जयजयकार सुरू झाला. कमाल यांचाही विजयामध्यें मोठा हिस्सा होता. पण त्यांच्या प्रसिद्धीविन्मुख स्वभावामुळें ते जनतेपुढें येऊं शकले नाहींत. संस्थेच्या इतर पुढाऱ्यांनींही त्यांचें नांव पुढें येऊं नये म्हणून

खबरदारी घेतली. कमाल यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना शंका नव्हती; पण उठल्यासुटल्या कडक टीका करण्याची त्यांची वृत्ती त्या पुढाऱ्यांना आवडत नव्हती. या टिकाकारास अशा समयीं मागें रेटणें हेंच योग्य समजून, त्यांनीं कमाल यांना राजकारणांत पुढें येऊं दिले नाहीं.

नंतर कमाल यांची मॅसोडोनिया येथील सैन्याचे प्रमुख अधिकारी म्हणून नेमणूक झाली. यावेळीं त्यांचें वय ३० वर्षांचें होतें. मॅसोडोनियामध्यें परत आल्यानंतर, त्यांनीं लष्करीशास्त्राचा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास केला. लष्करी सामर्थ्याची वाढ कशी होईल या विचारांत त्यांनीं कित्येक दिवस घालविले. लष्करी खात्यांतील त्यांची प्रगती व हुशारी पाहून त्यांना सन १९१० सालीं जनरल अली रझा यांच्याबरोबर फ्रान्समध्यें लष्करी कामगिरीवर पाठविण्यांत आले. पॅरिसला गेल्यानंतर त्यांनीं तेथील परिस्थिती काळजीपूर्वक न्याहाळली. ज्या कामगिरीवर कमाल यांची नेमणूक झाली होती ती कामगिरी अपेक्षेबाहेर यशस्वी झाली; त्याबद्दल जनरल अली रझांनीं त्यांची मुक्तकंठानें स्तुती केली. पॅरिसहून परत आल्यानंतर कमाल यांची सलानिकामधील लष्करी अधिकाऱ्यांच्या शाळेवर नेमणूक झाली.

लष्करी अधिकारीवर्गाच्या शाळेचीं सूत्रें हातांत घेतल्या-नंतर त्यांनीं शाळेची नवीन पद्धतींवर पुनर्घटना केली. पॅरिसहून परत आल्यानंतर त्यांचें मन सारखे राजकारणाकडे धांव घेऊं लागलें. आपल्या राष्ट्राच्या कमकुवत राजकारणाबद्दल त्यांना तिटकारा वाटूं लागला. "क्रांति झाली, क्रांति झाली म्हणून म्हणतात; पण त्या क्रांतीचा राष्ट्राला काय फायदा झाला? राष्ट्राची काय प्रगती झाली? जनतेचें काय कल्याण झालें? अनवर, तलात, आणि जमाल हे संस्थेचे पुढारी आज राजकर्ते झाले एवढा एकच फायदा क्रांतीमुळें झाला, असें फार तर म्हणतां येईल; पण राज्यधुरा वाहण्याइतकी त्यांची योग्यता आहे काय? राष्ट्राचे कल्याण करण्याची त्यांना तळमळ आहे काय? एकाच्या खांद्यावरून दुसऱ्याच्या खांद्यावर राज्यधुरा गेली. फक्त खांदा बदलला पण राज्यकारभार सुधारला काय?"

अशा तऱ्हेचे विचार कमाल स्पष्टपणें शाळेंतील अधिकाऱ्यां-समोर मांडीत; इतकेंच नव्हे तर समाजामध्यें देखील ते बिनदिक्कत बोलून दाखवीत.

## प्रकरण ८ वें

—xx—

# इटलीशी युद्ध

" युरोपांतील राष्ट्रें दिवसेंदिवस अधाशी बनत आहेत आणि अभागी तुर्कस्थानला केव्हां गट्ट करूं याची ती वाट पहात आहेत. ' संघ आणि प्रगति ' या संस्थेच्या हातांत राज्यकारभार आल्याबरोबर संस्थेचा पुढारी जवीद यानें विश्वासघातानें बगदाद रेल्वे जर्मन लोकांना विकून टाकली. जर्मन मुत्सद्यानीं तर आमच्या राजधानींत तळच टाकला आहे. परकीयांवर विसंबून न राहतां, तुर्कस्थाननें स्वतः राज्यकारभार करण्याची हिम्मत बाळगिली पाहिजे. आपल्या मातृदेशांतील परिस्थिति आहे तशीच आहे. पूर्वींच्या राजवटींत काडीचाही फरक नाहीं. पूर्वीसारखें आतांही दारिद्र्य आहे, पूर्वीसारखें आतांही असमाधान आहे, पूर्वीसारखा आतांही सैन्यामध्यें असंतोष आहे. तेव्हां वाटेल तें करून हे सर्व सुधारलेंच पाहिजे, मुठभर चळवळ्या लोकांना राजकारणांत स्थान

मिळालें म्हणून बहुजनसमाजाच्या हातांत सत्ता आली असें होत नाहीं. आपल्या देशांत क्रांति झाली असें आपण म्हणतो; पण परिस्थितीकडे लक्ष्य देतां ती क्रांति नसून, क्रांतीचें विडंबन आहे असेंच म्हटलें पाहिजे. तरी कांहीं निश्चित कार्यक्रम आंखल्या-खेरीज आपल्या मातृदेशाची धडगत नाहीं हें प्रत्येक तुर्कानें ओळखलें पाहिजे."

मुस्तफा कमाल यांचे वरील तर्कशुद्ध विचार लष्करांतील अधिकाऱ्यांना पटूं लागले व ते अधिकाधिक प्रमाणांत त्यांच्या भोवतीं गोळा होऊं लागले. पहिल्या दर्जाचा लष्करी अंमलदार या या दृष्टीनें लष्करी अधिकाऱ्यांच्या मनांत कमाल यांच्या विषयीं आदर होताच; त्यांत कमाल यांना आपल्या राष्ट्राच्या कल्याणा-विषयीं लागलेली तळमळ पाहून तर त्यांच्यावर अधिकच भक्ति बसली. कमाल यांच्या स्पष्ट व राष्ट्रप्रेमी विचारामुळें ते नवजवान तरुणांचे पुढारी व नेते म्हणून ओळखले जाऊं लागले.

कमाल यांची जहाल विचारसरणी पाहून असा मनुष्य राजधानीच्या ठिकाणीं ठेवणें धोक्याचे आहे हे युद्धमंत्री महामूद शौकत पाशा यांनीं ओळखलें व त्यांची सलानिकाम ३७ व्या घोडदलाचे ऑफिसर कमांडिंग ह्मणून बदली केली. या अनपेक्षित बदलीबद्दल कमाल यांनीं काडीमात्र विरोध दर्शविला नाहीं. युद्ध

मंत्र्याचा हुकूम शिरसावंद्य मानून ते सलानिकास गेले. त्या ठिकाणीं गेल्यावर त्यांना फार फुरसत सांपडूं लागली आणि हा फुरसतीचा वेळ ते आपल्या कार्याची नक्की आखणी करण्यांत घालवूं लागले. दररोज रात्रीं कडीकुलपांत गुप्त सभा होऊं लागल्या. आतां त्यांना जो विरोध करावयाचा होता तो सुलतानास नसून,राज्यसूत्रें ज्यांच्या हातीं आहेत अशा त्यांच्याच संस्थेच्या क्रांतिकारक समजल्या जाणाऱ्या सभासदांना, करावयाचा होता.

ही बातमी युद्धमंत्र्याच्या कानांवर जातांच, त्यांनीं कमाल यांना सैन्यामध्यें सरकार विरुद्ध प्रचार करण्याबद्दल दोष दिला. तथापि ऐकीव वार्तेखेरीज तशा प्रकारचा भरीव पुरावा नसल्यामुळें युद्धमंत्र्यांना कांहींच करतां येईना. त्यांनीं फक्त कमाल यांना सलानिकाहून बदलून कॉन्स्टँटिनोपल येथील मुख्य कचेरींत आपल्या नजरेखालीं आणून ठेविलें.

कॉन्स्टँटिनोपल मध्यें अद्याप शांतता नि सुव्यवस्था झाली नव्हती. मुत्सद्यांमध्यें अधिकाराबद्दल चुरस चालूंच होती. दर आठवड्यांस मंत्रिमंडळें बदलत असत. सर्व मुत्सद्यांना काबूंत ठेवणारा असा महान् पुढारी कोणीच नसल्यामुळें सुव्यवस्थेची घडी अद्याप बसली नव्हती. अशा परिस्थितीचा फायदा घेऊन आक्टोबर १९११

इसवीस इटलीनें आपले सैन्य ट्रिपोलीमध्यें घुसवून, मुख्य शहराचा व किनाऱ्याचा ताबा घेतला. इटलीनें अशा रीतीनें तुर्कस्थानाविरुद्ध युद्ध पुकारल्याबरोबर कमालांनीं राजकारण सोडून दिले व दोन स्नेह्यांबरोबर खुष्कीने ते ट्रिपोलीकडे यावयास निघाले. इटालियन लोकांनीं समुद्राचा ताबा घेऊन, दार्दानेलिस सामुद्रधुनी बंद करून टाकली त्यामुळें ट्रिपोलीला जाण्याकरितां फक्त एकच मार्ग मोकळा होता आणि तो म्हणजे खुष्कीचा. कमाल आशियामायनरमधून सिरीया व पॅलेस्टाईनमध्यें आले.तेथून ते अलेक्झांड्रिया येथें जाऊन पोहोचलें. इंग्रजांनीं इजिप्त तटस्थ असल्याची घोषणा करून सरहद्द बंद करून टाकली. तुर्की लोकांना इजिप्तची सरहद्द बंद झाल्याचें ऐकून कमाल यांना धक्काच बसला. 'इजिप्त तुर्कस्थानचा प्रदेश! त्यामध्यें इंग्रजांना ढवळाढवळ करावयाचें काय कारण? सरहद्द बंद करून तुर्कांना आपल्या प्रदेशांत जाण्याचा मज्जाव करणें म्हणजे शुध्द अत्याचार आहे' अशा विचारांनीं कमाल यांचें डोकें संतापून गेलें; पण त्यावेळीं संतापून उपयोग काय? कसेंही करून त्यानां ट्रिपोलीमध्यें जाणें भागच होते. ते तिघे स्नेही निरनिराळ्या मार्गांनीं गुप्तपणें ट्रिपोलीस जावयास निघाले.

कमाल यांनीं एका अरब गृहस्थाचा वेष घेतला व पश्चिमेकडे जाणाऱ्या एका रेल्वेनें ते जावयास निघाले. पश्चिम सरहद्दीवर

पुन्हां त्यांना अडविण्यांत आले. कमाल यांना मोडकेतोडके अरबी येत होते. शिवाय त्यांचे घारे डोळे पाहून ते अरब नसावेत असा तेथील अधिकाऱ्यांना दाट संशय आला. त्या सरहद्दीवरचा मुख्य अधिकारी एक इजिप्शीयन मुसलमान होता. अलेक्झांड्रीयाहून तेथील इंग्लीश कमांडरनें कमाल यांच्या चेहरेपट्टीचें वर्णन त्याच्याकडे पाठवून दिलें होतें व कमाल तेथें आल्याबरोबर त्यांना पकडून अलेक्झांड्रीया येथें पाठवावें असें फर्माविलें होतें. सरहद्दीवरच्या त्या अधिकाऱ्याच्या मनांत इंग्लिश व इटालीयन लोकांबद्दल विलक्षण तिरस्कार होता; उलट तुर्की लोकांविषयीं त्याच्या मनांत अत्यंत सहानुभूति होती; पण तो हुकुमाचा ताबेदार असल्यामुळें अलेक्झांड्रीयाहून आलेल्या हुकुमाची अमलबजावणी करणें त्याला भाग होतें. त्यानें दुसऱ्या एका घारे डोळे असलेल्या गृहस्थास पकडून अलेक्झांड्रीयास पाठवून दिले व कमाल यांना मनापासून आशिर्वाद देऊन त्यांना सरहद्द ओलांडू दिली.

कमाल हे ऐनलमनसूर येथें असलेल्या तुर्की छावणींत जावून पोहोंचले. त्या ठिकाणीं कमालांचें मोठ्या प्रमाणावर स्वागत करण्यांत आलें. अनवर पाशाही त्याठिकाणीं अगोदरच येऊन पोहोंचले होते. त्यावेळीं इटालीयन सैनिकांनीं समुद्र किनाऱ्याचा ताबा घेऊन आंत चाल करण्याचा विचार चालविला होता. अनवरपाशा

व कमाल यांच्या नेतृत्वाखालीं तुर्की सैन्यानें त्यांना थोपवून धरले. तुर्की सैन्य थोडें होतें; पण मुसलमानांनीं व्यापलेला सबंध उत्तर आफ्रिका त्यांचेमागे होता. आपल्या तुर्की मुसलमान बंधूना मदत करण्याकरितां लिबियापासून तो सहारा वाळवंटाच्या मुलुखा-पर्यंत सर्व मुसलमान टोळ्या मोठ्या उत्साहानें जमल्या. अनवर पाशानीं या पराक्रमी मुसलमान लोकांना एकत्र जमवून; त्यांच्यां ४० तुकड्या केल्या व प्रत्येक तुकडीबरोबर ३ तुर्की अधिकारी दिले. ते तुर्की अधिकारी सांगतील त्या प्रमाणे सर्वांनीं ऐकावयाचे असा इषारा दिला.या प्रचंड जनसमुदायाचा अनवर पाशांनीं योग्य उपयोग करून घेतला.

जवळजवळ एक वर्षभर इटालियन व तुर्की लोकांचें युद्ध चाललें होतें; पण सबंध वर्षांत तुर्की सैन्यानें इटालियन सैन्याला एक इंचभरही पुढें सरकूं दिलें नाहीं. इतक्यांत दुर्दैवानें आक्टोबर १९१२ मध्यें सर्व बाल्कन राष्ट्रांनीं तुर्कस्थानविरुध्द युद्ध पुकारलें. त्यामुळें घाईघाईनें तुर्की सरकारनें इटलीशीं तह करून, इटलीच्या हातावर ट्रिपोलीचें उदक सोडलें व आपले सर्व सैन्य त्या प्रदेशा-मधून काढून घेतलें.

प्रकरण ९ वें

—××—

# बाल्कन राष्ट्रांचा हल्ला

तुर्कस्थानावर सर्व बाल्कन राष्ट्रांनीं एकदम हल्ला चढविला आहे हें ऐकतांच कमाल ताबडतोब तुर्कस्थानाकडे येण्याकरितां निघाले. तुर्कस्थानामध्यें येऊन पाहतात तों सगळीकडे एकच हाहा:कार उडालेला दिसून आला. सर्व सरहद्दींवर तुर्की सैन्यानें मार खाल्ला होता. सर्वियाचें सैन्य विनासायास उत्तरेकडून पुढें सरकत होतें, दक्षिणेकडून ग्रीक. सैन्यानें हल्ला चढवून सलानिका आपल्या ताब्यांत घेतलें होतें; इतकेंच नव्हे तर, २५००० तुर्की सैनिकांना कैद केलें होतें. बल्गेरियाचें सैन्य सरळ कॉन्स्टँटिनोपलचे रोखानें तुर्की राजधानीपासून अवघ्या १९ मैलांवर नेऊन ठेपलें होतें. फक्त राजधानींत व ॲड्रीयानोपलच्या किल्ल्यांत कांहीं तुर्क होते; बाकी सर्व तुर्कांची युरोपमधून उचलबांगडी झाली होती. जिकडे पहावे तिकडे तुर्कांची लांडगेतोड! पराभव!! नाहीं

म्हणावयास सैफ नांवाच्या नाविक कमांडरनें हामिदिया नांवाचें लढाऊ जहाज, दार्दानेलीसच्या तोंडावर असलेली शत्रूची कोंडी फोडून, बाहेर नेले व समुद्रांत त्यानें शत्रूच्या अनेक बोटी बुडविण्याचा सपाटा चालविला. पण तुर्कांचा सगळीकडे मोठ्या प्रमाणांत पराभव होत होता, त्यामुळें सैफचा असामान्य पराक्रम निष्प्रभ ठरला.

राजधानींत तर विषण्णतेची छाया पसरली होती. दवाखाने, मशिदी, चर्च, खासगीवाडे जखमी लोकांनीं भरून गेले होते. शत्रूच्या तडाख्यांतून निसटून पळून आलेल्या लोकांनीं सबंध शहर भरून गेले होते. लोकांची अन्नानदशा झाली होती, हजारों लोक कॉलरा व विषमज्वरानें मरत होते, असंख्य लोक थंडी नि भूक यांना बळी पडत होते. वस्त्रहीन लोकांचे तांडेच्यातांडे रस्त्यांतून फिरत होते. जिकडे पहावे तिकडे म्लान व विषण्ण चेहरे दृष्टींस पडत.

सलानिका ग्रीकांच्या ताब्यांत गेल्यामुळें तेथील हजारों लोक आश्रयार्थ राजधानीमध्यें आले होते. ग्रीक लोकांनीं हातीं सांपडलेल्या तुर्कांची एकजात कत्तल केली आणि तुर्कांची जेवढी म्हणून मालमत्ता होती ती लुटून नेली. हें हृदयद्रावक वर्णन त्या लोकांच्या तोंडून ऐकून कमाल यांना मनस्वी दुःख झालें. सलानिकामध्यें त्यांची आई व बहीण रहात होती. त्या मायलेकी राजधानींत आल्या आहेत

कीं काय याचा तपास कमालांनीं केली. शेवटीं त्यांना आपल्या आईचा व बहिणीचा पत्ता एका ठिकाणीं लागला. यावेळीं त्यांच्या आईचा वृध्दापकाळ झाला होता व त्यांना नीट दिसतही नव्हते. सलानिकाहून येतांना त्या मायलेकींचे अतिशय हाल झालें. कित्येक दिवस त्या थंडीत कुडकुडत उपाशी होत्या.

कमाल यांना पाहतांच त्या माऊलीचे अंतःकरण भरून आले. त्यांनीं कमालांचें प्रेमभरानें चुंबन घेतलें. आपला मुलगा पाहिल्यावर त्यांना झालेल्या हालअपेष्टांचा व उपासमारीचा विसर पडला. कमाल यांनीं शहरामध्यें तावडतोब एक घर घेऊन, तेथें आपल्या वृध्द आईला व बहिणीला ठेवले. सलानिकाच्या पराभवाबद्दल जुबेदा यांच्या मनावर अतिशय परिणाम झाला होता. सलानिका इस्लामच्या कट्टया शत्रूंच्या हातीं पडले, त्यांच्या नातेवाईकांची अत्यंत क्रूरपणें कत्तल झाली, त्यांचे घर जमीनदोस्त केलें गेलें, त्यांचेजवळ होते ते सर्व लुटले गेले; त्यांचा सत्यानाश झाला! एका खोलींत त्या एकट्याच विषण्ण अंतःकरणानें नि भरलेल्या डोळ्यांनीं गतगोष्टींचा विचार करीत बसत व अनन्यभावानें अल्लाची करुणा भाकीत.

दार्दानेलीसच्या रोखानें येणाऱ्या बल्गेरियन सैन्यास तोंड देत असलेल्या सैन्याचे मुख्य म्हणुन कमाल यांची नेमणूक झाली.

त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी पडली होती. बल्गेरियन सैन्यास थोपवून धरण्यांत थोडी कुचराई झाली तर दार्दानेलीसवर बल्गेरियन सैन्याचा ताबा ठरलेलाच. दार्दानेलीसचा ताबा घेऊन आशियांतील तुर्कस्थानावर आघात करणेचा बल्गेरियन सैन्याचा बेत होता. कमाल यांनीं मोठ्या धैर्यानें बल्गेरियन सैन्यास तोंड दिलें. शत्रू सैन्यानें तुर्की सैन्याची फळी फोडण्याचा प्रयत्न केला; पण कमाल यांच्या योग्य बंदोबस्तामुळें व प्रभावी नेतृत्वामुळें त्यांना यश आलें नाहीं. कित्येक दिवस दोघांमध्यें घनघोर रणसंग्राम चालू होता. इतक्यांत तहाची भाषा सुरू झाल्यामुळें तो संग्राम तहकूब झाला. युरोपांतील मोठ्या राष्ट्रांनीं शांतता--परिषद बोलावून युद्ध संप-विण्याचा बेत केला. परिषदेमध्यें बाल्कन राष्ट्रांनीं अव्वाच्या सव्वा मागण्या पुढें केल्या. फक्त राजधानी वगळून युरोपमधील तुर्कस्थान आपसांत वाटून घेण्याचा सर्व बाल्कन राष्ट्रांचा डाव होता.

तुर्की पुढाऱ्यांत दोन तट पडले. तुर्कस्थानचे मुख्य वजीर कामीलपाशा यांच्या बाजूचे पुढारी, ‘ काय वाटेल ते होवो; तुर्कस्थाननें तह हा केलाच पाहिजे, ’ अशा मताचे होते. याच्या उलट एकजात तरुण पुढारी या बुढ्ढ्या वजीराविरुद्ध होते. ‘ वाटेल ते झाले तरी शरण जावयाचे नाहीं किंवा तुर्कस्थानची चीरफाड

होऊं द्यावयाची नाहीं; ' असें त्यांनीं ठरविलें. या दोन तटामध्यें भयंकर चुरस लागून राहिली.

इतक्यांत अनवर ट्रिपोलीहून आले. त्यांनीं ' संघ आणि प्रगती 'च्या सभासदांना व तरुण अधिकाऱ्यांना आपल्या विश्वासांत घेतले आणि ज्याठिकाणीं मंत्रिमंडळाचा तहाबाबत विचारविनिमय चालला होता त्याठिकाणीं ते आपल्या साथीदारांसह एकदम घुसले. अनवर व त्यांचे साथीदार पाहतांच मंत्रिमंडळाची गाळण उडाली. अनवरपाशांनीं युद्धमंत्री नजीम यांना गोळी घालून ठार केले व हातांत रिव्हॉल्व्हर घेऊन कामीलपाशा व इतर मंत्री यांचा पाठलाग केला. पण सुदैवानें कामीलपाशा व इतर मंत्री अनारपाशाच्या तडाख्यांतून वांचलें. विलंब न लावतां, अनवरपाशांनीं तह करूं इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांना पकडून फांसावर चढविले, अंतस्थ कलह मिटविले आणि बाल्कन राष्ट्रांच्या अपमानास्पद अटी लाथाडून टाकल्या.

अनवरपाशांनीं सर्व सैन्य जमविले व ॲड्रीयानोपलकडे कूच केले. कमाल त्यांच्याबरोबर होतेच. तुर्की सैन्यानें बल्गेरीयन सैन्याचा पराभव केला व ॲड्रीयानोपल आपल्या ताब्यांत घेतलें. शहरांत ज्यावेळीं अनवर व कमाल यांनीं प्रवेश केला त्यावेळीं नागरिकांनीं त्यांच्यावर फुलें उधळलीं.

अॅड्रीयानोपलच्या विजयानंतर कमाल राजधानीस परत आले. त्यांच्या पराक्रमाबद्दल त्यांना लेफ्टनंट कर्नलचा हुद्दा मिळाला. युद्धमंत्र्याची जागा अनवरपाशा यांना देण्यांत आली. सैन्याची पुनर्घटना करण्यासाठीं अनवरपाशांनीं जनरल लिमान व्हॉन सॉडर्स या जर्मन तज्ज्ञाला पाचारण केलें. ही बातमी ऐकल्याबरोबर कमाल यांना संताप आला व त्यांचा जाज्वल्य स्वाभिमान जागृत झाला. 'तुर्की सैन्याची पुनर्घटना करण्यास आपण तुर्क समर्थ आहोंत. त्याकरिता जर्मनीची मदत घेणें ही लाजीरवाणी गोष्ट आहे. या गोष्टीचा प्रत्येकानें निषेध करावा,' अशी कमाल यांनीं चळवळ चालविली.

"आमचे सैन्य ही आमच्या राष्ट्राची शक्ति आहे. या शक्तिवर नियंत्रण ठेवावयास जर्मनीला परवानगी द्यावी हा निव्वळ वेडेपणा आहे. आमचा प्रश्न आम्हींच सोडविला पाहिजे. हा प्रश्न सोडविण्याकरितां जर्मनीची मदत मागावी हा राष्ट्राचा अपमान आहे," अशा स्पष्ट शब्दांत कमाल यांनीं आपला निषेध प्रगट केला. त्यांनीं या बाबतींत अनरपाशांची भेट घेण्याचा प्रयत्न केला; पण त्याना यश न येतां, सोफीयास बदली केल्याचा हुकूम मात्र त्यांच्या हातीं पडला.

हुकूमानुसार कमाल यांनीं सोफियाकडे प्रयाण केलें. सोफीयामध्यें जाऊन फार दिवस होतात न तोंच युरोपमध्यें महायुद्धाचा

भडका उडाला. तुर्की राष्ट्रानें जर्मनीची बाजू घेऊन लढण्याचें जाहीर केलें असें कळतांच, कमाल यांना अतिशय वाईट वाटलें. कुठल्याही बाजूस न पडतां तटस्थ राहण्यांतच तुर्कस्थानचें कल्याण आहे असें त्यांनीं आपलें मत व्यक्त केलें. लढाई थोड्याच आठवड्यांत संपेल असा सर्वांचा कयास होता; पण जसजसे जास्त दिवस लोटूं लागले तसतशी कमाल यांची अस्वस्थता वाटूं लागली. लढाई चालूं असतां आपण स्वस्थ बसून राहावे ही कल्पना त्यांना सहन होईना. त्यांनीं रणांगणावर जाण्याची परवानगी मागितली; पण 'आपण आहांत' तेथेंच रहा, असें अनवरपाशांकडून उत्तर आल्यामुळें ते हात चोळीत स्वस्थ बसले. शेवटीं रजा न घेतां कॉंस्टॅंटिनोपल येथें जावें असा त्यांनीं विचार केला, इतक्यांत कॉन्स्टॅंटिनोपलमध्यें हजर व्हा असा हुकूम त्यांच्या हातांत आला.

## प्रकरण १० वें

—xx—

# महायुद्धांत

कमाल कॉन्स्टँटिनोपल येथें हजर झाल्या बरोबर, त्यांना गॅलीपोली द्वीपकल्पाच्या दक्षिण भागाचें संरक्षण करणाऱ्या व्हॉन साँडर्सच्या दिमतीस देण्यांत आले. व्हॉन साँडर्सचें, तुर्की अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेबद्दल चांगलें मत नव्हतें; पण कमाल यांची बुद्धीमत्ता व लष्करी ज्ञान पाहून,तुर्की अधिकारी आपल्या योग्यतेचे असू शकतात हे त्या जर्मन सेनानीस पटलें. कित्येक वेळेला व्हॉन साँडर्सशी कमाल यांचे लष्करी आंखणीबद्दल खटके उडत. शेवटीं साँडर्सला त्यांचें मत ग्राह्य मानावे लागत असे.कमाल यांची विद्वत्ता व हुषारी पाहून साँडर्सनें " उत्कृष्ट अधिकारी—खरा पुढारी " असे प्रशंसनीय उद्गार काढले.

गॅलीपोलीवर इंग्लिश सैन्य हल्ला करण्याच्या तयारीत आहे; इजिप्तमध्यें ८० हजार सैन्य तयार असून त्या सैन्यांस नेण्या-

कारितां आरमार सज्ज आहे अशा बातम्या कैरो व अथेन्सहून आल्या. व्हॉन सॉंडर्सला मोठा पेंच पडला. गॅलीपोली द्वीपकल्पाचा समुद्रकिनारा ९२ मैल लांब होता. इंग्रजांचें ८० हजार सैन्य कुठें उतरेल याचा नेम नव्हता. तुर्की सैन्य अवघें ६० हजार होतें. सॉंडर्सनें वीस वीस हजार सैनिकांच्या तीन तुकड्या करून इंग्लिश सैन्याचा प्रतिकार करण्याचें योजिलें.

रविवार २९ तारखेला इंग्रजांचें सैन्य येऊन थडकलें. त्यापैकीं एका तुकडीनें द्विपकल्पाच्या उत्तर बाजूस, दुसऱ्या तुकडीनें दक्षिण बाजूस हल्ला चढविला. मध्यावर आस्ट्रेलीयन सैन्यानें मुख्य हल्ला केला. या भागाचा कमाल सांभाळ करीत होते. आस्ट्रेलीयन सैन्याचा चुनक बेअर नांवाचें महत्वाचें लष्करी ठाणें घेण्याचा बेत दिसतांच, कमाल यांनीं आपलें सैन्य प्रतिकारार्थ चुनक बेअरकडे नेलें. त्यांच्या हातांत नकाशा होता; त्या नकाशाकडे पाहून ते आपल्या सैन्यास आज्ञा फर्मावित होते. शत्रूसमीप आहे असें दिसतांच त्यांनीं शत्रूसैन्यावर हल्ला करण्याचा हुकूम दिला. दिवसभर आस्ट्रेलीयन सैन्य व तुर्की सैन्य यामध्यें भयंकर युद्ध चाललें होतें. तोफांच्या माऱ्यापुढें उभें राहून जातीनें कमाल आपल्या सैनिकांस प्रोत्साहन देत होते. आस्ट्रेलीयन सैन्याला मागें समुद्रापर्यंत रेटण्याची तुर्की सैन्यानें शिकस्त केली; पण आस्ट्रेली-

यन सैन्य मागें हटले नाहीं. दोघेंही एकमेकांस हटवूं शकत नाहीं हें पाहून दोघांनींही खंदक खोदणेस सुरवात केली. कित्येक आठवडे खंदकामधूनच लढाई चालली होती. दोन्ही बाजूच्या सैनिकांना रात्रींच्या रात्रीं जागून काढाव्या लागत. रात्रीं संगीनींचा हल्ला केव्हां होईल याची कांहींच खात्री नव्हती. बाँब वर्षावामुळें दोन्हीं बाजूंच्या खंदकांत प्रेतांचा खच पडत होता. थोड्याच दिवसांत कडक उन्हाळा सुरू झाला. पाण्याची अतिशय टंचाई भासूं लागल्यामुळें, सैनिकांचें अतिशय हाल होऊं लागलें. दोन्ही सैन्यांच्यामध्यें पडलेली प्रेतें कुजून, त्यावर मोठ्या माशा बसूं लागल्या. त्याच माशा अन्नावरून वावरूं लागल्यामुळें हगवण, अमांश, विषमज्वर वगैरे रोग सैनिकांत मोठ्या प्रमाणांत फैलावूं लागले. दोन्ही सैन्यांची प्रतिकारशक्ति कमजोर झाली.

इतकी अवस्था झाली तरी कमालयांच्या चेहऱ्यावर काडीमात्र काळजी दिसेना. त्यांचा चेहरा सदैव उमेदीनें भरलेला दिसे. ते फार झोंप घेत नसत. आपल्या अधिकाऱ्यांना घेऊन, ते रात्रंदिवस सैनिकांमधून फिरत. जे हुकूम द्यावयाचे ते अत्यंत काळजीपूर्वक व अभ्यासपूर्वक देत असत. कित्येक वेळेला शत्रू सैन्याची पहाणी करण्याकरितां आपली हद्द ओलांडून धोक्याच्या जागीं जाण्यास त्यांना काडीमात्र भीती वाटत नसे. हातघाईची लढाई सुरू असतां

ते सैन्याच्या आघाडीवर, गोळ्यांच्या माऱ्यांत, बेदरकारपणें उभे राहात. त्यांच्या सभोंवार मुडदे पडत; पण, त्यांना चुकून देखील गोळी लागत नसे.एक दिवस आपल्या खंदकाच्या बाहेर बसले होते, तोंच ऑस्ट्रेलियन तोफांचा मारा सुरूं झाला. प्रत्येक गोळा त्यांच्या बाजूला येऊन फुटत होता. त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांनीं आश्रयार्थ बाजूला येण्याबद्दल कमाल यांना विनंति केली. कमाल शांतपणें म्हणाले, " आश्रय घेणें ह्मणजे सैनिकांना वाईट धडा देण्यासारखे आहे." इतकें बोलून त्यांनीं सिगारेट पेटविली व संथपणें हवेत धुराचे लोट सोडावयास सुरवात केली.

आगस्ट ७ तारखेस ऑस्ट्रेलियन सैन्यास इंग्रजाकडून कुमक मिळाली. पुन्हां जोरदार युद्ध सुरूं झालें. तुर्की सैन्यानें आपल्या पराक्रमाची शर्थ केली; पण, ऑस्ट्रेलियन व इंग्रजांच्या सैन्यांसमोर त्यांचा निभाव लागेना. तुर्की सैन्याचा अधिकारीवर्ग गोंधळून गेला व मागें सरकरण्याची भाषा बोलूं लागला. कमाल हे धैर्याचे मेरू होते.काडीमात्र न डगमगतां किंवा हताश न होतां, अग्निगोलकांच्या वर्षावांत ते आपल्या अधिकाऱ्यांना नि सैनिकांना प्रोत्साहन देत उभे होते. त्यांचा धीरोदात्त स्वभाव पाहून, त्यांच्या सैनिकांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. 'मरूं किंवा मारूं,' या आवेशानें ते निकरानें लढूं लागले. इतक्यांत बुलेरहून आणखी तुर्की सैन्याची

कुमक आली. या नवीन सैन्यास थोडा वेळ विश्रांती दिल्यानंतर, लढण्यास तयार राहण्यासाठीं कमाल यांनीं हुकूम दिला. ही नवीन कुमक आल्यामुळें तुर्की सैन्य मोठ्या उमेदीनें लढूं लागले. या सैन्यानें इंग्रजांच्या सैन्याला समुद्रालगत होजाचमनपर्यंत मागें रेटलें. या वेळीं इंग्रजाकडून लढणाऱ्या हिंदी सैन्यानें आपल्या पराक्रमाची शर्थ केली. हिंदी सैन्याचा पराक्रम पाहून, तुर्की सैन्य स्तिमितच झालें. हिंदी सैन्यानें पुन्हां तुर्की सैन्यावर चाल केली. इतक्यांत इंग्लीश आरमारानें आपला तोफखाना सुरू केला; पण, त्या तोफांचा मारा तुर्कांवर होण्याऐवजीं इंग्रज आणि हिंदी पलटणीवरच होऊं लागला. त्यामुळें इंग्लीश व हिंदी सैन्य गोंधळून गेले व त्यांनीं माघार घेतली. तोफांच्या माऱ्यामुळें त्याचें अतिशय नुकसान झालें.

रात्रीं ८ वाजतां आपल्या छावणींमधून कमाल एकटेच बाहेर पडले. शत्रूच्या जागेची पाहणी करण्याचा त्यांचा बेत होता. ' आपण यावेळीं एकटे जावूं नका ' असें त्यांच्या हाता-खालील अधिकाऱ्यांनीं परोपरीनें सांगितलें; पण ते त्यांनीं ऐकले नाहीं. ते बाहेर पडल्याबरोबर दोन गोळ्या सूं सूं करीत त्यांच्या बाजूनें निघून गेल्या, तरी न डगमगतां शत्रूच्या जागेची पहाणी करून ते परत फिरले.

तेथून आल्याबरोबर मध्यरात्रीपर्यंत कमाल पुढील हल्ल्याची आंखणी करीत बसले होते. त्यांनीं सर्व सैन्य आघाडीच्या खंदकांमध्यें जमविलें व त्या सैन्यास उद्देशून म्हणाले, " माझ्या तरुण वीरांनो, घाई करूं नका. हल्ला केव्हां करावयाचा हें ठरवून मी खंदकाच्या बाहेर पडेन मी हात वर केल्याबरोबर संगीनी खोवून माझ्या मागोमाग या. विजय आपला आहे हे लक्ष्यांत ठेवा. आज तुम्हीं जो पराक्रम कराल त्यावर तुमचें पुढचें यश अवलंबून आहे हें लक्ष्यांत ठेवा. "

ठरल्यावेळीं प्रत्येक तुर्की तोफ शत्रूवर रोखली गेली व शत्रूवर जबरदस्त मारा सुरू झाला. पहांटे बरोबर तीन वाजतां कमाल खंदकाबाहेर आले. इंग्रजांच्या सैन्यांनही बंदुकीच्या गोळ्यांचा मारा सुरू केला. त्यापैकीं एक गोळी कमाल यांच्या रिस्टवॉचवर आदळली व त्यामुळें त्या घड्याळ्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. सुदैवानें कमाल यांना कांहीं इजा झाली नाहीं.

तोफखान्याचा मारा बंद झाला. कमाल यांनीं हात वर करतांच संगीनी घेतलेले असंख्य तुर्की सैनिक खंदकामधून बाहेर पडले व कमाल याच्या मागून जाऊं लागले. शत्रू सैन्याजवळ जातांच तुर्की सैन्यानें संगीनीचा हल्ला चढविला. अकस्मात हल्ला व तोही अंधारांत झाल्यामुळें इंग्रजांचें सैन्य गोंधळून गेलें. इंग्रजांची

व तुर्कांची हातघाई सुरू झाली. प्रेतांचा खच पडूं लागला. तुर्की सैन्यानें इंग्रजांच्या सैन्याला समुद्रापर्यंत रेटीत नेले. समुद्रामधील इंग्लीश आरमारानें तोफांचा मारा सुरू केल्यामुळें, तुर्की सैन्यानें खंदक खोदून आश्रय घेतला. अशारीतीनें इंग्रजांच्या सैन्याला आपल्या प्रदेशामधून हुसकून लावून कमालांनीं आणीबाणीचा प्रसंग मोठ्या शिताफीनें व धैर्यानें टाळला. या अतुल पराक्रमाबद्दल कमाल यांना ' पाशा ' ही मानाची पदवी मिळाली. तेव्हांपासून कमाल हे ' कमालपाशा ' या नांवानें ओळखले जाऊं लागलें.

काबीज करण्याचा इंग्रजांचा बेत फसल्यावर त्यांनीं सुल्वा उपसागरामधून अनाफर्ता काबीज करण्याचा बेत चालविला. कमालपाशांना तावडतोब अनाफर्ताच्या आघाडीवर पाठविण्यांत आले. कमालपाशा आघाडीवर येऊन पाहतात तों तुर्की सैन्य अगदीं विस्कळींत झालेलें त्यांना दिसून आलें. त्यांनीं तावडतोब सैन्याची संघटना करून उत्कृष्ट शिस्त लावून दिली. दोन वेळां इंग्रजांनीं सुल्वा उपसागरामधून तुर्कांवर हल्ला केला. प्रत्येक वेळीं भयंकर युद्ध होऊन दोघांचेही असंख्य सैनिक मारले गेले. कमालपाशांजवळ मनुष्यबळ फार कमी होते, पण त्यांनीं आपल्या प्रभावी वाणीनें आपल्या थोड्याशा सैन्यांत नवचेतना निर्माण केली

व इंग्रजांशीं मोठ्या धैर्यानें लढून,त्यांना जमिनीवर उतरूं दिले नाहीं. डिसेंबर १९१५मध्यें अनाफर्ता ध्यावयाचा नाद सोडून इंग्रजांचें सैन्य परत फिरलें. अशारीतीनें कमालपाशांनीं शत्रूला पूर्णपणें हुसकून लावून अभूतपूर्व अशा विजय मिळविला. यदाकदाचित् या युद्धांत इंग्रजांचा जय झाला असता तर इंग्रजांनीं सरळ चुनक बेअरपासून अनाफर्तापर्यंत मुलूख काबीज करून दार्दानेलीसचा ताबा घेतला असता. दार्दानेलिसचा ताबा म्हणजे तुर्कस्थानचा मृत्यु होता. दार्दानेलीस ताब्यांत असल्यानंतर लगेच इंग्रजांचें निशाण तुर्कस्थानच्या राजधानीवर–कॉन्स्टँटिनोपलवर मोठ्या डौलानें फडकलें असतें.

इंग्रजांचा पराभव करून कमालपाशा कॉन्स्टँटिनोपल येथें परत आले. राज्यधानींत प्रवेश केल्याबरोबर कानठळ्या बसेपर्यंत कमालपाशांचा जयजयकार करण्यांत आला. ‘ राष्ट्रवीर ’ म्हणून त्यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव होऊं लागला. दार्दानेलीसचा व राजधानीचा रक्षणकर्ता म्हणून वर्तमानपत्रांतून त्यांच्या पराक्रमाची रोमांचकारक वर्णनें येऊं लागलीं. तुर्कस्थानचा सुपुत्र म्हणून त्यांचा ठिकठिकाणीं गौरव होऊं लागला.

कमालपाशा यांचा सत्कार चालू असतां, कॉकेशस पर्वताकडे रशियन सैन्याची चढाई होत असल्याची वार्ता आली. तावडतोब

कमालपाशांना कॉकेशस सरहद्दीकडे पाठविण्यांत आले. तिकडे जावयास वाहान नव्हतें कीं रस्ते नीट नव्हते! तरी मोठ्या मुष्कलीनें कमाल सरहद्दावर येऊन पोंहोंचले तेथें येऊन पह्यातांत तों तीच नेहमींची गैरव्यवस्था! तेच नालायख लष्करी अधिकारी! ते ठिकाण इतके लांब होतें कीं, त्या ठिकाणीं दुसरे कार्यक्षम अधिकारी मागविणें अशक्यच होते. कमालपशांनीं त्याच अधिकाऱ्यांना योग्य शिक्षण देऊन सबंध सैन्याची पुनर्घटना केली. रशियन सैन्य रस्ते व रेल्वे बांधीत सावकाश पुढें सरकत होतें. त्यांनीं तुर्कांचीं प्रमुख ठाणीं आपल्या कब्जयांत घेतली होती. इरझरूमचा प्रख्यात किल्लाही त्यांच्या हातीं पडला होता.

रशियाच्या विराट सैन्याला तोंड द्यावयास आपलें सैन्य असमर्थ आहे हें कमाल यांनीं ताबडतोब आळखलें. शिवाय, तुर्की सैन्याजवळ अन्नाचा तुटवडा होता;; बंदुका, तोफा व गोळ्यांचा सांठा नव्हता; उत्साह तर पार मावळूनच गेला होता. औषधपाण्याची सोय नसल्यामुळें हजारों सैनिक दोषी तापानें व आमांशानें मरत होतें. त्यांनीं ताबडतोब ही सर्व हकीकत राजधानींमध्यें असणाऱ्या मुख्य युद्धकचेरीस कळाविली; पण युद्धकचेरीहून कांहींच उत्तर आलें नाहीं किंवा दारुगोळ्याचा व औषधपाण्याचा

सांठाही पाठवून दिला नाहीं. रशियन सैन्य तर सावकाश आक्रमण करीत होतें. १७ सालच्या उन्हाळ्यांत रशियन सैन्य आपल्यावर हल्ला करील असा त्यांनीं अंदाज बांधला. तेवढ्या वेळांत सैन्यामध्यें शक्य तितकी सुधारणा करण्याचा त्यांनीं बेत केला. मक्तेदारांकडून औषधाची व अन्नाची कशीबशी तरतूद करविली; पण दारुगोळ्यांचा पुरवठा नसल्यामुळें उन्हाळ्यांत रशियन सैन्यानें हल्ला केल्यास त्याचा प्रतिकार करणें अगदीं अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली. आतांपर्यंत आपण अनेक विजय मिळविले; पण या वेळेला मात्र पराभव खावा लागणार या विचारानें कमालपाशांना फार वाईट वाटलें; तथापि धीर न सोडतां आहे त्यांतच परिस्थितींत त्यांनीं निकरानें लढण्याचें ठरविलें.

शेवटीं परमेश्वर त्यांच्या सहाय्यास धांवून आला. रशियामध्यें क्रांति होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. क्रांतीच्या वार्तेमुळें रशियन सैन्यावर बराच परिणाम झाला. सैन्याची शिस्त भंग पावूं लागली. कित्येक सैनिकांची सैन्य सोडून जाण्याची तयारी दिसूं लागली. रशियन सैन्याधिपती ग्रँड ड्यूक निकोलस यांना तावडतोब मास्कोस बोलाविण्यांत आले. त्यांची पाठ फिरल्याबरोबर रशियन सैन्य विस्कळीत झालें.

कमालपाशांनीं या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन आपल्या लहान सैन्यासह एकदम हल्ला चढविला. रशियन सैन्य अगोदरच विस्कळीत व नाराज झालें होतें. त्यांत हा तुर्कांचा हल्ला झाल्या-बरोबर रशियन सैन्याची दाणादाण झाली. कमालपाशांनीं शत्रूनें घेतलेले सर्व प्रांत परत मिळविले.

रशियन संकट दूर होतें न होतें तोंच तुर्कस्थानच्या दक्षिण भागांत नवेंच संकट उपस्थित झाले. इंग्रज सैन्याचा सिरीयामधून हल्ला करण्याचा विचार आहे अशी बातमी येऊन थडकली. ताबडतोब कमालपाशांनीं सैन्याची सर्व सूत्रें कझीम कारा बेकीर यांच्या हवालीं केली नि सिरीयाकडे जाण्याकरितां कॉन्स्टँटिनोपलचा रस्ता सुधारला. कपालपाशा सिरीयामध्यें येऊन पोहोंचेपर्यंत इंग्रजांनीं हिंदी लष्कराचे साहाय्यानें बगदादचा ताबा देखील घेतला होता. इंग्रजांशीं लढून, बगदाद पुन्हां मिळविण्याची महनीय कामगिरी कमालपाशा यांचेवर येऊन पडली होती. त्याकरितां जनरल व्हॉन फकनहॅन या जर्मन अधिकाऱ्यांशीं सहकार्य करण्याबद्दल कमाल पाशांना युद्धमंत्र्याची आज्ञा झाली. त्या ठिकाणीं असलेले तुर्की सैन्य त्या जर्मन अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं होते. ही परिस्थिती पाहतांच कमालपाशांना फार उद्वेग वाटला. जर्मन अधिकाऱ्याच्या हुकमतीखालीं वागण्याचें त्यांनीं साफ नाकारले. ' तेथील परिस्थितीचें

ज्ञान जर्मन अधिकाऱ्यापेक्षां आपल्यास जास्त आहे. तेव्हां अशा आणीबाणीच्या प्रसंगीं जर्मन सेनानीच्या हुकमतीखालीं काम करणें आपण केव्हांही पसंत करणार नाहीं ' असें त्यांनीं युद्धमंत्र्यांना साफ कळविलें. अलेपो येथें झालेल्या युध्दाविषयक सभेस युध्दमंत्रि जमील, कमालपाशा, फकन हॅन व बरेच जर्मन अधिकारी हजर होते. सभेमध्यें कमालपाशांनीं त्या जर्मन सेनानीची आंखणी किती चुकीची आहे हें स्पष्टपणें दाखविलें. ' बगदाद घेण्याचा प्रयत्न करणें व सुएझ कालव्यावर हल्ला करणें या दोन्ही गोष्टी आजच्या परिस्थितींत अशक्यप्राय असून, त्यांत कधींहीं यश येणें शक्य नाहीं. ' कमालपाशांचे हे उद्गार ऐकून त्या जर्मन सेनानीला संताप आला. युद्धमंत्र्यांनीं त्याची कशीबशी समजूत काढली व त्या जर्मन अधिकाऱ्याची आंखणी योग्य आहे असें ठरविलें. 'अशी मूर्ख-पणाची आंखणी व बेत करून, अपयश पदरांत घेण्यापेक्षां आपण राजीनामा दिलेला बरा, ' असा विचार करून कमालपाशांनीं आपला राजीनामा सादर केला. युध्दमंत्र्यांनीं राजीनामा परत घेण्याबद्दल त्यांना परोपरीने सांगितले; पण, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं कमालपाशांना दीर्घ मुदतीची आजारी रजा देण्यांत आली.

## प्रकरण ११ वें

—××—

# जर्मन राजधानींत

रजा घेतल्यानंतर कमालपाशा आपल्या आईबहिणीसह कॉन्स्टँटिनोपल येथें तीन महिने राहिले. हा तीन महिन्यांचा काळ त्यांना अतिशय कष्टाचा गेला. कामाशिवाय आळसांत घालविलेला एकएक दिवस त्यांना वर्षासारखा वाटूं लागला. त्यांना करमेना किंवा कुठेंही मन लागेना. आपली रजा संपते केव्हां आणि आपण नोकरीवर हजर होतो केव्हां असें त्यांना होऊन गेलें. सन १९१८ च्या वसंत ऋतूंत तुर्कस्थानाच्या युवराजांनीं जर्मन राजधानीस भेट देण्याचें ठरल्यामुळें, युवराजांबरोबर जर्मनीस जाण्याचा कमालपाशांना हुकूम झाला.

अनवरपाशांनीं कमालपाशांना जर्मनराजधानीच्या कामगिरीवर मुद्दाम पाठविण्याचें योजिलें. कमालपाशांना जर्मन लोकांविषयीं

सहानुभूती नव्हती. तुर्कस्थानच्या लष्करी कारभारांत जर्मन लोकांचें झालेलें प्राबल्य त्यांना सहन होत नसे. तुर्कांसारख्या लढाऊ जातीनें उठल्या सुटल्या जर्मन लोकांच्या ओंजळीनें पाणी प्यावें ही गोष्ट त्यांच्या मनांत शल्यासारखी लागून राहिली होती. खासगी किंवा सार्वजनिक ठिकाणीं ते या गोष्टीचा निषेध करीत व जर्मन लोकांचा तुर्कस्थानांत शिरकाव करून दिला म्हणून अनवर-पाशांना दोष देत. जर्मनी हें किती पहिल्या प्रतीचें राष्ट्र आहे व तेथील लष्कराधिकारी किती कार्यक्षम आहेत हें कमालपाशांच्या मनावर बिंबवून त्यांच्या मनांत जर्मन लोकांविषयीं जी अढी बसली होती ती काढून टाकण्याचा अनावरपाशांचा बेत होता.

ठरलेल्या दिवशीं तुर्कस्थानचे युवराज बर्लिनला जाण्यासाठीं खास आगगाडीनें निघाले. त्यांच्याबरोबर राजवाड्यावरील हांजी-खोर नि अजागळ लोकांचा ताफा बरोबर होताच. या सर्व लवा-जम्याबरोबर जर्मनीला आपल्या सारख्या माणसानें जावयाचे ही गोष्ट कमालपाशांना कशीशीच वाटली. आपण युवराजाबरोबर निघण्यास संमत्ती दिली हा आपला मूर्खपणा झाला, असें कमाल-पाशांना वाटूं लागलें.

कमालपाशांच्या विचाराबरोबर युवराजांची खास आगगाडीही मार्ग आक्रमूं लागली. तुर्कस्थानाची सरहद्द ओलांडल्याबरोबर,

कमालपाशांनीं आपल्या खास डब्यांत भेटावे अशी युवराजांची इच्छा आहे असें एका लष्करी अधिकाऱ्यानें सांगितलें. कमालपाशा युवराजांचा डब्यांत गेल्यावर, युवराजांनीं कमालपाशांचें स्वागत केलें. अद्याप आपल्या सारख्या पराक्रमी वीराची ओळख करून घेण्याचा योग आला नाहीं याबद्दल त्यांनीं कमालपाशांची क्षमा मागितली. थोड्याच वेळांत दोघांची गट्टी जमली व बर्लीनपर्यंतचा सर्व प्रवास त्यांनीं एकाच डब्यांतून केला.

बर्लीन येथें पोहोंचल्यानंतर स्टेशनवर तुर्कस्थानाच्या युवराजांचा यथोचित सत्कार करण्यांत आला. नंतर त्यांना मुख्य लष्करी ठाण्यावर नेण्यांत आले. त्याठिकाणीं जर्मनीचे भीष्माचार्य व्हॉन हिंडेनबुर्ग यांनीं युवराजांचे स्वागत केलें. युवराजांना लढाईची सर्व परिस्थिती समजावून देण्यांत आली; विशेषतः सिरीयाच्या सरहद्दीवरील परिस्थिती अत्यंत आशादायक आहे असें सांगण्यांत आलें. तेथून परत आपल्या निवासस्थानीं आल्यावर कमालपाशा युवराजांना म्हणाले, " सिरीयाच्या सरहद्दीबद्दल व्हॉन हिंडेनबुर्गांनीं जी माहिती सांगितली ती अत्यंत चुकीची आहे. जर्मन सैन्याधिकाऱ्याला तेथील परिस्थितीचें चुकीचें ज्ञान असावें ही गोष्ट अत्यंत शोचनीय आहे "

जर्मनीचे बादशहा कैसर यांनीं युवराजांच्या सन्मानार्थ एक मोठा खाना दिला. खाना झाल्यानंतर कमालपाशा हिंडेनबुर्गांच्याजवळ उभे होते. ते म्हणाले, " मेहेरबान, आपण सिरीयाच्या परिस्थितीविषयीं जी माहिती युवराजांना सांगितली ती अत्यंत चुकीची आहे. मी त्याठिकाणीं बरीच वर्षें काढलीं आहेत व त्यामुळें तेथील खरी परिस्थिती काय आहे हें मला पूर्णपणें माहित आहे. " जगामध्यें लष्करीशास्त्रांत अत्यंत निपुण समजल्या गेलेल्या व्हॉन हिंडेनबुर्गांना, कमालपाशांच्या निधडेपणाबद्दल आश्चर्य वाटलें. यापेक्षां कमालपाशांनीं जास्त बोलूं नये म्हणून हिंडेनबुर्गांनीं त्यांना सिगारेट ओढावयास दिली.

कोणीं चुकीची व अप्रबुद्धपणाची गोष्ट सांगितली तर ती कमालपाशांना सहन होत नसे. ते ताबडतोब भिडभाड न ठेवतां त्याची चूक स्पष्टपणें दाखवून देत असत. त्याचप्रमाणें त्यांच्या राष्ट्रीयत्वास धक्का लावलेले त्यांना खपत नसे. एक दिवस आलास्काच्या गव्हर्नरनें खाना दिला. त्यावेळीं त्यानें तुर्कांच्या राष्ट्रीयत्वाविषयीं शंका प्रदर्शित केल्याबरोबर कमालपाशा ताडकन उठून उभे राहिले व त्यांनीं गव्हर्नरचा योग्य शब्दांनीं खरपूस समाचार घेतला. कमालपाशांचा रुद्रावतार पाहून गव्हगर्नरनें ताबडतोब माफी मागितली.

जर्मनीहून परत जाण्याच्या अगोदर पश्चिम आघाडीची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा कार्यक्रम आंखला होता; पण प्रत्यक्ष रणांगणावर जावून पहाणी करण्याचें युवराजांनीं नाकारलें. शेवटीं कमालपाशा एकटेच जर्मन अधिकाऱ्यांसह आघाडीवर गेले व त्यांनीं आघाडीवरील खंदकांची पाहणी केली. नंतर शत्रूची टेहळणी करण्याकरितां एका झाडावर बांधलेल्या टेहेळणगृहामध्यें जाऊन तेथून शत्रूची होत असलेली हालचाल न्याहाळीली. तेथून परत आल्यानंतर ते युवराजांना म्हणाले," वरवर पहाणाऱ्यांना जर्मनीला यश मिळेल असें वाटतें; पण खरी वस्तुस्थिती तितकीशी आशादायक नाहीं, असें माझें मत आहे. "

युवराजांचे राजधानीमधील सर्व कार्यक्रम संपल्यानंतर ते आपल्या परिवारासह तुर्कस्थानला परत जाण्यास निघाले.

## प्रकरण १२ वें

—xx—

# युद्धतहकूब

बर्लीनहून परत आल्याबरोबर कमालपाशा अतिशय आजारी पडले. जवळ जवळ एक महीना ते बिछान्यावर पडून होते. डॉक्टरांनीं हवा पालट करण्यासाठीं व्हीएन्नास जाण्याचा कमालपाशांना सल्ला दिला. कॉन्स्टँटिनोपल सोडून जाणें त्यांच्या जिवावर आलें; पण इष्टमित्रांच्या आग्रहावरून हवापालट करण्याकरितां राजधानी सोडणें त्यांना भाग पडलें. प्रकृतीस थोडा आराम पडल्यावर कमालपाशा जुलै १९१८ मध्यें राजधानीस परत आले. त्यावेळीं वृद्ध सुलतानाचा मृत्यू झाला होता व युवराज वहीदुद्दीन गादीवर बसले होते. नव्या सुलतानास भेटण्याकरितां म्हणून कमालपाशा राजप्रासादांत गेले. सुलतान वहीदुद्दीन यांनीं कमालपाशा यांचे आभारपूर्वक स्वागत केलें व आपल्या जवळ बसवून घेतले. चालू

युद्धाविषयीं बोलणें निघाले असतां कमालपाशा स्पष्ट ह्मणाले, ' आपला पराभव होणार हे आपणांस दिसतच आहे. जर्मन अधिकाऱ्यांच्या हातीं असलेला तुर्की लष्कराचा ताबा आपण आपल्या हातांत घ्यावा. जर्मनीशीं असलेले दोस्तीचे नातें तोडून आपण ताबडतोब स्वतंत्रपणें तह करावा, हेच तुर्कस्थानच्या कल्याणाच्या दृष्टीनें इष्ट ठरणार आहे. जर्मनीच्या नादाला आपण लागलों तर सर्वस्वास मुकूं, हे आपण लक्षांत ठेवा. '

" आपल्यासारखे आणखी किती लष्करी अधिकाऱ्यांचें मत आहे. "

सुलतानांनीं विचारलें.

" पुष्कळ अधिकाऱ्यांचें मत माझ्याप्रमाणेंच आहे. "

" या गोष्टींचा योग्य विचार करूं, " असें सुलतानांनीं आश्वासन दिलें. कांहीं दिवसांनीं कमालपाशांना सुलतानांचें एकाएकीं बोलावणें आल्यावरून ते राजप्रासादांत गेले. त्यावेळीं सुलतानांच्या सभोंवार बरेच तुर्की व जर्मन लष्करी होते. कमालपाशांचें सुलतानांनीं सस्मित स्वागत केलें. जर्मन लष्करी अधिकाऱ्यांकडे वळून सुलतान म्हणाले, " कमालपाशा हे अत्यंत योग्यतेचे लष्करी अधिकारी असून, यांच्यावर माझा अतिशय विश्वास आहे. त्यांचा तोडीचा लष्करी अधिकारी आमच्या तुर्की

सैन्यांत नाहीं हें आपणाला ऐकून माहीत असेलच. आपल्या बुद्धिमत्तेच्या व तलवारीच्या जोरावर त्यांनीं तुर्कस्थानाला अनेक वेळां वांचविले आहे." नंतर कमालपाशांकडे वळून ते ह्मणाले, " आज आपली नेमणूक मी सीरीयामध्यें करीत आहे. तेथील परिस्थिती अत्यंत बिकट आहे. आपण त्याठिकाणीं गेलांत तरच सीरीयाची धडगत आहे; नाहींतर तो प्रांत शत्रूच्या हातांत गेला असेंच समजा. आपण हें कार्य यशस्वीतेनें कराल अशी मला पूर्ण खात्री आहे."

सुलतानांचा निरोप घेऊन कमालपाशा दिवाणखान्यांतून बाहेर पडत असतां एक जर्मन अधिकारी म्हणाला, " त्या ठिकाणच्या तुर्की सैन्यामध्यें दम नाहीं किंवा धैर्य नाहीं. मेंढरासारखे पळावयाचें मात्र त्यांना माहीत आहे " हे उद्गार कानीं पडतांच कमालपाशा चटकन फिरून त्या अधिकाऱ्या समोर जावून उभे राहिले. त्यावेळीं संतापानें कमालपाशांचें सर्व शरीर थरथर कांपत होतें. तुर्की लोकांची निंदा आणि तीहि जर्मन लोकांकडून ऐकून त्यांच्या पायाची तिडीक मस्तकास गेली. ते ओरडून म्हणाले, " तुर्की शिपाई कधींही पळून जाणार नाहीं. माघार हा शब्दच त्यांच्या कोशांत नाहीं. पळपुटेपणा हा तुम्हांलाच जास्त शोभून दिसेल. तुमच्या दुर्गुणाबद्दल तुर्की लोकांना नांवें ठेवावयाचें धाडस

तरी तुम्ही कसें करतां ? " कमालपाशांचा पहाडी आवाज त्या दिवाणखान्यांत घुमत राहिला. सर्व अधिकारी स्तिमित होऊन कमालपाशांकडे पहात राहिले.

आगष्ट महिन्यांत कमालपाशा सीरीयामधें येऊन पोहोंचले. तेथील तुर्की सैन्याची स्थिती अत्यंत शोकजनक असल्याचें त्यांना दिसून आले. तुर्की सैनिकांची आबाळ झाली होती. त्यांना खावयास पुरेसे अन्न नव्हते, पेहरावयास भरपूर कपडा नव्हता, कडक उन्हाळ्यामुळें पाण्याची जबरदस्त टंचाई भासत होती; विशेषतः सैन्यामध्यें आमांशाचा आजार पसरल्यामुळें सर्व सैनिक हवालदिल झाले होते. मोठ्या मिनतवारीनें तुर्की सैनिक खंदकामध्यें इंग्रजांच्या प्रतिकारार्थ कसेबसे दिवस कंठीत होते. याच्या उलट इंग्रजांच्या सैन्याची स्थिती होती. त्यांच्या अन्नाचा पुरावठा भरपूर होता; औषधपाण्याची उत्कृष्ट व्यवस्था होती; दारूगोळा, तोफा, विमानें किती तरी जास्त होतीं. तुर्कांजवळ पाहिले तर फक्त आठ विमाने व दोन विमान विध्वंसक तोफा होत्या !

अमीर फैसलचे अरब प्रजाजन इंग्रजांना मिळाले होते. टी. ई. लॉरेन्स या इंग्लीश अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं अरब लोकांनीं तुर्कांविरुद्ध धुमाकूळ माजविला होता. रेल्वे, टेलीग्राफ, पूल यांचा विध्वंस करण्यास सुरवात केली होती. तुर्कांना कुठल्याही

गोष्टीचा फायदा मिळूं नये असा अरबांचा कटाक्ष होता. अरब लोकांच्या या पिसाट व तुर्कस्थानविरोधी वृत्तीमुळें तेथील परिस्थिती अत्यंत चिंताजनक होऊन बसली होती. कमालपाशांनीं न डगमगतां सैन्यामध्यें सुधारणा करण्यास व त्यांच्यामध्यें शिस्त निर्माण करण्यास सुरवात केली. कमालपाशांना रात्रंदिवस विश्रांती नव्हती. या दगदगीमुळें कमालपाशा आजारी पडले व त्यांना तीन आठवडे अंथरुणावर पडून राहावे लागले. १९ तारखेस इंग्रजांचा मोठा हल्ला होणार हें कळतांच कमालपाशा ताडकन् अंथरूणावर उठून बसले; त्यांच्या अंगांत ताप होता तरी त्याची पर्वा न करतां आपल्या सहकाऱ्यांशीं विचारविनिमय करून इंग्रजांनां तोंड देण्याची त्यांनीं तयारी केली.

ठरल्याप्रमाणें इंग्रजांच्या सैन्याचा जबरदस्त हल्ला झाला. त्या हल्ल्यापुढें तुर्कांचा निभाव लागणें कठीण दिसूं लागलें. इंग्लीश विमानांनीं तुर्की सैन्यावर भयंकर बॉम्बवर्षाव सुरू केला. त्या वर्षावापुढें व इंग्रजांच्या तोफांच्या माऱ्यापुढें तुर्की सैन्याची दाणादाण झाली. कमालपाशांनीं न डगमगतां आपल्या सैन्यास धीर दिला; शत्रूशीं तोंड देण्याची शिकस्त केली; पण कांहीं इलाज चालेना. त्यामध्यें दुःखाची गोष्ट ही कीं, त्या प्रदेशांतील सर्व अरब इंग्रजांना मिळाल्यामुळें, त्यांच्याकडून कुठल्याही

प्रकारची मदत मिळेना. इंग्रजांचें अफाट सैन्य व त्यांना सहानुभूती दाखविणारी व मदत करणारी अरब प्रजा यापुढें तुर्की सैन्याचा निभाव लागणें कदापिही शक्य नव्हतें.

शेवटीं कमालपाशांनीं तेथून आपलें सैन्य हलविलें व मागें अलेपो येथें नेलें. तेथूनच शत्रूशीं लढत राहून तुर्कस्थानला वांचविण्याचा त्यांनीं बेत केला. अलेपो येथें आल्यानंतर कमालपाशांनीं आपला सैन्याची पुनर्घटना केली आणि त्यांच्यामध्यें नवचेतना पैदा केली. अरबांचा पुढारी लॉरेन्स यानें, ' तुर्कस्थानानें शांततेचा तह करावयास सुलतानांना भीड घालावी आणि चाललेला हा संहार थांबवावा, ' अशी कमालपाशांना सूचना पाठविली; पण ही सूचना कमालपाशांनीं तिरस्कारपूर्वक फेंटाळून लाविली. आपल्या सैन्याची स्थिती शक्य तो स्थिर व मजबूत करण्याची त्यांनीं तयारी चालविली.

तारीख २६ आक्टोबरला जोधपूर व म्हैसूर घोडेस्वार सैनिकांनीं तुर्कांवर हल्ला चढविला. तुर्कांची व हिंदी घोडदळाची जोराची चकमक सुरू झाली. यावेळीं कमालपाशा आघाडीवर राहून आपल्या सैन्यास प्रोत्साहान देत होते. तुर्कांनी आपल्या पराक्रमाची व बहादुरीची कमाल करून टाकली. हिंदी

सैन्याचें अतिशय नुकसान झालें व तें गोंधळून मागें हटूं लागलें. इतक्यांत हिंदी सैन्यास पुन्हां कुमक मिळाल्यामुळें तें जोराने लढूं लागलें. वेळ आणीबाणीची असल्यामुळें दोन्ही बाजूचें सैन्य निकरानें लढत होतें. हा घनघोर लढा कित्येक दिवस चालला होता.

इतक्यांत तुर्की सरकारानें युद्धतहकुबी मागितली अशी बातमी कॉन्स्टँटिनोपलहून रणांगणावर येऊन थडकली ! त्यामुळें तुर्क व दोस्तराष्ट्रें यामध्यें चाललेलें युद्ध तहकूब झालें.

## प्रकरण १३ वें

—xx—

# स्वातंत्र्याकरितां धडपड

राजधानीस ताबडतोब निघून या असा मुख्य प्रधानांचा हुकूम आल्यामुळें, सैन्याची सूत्रें दुसऱ्या अधिकाऱ्यांच्या हातीं देऊन कमालपाशांनीं राजधानीस प्रयाण केलें. ते राजधानीस येऊन पोहोंचले त्यावेळीं युद्ध तहकूब होऊन जवळ जवळ एक महिना झाला होता. राजधानीस येऊन पाहतात तो कमालपाशांच्या दृष्टीस काय दृष्य पडले !

सबंध शहरांत भयाण शांतता पसरली होती. रस्त्यामध्यें एकही तुर्की मनुष्य दिसत नव्हता. घरादारांचे दरवाजे व खिडक्या बंद केलेल्या दिसत होत्या, झुळझुळ वाहणारे निर्झर शुष्क झाले होते. शहरांतील बाजारपेठ ओसाड पडल्यासारखी दिसत होती. ज्याठिकाणीं हजारों लोकांची रिघ लागावयाची त्याठिकाणीं एखादा दुसरा मनुष्य तोही खालीं मान घालून बाजूला निघून जात असलेला

दृष्टीस पडे. माणसांनीं सदैव गजबजलेलीं कॉफीगृहें निर्मनुष्य दिसत होती. शहराचें सुतकी स्वरूप पाहून कमालपाशा यांचें अंतःकरण विषण्ण झालें.

सर्व शहर शत्रूच्या ताब्यांत होतें, बास्फरस सामुद्रधुनींत इंग्रजांच्या युद्धनौका संथपणें विहार करीत होत्या, दार्दानेलीसच्या नाक्यावर इंग्रजांचा पहारा बसला होता, फ्रेंच सैनिक शहरामध्यें मोठ्या दिमाखानें वावरत होते, रेल्वेवर इटालीयन सैन्याचा कबजा झाला होता, दोस्त राष्ट्रांचे अधिकारी पोलीस खात्यावर, लष्करावर व बंदरावर सत्ता गाजवीत होते! दोस्तांच्या सैनिकांनीं तुर्कांचे लष्करी किल्ले व ठाणीं उध्वत करण्याचा सपाटा चालू ठेवला होता, तुर्कांच्या फलटणी बरखास्त करून, तुर्की सैनिकांना घरोघर रवाना करण्याचे कार्य सुरूं होते.

वैभवशाली तुर्की साम्राज्य आज धुळीला मिळालें! ज्या युरोपियन राष्ट्रांना एकेकाळीं तुर्कस्थानानें दांती तृण धरावयास लावलें त्याच युरोपियन राष्ट्रांच्या पायाशीं, गलित झालेला तुर्कस्थान विव्हळत पडला. तुर्की साम्राज्याच्या चिंधड्या उडाल्या; ईजिप्त, सीरीया, इराक आणि अरबस्थान हे सर्व प्रदेश तुर्कांच्या हातून गेले. तुर्कस्थानच्या मंत्रीमंडळाचा बोजवारा उडाला. अनवरपाशा, तलात आणि जमील हे प्रसिद्ध मंत्री फरारी झाले; दोस्त राष्ट्रांच्या-

शत्रूंच्या हुकमतीखालीं तुर्की सरकार एकाद्या गुलामाप्रमाणें त्यांच्या आज्ञा निमूटपणें मान्य करीत होतें.

अंगावर शहारे आणणारें हें दृष्य पाहून कमालपाशांना भड-भडून आलें, आपल्या राष्ट्राची चाललेली धूळधाण पाहून त्यांच्या अंतःकरणांस तीव्र वेदना झाल्या, आपल्या मातृदेशावर शत्रूंनीं घातलेला दरोडा पाहून त्यांच्या चेहऱ्यावर विषण्णता पसरली. आपल्या राष्ट्रास स्वयंशासित व बलवान करावयाच्या त्यांच्या कल्पना धुळीस मिळाल्या; त्यांचे मनोरथ कोसळून पडले! शिकस्तीचे प्रयत्न करूनही दैवानें शेवटीं दगा दिला, याबद्दल त्यांना अतिशय वाटलें. आपल्या डोळ्यांदेखत शत्रूंनीं आपल्या राष्ट्राची विटंबना करावी याबद्दल त्यांना अत्यंत उद्वेग वाटला.

कमालपाशांनीं भरलेल्या डोळ्यांनीं पण अंतर्मुख दृष्टीनें सभोंवार पाहीलें. क्षणांत त्यांचा दुर्दम्य आशावाद जागृत झाला. अजूनही आपल्या राष्ट्रांत नवचेतना निर्माण करतां येईल, अजूनही आपल्या मातृदेशास परकीयांच्या पकडींतून सोडवितां येईल, अजूनही आपल्या जन्मभूमीस सुखाचे दिवस दाखवितां येतील असे महत्वाकांक्षी विचार त्यांच्या अंतःकरणांत उचल खावूं लागले. ते तडक इज्जतपाशाकडे गेले व त्यांना आपले विचार बोलून दाखविलें.

इज्जतपाशा व कमालपाशा या दोघांनीं बराच वेळ विचारविनिमय केला. शेवटीं कमालपाशा म्हणाले, "ज्यांना आपण शत्रू समजत होतो त्या दोस्त राष्ट्रांच्या ओंजळीनें पाणी पिणारी ही निर्जीव राजवट बदलून तिची भक्कम पायावर आपणांस स्थापना केली पाहिजे. इंग्रजांपुढें माना तुकविणाऱ्या व त्यांची हांजी हांजी करणाऱ्या तौफीकपाशा सारख्या मुख्य प्रधानास काढून टाकून तुम्हीं स्वत: मुख्य प्रधान व्हा. मी युद्धमंत्र्याची जबाबदारी पत्करतो. आपण दोघे मिळून आपल्या राष्ट्राची लाज राखण्याचा प्रयत्न करूं या!"

इज्जतपाशांच्या सहाय्यानें कमालपाशांनीं या निर्धाराप्रमाणें एक स्वतंत्र पक्ष स्थापन केला. या पक्षाला बरेच लष्करी अधिकारी व मुत्सद्दी मिळाले; पण तुर्की पार्लमेंटचे सभासद वश होईनात. पार्लमेंटच्या सभासदांना कमालपाशांनीं स्पष्टपणें व आग्रहपूर्वक सांगितलें कीं, ' तौफीकपाशांची प्रधानपदावरून उचलबांगडी केल्यावाचून राज्याची घडी नीट बसणार नाहीं; जोपर्यंत तौफीक पाशा मुख्यप्रधान आहे तोपर्यंत शत्रू आपल्या घरांत आहे असेंच समजा. " पार्लमेंटच्या सभासदांनीं वरकरणी कमाल-पाशांच्या विधानाला मान्यता दिली; पण ज्यावेळीं पार्लमेंटमध्यें तौफीकपाशांचा प्रश्न निघाला त्यावेळीं बहुतेक सर्वच सभासदांचे पारडे तौफीकपाशाकडे झुकलें. कमालपाशांनीं ताबडतोब सुलता-

नांची भेट घेतली व त्यांस सांगितले, "शत्रूला तोंड देण्याकरितां, त्यांच्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याकरितां, राष्ट्रांत जो न्यूनगंड पसरला आहे तो नष्ट करण्याकरितां सध्या अस्तित्वांत असलेलें मंत्रीमंडळ काढून टाका. माझ्याकडे युद्धमंत्र्याचें काम दिलें तर मी अजूनही तुर्कस्थानाचा बचाव करूं शकेन. या पार्लमेंटचे ताबडतोब विसर्जन करा. पार्लमेंटचे अर्धेंअधिक सभासद राष्ट्राचे दुष्मन आहेत व बाकीचे भित्रे आहेत. परिस्थितीस तोंड कसे द्यावे हें त्यांना कळत नाहीं. त्यांच्यामध्यें एकही निधड्या वृत्तीचा मनुष्य नाहीं.

"आपली गोष्ट कबूल करावयास हरकत नाहीं. आपलें सैन्यावर फार वजन आहे. ते सैन्य माझ्याशीं राजनिष्ठ राहील अशी तुम्ही खात्री देतां काय ?" सुलतानांनीं सवाल टाकला.

"पण तें सैन्य राजनिष्ठेपासून च्युत होईल असें मला वाटत नाहीं," कमालपाशांनीं उत्तर दिलें.

"सैन्य राजनिष्ठ राहील अशी खबरदारी घ्या. मी उद्यां पार्लमेंट बरखास्त करतो," सुलतान म्हणाले.

सुलतानांनीं सांगितल्याप्रमाणें पार्लमेंट बरखास्त केलें. आपला मेव्हणा फरीदपाशा याला मुख्य प्रधान करून सर्व सूत्रें त्याच्या ताब्यांत दिली. सन १९१९ साल उजाडलें. तुर्की राष्ट्रावरची दोस्त राष्ट्रांचीं पकड ढिली पडूं लागली. त्यांनी आपआपलें सैन्य

तुर्कस्थानांमधून काढून घ्यावयास सुरुवात केली. इकडे फ्रान्स, इटली व इंग्लंडमध्यें अंतर्गत राजकीय भानगडी उपस्थित होऊं लागल्या. लढाईचा परिणाम सर्व राष्ट्रांवर प्रखरपणें दिसूं लागला. तिकडे दोस्त राष्ट्रांचे मुत्सद्दी पॅरिसमध्यें जमून जर्मनी विषयीं जोराची वाटाघाट करीत होते. तुर्कस्थानाकडे लक्ष द्यावयास त्याना सवडच नव्हती. अद्याप तहाच्या शर्ती पूर्णपणें अमलांत यावयाच्या होत्या. लॉईड जार्जचे सल्लागार म्हणाले " तुर्कस्थानला सोडून द्या. त्याचे आंपोआप तुकडे पडतील. नंतर आपण ते तुकडे वाटून घेऊं. "

ही सर्व परिस्थिती पाहून स्वातंत्र्याचा पुन्हां एकदां जोराचा प्रयत्न करावयास ही वेळ योग्य आहे अशी अंधुक आशा, निराश झालेल्या तुर्कांच्या अंतःकरणांत डोकावूं लागली. तशा प्रकारचा प्रयत्न कॉन्स्टँटिनोपलमध्यें करणें शक्यच नव्हते;कारण तेथें इंग्रजांची सुलतानवर नि शहरावर जबरदस्त पकड होती. त्यामुळें कुठलीही हालचाल करणें म्हणजे मृत्यूस आव्हान देण्यासारखें होतें. मात्र अनातोलीया सारख्या दूरच्या व डोंगराळ जागीं कांहींतरी हाल-चाल करणें शक्य होतें आणि त्या प्रमाणें ज्यांच्या अंतःकरणांत आपल्या राष्ट्राविषयीं भक्ति आणि तळमळ होती अशा अनेक तुर्कांनीं तशा प्रकारची हालचाल करण्याचें ठरविले. या हालचालीस मदत करण्याकरितां खुद्द कॉन्स्टँटिनोपलमध्यें दहाबारा गुप्त संस्था स्थापन केल्या. शत्रूंच्या नियंत्रणाखालीं असलेली हत्यारें व दारू-

गोळा चारून अनातोलीयाकडे पाठविणें, ज्या ठिकाणीं लोक गोळा होणें शक्य आहे असे अड्डे तयार करणें, कार्यक्रम आंखणें वगैरे कार्य या संस्थांकडून करण्याचें ठरले. मोठमोठ्या दर्जाच्या अधिकारी लोकांनीं शक्य तितकी मदत करावयाची आश्वासनें दिलीं. इस्मतपाशा हे युद्धखात्याचे अंडर सेक्रेटरी होतें, फिवझी लष्करी खात्याचे मुख्य होते, फतेही अंतर्गत कारभाराचे प्रमुख होते व सैफ नाविक दलाचे मुख्य अधिकारी होते. ही सर्व बडी मंडळी कमालपाशांची जिगरदोस्त होती. त्यांनीं स्वातंत्र्याचे प्रयत्न यशस्वी होण्यास सर्व प्रकारची मदत करावयाचें ठरविले. अनातोलीयाच्या डोंगराळ भागांत शत्रूचा प्रतिकार करण्याकरितां दहाबारा ठिकाणीं लष्करी केंद्रे उघडण्यांत आलीं. रशियन सरहद्दीवर कझीम कारा बेकीर आपल्या सहा लष्करी तुकड्यांसह तयार होते. प्रतिकाराच्या या गोष्टी कमालपाशांच्या प्रेरणेनेंच घडत होत्या. प्रत्येक गोष्ट त्यांच्या सल्यानेंच ठरत होती; पण कमालपाशांनीं आपण या सर्व भानगडीपासून अलिप्त आहोंत असें मोठ्या सफाईनें भासविलें.

स्वातंत्र्याची ही शेवटची धडपड यशस्वी होणार काय?

## प्रकरण १४ वें

—xx—

# तात्पुरते सरकार !

दोस्त राष्ट्रांचें, विशेषतः इंग्रजांचें वर्चस्व नष्ट करण्याकरितां तरुण तुर्कांची जोराची धडपड चालू आहे असा धोक्याचा इषारा गुप्त हेरांनी व ख्रिश्चन लोकांनीं इंग्रजांना दिला. तथापि इंग्रजांनीं या सूचनेला फारसें महत्व न देतां, जी मंडळी धोका देणारी वाटतात, त्यांना तुरुंगांत डांबून टाकले.या सर्व राजबंद्यांना तुरुंगांतून सोडवायचा कट केला गेला;पण तो उघडकीस आल्यामुळें फसला. या कटांत कमालपाशांचा प्रामुख्यानें हात होता; पण आपलें नांव पुढें न येईल अशी त्यांनीं सक्त खबरदारी घेतली. इंग्रजांना मात्र त्यांचा दाट संशय आला व माल्टाला पाठविण्यांत येणाऱ्या अराजक लोकांच्या यादींत कमालपाशांचें नांव घातलें गेलें.

अनातोलीयामध्यें सुप्तावस्थेंत असलेल्या बंडाळीचा बींमोड करावयाचें इंग्रजांनीं व सुलतानानीं ठरविलें. तेथील परिस्थिती काबूंत आणण्याकरितां, बंडखोरांची हत्यारें काढून घेण्याकरितां, त्यांचें नुक्तेच उभे असलेलें सैन्य मोडून टाकण्याकरितां आणि त्यांच्या चाललेल्या गुप्त सभा व बैठकी बंद करण्याकरितां कुणीतरी हुषार व पराक्रमी अधिकारी पाठविला पाहिजे असें सुलतानानीं ठरविले व त्या महत्वाच्या कामगिरीवर कमालपाशांचीं नेमणूक करावयाचें नक्की केलें; पण, इंग्रज लष्करी अधिकाऱ्यांनीं या नेमणुकीस सक्त हरकत घेतली. कमालपाशांसारख्या एकेकाळीं क्रांतिकारक समजल्या जाणाऱ्या भयंकर माणसाला अनातोलीयामध्यें पाठविणें ह्मणजे आपल्या पायांवर आपण होऊन धोंडा मारून घेण्यासारखें आहे असें इंग्रज हायकमिशनरचे मत पडलें. सुलतानांचा मेव्हणा व मुख्य प्रधान फरीदपाशा यांनीं कमालपाशांबद्दल इंग्रजांजवळ रदबदली केली. ते म्हणाले, " कमालपाशांचा स्वभाव बंडखोर असला तरी ते सुलतानांच्या व आपल्या विरुद्ध जातील असें मला वाटत नाहीं. शिवाय राष्ट्रांत त्यांना अतिशय मान असल्यामुळें ते अनातोलीयास जातील तरच तेथील बंड मोडून जाईल. त्यांच्याखेरीज या कामाला योग्य असा दुसरा अधिकारीच आपल्याजवळ नाहीं. "

कमालपाशांना कैद करून माल्टा येथें पाठवावें हा इंग्रजांचा बेत आणि बंड मोडण्याकारितां आपला प्रतिनिधी म्हणून त्यांना अनातोलीयामध्यें पाठवावें ही सुलतानांची इच्छा; या दोहोमध्यें इंग्रजांचा बेत रहित झाला व सुलतानांची इच्छा फळाला आली. कमालपाशांना अनातोलीयांत पाठविण्याकरितां संमत्ती देण्यास फरीदपाशानें इंग्रजांना भाग पाडले. कमालपाशांचें दैव बलवत्तर म्हणून माल्टामध्यें जन्मभर कैदी होऊन राहण्याऐवजी सुलतानाचे प्रतिनिधी म्हणून अनातोलीयामध्यें जाण्याचा त्यांना मान मिळाला. त्यांचे नांव लवकरच अटक होणाऱ्या अराजकांच्या यादींतून काढून टाकण्यांत आलें व त्यांची पूर्वप्रांतांचे गव्हर्नरजनरल म्हणून नेमणूक झाली.

अनातोलीयास जाण्यापूर्वीं कमालपाशा आपल्या आईचा निरोप घेण्यासाठीं गेले. त्यांच्या आईनें प्रेमभरानें त्यांचें चुंबन घेतलें व भरलेल्या डोळ्यांनीं आपल्या पुत्रास आशिर्वाद दिला. कर्नल आरीफ व रफेतपाशा यांसह कमालपाशांनीं कॉन्स्टँटिनोपल सोडले. बऱ्याच त्रासदायक प्रवासानंतर ते समसन येथें १९ मे १९३९ रोजीं उतरले व तेथून अमासिया येथें त्यांनीं प्रयाण येलें.

अमासिया येथें आल्याबरोबर कमालपाशांनीं आपली आकांक्षा, आपले ध्येय, आपला संकल्प सिद्धीस नेण्याचा कृतनिश्चय केला. तुर्क-

स्थानाला शत्रूंच्या मगरमिठींतून सोडवून त्याला स्वतंत्र करण्याची त्यांची आकांक्षा होती, परकीयांच्या लाथा खाणाऱ्या निरुप तुर्कस्थानाला गदगदां हालवून त्याच्या सत्वाची ओळख करून द्यावयाचे त्यांचे ध्येय होतें, दोस्त राष्ट्रांच्या इच्छेस मान तुकविणाऱ्या गुलामी मनोवृत्तीच्या तुर्कस्थानाला स्वाभिमानी नि स्वयंशासित करण्याचा त्यांचा संकल्प होता. तुर्कस्थान हा तुर्कांकरितांच आहे नि तुर्कांकरितांच राहील हे त्यांना जगाला पटवून द्यावयाचे होतें. कमालपाशांची आकांक्षा, त्यांचें ध्येय, त्यांचा संकल्प सिद्धिस जाण्याची चिन्हें क्षितीजावर स्पष्टपणें दिसूं लागलीं!

आपल्या ध्येयपूर्तीकरितां त्यांना तुर्की सैन्याचें व लष्करी अधिकाऱ्यांचे साहाय्य हवें होतें. पराक्रमी योद्धा म्हणून कमालपाशांचा लौकिक असल्यामुळें, तुर्की सैनिकांच्या मनांत त्यांच्याविषयीं गाढ आदर होता. त्यांच्या एका शब्दावर वाटेल तें दिव्य करण्याची लष्करी अधिकाऱ्यांची तयारी होती. अमासिया येथें आल्यावर त्यांनीं सर्व प्रमुख ठिकाणीं तारा करून जनतेची नाडी ओळखून घेतली. त्या प्रांतांत राहणाऱ्या तुर्की वीरांना त्यांनीं बोलावून घेतले व त्यांच्यासमोर आपले विचार मांडले. प्रतिकार हा एकच आपल्या राष्ट्राला स्वतंत्र करावयाचा उपाय आहे असें सर्वांनीं कबूल केलें. त्या सर्वांनीं मिळून प्रतिकार कसा

करावयाचा हें ठरविलें. तुर्की टोळ्यांना जमवून त्यांचें राष्ट्रीय सैन्य तयार करावयाचें, हत्यारेंपात्यारें गोळा करिण्याकरितां ठिकठिकाणीं केंद्रे स्थापावयाची आणि जनतेंत जागृती करण्याकरितां पुढारी लोकांनीं गुप्त दौरे काढावयाचे; असा कार्यक्रम आंखला. हा सर्व कार्यक्रम त्यांना अत्यंत सावधगिरीनें करावयाचा होता. इंग्रजांना याचा सुगावा लागला तर ते आपले प्रयत्न मुळासकट उपटून काढल्याशिवाय राहणार नाहींत अशी कमालपाशांची व त्यांच्या सहकाऱ्यांची बालंबाल खात्री होती. सुलतान इंग्रजांच्या हातांतील खेळणें झाल्यामुळें राष्ट्रोद्धाराच्या या कार्यास त्याचा पाठिंबा मिळणें शक्य नव्हते. शिवाय लढायांमुळें जनता इतकी कंटाळून गेली होती कीं, तिच्यामध्यें एकदम जागृती होईल अशी खात्री देववत नव्हती. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करूनच कमालपाशांनीं अत्यंत सावधगिरीनें कार्यास हात घालावयाचें योजिलें. स्वातंत्र्याची ही चळवळ योग्य नियंत्रणाखालीं चालावी या दृष्टीनें पश्चिम भागांत अलीफौदचें, पूर्व भागांत कझीम कारा बेकीरचें व मध्यभागांत कमालपाशांचें नियंत्रण असावें असें ठरल्यानंतर कमालपाशा म्हणाले, " सुलतान व तुर्की सरकार शत्रूच्या हातांतील बाहुलीं बनल्यामुळें,आपण अनातोलीयामध्यें एक तात्पुरते सरकार अवश्य स्थापन केलें पाहिजे. " कमालपाशांच्या सहकाऱ्यांनीं

दुजोरा दिला व या बाबतींत राष्ट्राचा निर्णय घेण्याकरितां सिवास येथें शक्य तितक्या लवकर तुर्कस्थानांतील कार्यकर्त्या प्रतिनिधींची एक कॉंग्रेस बोलवावी असें ठरलें. ' ही कल्पना आम्हांला मान्य आहे, ' असें सर्व लष्करी अधिकाऱ्यांनीं व पुढाऱ्यांनीं कमालपाशा यांना तारेनें कळविल्यामुळें कमालपाशांना अत्यंत आनंद झाला.

## प्रकरण १५ वें

—××—

# एकमेव पुढारी.

कमालपाशांनीं खेड्यापाड्यांतून दौरा काढला, तेथील अधिकारी लोकांना आपली अंतिम इच्छा बोलून दाखविली, सैन्यामधील बेकार अधिकाऱ्यांना गोळा केले. "तुमचें राष्ट्र, तुमचा प्यारा तुर्कस्थान, शत्रूच्या कचाट्यांत सांपडला आहे. तुर्कस्थान नेस्तनाबूद करून त्याठिकाणीं ग्रीकस्थान करावयाचा शत्रूचा डाव चालला आहे. तुर्कस्थानचा सुलतान, तुमचा बादशहा आज शत्रूचा कैदी होऊन बसल्यामुळें हताश झाला आहे. आतां तुम्हींच आपलें रक्षण केलें पाहिजे, तुम्हींच आपलें राष्ट्र जगविलें पाहिजे, तुम्हींच आपला मातृदेश वांचविला पाहिजे! बाहेरून मदतीची अपेक्षा करण्यांत अर्थ नाहीं. तुम्हीं आपल्या मनगटावरच आपलें अस्तित्व राखले पाहिजे. उठा, सज्ज व्हा आणि राष्ट्रीय

सैन्यांत आपलें नांव दाखल करा! राष्ट्राचा विनाश थांबवावयाचा असेल, आपल्या घरादारांची व बायकापोरांची अब्रू सांभाळायची असेल तर आपणाला शत्रूचा प्रतिकार हा केलाच पाहिजे." कमालपाशांनीं आपल्या प्रभावी वाणीनें व व्यक्तिमत्वानें तुर्कांच्या हृदयांत राष्ट्रप्रेमाची ज्योत पेटविली, त्यांच्या सुप्तभावनांना चेतना दिली, त्यांच्या थंडावलेल्या रक्तास उसळी आणली व त्यांचा जाज्वल्य स्वाभिमान जागृत केला.

कमालपाशांनीं शत्रूचा प्रतिकार करण्याकरितां प्रत्येक खेड्यांत केंद्रें स्थापन केलीं. हें कार्य करीत असतांना त्यांना अतिशय त्रास झाला. वारंवार होणाऱ्या युद्धामुळें लोकांच्या अंतःकरणांत त्राण उरला नव्हता. कशाही स्थितींत, कांहीं तरी करून जगावयाचें अशीं त्यांची भावना झाली होती. पण, कमालपाशांची प्रभावी वाणी ऐकल्यानंतर ते थोडथोडे जागे होऊं लागले. त्याचवेळीं ग्रीक सैन्यानें स्मर्नावर हल्ला केला असून तेथील तुर्कांचीं घरदारें तें जाळीत आहे व त्यांची सर्रास कत्तल करीत आहे, अशी बातमी एकाद्या वणव्या प्रमाणें सबंध तुर्कस्थानभर पसरली. या घटनेचा फायदा घेऊन कमालपाशांनीं तुर्कांचा क्रोध चेतविला! खेड्या-पाड्यांतून जनतेमध्यें संतप्तपणाच्या लाटा वाहूं लागल्या. प्रत्येक मनुष्य कमालपाशांच्या निशाणाखालीं जमूं लागला. अनातोलीयामध्यें

जागृती केल्यानंतर कमालपाशा इरझरमकडे वळले. या ठिकाणीं त्यांचें कार्य फार सुखकर झालें. रशियन लोक कॉकेशस प्रदेशांमधून गेल्यानंतर तेथें इंग्रजांनीं, तुर्कांच्या सरहद्दीला लागून आर्मिनियन लोकांचें प्रजासत्ताक राज्य स्थापण्यास मदत केली. ज्यावेळीं तह होईल त्यावेळीं इरझरम भोंवतालचे तुर्की प्रांत तुमच्या राज्यास जोडण्यांत येतील असें इंग्रजांनीं आर्मिनियन लोकांस अभिवचन दिलें होतें. या गोष्टीचा स्थानिक तुर्कांना फार राग आला. आपला प्रांत, आपला मुलुख, दुसऱ्याच्या हवाली करावयाचा ही कल्पनाच त्यांना असह्य वाटली. ' एक मरूं किंवा मारूं पण आर्मेनियन हुकुमती खालीं जाणार नाहीं, ' अशी त्यानीं प्रतिज्ञा केली. हे सर्व तुर्क कमालपाशांना मदत करावयास एका पायावर सज्ज झाले.

प्रत्येक ठिकाणीं कमालपाशांचे ओजस्वी भाषण ऐकण्याकरितां लोकांची तोबा उडत असे. जनतेवर त्यांच्या भाषणाचा विलक्षण परिणाम होई. कमालपाशांनीं पुकारलेल्या स्वातंत्र-युद्धांत हजारों लोकांनीं नांवे नोंदविली, त्यांच्या लष्करी कवायती सुरूं झाल्या. कित्येक ठिकाणीं इंग्रज आणि फ्रेंच यांच्या सक्त पहाऱ्याखालीं असलेलीं हत्यारें नि दारूगोळा यांची कोठारे तुर्कांनीं लुटलीं व पुढील उपयोगाकरितां त्यांचा पर्वतामध्यें सांठा करून ठेवला. ठिक-ठिकाणीं तुर्कांना निशस्त्र करावयाचे कार्य इंग्रज अधिकारी करीत

होतें. कमालपाशांनीं त्या त्या ठिकाणच्या तुर्की अधिकाऱ्यांना, ' इंग्रजांच्या हवालीं हत्यारें करूं नका, असा तुम्हांला सुलतानांचा हुकूम आहे, ' असे संदेश पाठविले.

या चळवळीची बातमी कॉन्स्टँटिनोपलमध्यें तांतडीनें पोहोंचली. इंग्रज अधिकाऱ्यांना अतिशय राग आला व त्यांनीं सुलतानांस धमकी दिली. सुलतान गांगरून गेले. " कमालपाशांना आपण बंड मोडण्याकरितां पाठवून दिले आणि तेच बंडखोरांचे पुढारी झाले; आपण कमालपाशांवर त्या ठिकाणीं पाठवून दिले हाच आपला मुर्खपणा झाला " असें सुलतानांस वाटूं लागलें. त्यांनीं कमालपाशांना ' ताबडतोब कॉन्स्टँटिनोपल येथें हजर व्हा. ' असा हुकूम पाठविला. हुकूम मिळाल्या बरोबर कमालपाशांनीं सुलतानांस एक लांबलचक तार पाठवून, ' आपण तुर्कस्थानचे बादशहा आहांत, तुर्कांचे नेते आहांत. आपण जागे व्हा आणि परकीय शत्रूच्या विरुद्ध झगडणाऱ्या तुर्की जनतेचे नेतृत्व स्वीकारा ' अशी विनंती केली. रात्रभर कमालपाशांनीं तारेच्या उत्तराची वाट पाहिली. पहांटे त्यांना ताबडतोब परत येण्याबद्दल उत्तर आले. कमालपाशांनीं परत जावयाचे साफ नाकारलें. ' राष्ट्रास स्वातंत्र्य मिळेपर्यंत आपण अनातोलीयांत राहणार ! ' अशी उलट तार त्यांनीं सुलतानांस केली. सुलतानांनीं ताबडतोब कमालपाशांना नोकरींतून बडतर्फ केलें आणि त्यांच्या आज्ञा मानूं नका, असें सर्व मुलकी व लष्करी

अधिकाऱ्यांना कळविलें. कमालपाशांनीं आपल्या पुरस्कर्त्यांना व मान देणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांना एकत्र बोलावून सांगितले,

" सुलतान आपल्या विरुद्ध आहेत. आतां आपणांस त्यांच्याकडून स्वातंत्र्याकरितां कांहींच मदत मिळणें शक्य नाहीं. आपणाला मोठमोठ्या संकटांना तोंड द्यावें लागेल, अनेक क्लेश भोगावे लागतील, अनेक त्याग करावे लागतील. एकदां हें कार्य हातीं घेतल्यावर कुणीही माघार घेतां कामा नये किंवा पश्चाताप करतां कामा नये. तुम्ही आपला पुढारी म्हणून कोणीतरी निवडलाच पाहिजे. तुम्हाला विजय पाहिजे असेल तर एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे आणि ती म्हणजे तुम्ही सर्वांनीं एकाचेंच नेतृत्व स्वीकारलें पाहिजे. एकानेंच या चळवळीचा पुढाकार घेतला पाहिजे. तुम्ही मलाच पुढारी व नेता म्हणून निवडलेत तर माझ्या नशिबी जे येईल ते तुम्ही माझ्याबरोबर भोगले पाहिजे. आतां मी लष्करी अधिकारी राहिलो नाहीं. यापुढें बंडखोर म्हणून माझा उल्लेख करण्यांत येईल. मी लष्करी अधिकारी होतों त्यावेळीं जशा माझ्या आज्ञा तुम्ही पाळीत होतां, तशाच यापुढेंही पाळत राहाल तर मी आपला पुढारी होऊं शकेन. आपण या गोष्टींचा पूर्ण विचार करा आणि मला उत्तर द्या "

सर्वांनीं कमालपाशांची आज्ञा शिरसावंद्य मानण्याचे कबूल केलें आणि एकमतानें कमालपाशांना एकमेव पुढारी म्हणून संमत्ती दिली !

## प्रकरण १६ वें

—××—

# तुर्की काँग्रेस

तुर्की जनतेच्या प्रतिनिधींची काँग्रेस बोलावण्याचें अगोदरच ठरलें होतें हें आपण मागें वाचलेंच आहे. त्या काँग्रेसच्या अधिवेशनाची आमंत्रणें सर्वांना पाठविण्यांत आलीं. प्रत्येक जिल्ह्यास कमालपाशांनीं पुढील संदेश पाठविला, "आपलें राष्ट्र अत्यंत धोक्यांत आहे. सध्यांचें सरकार राज्यकारभार करण्यास अत्यंत नालायख बनलें आहे. आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हें जनतेच्या इच्छेवर व उत्साहावर अवलंबून आहे. त्या स्वातंत्र्याचा विचार करण्याकारितां सिवास येथें तुर्की काँग्रेस भरविणेचें ठरविलें आहे. प्रत्येक जिल्ह्यानें तीन प्रतिनिधी पाठवून द्यावे. हा सर्व व्यवहार अत्यंत गुप्तपणें करण्यांत यावा."

सुलतानांनीं कमालपाशांना हुद्यावरून काढून टाकल्यामुळें, त्यांना कुठलाही अधिकारी दर्जा राहिला नव्हता. त्यामुळें पुष्कळ

शहरांतील अधिकाऱ्यांनीं त्यांचा संदेश अमलांत आणण्याचें नाकारलें. कमालपाशांना कांहींतरी अधिकार द्यावा व सिवास येथें भरणाऱ्या कॉंग्रेसपुढें ठेवण्यांत येणारा नक्की कार्यक्रम आंखावा या दृष्टीनें इरझरम येथें निवडक लष्करी पुढारी व प्रतिनिधी यांची परिषद भरविण्यांत आली. कमालपाशांचे स्नेही व त्या प्रांतांतले मुख्य लष्करी अधिकारी कझीमकारा बेकीर यांच्या सहाय्यानेंच ही परिषद बोलाविण्यांत आली.

परिषदेसमोर भाषण करावयास कमालपाशा उभे राहतांच, सगळीकडे शांतता पसरली. ते खणखणीत आवाजांत ह्मणाले, " अनातोलीयांत आपण राजकीय क्रांति केली पाहिजे. राष्ट्राचे संपूर्ण स्वातंत्र्य हें आपले ध्येय आहे. जें राष्ट्र आपला मान व अस्तित्व राखण्याची शिकस्त करतें, त्या राष्ट्रास जगांतलि कोणतीही शक्ति दडपूं शकत नाहीं. आमच्या पवित्र मातृभूमींतील एक रेसभर देखील जागा आम्हीं परकीयांस द्यावयास तयार नाहीं. आमची मातृभूमी, आमचें राष्ट्र, अभेद्य आहे व राहिले पाहिजे. जें राष्ट्र आपण होऊन दुसऱ्यासमोर नमतें, ते गुलाम होण्याच्याच योग्यतेचें आहे. तुर्कांच्या नसनसांमध्यें अस्सल रक्त वहात आहे नि त्या रक्ताचा आम्हांला जाज्वल्य अभिमान आहे. अशा अस्सल रक्ताच्या लोकांचे राष्ट्र आपल्या सत्व रक्षणार्थ सदैव लढत राहील; पण गुलामगिरी

पत्करणार नाहीं. लढाई हे आयुष्यामधील श्रेष्ठ तत्व आहे असें आह्मीं समजतों. आम्हीं लढूं किंवा मरूं; पण अपमानाचें जीवित कंठणार नाहीं. आमच्या सामर्थ्यावर आमचा अढळ विश्वास आहे. त्या सामर्थ्याच्या जोरावर आम्हीं आपलें ध्येय साध्य करूं. आपल्यापुढें दोनच प्रश्न आहेत. एक स्वातंत्र्य किंवा मृत्यू!"

कमालपाशांच्या भाषणानें सर्वांचीं अंतःकरणें भारून गेलीं. त्यापैकीं एक म्हणाला, "या दुर्धर कालांत अल्लानें आपला दूत आमच्याकडे पाठवून दिला आहे."

दुसरा म्हणाला "अल्ला, कमालपाशांस उदंड आयुष्य देवो."

यानंतर वादविवादास सुरवात झाली.

"हे सर्व कबूल; पण या स्वातंत्र्य-चळवळीचे धुरीणत्व कोण स्वीकारणार?" एक वृद्ध म्हणाला.

"अर्थात् कमालपाशा" बरेचजण ओरडले.

"धुरीणत्व किंवा पुढारीपणा एकाच्या हातीं न देतां तो मंडळाच्या हातीं असावा. आठ दहा लोकांचे एक मंडळ बनवावे."

कमाल म्हणाले, "सद्गृहस्थहो, अत्यंत मोठे व जोखमीचें कार्य असेल तर त्याचा पुढाकार योग्य, उत्साही व निश्चयी अशा एका व्यक्तिकडेच दिला पाहिजे, असें इतिहास निःशंकपणे आपणांस

सांगत आहे. अशा तऱ्हेचे कार्य मंडळाकडून किंवा चारचौघांकडून कधींच पार पडत नाहीं; उलट कार्यामध्यें मतभेद किंवा अडथळेच निर्माण होतात. माझ्या एकट्याकडेच पुढारीपणाचा मक्ता यावा असा मात्र याचा अर्थ कोणी करूं नये. आपणाला योग्य वाटेल तो पुढारी निवडा. आपण ज्याला निवडाल त्याच्या आज्ञेंत आम्हीं सर्व राहूं.

"कमालपाशांखेरीज पुढारी होण्यास कोणी योग्य दिसत नाहीं" बरेच जण ओरडले.

"भिडस्तपणामुळें खरें मत काय आहे तें कळत नाहीं. याकरितां गुप्तपणानें मतें घ्यावीं हें अधिक श्रेयस्कर आहे," एकजण शिष्टपणें म्हणाले.

शेवटीं गुप्तपणें मतें घेण्यांत येऊन तीं त्या ठिकाणीं जमलेल्या प्रतिनिधींमध्यें अत्यंत वृद्ध अशा एका गृहस्थाकडून मोजण्यांत आलीं. नंतर त्या वृद्ध गृहस्थांनीं उठून सांगितलें, "कमालपाशा यांच्याकडे एकमतानें पुढारीपण देण्यांत आले आहे."

सगळीकडे टाळ्यांचा कडकडाट झाला. नंतर एकदम नितांत शांतता पसरली. सभेमध्यें एक जासूद आला व त्यानें मार्शल कझीमकारा बेकीर यांच्या हातीं एक लखोटा दिला.

मार्शल बेकीर यांनीं संथपणें लखोटा फोडला. त्यांतील मजकूर वाचला व कमालपाशा यांच्याकडे नजर टाकली. सर्व सभागृह निश्चल झाले; मार्शल बेकीर यांचा चेहरा गंभीर झाला. शेवटी ते कमालपाशांना म्हणाले, " मला आपल्याशीं एकातांत कांहीं बोलावयाचे आहे. "

मार्शल बेकीर व कमालपाशा दुसऱ्या दालनांत गेले. मार्शल बेकीर म्हणाले, " पाशा, हा संदेश सुलतानांकडून आला असून, त्यांत आपणांस कैद करण्याची व परिषद बरखास्त करण्याची मला आज्ञा झाली आहे. मी आपणांस वचन दिलें आहे हें खरें; पण सुलतानांची आज्ञा मला मान्य केली पाहिजे. "

कमालपाशा यांच्या समोर त्यांचें भीषण भवितव्य दिसूं लागलें. इंग्रजांचा कैदी, माल्टामध्यें बंदीवास, लष्करी चवकशी आणि नंतर फांशी– हीं भयानक दृष्यें एका क्षणांत त्यांच्या नजरे समोरून गेलीं !

" तुर्कांना गुलाम करून टाकावयाचें किंवा त्यांना स्वतंत्र करावयाचे हे सर्वस्वी आपल्या हातीं आहे, " कमालपाशा संथपणें व चित्तवृत्ति विचलित होऊं न देतां म्हणाले.

मार्शल बेकीर गोंधळून गेले. काय करावें हें त्यांना कळेना. "मला थोडा वेळ विचार करूं द्या" असें म्हणत ते खोलीच्या बाहेर पडले. ते व्हरांड्यात एकटेच येरझाऱ्या घालीत होते. त्यांच्या चेहऱ्यावर घर्मबिंदू चमकूं लागले, त्यांचा घसा सुकून आला.

"कझीमकारा बेकीर हे बडे लष्करी अधिकारी होते व सुलतानांचा त्यांच्यावर फार विश्वास होता. हुकूमाची अमल-बजावणी कशी करावी हें त्यांना कांहीं सुचेना. त्यांनीं कमालपांशाना खांद्यास खांदा देऊन लढण्याचें वचन दिलें होतें; पण कमाल-पाशांना कैद करावे अशी त्यांची राजनिष्ठा त्यांना सांगू लागली. आपलें वचन पाळावें कीं सुलतानांचा हुकूम मान्य करावा, याबद्दल त्यांच्या डोक्यांत काहूर माजलें.

कमालपाशांचें व त्याबरोबर राष्ट्राचें भवितव्य, कझीमकारा बेकीर यांच्या हातीं होते. कमालपाशांना कैद केले तर कमाल-पाशांच्या सर्व आकांक्षा धुळीस मिळून त्यांना जन्मभर माल्टामध्यें इंग्रजांचे कैदी होऊन राहणें किंवा सुलतानांच्या रोषास बळी पडून या जगांतून कायमचें नाहींसें होणें भाग होतें. कमालपाशांचा तुरुंगवास म्हणजे राष्ट्राचा बंदीवास; कमालपाशांचा मृत्यु म्हणजे राष्ट्राचा निःपात होता! आजपर्यंत झालेली जागृती, राष्ट्राच्या

स्वातंत्र्याकरितां चाललेला लढा, या सर्वांचा नायनाट कमालपाशांच्या बंदीवासानें किंवा मृत्युनें होणार होता! कमालपाशांनी नवजवान तुर्कांच्या अंतःकरणांत पेटवलेली स्वातंत्र्य ज्योत विझणार होती, त्यांनीं राष्ट्रांत उत्पन्न केलेले नवचैतन्य मृतप्राय ठरणार होतें, त्यांनीं समतेची केलेली पुकार हवेंत विरून जाणारी होती, त्यांनीं राष्ट्राकरितां सुरू केलेला आत्मयज्ञ स्थगित होणार होता, आपल्या राष्ट्राला अव्वल दर्जाचें स्थान प्राप्त करून देण्याची त्यांची महत्वाकांक्षा धुळीस मिळणार होती. कझीमकारांच्या अंतःकरणांत या विचारांनीं कालवाकालव सुरू झाली, तुर्कस्थानाचें भेसूर स्वरूप त्यांना भेडसावूं लागलें, राष्ट्राचें भीषण भवितव्य त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेऊं लागलें.

कझीमकारा बेकीर यांचा चेहरा बदलला, त्यांच्या डोळ्यांत निश्चयाचे तेज तळपूं लागले. ते ताडकन् उठले व समोर बसलेल्या कमालपाशांच्या गळ्याला त्यांनीं मिठी मारली " कमाल, माझ्या शरिरांत रक्ताचा एक थेंब शिल्लक असेपर्यंत मी तुमचा व तुमच्या स्वातंत्र्यप्रेमी स्नेह्यांचा सांभाळ करीन. "

परिषदेचे कार्य पुढें सुरू होऊन परकीय शत्रूंचा प्रतिकार करणें, आणि राज्यकारभार चालविण्याकरितां तात्पुरत्या सरकाराचा

स्थापना करणें, असा ठराव एकमतानें पास झाला. सिवास येथें भरणाऱ्या कॉंग्रेसपुढें वरील ठराव मांडण्याकरितां एक कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें व कमालपाशांना त्या मंडळाचे चेअरमन करण्यांत आले.त्याचवेळीं कॉंग्रेसला हजर राहण्याचा कमालपाशांना हक्क असावा म्हणून इरझरमतर्फे प्रतिनिधी ह्मणून त्यांची निवड झाली.

ठरल्याप्रमाणें कॉंग्रेस भरली. तुर्कस्थानाच्या सर्व प्रांतांतून जनतेचे प्रतिनिधी आले होते. कॉंग्रेस ही अराजकांची मजलीस आहे असा सर्वत्र पुकारा झाल्यामुळें कॉंग्रेसला जे प्रतिनिधी आले होत ते जीवावर उदार होऊनच आले होते.कॉंग्रेसला जातांना सरकार-कडून अडथळा किंवा अटक होऊं नये म्हणून कोणी गुप्तपणानें, कोणी वेषांतरानें, कुणी आडमार्गानें, तर कोणी डोंगरकपारीच्या रस्त्यानें, ते कॉंग्रेसच्या अधिवेशनास हजर झाले होते. कमालपाशांना पकडण्याकरितां सरकारनें कडेकोट बंदोबस्त केला होता. कमाल-पाशांना ही बातमी लागल्याबरोबर रात्रीच्या वेळीं डोंगर -पर्वता-मधून मोठ्या मुष्कलीनें ते सिवास येथें जाऊन पोहोंचले.

कॉंग्रेसचें अधिवेशन सुरूं झालें. प्रतिनिधींमध्यें कडाक्याचा वादविवाद सुरूं झाला. कांहीं प्रतिनिधींनीं ' स्वातंत्र्याकरितां सशस्त्र लढा सुरूं करावा, ' कांहींनीं ' सशस्त्र लढा आजच्या परिस्थितींत

अशक्य आहे, ' कांहींनीं ' अमेरिकेचें सहाय्य घ्यावें, ' तर कांहींनीं ' सरकार नि प्रजा यांच्या लढ्यामुळें राष्ट्रांत यादवी माजेल; या करितां सनदशीर मार्गांनीं हा प्रश्न सोडवावा, ' अशी आपआपलीं मतें जोरजोरानें मांडलीं. हे मतभेद मिटविण्याची कमालपाशांनीं शिकस्त केली. त्यांनीं प्रतिनिधींबरोबर तासचेतास वादविवाद केला.

वादविवादाचा शेवट होत नाहीं असें वाटून, अरीफ नांवाचा एक बडा लष्करी अधिकारी कमालपाशांना हळूंच ह्मणाला, ' ही कॉंग्रेस आणि हे लोकांचे प्रतिनिधी यांना जाऊं दे मसणांत! तुह्मीं यांच्या नादाला लागूं नका. आमचें सर्व लष्कर तुमच्यामागें आहे. आणि तुम्हांला सर्वाधिकारी समजून तुमच्या आज्ञा मान्य करण्याचें आम्हीं एकमतानें ठरविलें आहे. आम्हांला आज्ञा द्या ह्मणजे पहातो तुम्हांला हे प्रतिनिधी कसा विरोध करतात ते. "

कमालपाशा शांतपणें म्हणाले, " अरीफ, तुझें म्हणणें आलें माझ्या लक्ष्यांत! पण, नुसत्या संगीनींच्या जोरावर हा अवघड प्रश्न सोडविला जाणार नाहीं. जनतेमध्यें जागृति, आत्मविश्वास व निष्ठा उत्पन्न केली पाहिजे. आपण आंधळ्याला डोळस केले पाहिजे; आणि त्याकरितां राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून प्रचारक म्हणून संचार केला पाहिजे. आपल्या राष्ट्राच्या पवित्र कार्याकरितां

शेवटच्या नागरिकाची सहानुभूती व आधार मिळेपर्यंत आपण विश्रांती घेतां उपयोगी नाहीं."

अरीफ निरुत्तर झाला; कमालपाशांनीं पुनः वादविवादाकडे आपलें लक्ष वळविलें. यावेळीं एक राजकीय पक्ष स्थापन करून आपल्या हक्कांची मागणी करावी हें आजच्या परिस्थितींत शक्य व योग्य दिसतें असें अट्टाहासानें कांहीं वृद्ध प्रतिनिधी प्रतिपादन करीत होते. कमालपाशा उभे राहिले व म्हणाले, "सभ्य गृहस्थहो, आपण राजकीय पक्ष स्थापन करण्याकरितां किंवा निष्फळ चर्चा करण्याकरितां जमलो नाहीं. आपणाला आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य व सत्व राखावयाचें आहे. आपल्या शिरावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आपण एकाद्या पक्षाचे किंवा समितीचे सभासद नसून अखिल राष्ट्राचे प्रतिनिधी आहोंत. आपल्या राष्ट्रांतील लोकांच्या स्वास्थाकरितां झगडणें, लढणें, हें आपलें पवित्र कार्य आहे. अर्धवट मनोवृत्तीच्या किंवा दोलाचल वृत्तीच्या लोकांना आमच्यामध्यें स्थान नाहीं. आपल्यापुढें जें महत्वाचें कार्य आहे तें गुप्तपणानें कधींही सिद्धीस जाणार नाहीं किंवा बहुमताच्या आणि वादविवादाच्या जोरावर शत्रूच्या हातून आपले हक्क हिसकून घेतां येणार नाहींत. आपण जनतेमध्यें जागृती निर्माण केली पाहिजे. स्वातंत्र्याचा संदेश खेडोपाडीं पोहोंचविला पाहिजे,

तेथील लोकांशीं समरस झाले पाहिजे, त्यांच्या भावना चेतविल्या पाहिजेत. आपण माझ्यावर विश्वास प्रगट केला याबद्दल मी आपला आभारी आहे; पण मी बंडखोर आहे, असें सरकारनें जाहीर केलें आहे. मी जर पकडला गेलो तर माझा शेवट कसा होणार याची मला पूर्ण जाणीव आहे. जे माझ्याशीं सहकार्य करूं इच्छितात त्यांचाही शेवट माझ्याप्रमाणेंच होणार, हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. माझ्याशीं सहकार्य करूं इच्छिणाऱ्यांनीं, वाटेल ते दिव्य करावे लागलें तरी राष्ट्राचें पवित्र कार्य कदापिही सोडणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली पाहिजे"

कमालपाशांच्या या प्रभावी भाषणानें प्रतिनिधींच्या अंतः-करणाचा कबजा घेतला. कमालपाशा खालीं बसतांच टाळ्यांचा कडकडाट झाला.

" तुमच्या सारखा पुढारी आम्हांला पाहिजे, नव्हें तुम्हींच आमचे पुढारी बनले पाहिजे, " एक मुख्य प्रतिनिधी उद्गारला व बाकीच्या सर्वांनीं त्याला संमती दिली.

" आज मी सर्व साधारण नागरिक आहे. सैन्यामधून मला बडतर्फ करण्यांत आले आहे पण, मुख्य सैन्याधिकारी म्हणून पूर्वी जशा माझ्या आज्ञा मान्य करण्यांत येत होत्या तशा यापुढेंही करण्यांत आल्या पाहिजेत "

" सर्व सैन्य आपल्या मागें आहे, " एक सैन्याधिकारी म्हणाला.

" आणि जनताही, " प्रतिनिधी म्हणाले.

अधिवेशनाचें कार्य पुन्हां उत्साहानें सुरू झालें. अधिवेशन ऐन रंगांत आले असतां कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना एकदम कैद करावें असा हुकूम सुलतानांनीं त्या प्रांतांचे गव्हर्नर अली गालीब यांना पाठवून दिला. अली गालीब हे अत्यंत राजनिष्ठ गव्हर्नर समजले जात होते. तो प्रांत अडाणी, खेडवळ व अत्यंत राजनिष्ठ अशा कुर्द टोळ्यांचा होता. त्या टोळ्यांच्या सहाय्यानें सिवास येथें कॉंग्रेसवर छापा घालावयाचें अली गालीब यांनीं ठरविलें. कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना ही बातमी लागतांच, त्यांना फार संताप आला. कुर्दांसारख्या अडाणी लोकांकडून, राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणविणाऱ्या धुरिणांची मानखंडणा व्हावयाची वेळ यावी, या गोष्टीचा त्यांना फार विषाद वाटला. कमालपाशांनीं या कुर्द लोकांचा व गव्हर्नरचा ताबडतोब बंदोबस्त करावा असें सर्व प्रतिनिधींनीं सुचविलें. प्रतिनिधींच्या इच्छेनुसार कमालपाशांनीं अत्यंत इमानी व तडफदार तरुणांचें सैन्य ताबडतोब उभारून त्या सैन्यास कुर्द लोकांचें पारिपत्य करण्याकरितां पाठविलें. कमालपाशांच्या

सैन्यानें कुर्द लोकांची दाणादाण उडविली व गव्हर्नर अली गलीब यांना ' दे माय धरणी ठाय ' करावयास लावलें.

या कामगिरीमुळें कॉंग्रेसचे प्रतिनिधी कमालपाशावर निहायत खूष झाले. कमालपाशांनीं आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सशस्त्र प्रतिकार हा एकच योग्य उपाय आहे असें जें वादविवादाच्या वेळीं विधान केलें होतें त्याची सत्यता या बिकट प्रसंगीं सर्वांना आली. शेवटीं आपल्या राष्ट्रावर आक्रमण करणाऱ्या परकियांशीं सशस्त्र प्रतिकार करणें हेंच योग्य आहे असें एकमतानें ठरलें.

त्याचप्रमाणें त्या कॉंग्रेसमध्यें राष्ट्रीय करार(National Pact) एक मतानें मंजूर करावा असा खुद्द कमालपाशांनीं ठराव आणला. तुर्की राष्ट्राचें संपूर्ण व अविभाज्य स्वातंत्र्य हें त्या करारांचें ध्येय होतें

" राष्ट्रीय करार ही फार पुढची पायरी आहे. आतां जें सनदशीर होईल त्याचा अवलंब करणें हिताचे होईल, " हळूंच एक प्रतिनिधी म्हणाले.

" भित्र्या नि निरुत्साही लोकांनीं या राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहावें असें पहिल्याप्रथमच मी बजावले आहे, " कमालपाशांचा पहाडी आवाज सगळीकडे दुमदुमला.

राष्ट्रीय करार हा आजच्या परिस्थितींत किती अवश्य व अपरिहार्य आहे याचें कमालपाशांनीं इतकें वक्तृत्वपूर्ण समर्थन केलें कीं, त्यांचें भाषण संपतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सर्व वातावरण उत्साहानें भरून गेलें. ‘ स्वातंत्र्य किंवा मृत्यू ! ’ अशा एकच गर्जना झाली आणि राष्ट्रीय करार एकमतानें मंजूर करण्यांत आला.या करारामधील अटी इंग्रजांनीं व त्यांच्या अंकीत असणाऱ्या सुल्तानांनीं मान्य करीपर्यंत स्वातंत्र्याचा लढा चालवावयाचा असें निश्चित झालें.

“ कमालपाशा चिरायू होवोत ! ” दुसरी गर्जना झाली.

“ नाहीं, राष्ट्र चिरायू होवो ! ” सद्गदीत होऊन कमालपाशा म्हणाले.

त्याच बैठकीत कॉंग्रेसनें तुर्कस्थानाचें स्वतंत्र व तात्पुरतें सरकार स्थापित केल्याचें घोषीत केलें. हा राज्यकारभार व्यवस्थित चालविण्या-करितां एक कार्यकारी मंडळ निवडण्यांत येऊन, कमालपाशांना या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष करण्यांत आले.

जुने तुर्की पार्लमेंट बरखास्त करून नव्या निवडणूकी करण्यांत याव्या असें राष्ट्रीय कार्यकारी मंडळाकडून मध्यवर्ती सरकारास कळविण्यांत आलें. मध्यवर्ती सरकारकडून उत्तर न आल्यामुळें कमालपाशांनीं सर्व नियंत्रण आपल्या हातीं घेतलें.

त्यांनीं तारखात्याचा कबजा घेऊन राजधानीचा इतर प्रांतांशीं असलेला संबंध तोडून टाकण्याविषयीं लष्करी अधिकाऱ्यांना कळविलें. त्याप्रमाणें सर्व जमीनमहसूल आपल्याकडे पोहोंचता करण्याबद्दल व शक्य त्याठिकाणीं आपल्या विश्वासांतील मुलकी अधिकारी नेमण्याबद्दल हुकूम दिला.

हे ऐकून सुलतानांचें धाबें दणाणलें. काय करावें हे त्यांना सुचेना. युद्धतहकुबीच्या अटींनुसार फौज ठेवण्याची मनाई असल्यामुळें कमालपाशांनीं घोषित केलेल्या बंडाचें पारिपत्य करण्यास सुलतान असमर्थ होते. शिवाय जे कांहीं लष्करी अधिकारी होते ते सर्व कमालपाशांच्या निशाणाखालीं जमल्यामुळें व सर्व जनता त्यांच्याच मागें असल्यामुळें हात चोळीत बसण्यापलीकडे सुलतान कांहींही करूं शकत नव्हते. शेवटीं काँग्रेसनें कळविल्याप्रमाणें सुलतानांनीं जुनें पार्लमेंट बरखास्त केलें व नव्या निवडणुकी करणेस त्यांनीं संमत्ती दिली.

पण ही संमत्ती देतांना सुलतान मिस्किलपणें हंसले; त्या हंसण्यांत फार मोठा अर्थ दडला होता.

" नव्या निवडणुकी होऊन त्यांत नॅशनल असेंब्लीचे सर्व अराजक सभासद निवडून येतील; या निवडणुकी झाल्या म्हणजे

माझ्या छातीवर नाचविण्याकरितां राजद्रोही बदमाशांनीं तात्पुरतें निर्माण केलेलें सरकार आपोआप रद्द होईल आणि तो अनातोलियामधील क्रूर लांडगा कमालपाशा, अनातोलीयाच्या ओसाड प्रदेशांत एकटाच भटकत फिरेल. उद्यां त्याला कोणी विचारणार नाहीं; परवां लोकांच्या स्मृतीपटलावरून तो कायमचा निघून जाईल! हे राष्ट्रांचे कैवारी, हे पार्लमेंटचे नवे समासद, हीं राजद्रोही कुत्रीं या कॉन्स्टँटिनोपलमध्यें माझ्या नजरेखालीं व इंग्रजांच्या आरमारी तोफांच्या टप्प्यांत एकत्र येतील, आणि–आणि मग मी आहे व ते आहेत, "

सुलतानांनीं संतापानें हाताचीं बोटें जवळच्या मऊ उशीवर रोविलीं.

पार्लमेंटच्या नव्या निवडणुकींत सर्व भागांतून प्रचंड बहुमतानें कॉंग्रेसचे प्रतिनिधी निवडून आले. निवडणूक झाल्यानंतर कॉंग्रेसनें आपली मुख्य कचेरी अंगोरा येथें नेली. या कचेरींत निवडणून आलेले सर्व प्रतिनिधी पुढील वाटाघाटी करण्याकरितां व कार्याची दिशा ठरविण्याकरितां जमले. कॉंग्रेस बरखास्त करावी व पार्लमेंटची बैठक पूर्वींप्रमाणेंच कॉन्स्टँटिनोपल येथें भरवावी असें बऱ्याच प्रतिनिधींचें मत पडलें. कमालपाशांनीं या दोन्ही गोष्टींस जबरदस्त विरोध केला. " प्रतिनिधी कार्य कसे करतात हें

पहाण्याकरितां व राष्ट्रावर नियंत्रण ठेवण्याकरितां कॉंग्रेसचें अस्तित्व अत्यंत जरूरीचें आहे. केवळ निवडणुकी लढविण्यापुरतेंच कॉंग्रेसचें कार्य आहे असे समजणें अत्यंत चुकीचे आहे. त्याचप्रमाणें पार्लमेंटच्या सभासदांनीं कॉन्स्टॅंटिनोपल येथें न जातां, अंगोरा येथें पार्लमेंटची बैठक भरविण्यास सुलतानास भाग पाडावें. कॉन्स्टॅंटिनोपलमध्यें इंग्रजांचें वर्चस्व असल्यामुळें पार्लमेंटच्या सभासदांना स्वातंत्र्य राहाणार नाहीं व त्यांना केव्हां अटक होईल हें सांगतां येत नाहीं. तेव्हां या दोन्हीं सूचना पार्लमेंटच्या सभासदांनीं परत घ्याव्या," असें कमालपाशांनीं सुचविलें. पण, त्या प्रतिनिधींनीं कमालपाशांचे म्हणणें ऐकले नाहीं. सर्वांनीं कॉन्स्टॅंटिनोपल येथें भरविण्यांत येणाऱ्या पार्लमेंटच्या बैठकीस हजर राहावें असें एकमतानें ठरविलें.

कमालपाशा हे झरझरम प्रांतामधून पार्लमेंटचे सभासद म्हणून निवडून आले होतें. त्यांनीं कॉन्स्टॅंटिनोपल येथें भरणाऱ्या पार्लमेंटच्या बैठकीस हजर राहण्याचे नाकारलें. पार्लमेंटचे सर्व सभासद कॉंस्टॅंटि-नोपल येथें जाण्यास निघाले तरी त्या गोष्टीचा आपल्या मनावर काडीमात्र परिणाम होऊं न देतां, कमालपाशांनीं हत्यारेंपात्यारें व दारूगोळा जमा करण्याचा व सैनिकांना तयार करण्याचा अविश्रांत उद्योग चालूं ठेवला.

प्रकरण १७ वें

—xx—

# शिरच्छेदाची आज्ञा

कॉन्स्टँटिनोपलमध्यें जानेवारी १९२०सालांत तुर्की पार्लमेंटची बैठक भरली. पार्लमेंटचें कार्य सुरू झालें; पण त्या कार्यांत वारंवार अडथळे निर्माण होऊं लागले. कमालपाशांनीं जें भविष्य केलें होते त्याची प्रचीती, हळूहळू पार्लमेंटच्या सभासदांना येऊं लागली. तुर्की राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून तुर्की राष्ट्राचे हक्क अबाधित राखण्याकरितां ते त्या ठिकाणीं जमले होते. तुर्की राष्ट्राचीं सूत्रें इंग्रजांच्या व त्यांच्या तंत्रानें चालणाऱ्या सुलतानांच्या हातीं जावी अशा प्रयत्नांना त्यांनीं सक्त विरोध केला; एवढेंच नव्हे तर, काँग्रेसनें तयार केलेला 'राष्ट्रीय करार' पार्लमेंटमध्यें मंजूर करून घेतला. तो करार म्हणजे विजयी शत्रूंना किंवा इंग्रजांना एकप्रकारचें आव्हानच होतें.

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

आपल्या हुकमतीखालीं असणाऱ्या तुर्की राष्ट्राच्या पार्लमेंटनें स्वतंत्र राष्ट्राची मागणी करणारा करार मंजूर करून घ्यावा ही गोष्ट इंग्रजांना फार झोंबली. त्यामध्येंच तरुण तुर्कांनीं ठिकठिकाणीं आपल्याविरुद्ध बंड केल्याच्या वार्ता त्यांच्या कानावर आल्या. दिलेल्या हुकमांचा भंग सर्रास सुरू आहे, नियंत्रण करण्याकरितां ठेविलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांचा पदोपदीं अपमान होत आहे, हत्यारें हवाली करण्यांत तरुण तुर्कांकडून इन्कार होत आहे, इंग्रज लोकांच्या छावण्यांवर हल्ले होत आहेत, अशा अनेक बातम्या सारख्या येऊं लागल्यामुळें इंग्रजांचे स्वास्थ्य पार नष्ट होऊन गेलें. तुर्कस्थानच्या अंतर्भागांतून इंग्रज सैन्य निघून गेल्यामुळें, या गोष्टींचा बंदोबस्त करणें इंग्रजांना अवघड जाऊं लागलें. फक्त कॉन्स्टँटिनोपलमध्यें तेवढें त्यांचे सैन्य असल्यामुळें त्या ठिकाणींच तरुण तुर्कांच्या आकांक्षांना शक्य तितका पायबंद घालण्याचे त्यांनीं योजिलें. मार्च ता. १६ ला इंग्रजांनीं सबंध शहर आपल्या ताब्यांत घेऊन, सुलतानास पार्लमेंटची बैठक बरखास्त करावयास लाविली नि पार्लमेंटच्या सभासदांपैकीं बऱ्याच पुढाऱ्यांना कैद करून त्यांना माल्टामध्यें पाठविलें. कांहीं तुर्की पुढारी मात्र इंग्रजांच्या हातून निसटून गेले.

या सुसंधीचा फायदा घेऊन तरुण तुर्कांचा कायमचा बीमोड करावयाचे सुलतानांनीं ठरविलें. त्यांनीं " खलीफाचे सैन्य "

या नांवाची एक तात्पुरती फौज तयार करावयास युद्धमंत्री सुलेमानपाशा यांना फर्माविले. सदर फौज तयार करण्याकरितां सुलतानांनीं इंग्रजांची परवानगी घेतली होती. या कार्यास हातभार लावण्याकरितां सुलतानांनीं तुर्कस्थानमध्यें असणाऱ्या झाडून साऱ्या मुल्लामौलवींना पाचारण केलें. जवळ जवळ दोन तपें तरूण तुर्कांचें सर्वत्र वर्चस्व असल्यामुळें या मुल्लामौलवींची मिजास बंद पडली होती, त्यांना कोणी विचारीनासें झाले होते, त्यांची अवहेलना होत होती. सुशिक्षित तुर्कांचा उत्कर्ष होण्यापूर्वी तुर्कस्थानमध्यें या मुल्लामौलवींचे अतिशय प्रस्थ होतें हें आपण मागें पाहिलेच आहे. तरूण तुर्कांनीं त्यांचें प्रस्थ कमी करण्यांत प्रथम भाग घेतला; त्यांचे समाजांतील महत्वाचें स्थान हिरावून घेतले; त्यांच्या धर्माज्ञा धाब्यावर बसविल्या. तेव्हां या तरुणांचा निःपात करण्याची सुसंधी मुल्लामौलवी कशा गमावतील? ते मोठ्या हिरीरीनें सुलतानास जाऊन मिळाले. स्वातंत्र्याकरितां तळमळणाऱ्या तुर्कांविरुद्ध गिल्ला माजविण्याची महत्तम कामगिरी सुल्तानांनीं त्यांच्यावर सोपविली. सुलतानांचा आशिर्वाद घेऊन ही सैतानांची सेना सबंध तुर्कस्थानांत पसरली “ पाश्चात्य ज्ञान घेतलेल्या या तरुण तुर्कांचे ऐकूं नका. त्यांनीं अखिल मुसलमानांच्या खलिफा विरुद्ध युद्ध पुकारलें आहे. खलीफा म्हणजे जगांतील मुसलमानांचा धर्मगुरु, खलीफाच्या

विरुद्ध युद्ध म्हणजे इस्लामविरुद्ध युद्ध होय. या धर्महीन तरूण तुर्कांना नेस्तनाबूद करून टाका, ते सांपडतील त्या ठिकाणीं ठेंचून काढा. त्यांचा निःपात केल्याशिवाय इस्लाम धर्माची व खलीफाची शाश्वती नाहीं. त्यांना मारून टाकणें म्हणजे महापुण्य पदरीं बांधून घेणें होय. हे तरूण तुर्क इस्लामचे कट्टे दुष्मन होत" अशा तऱ्हेचा विषारी प्रचार या मुल्लामौलवींनीं समाजांत सुरू केला. बहुसंख्यांक तुर्की समाज अडाणी व धर्मांध असल्यामुळें या प्रचाराचे भीषण परिणाम सबंध तुर्कस्थानभर दृगोचर होऊं लागले.

तरुण तुर्कांमध्यें व मुल्लामौलवींनीं चिथावून दिलेल्या अज्ञानी तुर्कांमध्यें भयंकर यादवी सुरू झाली. शहराशहरामध्यें, खेड्या-खेड्यांमध्ये, कुटुंबाकुटुंबामध्यें दोन तट पडून रक्तपात होऊं लागला. बापाविरुद्ध मुलगा, भावाविरुद्ध भाऊ, मामाविरुद्ध भाचा, चुलत्याविरुद्ध पुतण्या, एकमेकांवर तुटून पडूं लागले. ठिकाठिकाणीं बंड व दंगे सुरू झाले; त्या दंग्यांस सुलतानांच्या लोकांनीं प्रोत्साहन दिलें. एकमेकांवर दगडांचा वर्षाव होऊं लागला, लाठीमार सुरू झाला, अंगावर फटक्यांचे वळ उठूं लागले, तलवारीचे घाव पडूं लागले, ठिकठिकाणीं फांसावर लटकावलेलीं प्रेतें दिसूं लागलीं. कमाल पाशांच्या अनुयायांनीं यांचा पुरेपूर सूड घेतला. सुलतानांचे लोक,

फितुरी व मुल्लामौलवी यांना ते सांपडतील तेथें गोळ्या घालण्यास, त्यांनीं सुरवात केली.

सुलतानांनीं फर्मानें काढून अंगोऱ्याच्या बंडखोरांविरुध्द जनतेनें मदत करावी अशी विनंती केली. या फर्मानाचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं असें दिसून आल्यावर सुलतानांनीं कमालपाशा व त्यांच्या अनुयायांना बहिष्कृत व धर्मबुडवे ठरवून त्यांना जो ठार मारील त्याला इहलोकीं व परलोकीं सद्‌गती मिळेल, अशी खास धर्माज्ञा काढली. सुलतान ह्मणजे सर्व मुसलमानांचा खलीफा आणि खलीफांची धर्माज्ञा पाळणें महापुण्य होय असें सर्वत्र समजलें जात होते. ही धर्माज्ञा पाळण्याचें महापुण्य लागावे म्हणून एखाद्या धर्मवेड्याकडून कमालपाशांचा शिरच्छेद केव्हां केला जाईल याचा नेम नव्हता.

## प्रकरण १८ वें

—xx—

# ग्रँड नॅशनल असेंब्ली.

कमालपाशांचा शिरच्छेद करणें हे महापुण्य आहे असें धार्मिक फर्मान सुलतानानें काढल्याची बातमी कमालपाशांच्या कानांवर ज्यावेळीं प्रथम आली त्यावेळीं ते अंगोरा येथील शेतकी शाळेच्या दिवाणखान्यांत एका खिडकीसमोर निसर्गाची शोभा पहात स्वस्थपणें बसले होते. ही बातमी ऐकून कमालपाशा संथपणें हंसले नि पुन्हां आपली दृष्टी सभोंवार पसरलेल्या हिरवळीवर फिरविली.

कांहीं वेळानें दुसरा एक गृहस्थ आला व त्यानें कमालपाशाचे कानांत कांहींतरी सांगितले. क्षणांत कमालपाशांच्या चेहऱ्यावर विषण्णता पसरली, ते उठून येरझाऱ्या घालूं लागले. एका खिडकीसमोरून दुसऱ्या खिडकीसमोर ते उभे राहत. त्यांना चैन कशी ती पडेना. आपला खून होणार ही बातमी

ऐकून देखील आपल्या मनावर काडीमात्र परिणाम न होऊं देणाऱ्या कमालपाशांच्या चेहऱ्यावर विषण्णता कां पसरावी? त्यांना अस्वस्थता कां वाटावी? त्यांनीं बेचैन कां व्हावे?

ग्रीक लोकांनीं स्मर्नाच्या बाजूनें पुन्हां तुर्कस्थानावर आक्रमण सुरूं केल्याची बातमी ऐकून कमालपाशांना फार धक्का बसला. यादवीने जर्जर झालेल्या तुर्कस्थानावर झडप घालून त्याला नेस्तनाबूद करण्याची सुसंधी ग्रीक लोकांनीं साधल्याचें ऐकून कमालपाशा अत्यंत अस्वस्थ झालें. ग्रीक सैन्याच्या अत्याचारांमुळें स्मर्नाच्या बाजूस हाहाःकार उडाला होता. सांपडतील त्या तुर्कांची निर्दयपणें कत्तल करीत, तुर्कांचीं घरेंदारें जाळीत, त्यांचीं शेतें उजाड करीत ग्रीक सैन्य पुढें सरकत होतें. आपल्या शत्रूला विरोध करावयाचा सोडून, आपल्याच लोकांच्या पाठीस हात धुवून लागलेल्या मुल्लामौलवींची व त्यांना आश्रय देणाऱ्या सुलतानांची कमालपाशांना अत्यंत चीड आली. मुल्लामौलवींनीं भडकाविलेला वणवा सर्व राष्ट्रभर वायुवेगानें पसरूं लागला. जिकडे पहावें तिकडे तरूण व राष्ट्राभिमानी तुर्कांची लांडगेतोड सुरूं झाली. ' खलीफांच्या सैन्यानें, शहरामागून शहरें आपल्या कबजांत घेऊन तेथील तरूण तुर्कांचा निःपात करण्यास सुरवात केली. स्मर्नाच्या दऱ्याखोऱ्यांतील रानटी टोळ्यांनींही ठिकठिकाणीं

दंगल सुरू केली. इधम नांवाच्या त्यांच्या पुढाऱ्यानें तर, ' आपण तुर्कस्थानचे बादशहा आहोंत. ' असें घोषित केलें.

कमालपाशांपुढें भेसूर निराशेचें चित्र उभें राहिलें. आपण आतांपर्यंत राष्ट्राच्या उद्धाराकरितां केलेले परिश्रम वायां जाऊन, आपलें राष्ट्र गुलाम म्हणून कायमचे दिवस कंठणार या विचारानें त्यांच्या अंतःकरणांत कालवाकालव सुरू झाली. त्यावेळीं बाहेर काळकभिन्न अंधार पसरला होता. कमालपाशांनीं खिडकींतून बाहेर नजर टाकली तोंच त्या अंधःकाराच्या भालप्रदेशावर उठून दिसणारी चंद्रकोर त्यांच्या दृष्टीस पडली. कमालपाशांचा चेहरा बदलला,त्यांच्या डोळ्यामध्यें एक प्रकारचें तेज चमकूं लागले,त्यांचे बाहू स्फुरण पाऊं लागले! त्यांनीं आपल्या मुठी आवळल्या व ते ताडकन् उठून उभे राहिले.

" शरीरांत रक्ताचा थेंब शिल्लक असेपर्यंत मी लढत राहणार. माझ्या मातृदेशाला मी अद्यापही स्वतंत्र करूं शकेन. " कमालपाशांच्या या उद्गारांनीं त्यांच्याभोंवती असणाऱ्या अनुयायांमध्यें विद्युत्वेगानें उत्साह पसरला.

आपल्या प्रकृतीची पर्वा न करितां कमालपाशा रात्रंदिवस त्या दिवाणखान्यांत बसून सद्यस्थितीवर आपल्या सहकाऱ्यांबरोबर

चर्चा करीत व राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत काय चालले आहे याचा कानोसा घेऊन त्याप्रमाणें आपल्या सैनिकांस हुकूम देत. त्यांच्या सैनिकांच्या हातीं जे मुल्लामौलवी व सुलतानांची कड घेणारे लोक सांपडतील, त्यांना यमसदनास पाठविण्याची त्यांनीं सर्रास परवानगी दिली होती. इतके प्रयत्न करूनही जर राष्ट्रप्रेमी तुर्कांची खटपट फुकट जाईल तर तुम्हीं काय कराल? असा प्रश्न एका अमेरिकन वार्ताहराने कमालपाशांना विचारला. तेव्हां कमालपाशांनीं निश्चयी आवाजांत उत्तर दिलें, " जें राष्ट्र आपल्या अस्तित्वाकरितां व स्वातंत्र्याकरितां त्यागाची शिकस्त करतें, त्या राष्ट्राचा कधींच पराभव होणार नाहीं. पराभव म्हणजे राष्ट्राचा मृत्यू होय." आपले राष्ट्र मेलें नाहीं, अद्याप ते जिवंत आहे, असा त्यांचा विश्वास होता. कमालपाशांच्या रोमरोमांतून, नसांनसांतून, शब्दाशब्दांतून हा विश्वास प्रतीत होत होता. कमालपाशांनीं आपल्या अमोघ वाणीनें राष्ट्रप्रेमी तुर्कांमध्यें नवचेतना निर्माण केली. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वानें तरुण तुर्कांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला. कमालपाशांचे जळजळीत विचार, त्यांची मातृदेशाविषयीं असीम तळमळ, राष्ट्राच्या उद्धाराकरितां त्यांचे चाललेले अविश्रांत प्रयत्न पाहून प्रत्येक तुर्क कमालपाशांवर आपली जान कुर्बान करूं लागला. 'स्वातंत्र्य किंवा

मृत्यू ! ' या कमालपाशांच्या घोषणेचा पुनरुच्चार करीत, हजारों तुर्क त्यांच्या निशाणाखालीं जमूं लागले.

यशोदेवता कमालपाशांच्या सहाय्यास धांवली.कमालपाशांच्या असंख्य अनुयायांनीं ग्रीकांचा यशस्वी प्रतिकार केला, सुलतानांच्या कच्छपी लागलेल्या राजनिष्ठांचा खुर्दा उडविला, कमालपाशांच्या विरुद्ध प्रचार करणाऱ्या मुल्लामौलवींना तोबा करावयास लावलें. त्यांच्या अनुयायांमध्यें इतका उत्साह, इतकें धैर्य निर्माण झालें कीं, त्यांनीं इंग्लीश पलटणींवर हल्ला करून त्यांना समुद्रापर्यंत पिटाळून लावलें; फ्रेंच व इटालीयन सैन्याची तीच गत केली. राष्ट्रावर नियंत्रण ठेवण्याकरितां दोस्तराष्ट्रांनीं जे अधिकारी ठेविले होते त्यांना कैद करून, इंग्लीशांनी ज्या तुर्कीपुढाऱ्यांना माल्टामध्यें कैदेंत टाकले होते त्यांच्याबद्दल ओलीस म्हणून ठेवून घेतले.

' इंग्रजांनीं आपल्या राजधानीचा कबजा घेतला, आपल्या पुढाऱ्यांची धरपकड करून त्यांना तुरुंगात डांबले, तुर्की पार्लमेंट बरखास्त करण्याचा उद्दामपणा केला आणि या सर्व अपमानकारक कृत्यांना सुलतानानें संमत्ती दिली. ' या बातम्या खेडोपाडीं पोहोंचल्यावर तुर्की जनता सुलतानावर फार खवळली. ' आपण आपल्या सच्च्या देशबांधवांविरुद्ध व कमालपाशांविरुद्ध अंधपणानें

सुलतानाला मदत केली हा आपला मुर्खपणा झाला,' असें जनतेला वाटूं लागलें.

कमालपाशांच्या राष्ट्रीय पक्षास राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून जोराचा पाठिंबा मिळूं लागला. जोपर्यंत कॉन्स्टँटिनोपेलमध्यें· आपल्या राजधानीमध्यें, इंग्रजांचें वर्चस्व आहे तोपर्यंत आपणास कांहींही करतां यावयाचें नाहीं, असें प्रत्येक तुर्कांचे ठाम मत बनलें. राष्ट्रांच्या अभ्युदयाकरितां सुलतानांवर विश्वास टाकणें कुचकामाचें आहे अशी त्यांची विचारसरणी बनूं लागली. कमाल-पाशांची बाजूच न्यायाची व योग्य आहे; परकीयांच्या तावडींतून स्वतःची सुटका करून घेण्याकरितां सशस्त्र प्रतिकार केला पाहिजे असे विचारप्रवाह सर्व राष्ट्रभर जोरांत वाहूं लागले.

सर्व दर्जाच्या, मताच्या आणि पक्षाच्या स्त्री- पुरुषांनीं राष्ट्राच्या उध्दाराचें कंकण हातीं बांधलें.खेडुत स्त्रियांनीं दारूगोळा नि हत्यारें गोळा करण्याची तयारी दर्शविली, घरंदाज स्त्रियांनीं सैनिकांची शुश्रुषा करण्याचे व त्यांचे कपडे शिवण्याचें कार्य पत्करलें. एकजात सर्व तुर्कांनीं कमालपाशांच्या आज्ञा एकनिष्ठपणें पाळण्याच्या प्रतिज्ञा केल्या. खलीफांच्या सैन्यावरही या वातावरणाचा परिणाम झाला. त्या सैन्यांत सैनिकांची गळती सुरू झाली.

त्यापैकीं कांहीं सैनिकांनीं चिडून जाऊन आपल्या अधिकाऱ्यांसच गोळ्या घातल्या. सुलतानांच्या रोषास बळी पडूं नये ह्मणून पळून गेलेले पार्लमेंटचे सभासद, सैन्याधिकारी, राजकारणी भराभर अंगोरा येथें जमूं लागले. सर्व तुर्कस्थानांत क्रांतिच्या लाटा उसळूं लागल्या. संबंध राष्ट्र आपल्या सूत्रधाराकडे, कमालपाशांकडे मोठ्या आशेने पाहूं लागले.

तुर्की पार्लमेंटची बैठक अंगोरा येथें भरावी असें कमालपाशा यांनीं फर्मान काढले. त्या फर्मानानुसार पार्लमेंटचे सर्व सभासद अंगोरा येथें जमा झालें. त्यांनीं आपल्या पार्लमेंटास " ग्रँड नॅशनल असेंब्ली " हे नवे नामाभिधान देऊन कमालपाशांना तिचे अध्यक्ष बनविलें. फ्रेंच प्रजासत्ताक राज्याच्या अध्यक्षानें एक संदेश पाठविला होता. त्या संदेशास असेंब्लीचा अध्यक्ष या नात्यानें कमालपाशांनीं बेडरपणें पुढील उत्तर पाठविलें, " जोपर्यंत परकीयांच्या अमलाखालीं आमची राजधानी आहे तोपर्यंत अंगोऱ्याहून ग्रँड नॅशनल असेंब्ली तुर्की राष्ट्राचे भवितव्य ठरवीत राहील. असेंब्लीत एक कार्यकारी मंडळ निवडले असून, त्या कार्यकारी मंडळानें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला आहे. सुलतान किंवा त्यांचे सरकार यांचेकडून आलेल्या आज्ञा फोल समजणेच्या आहेत. या पुढें तुर्की राष्ट्रानें स्वावलंबी व स्वतंत्र राष्ट्राचें हक्क मिळविणेचा

कृतनिश्चय केला आहे. योग्य व सन्मानयीय असा शांततेचा तह करण्यास, तुर्की राष्ट्राची केव्हांही तयारी आहे. मात्र तो तह राष्ट्राच्या खास प्रतिनिधींकडूनच केला जाईल."

महायुद्धांत जर्जर झालेल्या, यादरीनें कमजोर व निःसत्व बनलेल्या व अद्यापि शत्रूच्या कबजांत असलेल्या एका राष्ट्राच्या तात्पुरत्या अध्यक्षांचे हे बेडरपणाचें उद्गार, कमालपाशांच्या अभिजात निधडेपणाची उत्कृष्टपणें साक्ष देत आहेत. या निधडे-पणाचा जन्म स्वाभिमानांत झाला होता. कमालपाशांच्या स्वाभिमानावर कुणी हल्ला केला तर कशाचीही पर्वा न करितां ते त्यांच्यावर तुटून पडत. एकदां लॉर्ड ग्रे यांनीं आपल्या भाषणांत तुर्कांना कमीपणा येईल असे उद्गार काढल्याचे ऐकतांच ते उसळून म्हणाले " आह्मीं त्यांच्याच योग्यतेचें आहोंत हे इंग्रजांना लवकरच कळेल आणि आम्हांला बरोबरीने वागविणे त्यांना भाग पडेल. प्राण गेला तरी आम्हीं आमची मस्तकें त्यांच्यासमोर झुकविणार नाहीं. आमचा शेवटचा मनुष्य जिवंत असेपर्यंत त्यांच्याशी आह्मीं झगडत राहून आमचें म्हणणें त्यांना कबूल करावयास लावूं! "

## प्रकरण १९ वें

—××—

# ग्रीकांचा हल्ला.

महायुध्द संपल्यानंतर पॅरिसमध्यें प्रेसिडेंट विल्सन,लॉईड जॉर्ज क्लेमेंको आदि बडी बडी मुत्सद्दी मंडळी पराजित झालेल्या राष्ट्रांचे भवितव्य ठरविण्याकरितां जमली. तुर्कांकरितां एक तहनामा तयार करण्यांत आला. हा तहनाम्याचे नांव सेव्हर्सचा तह होय. या तहाच्या अटींही ताबडतोब जाहीर करण्यांत आल्या. त्या तहाच्या अटींचा स्वींकार म्हणजे तुर्कस्थानचा मृत्यूच होता.

> " युरोपमधुन तुर्कांची कायमची उचलबांगडी करणें हाच सेव्हर्सच्या तहाचा उद्देश होता.* "

या तहान्वयें तुर्कस्थानाने सीरिया पॅलेस्टाईन, इराक, हेजाज अरबस्थान, इजिप्त, सुदान, लिबिया व सैप्रस यावरील अधिराज्याचा

---

*" The New world "by Bowman, Ph. D.-Page 402

हक्क सोडावयाचा; दक्षिण अनातोलिया व किलीकीया हे प्रांत फ्रान्सला, व अदालिया हा इटलीला व स्मर्ना ग्रीसला द्यावयाचा; कॉन्स्टँटिनोपल ही तुर्कस्थानची राजधानी आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखालीं असावयाची; फक्त मध्य अनातोलीया तेवढा तुर्कांच्या ताब्यांत राहावयाचा; तुर्कांच्या प्रत्येक हालचालीवर दोस्तराष्ट्रांची नजर असावयाची; त्यांच्या जमीनमहसुलावर नियंत्रण ठेवले जावयाचे; तुर्की फौजा कमी करावयाच्या आणि ग्रीसखेरीज करून इतर राष्ट्रांच्या नुकसान भरपाईकरितां त्यांना तुर्कस्थानानें १८ कोट रुपये द्यावयाचे; अशा अटी घालून युरोपियन मुत्सद्यांनीं तुर्कस्थानाची गठडी वळली होती.

या तहाच्या अटी प्रसिद्ध झाल्याबरोबर मुसलमानी जगतात भयंकर खळबळ उडाली. युरोपमधील एकुलत्या एक मुसलमानी राष्ट्राची युरोपियन मुत्सद्यांनीं धुळधाण उडविलेली पाहून प्रत्येक मुसलमानाचें अंत:करण दुखावलें गेलें. तुर्कस्थानामध्यें तर हाहा:कार उडाला; राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून निषेधाच्या गर्जना होऊं लागल्या; जनता संतापानें बेमान झाली; या अपमानास्पद तहावर सही करण्यास सुलतानांनीं संमत्ती देऊं नये, अशा आरोळ्या सर्वत्र ऐकूं येऊं लागल्या.

सुलतान वहीदुद्दीन, मुख्य मंत्री फरीदपाशा व सुलतानांचे मंत्रिमंडळ यांजमध्यें वाटाघाट चालूं होती. तह कितीही अपमानकारक असला तरी तो मान्य केला पाहिजे, असा मुख्य मंत्री फरीदपाशा यांचा आग्रह पडला. शेवटीं सुलतानांनीं संमत्ती दिली व तुर्की वकिलांनीं पॅरिसमध्यें जाऊन तारीख ११ आगष्ट १९२० रोजीं तहावर सह्या ठोकल्या.

तो दुर्दैवी दिवस तुर्कस्थानांमध्यें सुतकासारखा पाळला गेला. वर्तमानपत्रांतील मजकूर काळ्या चौकटींत प्रसिद्ध झाला. हताश नि निराश झालेले तुर्क कमालपाशांकडे मोठ्या आशेनें पाहूं लागले. प्रत्येक तुर्क कमालपाशांच्या निशाणाखालीं भराभर जमूं लागला. उरले सुरलेले खलीफांचें सैन्य कमालपाशांना मिळालें; आणि अशा रितीनें तुर्कस्थानाची प्रतिकारशक्ति वाढूं लागली.

जवळजवळ ५०० वर्षे तुर्कलोक राज्यकर्ते होते; आतां गुलाम होऊन राहण्याचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर गुदरला होता. या तहामुळें तुर्कांमधील आपापसांत असणारे सारे भेद चट्दिशीं नाहींसे झाले. कमालपाशांनीं केलेल्या भीषण भविष्याची त्यांना प्रचीती आली. त्यांनीं जे शब्द बोलून दाखविले होते ते अक्षरशः खरें ठरूं लागले. निव्वळ योद्धा म्हणून नव्हे तर अव्वल दर्जाचा

मुत्सद्दी म्हणून कमालपाशांची कीर्ति पसरूं लागली. आपल्या राष्ट्राचा उद्धार फक्त कमालपाशा एकटेच करूं शकतील अशी जनतेची खात्री झाली. त्यांच्या नेतृत्वाखालीं आपल्या राष्ट्रावर चाल करून येणाऱ्या ग्रीकांचें पारिपत्य करण्याचा तुर्कांनीं निश्चय केला.

ग्रीक सैन्याचें पारिपत्य करण्याकरितां कमालपाशांनीं ताबडतोब युद्धमंडळ नेमलें व त्यांत बेकीरसामी, जाफर, फिवझी या पराक्रमी पुरुषांचा समावेश केला. दक्षिणभागांतील तुर्कांनीं कमालपाशांच्या आज्ञेप्रमाणें फ्रेंच सैनिकांवर हल्ला करून त्यांना पिटाळून लावले. पूर्व भागाकडे कझीकारा बेकीर यांनीं शत्रूला हाकलून देऊन तो प्रदेश सुरक्षित केला. कमालपाशांनीं कॉन्स्टँटिनोपलवर चाल केली.स्मर्नाच्या बाजूस ग्रीक सैन्य व कॉन्स्टँटिनोपल मध्यें इंग्रजसैन्य, इतकेंच परकियांचें सैन्य सबंध तुर्कस्थानामध्यें होतें.

जनरल जाफर यांनीं युरोपच्या बाजूनें व अली फऊद यांनीं आशियाचे बाजूनें कॉन्स्टँटिनोपलवर कमालपाशांच्या मदतीला मोर्चा नेला. कॉन्स्टॅंटिनोपलमध्यें इंग्लिश सैन्य अगदींच थोडे असल्यामुळें तुर्कांचा प्रतिकार करण्यास तें सर्वस्वी असमर्थ होतें. दोस्तराष्ट्रांच्या महान मुत्सद्यांना तुर्कांच्या आक्रमणाची

बातमी लागतांच ते अवस्थ झालें. प्रत्येक राष्ट्रानें तुर्कस्थानामधील आपलें सैन्य कमी करून टाकलें होतें; त्यामुळें तुर्कांना पायबंद कसा घालावा याची त्या मुत्सद्यांना फार काळजी लागली. याशिवाय दोस्त राष्ट्रांमध्यें युद्धानंतरची भीषण प्रतिक्रिया सुरूं झाली होती. इटालीमध्यें क्रांति होण्याचीं चिन्हें स्पष्टपणें दिसत होतीं, फ्रान्सचे हात सिरीयामधें गुंतले होते, ब्रिटिश साम्राज्य युद्धाच्या जबरदस्त टोल्यामुळें हतबल झाले होते, आयर्लंडमध्यें यादवी सुरू झाली होती, मेसापोटेमिया व हिंदुस्थानमध्यें स्वातंत्र्याची चळवळ जोरांत सुरू होती. अमेरिकेनें तर मदत करण्याचें साफ नाकारलें ! यामुळें तुर्कांचा बींमोड करून आपला डाव साधण्याकरितां दोस्तांजवळ भरपूर सैन्य नव्हतें. आहे त्या परिस्थितींत तुर्कांशीं लढणें किंवा पळून जाणें एवढें दोनच उपाय त्यांच्या समोर होते.

पॅरिसमध्यें तहाच्या वाटाघाटी करीत बसलेल्या मुत्सद्यांनीं आपली डोकीं खाजविली; पण त्यांना कांहीं मार्ग सुचेना. ' कमालपाशा नुसतें आक्रमण करूनच थांबणार नाहींत तर दोस्त-राष्ट्रांच्या उरलेसुरलेल्या सैन्याची लांडगेतोड करून त्यांना तुर्कस्थानामधून अपमानास्पद रीतीनें हाकलून लावणार, ' हें ताजें वृत्त ऐकतांच ते आ वांसून बसले.

"मूठभर आणि अडाणी तुर्कांनीं महायुद्धांत विजय मिळविलेल्या दोस्तराष्ट्रांच्या सैन्यास मेंढरांसारखे पिटाळून लावावे म्हणजे केवढा हा अपमान! आणि हा अपमान आमच्या जागत्या डोळ्यांनीं पाहावयाचा! ते कांहीं नाहीं. याला जर पायबंद घातला नाहीं तर उद्यां ठिकठिकाणीं क्रांत्या होतील, बंडखोरांचा सुळसुळाट होईल, आणि आम्हीं जी जगाची आंखणी आमच्या मनाप्रमाणें केली आहे तिची धुळधाण उडेल. वाटेल ते झालें तरी या तरुण तुर्कांना वठणीवर आणलेंच पाहिजे! होय; पण तें कसें?"

पुनः ते मुत्सद्दी निराशापूर्ण नजरेनें एकमेकांकडे पाहूं लागले. त्याचवेळीं त्यांच्यामागें एक धूर्त व्यक्ति, या मुत्सद्यांचें मनोगत ओळखीत उभी होती; त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेल्या भावना काळजीपूर्वक न्याहाळीत होती. या व्यक्तीचें नांव व्हेनिझिलॉस होतें. व्हेनिझिलॉस हा ग्रीसचा मुख्य प्रधान होता. अतिशय हुशार व महत्वाकांक्षी मुत्सद्दी अशी त्याची ख्याति होती. त्यानें आपल्या आयुष्यांत एकच ध्येय समोर ठेविलें होतें आणि तें म्हणजे तुर्कस्थान काबीज करून, ग्रीसचें एक मोठें साम्राज्य स्थापावयाचें नि कॉन्स्टँटिनोपल ही त्या साम्राज्याची राजधानी करावयाची! सतत २० वर्षें तो आपल्या ध्येयामागें लागला होता.

तें ध्येय साध्य होण्याची वेळ आतां आली असें त्याला वाटूं लागलें.

त्यानें नुक्तेच स्मर्नामध्यें पहिल्या दर्जाचे ग्रीक सैन्य पाठवून दिलें होतें. इंग्लीश आणि फ्रेंच सरकारांकडून युद्धाचा मोठा सांठा त्यानें अगोदरच विकत घेतला होता. उत्कृष्ट बंदुका, तोफा, रणगाडे यांनीं ग्रीक सैन्य सुसज्ज केलें होतें, " तुर्कस्थानचा बराच मोठा व सुपीक प्रदेश ग्रीसच्या हवालीं करण्यास तुम्हीं तयार असाल तर मी आपलें उत्कृष्ट सैन्य तुमच्या दिमतीस देतो. " अशी समोर बसलेल्या मुत्सद्यांस व्हेनिझिलॉसनें अट घातली. त्या मुत्सद्यांनीं ताबडतोब ती अट कबूल केली व ग्रीक सैन्य आघाडीवर पाठवून आपली अब्रू वांचविण्याचा त्याला आग्रह केला. व्हेनिझिलॉस एकवेळ हांसला व त्या मुत्सद्यांच्या इच्छेप्रमाणें ताबडतोब चढाईचा हुकूम देण्याचे त्यानें कबूल केलें.

कमालपाशा व त्यांचे सहकारी यांनीं कॉन्स्टँटिनोपलवर हल्ला करण्याची जय्यत तयारी केली; तोंच ग्रीक सैन्य आघाडीवर येत आहे असें त्यांना कळलें. जसजसें ग्रीक सैन्य पुढें सरकत गेलें, तसतसा त्या सैन्यास विजय मिळत गेला. खरें पाहिले असतां, सुसज्ज अशा ग्रीक सैन्यापुढें कमालपाशांचें सैन्य म्हणजे कांहींच

नव्हते.कमालपाशांच्या सैन्याजवळ दारूगोळा, वैद्यकीय पुरवठा भरपूर नव्हता; इतकेंच नव्हे तर, भरपूर अन्नाची तरतूद देखील नव्हती.

ग्रीकांची एक फौज उत्तरेच्या बाजूने आली व तिनें जाफर यांच्या सैन्याचा पराभव केला व त्या प्रांतातून सर्व तुर्की सैन्यास हुसकून लावून आड्रीयानोपल नांवाचा महत्वाचा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. दुसरी फौज स्मर्नाच्या बाजूनें सरकत येऊन, तिनें अली फऊद यांच्या सैन्याचा पराभव करून तेथील सर्व तुर्की सैन्यास उधळून लावलें. ग्रीकांची मुख्य फौज अनातोलीयाचा रेल्वेमार्ग कबजांत घेण्याकरितां निघाली.

ठिकठिकाणीं ग्रीक सैन्यानें तुर्कांचा पराभव केल्यामुळें, राष्ट्रांत निराशेचें दाट वातावरण पसरलें. यापुढें लढण्यापेक्षां ग्रीक लोकांबरोबर तह केलेला बरा अशी भाषा सर्वत्र ऐकूं येऊं लागली. राष्ट्रांत पसरलेला हा जबरदस्त निराशावाद पाहून कमालपाशांनीं ताबडतोब ग्रँड नॅशनल असेंब्लीची बैठक बोलाविली व त्या असेंब्लींत राष्ट्राच्या प्रतिनिधीं समोर त्यांच्या अंतःकरणास पीळ पडेल असें भाषण केलें. ते म्हणाले, " तुम्हीं पराक्रमी तुर्क आहांत. एकेकाळीं या ग्रीक लोकांना खडे मारणाऱ्या महापुरुषांचे वंशज आहांत. काल गुलाम म्हणून तुमच्या पायांशीं लोळत पडलेल्या ग्रीकांपुढें तुम्ही हार खाणार काय? त्यांना शरण जाणार काय?

त्यांच्या माऱ्यापुढें माघार घेऊन तुर्कस्थानाच्या उज्वळ परंपरेस काळीमा फासणार काय? आज तुम्हीं शत्रूपुढें हार खाल्लीत, माघार घेतलीत तर या जगांमधील तुमचें अस्तित्व, तुमचा पराक्रम, तुमचा मोठेपणा, तुमची संस्कृती यांना कायमची मूठमाती मिळाली म्हणून समजा. तुर्कांचें नांव जिवंत ठेवणें सर्वस्वी तुमच्या हातीं आहे. तुम्हीं, सर्वांनीं हातपाय गाळले, तरी कमाल एकटा लढेल. शत्रूनें राईराई एवढें तुकडे केले तरी मातृभूमी त्याला प्रेमानें आपल्या पदराखालीं झांकून घेईल! आणि ती म्हणेल--' कमालपाशा माझ्या पोटीं जन्मला होता, कमाल माझ्या दुधानें वाढला होता, कमालच्या अंगांत माझे रक्त खेळत होते, म्हणून तो माझ्यासाठीं लढला—माझ्यासाठीं मेला. जातिवंत कवी म्हणतील कमाल मेला पण आईसाठीं मेला! कमाल जिवंत होता. कमाल मुर्दाड नव्हता! मग बोला तह करणार कां लढणार? लढतां लढतां मरणार? " *

" आम्हीं लढणार! आम्हीं लढणार! " एकच आरोळी ऐकूं आली.

" तर मग उठा, सज्ज व्हा, एकनिष्ठतेनें लढा, विजय तुमचाच आहे! "

---

$ सामत कृत ' कमालपाशा ' पृष्ठ ५६--५७

कमालपाशांचा हा तेजस्वी संदेश विद्युत्वेगानें राष्ट्रभर पसरला. क्षणांत तुर्कांचा निराशावाद निघून गेला व नव्या दम्यानें त्यांनीं ग्रीक सैन्यास तोंड देण्याचा निर्धार केला. तुर्की स्त्रियांमध्यें तर उत्साहाचें वारें पसरलें. आपला बुरखा फेकून देऊन त्या स्वातंत्र्य-युध्दास सज्ज झाल्या.

दुसरे दिवशीं कमालपाशा पुन्हां रणभूमीवर परतले. माऱ्याची जागा पहात, कमालपाशा घोड्यावरून फिरत होते. घोडा वळवितांना दगडावरून घोड्याचा पाय निसरला व तोल जाऊन घोडा खालीं पडल्यामुळें कमालपाशांच्या बरगडींत भयंकर मार लागला; त्यांना हलणें देखील अशक्य होऊन गेले. कमालपाशांची बरगडी तुटली असून त्यांना उपचाराकरितां अंगोऱ्यास नेले अशी बातमी क्षणांत सैनिकांमध्यें पसरली.

कमालपाशांना, आपल्या मुख्य सैन्याधिकाऱ्याला अपघात आणि तोही लढाईस तोंड लागण्यापूर्वीं ! सैनिकांना धक्का बसला; त्यांचे चेहरे सुकून गेले. सुरवातीसच अमंगल प्रसंग घडला.

लढाईला जोरांत सुरवात झाली. ग्रीक सैन्यानें तुर्कांची दक्षिण आघाडीची फळी फोडली. ही फळी फोडण्यांत तुर्कांचें अंगोऱ्याशीं असलेलें दळणवळण तोडून टाकण्याचा उद्देश होता.

तुर्क जीवावर उदार होऊन लढूं लागले. तेथील खरखीत माती रक्तानें भिजूं लागली. तोफांच्या गोळ्यांनीं बाजूच्या टेकड्यांच्या ठिकऱ्या उडूं लागल्या. ग्रीक सैन्यानें तुर्कांना मागें रेठले. तुर्कांचा दम तुटूं लागला.

आपलें सैन्य कच खात आहे अशी बातमी ऐकल्याबरोबर कमालपाशा ऑपरेशन टेबलावर ताडकन उठून बसले. डॉक्टरांनीं त्यांना न हलण्याबद्दल परोपरीनें सांगितलें; पण त्यांनीं डॉक्टरांच्या म्हणण्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. शेवटीं डॉक्टरांनीं बँडेज कसेबसें बांधल्यानंतर कमालपाशा रणांगणाकडे निघाले. त्यांची एक बरगडी फुप्फुसांत घुसल्यामुळें त्यांना मरणप्राय वेदना होत होत्या; तरी त्याची पर्वा न करितां ते आघाडीवर पोहोंचले.

कमालपाशांच्या आगमनाची बातमी खंदकाखंदकांतून वायुवेगानें पसरली. सैनिक साशंक झाले. " इतका भयंकर मार लागला असतां पुन्हां रणांगणावर कमालपाशा आले आणि तेही इतक्या लवकर? अगदींच अशक्य? कदाचित् आमचा उत्साह द्विगुणीत व्हावा म्हणून ही हूल उठविली असेल! " पण ही हूल नव्हती. खरोखरीच कमालपाशा आघाडीवर हजर झाले. त्यांना पाहातांच सैनिकांनीं जयजयकार केला. कमालपाशा मोठ्या मुष्कीलीनें घोड्यावरून फिरत होते. ते सैनिकांना म्हणाले, " माझ्या शूर वीरांनों! हां

अल्लाचा इषारा आहे. ज्याप्रमाणें माझी बरगडी तुटली त्याप्रमाणें तुम्हीं शत्रूची फळी तोडून काढली पाहिजे. "

कमालपाशांचे शब्द ऐकल्याबरोबर तुर्क सैनिक बेभान होऊन लढूं लागले. त्यांनीं शत्रूवर संगिनींचा हल्ला केला. " मारूं किंवा मरूं " या अभिनिवेशानें तुर्क लढत होते. संध्याकाळ होईपर्यंत तुर्कांनीं ग्रीक सैन्यास फुरसत घेऊं दिली नाहीं. शेवटीं थकून ग्रीक सैन्य मागें हटलें. तुर्की सैनिकांनीं ताबडतोब खंदक खणून त्यांच्या समोर आपला तळ दिला.

ग्रीक सैन्यानें अनातोलियाच्या रेल्वेचा कांहीं भाग आपल्या ताब्यांत घेतला; पण जनरल इस्मतपाशा यांनीं ग्रीक सैन्यावर हल्ला करून त्या सैन्याला आपल्या जागीं परतविले. कमालपाशांच्या सैन्याचा हा पहिला विजय होय. इकडे कझीम कारा बेकीर यांनीं आर्मेनियावर चढाई केली. त्यांना रशियन सैन्याचें सहाय्य मिळालें. शिवाय आपण होऊन रशियानें पैसा व हत्यारें यांची तुर्कांस मदत केली.

सुदैवानें इकडे ग्रीसमध्यें राजकीय भांडणें जोरांत सुरूं झाली. त्याची प्रतिक्रिया सैन्यावरही होऊं लागली. व्हेनिझिलॉस व त्यांचे सहकारी यांची अथेन्समधून हकालपट्टी केल्याचें वृत्त समजतांच सैन्यामध्यें एकच खळबळ उडाली. कारण व्हेनिझिलॉसच्या

प्रेरणेनेंच ग्रीक सैन्य तुर्कांचा पराभव करण्याकरितां सज्ज झाले होते. फ्रान्स आणि इटली येथील राजकर्त्यांच्या मनांत हें तुर्की-ग्रीक युद्ध संपवून टाकावें असें होतें. कदाचित या क्षुल्लक वाटणाऱ्या युद्धापासून पुनः सर्व जग पेट घेईल अशी त्या राज्यकर्त्यांना भीती वाटत होती. त्यांनीं तुर्कस्थान व ग्रीस यामध्यें सलोखा निर्माण करण्याची तयारीही दर्शविली;पण ग्रीसनें या गोष्टीचा सक्त इन्कार केला. "आम्हीं शेवटपर्यंत लढणार" असें ग्रीक मुत्सद्यांनीं दोस्तराष्ट्रांना कळविलें. यावर दोस्तराष्ट्रांनीं "तुमचे तुम्हीं पाहून घ्या, आम्हीं तटस्थ राहतो" असें जाहीर केलें. आतां हा लढा फक्त तुर्कस्थान व ग्रीस यामध्येंच चालू राहिला. फ्रान्सनें तुर्कस्थानाला मदत करण्याचें गुप्त संदेश पाठविले. इटालीनें तर तुर्कस्थानाला उघडपणें हत्यारें पुरविण्यास सुरवात केली. अफगाणिस्थान, पर्शिया, हिंदुस्थान आणि इजिप्त या देशांत तुर्कस्थानाला मदत करण्याची चळवळ सुरू झाली. सगळीकडून तुर्कस्थानावर सहानुभूतीचा व आर्थिक मदतीचा वर्षाव होऊं लागला. याखेरीज तुर्कस्थानांमधील यादवी नष्ट झाल्या कारणानें, तुर्कस्थान पूर्वीपेक्षां जास्त बलवान व कार्यक्षम झाला.

आतां जास्त वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं असें समजून कमाल पाशांनीं ग्रीक सैन्याचा प्रतिकार करण्यासाठीं जय्यत तयारी सुरू

केली. त्यांना रात्रंदिवस विश्रांती नव्हती; कित्येक दिवस त्यांनीं झोंपेशिवाय घालविले. कमालपाशांचें सैन्य व सामुग्री दुय्यम दर्जाची होती. अव्वल दर्जाच्या ग्रीक सैन्याबरोबर मुकाबला करण्याकरितां आपलें सैन्य जास्त कार्यक्षम करण्याची त्यांनीं शिकस्त केली. अविश्रांत परिश्रमाचा परिणाम कमालपाशांच्या प्रकृतीवर दिसूं लागला. डॉक्टरांनीं त्यांना विश्रांती घेण्याबद्दल परोपरीनें बजावून सांगितलें; ' पण शत्रू दाराशीं येऊन ठेपला असतां, विश्रांती घेणें कृतघ्नपणाचें आहे' असें करारीपणाचे उद्गार कमालपाशांनीं काढले. ते पुढें म्हणाले, " माझा देश संकटांत आहे.शत्रूनें माझ्या देशाची धूळधाण करून टाकण्याच्या इराद्यानें चाल केली आहे. या वेळीं प्रकृतीकडे पाहाण्यापेक्षां माझ्या राष्ट्राकडे मला पाहिले पाहिजे. राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां झगडत असतां मला मृत्यू आला तर त्या सारखी भाग्याची दुसरी गोष्ट नाहीं असें मी समजेन. आतां विश्रांती राष्ट्राला स्वतंत्र केल्यानंतर; किंवा मेल्यानंतरच ! "

# प्रकरण २० वें

—xx—

## गाझी कमालपाशा

जुलै महिन्यांत कमालपाशा अंगोरामध्यें आपल्या सैन्याची पुनर्घटना करीत असतां, ग्रीक सैन्यानें एकदम जोराची चढाई केली. तुर्कस्थानाच्या तीन्हीं बाजूनें ग्रीक सैन्य चढाई करीत होतें. त्या सैन्याला तोंड देण्याचें शिकस्तीचें प्रयत्न, जनरल इस्मतपाशा करीत होते. इस्की शहीर हें महत्वाचें लष्करी ठाणें व त्या ठाण्याचें संरक्षण करणारें तुर्की सैन्य यांना वेढून टाकण्याचा ग्रीक सैन्याचा बेत होता. ग्रीक सैन्यास थोपवून धरण्याचे इस्मत-पाशांचे सर्व प्रयत्न फोल ठरले. आहे त्या ठिकाणींच ठाणें देऊन बसावयाचें किंवा मागें हटावयाचे हाच प्रश्न त्यांच्यासमोर होता. इस्मतपाशांनीं ही सर्व हकीकत कमालपाशांना कळविली व त्या ठिकाणीं प्रत्यक्ष येऊन पहाणी करावी असें सुचविलें. क्षणाचाही विलंब न लावतां कमालपाशा हजर झाले व त्यांनीं सर्व परिस्थिती

न्याहाळीली. ' सक्रीया नदीच्या मार्गें २०० किलोमिटर हद्दून अंगोराचें संरक्षण करण्यास सज्ज रहा असा हुकूम कमालपाशांनीं सोडला व ते ताबडतोब अंगोरास परतले. आणीबाणीची वेळ पाहून, नॅशनल ग्रँड असेंब्लीनें कमालपाशांना सरसेनापती ( कमांडर इन चीफ ) च्या अधिकारासह सर्वाधिकारी ( डिक्टेटर ) नेमले. कमालपाशांनीं सर्व अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि शत्रूचा प्रतिकार करण्याकरितां नव्या योजना आंखून कमालपाशा ताबडतोब रणांगणावर परतले. शत्रूवर मारा करण्याकरितां जागेची पहाणी करीत कमालपाशा एका टेकडीवर उभे होते. त्यांनीं लांबवर नजर टाकली. एकाएकीं कमालपाशांचा चेहरा प्रफुल्लित झाला, त्यांचे डोळे कृतज्ञतेनें भरून आले. तुर्की स्त्रिया आपल्या लहान लहान मुलांना पाठीशीं बांधून दारुगोळा आघाडीवर घेऊन जात होत्या. आपल्या आयाबहिणींचा हा उत्साह पाहून कमालपाशांनी धन्यतेचा निःश्वास टाकला व डोळ्यांतील अश्रू पुसून काढले.

आजपर्यंत चार भिंतींच्या आड आपले सारे आयुष्य घालविणाऱ्या, मुल्लामौलवींच्या टांचेखालीं रगडल्या जाणाऱ्या, रूढींच्या वरवंट्याखालीं चेंचल्या जाणाऱ्या, तुर्की स्त्रियांनीं स्वातंत्र्ययुद्धांत

केवढी धाडसाची कामगिरी केली याचें हृद्य वर्णन एका जर्मन ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें केलें आहे.

" तुर्की तोफखान्याला लागणारा दारूगोळा आपल्या डोक्यावर घेऊन स्त्रियांचा लांबच लांब व मोठा जमाव आघाडीवर चालला होता. त्या स्त्रियांनीं आपल्या लहान लहान कच्याबच्यांना आपल्या पाठीशीं घट्ट बांधून ठेविले होते. त्यांच्यामागून युद्ध सामुग्रीनें भरलेल्या बैलगाड्यांची रांग चालली होती. ज्याठिकाणीं युद्धास तोंड लागलें आहे, त्या ठिकाणापासून थोड्या अंतरावर या बैलगाड्या मधून आणलेली युध्दसामुग्री स्त्रियांकडून उतरून घेतली जात असे नि तेथून प्रत्यक्ष रणांगणावर स्त्रियांकडून हातोहात पोहोंचविली जात असे. तेथें पुरुषांचा तुटवडा असल्यामुळें ही सर्व कामें स्त्रियाच करीत.

रणांगणावर गोळीबाराचा मारा सुरू असतां व कुलपी गोळे पडत असतां, युध्दसामुग्रीचा बोजा घेऊन तुर्की स्त्रिया शांतपणे व धीटपणें रणांगणावर

जात असत. त्यांच्या पाठीवर बांधलेली लहान मुलें युद्धाच्या दणदणाटानें दचकून किंचाळत " ×

महाराष्ट्रीय महिलांच्या आवडत्या 'स्त्री' मासिकांत तुर्की स्त्रियांच्या पराक्रमाची खालील हकीकत प्रकाशित झाली आहे,

" आपलें स्वातंत्र्य राखण्याकरितां तुर्क स्वतः सैन्यांत दाखल झाले. त्यांच्या स्त्रिया तुर्की सैन्याला दारूगोळा, बंदुका, मशिनगन्स, अन्न, कपडे इत्यादि पुरविण्या-साठीं स्वयंसेविका झाल्या. एका कांखेला लहान मूल व डोकीवर अगर खांद्यावर दारूगोळ्यांच्या पेट्या वाहणाऱ्या हजारों तुर्की तरुणी खंदका खंदकांतून रात्रंदिवस पळत होत्या. कित्येक स्त्रिया मधेंच थांबून शत्रूवर गोळीबार करीत. त्या वेळचा देखावा केवढा रोमांचकारक असेल बरें! रहिमे नांवाची एक तरूणी सैन्यांत शिपाई म्हणून दाखल झाली होती. तिच्या अंगावर भयंकर जखमा झालेल्या होत्या तरी ती जखमांनीं घायाळ होऊन पडलेल्या दोन तुर्की शिपायांना बगलेंत घेऊन समरांगणातून हॉस्पिटलकडे

× "Kemal Ata Turk" by Hanns Froembgen, Page 154

चालली होती. ती हॉस्पिटलच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोंचली तेव्हां एक सैनिकानें तिच्यावर गोळी झाडली; ती तिथेंच मरण पावली. फातिमा चाऊस ही दुसरी स्त्री आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी सैनिक म्हणून दाखल झाली. अमेरिकन वर्तमानपत्रांच्या बातमी दारांनीं या धिप्पाड स्त्री सैनिकेचे फोटो वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केले होते. हलिदे हनूम (प्रसिद्ध लेखिका) या १६--८--२१ रोजीं सैन्यांत सैनिका म्हणून दाखल झाल्या. हातांत रायफल घेऊन त्या इतरांबरोबर कित्येक दिवस व रात्र खंदकांतून शत्रूवर गोळीबार करीत होत्या. त्यांच्या तुकडीला विश्रांती मिळे तेव्हां त्या जखमी शिपायांच्या शुश्रूषेची व खाण्यापिण्याची व्यवस्था करीत. त्या भयंकर दिव्यांत आपले दिवस कसे जात होते यासंबंधीं त्यांनीं आपल्या आठवणींत खालील उद्गार काढले आहेत, ‘ त्या क्षणापासून मला कशाचेही भान राहिले नव्हते. मी माझे वैयक्तिक अस्तित्व विसरून गेले. तुर्कस्थानांत चालू असलेल्या या प्राणांतिक राष्ट्रीय आंदोलनाचा एक घटक म्हणून

मी माझें कर्तव्य बजावीत होतें, लिखाण लिहीत होते, आणि श्वासोच्छ्वास करीत होतें" +

२१ आगष्ट १९२१ रोजीं ग्रीकांनी तुर्की सैन्यावर तोफांचा भडीमार सुरू केला. ग्रीक आणि तुर्क यांच्यामध्यें भीषण युद्ध सुरू झाले. १४ दिवस हा रणसंग्राम चालला होता. दोन्ही बाजूला प्रेतांचे ढीग पडत होतें. यावेळीं तुर्कांचा पराभव झाला तर सबंध तुर्कस्थानास ग्रीकांचे गुलाम म्हणून राहणें भाग होते. कमालपाशा स्वतः रणांगणावर हजर राहून आपल्या थोड्याशा सैन्यास प्रोत्साहन देत होते. स्वातंत्र्य किंवा मृत्यु अशी गर्जना करीत ते सैनिकामधून सारखे हिंडत होते. प्रत्येक तुर्क आपले शीर तळहातावर घेऊन लढत होता. ग्रीक सैन्यानें शिकस्त केली; पण तुर्की सैन्य एक रेसभर देखील मागें हटले नाहीं. बावीस दिवसाच्या लढाई नंतर ग्रीक सैन्य थकलें व हळू हळू मागें हटूं लागलें. मागें हटत असतां चीडून जाऊन ग्रीक सैन्यानें तुर्कांची घरेदारें व शेतें जाळून टाकलीं. जवळ जवळ २०० मैलांचा प्रदेश त्या सैन्यानें उजाड करून टाकला. कमालपाशांचें सैन्य ग्रीक सैन्याचा पाठलाग करीत होतें. शेवटीं ग्रीक सैन्यानें आपल्या पहिल्या ठिकाणीं--जेथून जुलै महिन्यांत त्यांनीं चढाईस प्रारंभ केला त्याठिकाणीं—खंदकांत जाऊन

+ 'स्त्री' मासिक, मार्च १९३५.

आश्रय घेतला. ग्रीक सैन्यासमोरच खंदक खणून आपल्या सैन्यास त्या ठिकाणीं तळ देण्यास कमालपाशानीं हुकूम दिला.

कमालपाशांनीं ग्रीक सैन्यास मागे हटविण्याचा अपूर्व पराक्रम केल्याबद्दल, अंगोरा मधील तुर्की जनता आनंदानें वेडी झाली. जनतेनें कमालपाशांचा जयघोष सुरूं केला आणि त्यांना "गाझी" ( शत्रूचा नाश करणारा ) अशी बहुमानाची पदवी दिली. परराष्ट्रांनीहीं कमालपाशांचा मुक्त कंठानें गौरव केला. रशिया, अफगाणिस्थान, हिंदुस्थान, आणि अमेरिका इतकेंच नव्हे तर, थोड्याच दिवसापूर्वी तुर्कस्थानला आपला कट्टा शत्रू समजणाऱ्या फ्रान्स व इटली राष्ट्रांनींहीं, कमालपाशानां अभिनंदनपर तारा पाठविल्या.

कमालपाशांवर अभिनंदनाचा वर्षाव होत होता तरी त्यांचें सैन्याची पुनर्घटना करण्याचें कार्य दुप्पट जोरानें सुरू होतेच. अजून शत्रूचा पुरा पाडाव झाला नव्हता. शत्रू केव्हां उचल खाईल याचा नेम नव्हता. शत्रूचा पुरा पराभव करण्याकरितां कमालपाशांनीं रात्रंदिवस तयारी सुरूं केली. त्यांना हत्यारे, दारूगोळा व मनुष्यबळ याची अतिशय जरूरी होती. त्यानीं फ्रान्सबरोबर गुप्त तह करून टाकल्यामुळें सिरीयाच्या सरहद्दीवरील ८० हजार लोकांची मदत व ४० हजार सैनिकांना पुरेल इतकी युद्धसामुग्री मिळाली.

याखेरीज कमालपाशानीं रशियाकडून कर्ज काढून इटली व अमेरिकेपासून आणखी जास्त शस्त्रास्त्रें खरेदी केली.

कमालपाशांनीं सन १९२२ सालच्या उन्हाळ्यांत ग्रीक सैन्यावर हल्ला करण्याचा बेत कायम केला; पण याची गंधवार्ताही कुणाला लागूं नये अशी त्यांनीं सक्त खबरदारी घेतली, इतकेंच नव्हे तर रणांगणावर असणाऱ्या सैन्याधिकाऱ्यांना देखील या गोष्टीचा थांगपत्ता लागूं दिला नाहीं. सैन्याधिकाऱ्यांशी बोलणें करावयास गेलों तर शंका येईल म्हणून त्यांनीं सैनिकांचा एक फुटबॉलचा सामना करण्याची आज्ञा दिली. फुटबॉलचा खेळ पाहण्याकरितां म्हणून कमालपाशा अंगोराहून मुद्दाम त्या ठिकाणीं आले होते. सामना पाहण्यास सर्व लष्करी अमलदार उपस्थित होते. त्यांना लढाईच्या समक्ष आज्ञा देऊन, कुणालाही संशय येऊन देतां ते अंगोरास परत फिरले.

हल्ला करण्यापूर्वीं बरोबर एक आठवडा कमालपाशांनीं तुर्कस्थानचे बाहेरील जगाशीं असलेलें सर्व दळणवळण तोडून टाकलें. त्यांनीं २६ तारखेला म्हणजे हल्ला करण्याच्या दिवशीं एक मोठी मेजवानी देण्याचें जाहीर केले व मेजवानीची आमंत्रणें २४ तारखेसच सगळीकडे पाठवून दिलीं. आपण फार कामांत आहोंत तेव्हां आपल्या निवासस्थानाच्या आसपास दोन दिवस कुणालाही फिरकूं

द्यावयाचे नाहीं असा कमालपाशांनीं पहारेकऱ्यांना सक्त हुकूम दिला. मध्यरात्रीं कुणालाही चाहूल लागूं न देतां कमालपाशा आपल्या स्टाफसह रणांगणाकडे निघाले. ठरल्याप्रमाणें २६ तारखेला पहाटे ४ वाजतां तुर्की सैन्यानें ग्रीक सैन्यावर एकदम हल्ला चढविला. आपल्यावर हल्ला होणार याची ग्रीक लष्करी अधिकाऱ्यांना कल्पना देखील नव्हती. आज कमालपाशांची बडी मेजवानी असल्यामुळें काळजी करण्याचें कारण नाहीं या विचारानें ग्रीक अधिकारी स्वस्थ झोंपी गेले होते. अकस्मात हल्ला झाल्यामुळे ग्रीक सैन्य गोंधळून गेले. संध्याकाळपर्यंत तुर्कांनीं ग्रीकांचा धुव्वा उडविला. ग्रीक सैन्य सैरावैरा धावूं लागले व सैन्याधिकारी आपला जीव वाचविण्याच्या प्रयत्नास लागले. तारांची कुंपणें, बंदुकी, तोफा, दारूगोळा, कपडे, तंबू सर्व टाकून देऊन ग्रीक सैन्य वाट फुटेल तिकडे पळून जाऊं लागले. तुर्की घोडेस्वारांनीं त्यांचा पाठलाग सुरू केला. जातां जातां ग्रीक सैनिकांनीं निर्दयपणें तुर्की म्हाताऱ्याकोताऱ्यांची, लहान लहान मुलांची व स्त्रियांची कत्तल करण्यास सुरवात केली. पाठलाग करणाऱ्या तुर्की घोडेस्वारांनींही त्या ग्रीक सैनिकांस कंठस्नान घालून पुरेपूर सूड उगविला. ग्रीक सैनिकांनीं दहा दिवसाच्या आंत १९० मैल मागें पळत जाऊन समुद्र गांठला व त्या ठिकाणीं नांगरलेल्या आपल्या बोटींत बसून ते पसार झाले. समुद्राच्या

किनाऱ्यावर तुर्की सैन्य पराभूत होऊन परत चाललेल्या ग्रीक सैन्याकडे विजयी मुद्रेनें पहात होते. त्यांच्या समोर पसरलेला समुद्र, तुर्की सैन्यास विजय मिळाल्यामुळें, आनंदानें उसळत होता.

कमालपाशांच्या अतुल विजयाची बातमी सर्व जगभर विद्युत्वेगानें पसरली. कमालपाशांनीं आपल्या मूठभर सैन्याच्या साहाय्यानें बलाढ्य ग्रीक सैन्यास धूळ चारली याबद्दल जगाच्या कानाकोपऱ्यांतून धन्योद्गार निघूं लागले. परचक्रापासून आपल्या राष्ट्रास वांचविल्याबद्दल त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव होऊं लागला. आपल्या अभूतपूर्व पराक्रमानें कमालपाशांनीं आपलें नांव जगाच्या इतिहासांत चिरंजीव केलें असे धन्योद्गार सर्वत्र निघूं लागले.

कमालपाशा विश्रांतीकरितां उशाक येथें थांबल्यावर, ग्रीकांचा कमांडर--इन--चीफ जनरल ट्रीकोपीस याला त्याच्या दुय्यम सेनापतीसह पकडल्याची बातमी आली. कमालपाशांनीं त्यांना आपल्यासमोर हजर करण्याचा हुकूम केला. त्यांना समोर घेऊन आल्याबरोबर कमालपाशांनीं उत्थापन देऊन त्यांच्याशीं हस्तांदोलन केलें आणि त्यांना मोठ्या आदरानें कॉफी व सिगारेट दिल्या. याच अधिकाऱ्यांनीं तुर्की शहरांची जाळपोळ करण्यास व तुर्की लोकांची कत्तल उडविण्याचा हुकूम दिला होता.

त्यांच्या कृत्याची त्यांना आठवणही करूं न देतां कमालपाशा म्हणाले, " ते अधिकारी आहेत, माझे लष्करी प्रतिस्पर्धी आहेत. त्यांना मला आदरानें वागविलेच पाहिजे " नंतर त्यांना जावयास कमालपाशांनीं परवानगी दिली. जातांना कमालपाशा त्यांना म्हणाले, " किती झालें तरी युद्ध हा दैवाचा खेळ (Game of chance) आहे. तुम्हीं आपल्याकडून शिकस्त केलीत. तुमचा पराभव झाला हा तुमच्या नशिबाचा दोष आहे; त्याबद्दल वाईट वाटूं देऊं नका "

कमालपाशानीं आपल्या कट्टया दुष्मानांची मोठ्या इतमामानें रवानगी केली व आपण स्मर्नाकडे कूच केले. कमालपाशा स्मर्नास येणार म्हणून त्यांच्या स्वागताची प्रचंड तयारी झाली होती. लोकांनीं त्यांची फुलांनीं मढविलेल्या मोटारींतून मोठ्या थाटाची मिरवणूक काढली. मिरवणूक पाहण्याकरितां लोकांची दुतर्फा प्रचंड गर्दी झाली होती कमालपाशांचे, त्यांच्या स्वातंत्र्यवीराचें दर्शन घेण्याकरितां लोकांचा नुसता तोबा उडाला होता. त्यांना पाहिल्या बरोबर लोकांनीं कानठळ्या बसेपर्यंत जयघोष केला; परमेश्वरानें त्यांना चिरायू करावे म्हणून करुणा भाकली. त्यांची गाडी जमावामधून जात असतां, त्यांच्यावर फुलें उधळलीं जात होती. मिरवणूक संपल्यानंतर कमालपाशा आपल्या निवासस्थानीं गेले.

प्रकरण २१ वें

—xx—

## प्रेमपाशांत

आपल्या निवासस्थानीं कमालपाशा कामांत गर्क झाले असतां, पहारेकऱ्यांनीं एक स्त्री भेटावयास आल्याची त्यांना वर्दी दिली. पहारेकऱ्यांची पाठ फिरते न फिरते तोंच ती स्त्री कमालपाशा समोर दाखल देखील झाली. परवानगीशिवाय आपल्या खोलींत प्रवेश केल्याबद्दल कमालपाशांना राग आला; पण त्या सौजन्यपूर्ण स्त्रीकडे पाहिल्याबरोबर तो राग कोठच्याकोठें गेला. कमालपाशांनीं त्या स्त्रीस बसावयास सांगितले व नखशिखांत त्या स्त्रीस न्याहाळून पाहिले. त्या स्त्रीनें पाश्चात्य पद्धतीचा वेष परिधान केला होता; नाहीं म्हणावयास तिनें आपल्या डोक्यावरून तुर्की पद्धतीचे वस्त्र घेतले होते. अत्यंत आकर्षक चेहरा, काळेभोर डोळे, सतेज कांति यामुळें ती स्त्री अतिशय मोहक दिसत होती. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा करारीपणा दिसत होता. तिनें न डगमगतां

कमालपाशांच्या नजरेशी आपली नजर भिडविली. इतक्या धीटपणें वागणाऱ्या त्या सुंदर तुर्की स्त्रीबद्दल कमालपाशांना एक प्रकारचें कौतुक वाटले. कमालपाशांनीं त्या स्त्रीची आपुलकीनें चौकशी केली.

ती सुंदर स्त्री एका धनाढ्य तुर्काची एकुलती एक मुलगी होती. तिचा बाप अनेक जहाजांचा मालक होता. स्मर्नाच्या एका बाजूस असलेल्या टेकडीवर तिचा प्रासादतुल्य महाल होता. ती नुकतीच पॅरिसहून तुर्कस्थानास परत आली होती. कमालपाशांची कीर्ति अगोदरच तिच्या कानावर गेली होती. आपल्या राष्ट्रास स्वतंत्र करणाऱ्या स्वातंत्र्यवीरास आपल्या घरीं पाहुणा म्हणून बोलावून, त्याचा सत्कार करावा या उद्देशानेंच ती कमालपाशांकडे आली होती. तिनें अत्यंत नम्रपणें आपल्या घरीं राहावयाचें आमंत्रण कमालपाशांना दिलें.

सस्मितपणें कमालपाशांनीं तें आमंत्रण स्वीकारलें व त्याच दिवशीं त्या स्त्रीच्या घरीं ते पाहुणा म्हणून राहावयास गेले. जवळ जवळ वर्षभर त्यांना विश्रांती म्हणून कशी ती नव्हती. त्याठिकाणीं त्यांना फार आराम वाटला. शिवाय तो प्रासाद शहरापासून दूर असल्यामुळें, त्याठिकाणीं गडबड किंवा गलबला अजिबात नव्हता. त्या प्रासादाच्या गच्चीवरून स्मर्ना शहर

व त्याला लागून असलेला समुद्र याची शोभा अवर्णनीय दिसत असे.

त्या तरुण मुलीनें कमालपाशांची चांगली बडदास्त ठेविली; त्यांना कुठल्याही गोष्टीचें न्यून वाटूं दिलें नाहीं. आरामशीर प्रासाद, आल्हादकारक हवा, रुचकर पक्वान्नें आणि त्या सुंदर मुलीचें सानिध्य यामुळें कमालपाशांचें दिवस अत्यंत आनंदांत व उल्हासांत जाऊं लागले. ती मुलगी सदैव आपल्या सानिध्यांत असावी असें त्यांना वाटूं लागलें. ती क्षणभर बाजूला गेली तर ते उदास बनत असत. एकदोन दिवसांतच त्या मुलीनें कमालपाशांचें अंत:करण काबीज करून टाकलें. आतांपर्यंत कमालपाशांच्या अंत:करणावर कुणीही पगडा बसविला नव्हता— नव्हे बसवावयाचे धाडस केलें नव्हते. पण त्या हुषार मुलीनें त्या पराक्रमी पुरुषास आपलेसे करून टाकले. कमालपाशांच्या अंत:करणांत प्रेमाचा प्रादुर्भाव झाला. आतांपर्यंत त्यांचे सबंध आयुष्य राष्ट्रसेवेंत गेले होते. त्यांना प्रेम करावयास फुरसतच होती कुठं मुळीं ? पण आज ते प्रेमपाशांत सांपडले. जिच्या प्रेमपाशांत कमालपाशा बद्ध झाले त्या भाग्यशाली स्त्रीचें नांव लतीफा खानम.

रात्रीच्या प्रशांतवेळीं जेवण करून कमालपाशा लतीफा खानमसह गच्चीवर उभे होते. गार वारा वहात होता. त्या

वाऱ्याच्या झोताबरोबर समोरील बागेंतील गुलाबाचा सुगंध सगळीकडे दरवळत होता. कमालपाशांनीं लतीफा खानमना प्रेमभरानें झटदिशीं आपल्या जवळ ओढून घेतले. लतीफा खानम चटकन बाजूला झाल्या व म्हणाल्या, "माझे तुमच्यावर प्रेम आहे; पण लग्न झाल्याखेरीज मी तुमच्याजवळ येऊं शकत नाहीं याबद्दल क्षमा करा."

"काय लग्न? पण तुर्कस्थानाचें कार्य परिपूर्ण झाल्याखेरीज मी लग्न करणार नाहीं अशी शपथ घेतली आहे."

"मी ही पण शपथ घेतली आहे कीं लग्न झाल्याखेरीज माझ्या अंगाला कुणालाही स्पर्श करूं देणार नाहीं"

लतीफा खानमच्या चेहऱ्यावर करारीपणा स्पष्टपणें उमटला होता. कमालपाशा तिच्याकडे अनिमिष लोचनांनीं पहात राहिले. ती बाजूला सरकली याबद्दल क्षणभर कमालपाशांना राग आला; पण तिचा करारीपणा व तत्वनिष्ठा पाहून, त्यांच्या मनांत एक प्रकारचा आदर उत्पन्न झाला. त्यांनीं पुन्हा एकवार प्रेमभरानें लतीफा खानमकडे पाहिले व आपल्या खोलीचा रस्ता सुधारला.

दुसरे दिवशीं ते आपल्या लष्करी ठाण्याकडे परतले. जवळ जवळ महिनाभर ते आपल्या कामांत गढून गेले होते. काम संपल्या-नंतर, ते मोटारींतून निघाले ते तडक स्मर्नामध्यें लतीफा खानमच्या घरीं पोहोंचले. लतीफा वरच्या मजल्यावर आहे असे कळतांच ते धांवतच जिना चढून वर गेले. कमालपाशांना पाहिल्या बरोबर लतीफा खानमनीं स्मित हास्य केले.

" लतीफा, तुझी इच्छा मला मान्य केलीच पाहिजे. मी लग्न करावयास तयार आहे. आत्तां; या घटकेला; क्षणाचाही विलंब न लावतां."

लतीफा गोंधळून गेल्या; लाजल्या. त्यांना काय उत्तर द्यावे तेंच कळेना. शेवटीं त्या कशाबशा म्हणाल्या, " इतकी काय गडबड आहे; उद्यां सकाळीं." सकाळपर्यंत दम धरणें कमालपाशांच्या जिवावर आले. शेवटीं कसेबसे ते तयार झाले. सकाळीं उठल्याबरोबर कमालपाशांनीं रस्त्यांतच एका मुल्लाला अडविले. तो बिचारा मशिदींतील प्रार्थना आटोपून आपल्या घरीं जात होता. कमालपाशांचे व लतीफा खानमचे लग्न लावल्यानंतर त्या मुल्लाची सुटका झाली. कांहींही अनावश्यक विधी न करतां किंवा कुणासही आमंत्रण न देतां कमालपाशांनीं आपलें लग्न आटोपून घेतलें.

कमालपाशांचे लग्न झालें याची शहरांत बातमी देखील नव्हती. ज्यावेळीं संध्याकाळीं ते लतीफा खानमसह गाडीतून शहरांत फिरावयास निघाले त्यावेळीं लोकांनी ओळखिले कीं कमालपाशा चतुर्भूज झाले. हां हां म्हणतां ही बातमी शहरभर पसरली. आपल्या स्वातंत्र्यवीराचा विवाह झाला याबद्दल शहरांतील लोकांनीं त्यादिवशीं आनंदोत्सव केला.

## प्रकरण २१ वें

—××—

# प्रशंसनीय तारतम्य

युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांच्या आक्रमणापासून आपल्या लहानशा राष्ट्रास वांचविल्याबद्दल, कमालपाशांचा जयघोष अद्यापही चालला होता. जगांतील प्रत्येक राष्ट्राच्या मुखपत्रांनीं कमालपाशांची मुक्तकंठानें स्तुति चालविली होती. आफ्रिका, मलाया स्टेटस्, रशिया, अफगाणिस्थान, पर्शिया, चीन, इतकेंच नव्हे तर, हंगेरीसारख्या ख्रिश्चन राष्ट्रांकडून कमालपाशांना मानाच्या तलवारी नजर करण्यांत आल्या; मानपत्रें देण्यांत आलीं. कित्येक वर्षांत कुणाचाही जयजयकार झाला नसेल इतका जयजयकार कमालपाशांचा सर्व जगभर झाला. गुलाम राष्ट्रें कमालपाशांकडे आशाळभूत नजरेनें पाहूं लागलीं; ज्यांना साम्राज्यशाहीबद्दल तिटकारा वाटत होता ते लोक कमालपाशांकडे आपला पुरस्कर्ता निर्माण झाला अशा भावनेनें बघूं लागले. अखिल युरोपांमधील गोऱ्या राष्ट्रांना

सणसणीत थप्पड देऊन त्यांचा नक्षा उतरविणारा हा मुसलमान नरवीर आपला आदर्श आहे असें गोऱ्या राष्ट्रांच्या टांचेखालीं जीवित कंठणाऱ्या गुलाम नागरिकांना वाटूं लागलें. आतांपर्यंत पाश्चात्यांनीं आपल्यावर कुरघोडी केली; आतां त्यांच्यावर आम्ही मात करूं अशा आशेनें आशियाखंडांतील राष्ट्रांकडून, युरोपियन राष्ट्रांविरुद्ध कमालपाशांनीं आपलें पुढारीपण स्वीकारावें, अशी इच्छा प्रदर्शित करण्यांत आली.

पण या प्रशंसेनें, अभिनंदनाने किंवा मोठेपणानें कमालपाशांनीं आपल्या मनाचा तोल जावूं दिला नाहीं. त्यांनीं आपलें डोकें स्थिर ठेविलें. बेफाट कल्पनांनीं हुरळून न जातां, त्यांनीं शांत चित्तानें आपलें ध्येय, आपलें कार्य ठरविलें. साम्राज्य स्थापण्याच्या किंवा पाश्चात राष्ट्रांविरुद्ध पौर्वात्य राष्ट्रांचें पुढारीपण स्वीकारण्याच्या कल्पना त्यांना अव्यवहार्य व कुचकामाच्या वाटूं लागल्या. जगांतील सर्व मुसलमानांचें नेतृत्व स्वीकारण्याचें विचारही त्यांना अप्रबुद्धपणाचे वाटूं लागले. एका प्रसंगीं त्यांनीं स्पष्टपणें सांगितले कीं, "जगांतील माझ्या सर्व मुसलमान बंधूंनीं स्वतंत्र राहावे अशी माझी इच्छा आहे. एवढी सदिच्छा प्रदर्शित करण्याखेरीज आपण त्यांना कांहींही मदत करूं शकत नाहीं." आपल्या राष्ट्राकडे संपूर्ण दुर्लक्ष करून, इतर राष्ट्रांतील मुसलमानांच्या

उद्धाराकरितां किंवा स्वातंत्र्याकरितां आपलें सर्व लक्ष, सर्व शक्ति केंद्रीभूत करणें त्यांना अप्रयोजकपणाचें वाटलें. मुसलमान राष्ट्रांनीं दुसऱ्या राष्ट्राच्या मदतीची अपेक्षा न करतां, स्वतःच्या हिंमतीवर व सामर्थ्यावर तुर्कस्थानाप्रमाणें स्वातंत्र्य मिळवावें अशीच कमालपाशांची इच्छा होती. बाहेरून मदतीची अपेक्षा करीत बसण्यापेक्षां आपणच स्वावलंबी होऊन आपला मातृदेश, आपलें राष्ट्र, मुसलमानानीं स्वतंत्र व स्वयंशासित करावें हीच कमालपाशांची शिकवण होती. 'माझ्या मदतीची अपेक्षा करण्यापेक्षां तुम्ही स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शिका,' असाच कमालपाशांचा सर्व मुसलमानी राष्ट्रांना संदेश होता. जगाच्या भानगडी किंवा उचापती न करतां, प्रत्येकानें प्रथम आपआपल्या राष्ट्राचा उद्धार करण्याचे व्रत स्वीकारावें, हें कमालपाशानीं आपल्या उदाहरणानें शिकविलें.

आणि आपले हे विचार त्यांनीं ग्रँड नॅशनल असेंब्लीपुढें स्पष्टपणें मांडले. ते म्हणाले, " सर्व मुसलमान राष्ट्रांचा एक संघ बनवावा, या गोष्टीवर माझा विश्वास नाहीं. प्रत्येकानें आपलें राष्ट्र सुसंघटीत व बलवान करण्याचा प्रयत्न करावा. राष्ट्र म्हणून आपणाला आपल्या सरहद्दींत अभिमानानें कसें जगतां येईल एवढा एकच विचार आपल्या डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे. आपण

आपल्या राष्ट्राचें जें ध्येय ठरवूं त्यावर विकाराची किंवा मनोराज्याची पडछाया पडतां कामा नये. अशा निष्फळ मनोराज्यापासून आपण दूर रहा. अशा मनोराज्यापायीं आपणांस आतापर्यंत जबर किंमत द्यावी लागली आहे."

बोल्शेविक लोकांनाही त्यांनीं असेंच उत्तर दिलें. मास्कोहून जनरल फ्रन्झ यांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळ कमालपाशांकडे आले होते. मेजवानीच्या प्रसंगीं त्या शिष्टमंडळाच्या नेत्यानें कमालपाशांना विनंती केली, "ज्या राष्ट्रांवर व नागरिकांवर जुलूम होत आहे, त्या जुलूमापासून त्यांना मुक्त करण्याचें ध्येय बोल्शेविक रशियानें पत्करलें आहे. तरी या पुण्यकार्यांत तुर्कस्थानानें सहभागी व्हावें" कमालपाशानीं उत्तर दिलें, "जुलमी किंवा जुलमानें गांजलेले असें कोणी या जगांत नाहींत. पण आपल्यावर जुलूम करण्यास परवानगी देणारे लोक मात्र आहेत. या शेवटच्या कोटींमधील तुर्क लोक नाहींत. आपली काळजी कशी घ्यावी हें त्यांना पूर्णपणें माहीत आहे. बाकीच्यानींहि आपआपली काळजी घ्यावी म्हणजे जुलूम करणाराचा व करून घेणारांचा प्रश्नच उरणार नाहीं."

त्याचप्रमाणें तुर्कस्थानानें पाश्चात्य राष्ट्रांविरुद्ध पौर्वात्य राष्ट्रांचें पुढारीपण पत्करावें किंवा इस्लामी राष्ट्रांचें नेतृत्व स्वीकारून

ख्रिश्चन राष्ट्रांविरुद्ध चढाई करावी किंवा गुलाम राष्ट्रांचे नेते बनून त्यांच्यावर प्रभुत्व गाजविणाऱ्या राष्ट्रांशी झगडा चालवावा, अशा रम्य पण आचरण्यास कठीण कल्पनांच्या आहारीं कमालपाशा कधींच गेले नाहींत. आकाशाला गवसणी घालण्याचे विचार किंवा केवळ मोठेपणा मिळविण्याकरितां घोषित केलेलें अशक्य ध्येय यांच्या मागें लागून आपल्या स्वीकृत कार्याकडे दुर्लक्ष करण्याचें पाप कमालपाशांनीं कधींहि केलें नाहीं. त्यांचे प्रशंसनीय तारतम्य मी मी म्हणणाऱ्या मुत्सद्यांना देखील चकित करून सोडणारे आहे असा निर्वाळा प्रत्येक बुद्धिवादी माणसास द्यावा लागेल.

## प्रकरण २३ वें

—xx—

# राजकारण व धर्म यांची फारकत

**क**मालपाशांचा या पुढील जीवन वृत्तांत पाहिला म्हणजे आयुष्यभर झगडा करणें हेंच त्यांचें ध्येय असलें पाहिजे हें उघड दिसतें आणि तें त्यांनीं आपल्या एका स्नेह्याजवळ बोलूनही पण दाखविलें. तो स्नेही म्हणाला, " तुम्हीं ग्रीक लोकांचा पराभव केलात. इंग्लीश, इटालीयन व फ्रेंच राष्ट्रांवर मात केलीत. तुम्हीं आतांपर्यंत झगडतच आलांत; यापुढें तुम्हांला विश्रांती घ्यावयास हरकत नाहीं. "

" विश्रांती ! कसली विश्रांती ! ग्रीक लोकांबरोबर झगडा संपला म्हणून आपला कार्यभाग संपला असें समजूं नका. आतां मला स्वजनांबरोबर झगडावे लागेल, येथील राजवटी विरुद्ध झगडावे लागेल, माझ्या राष्ट्रांतील लोकांच्या भावना निःसत्व करून टाकणाऱ्या सामाजिक चालिरिती विरुद्ध झगडावे लागेल ! माझें

राष्ट्र, माझा देश सत्वशील, बलवान व सुखी होईपर्यंत मला झगडावे लागेल. अन्यायाविरुद्ध, असत्याविरुद्ध आयुष्यभर झगडा करीत राहणें हेंच माझ्या आयुष्याचें ध्येय आहे. "

परकीयांचे उच्चाटण केल्यानंतर कमालपाशांनीं सध्यांच्या राज्यपद्धती विरुद्ध झगडा करण्याचें ठरविलें. अंगोरामध्यें नॅशनल ग्रँड असेंब्लीच्या हातीं खरी राज्यसत्ता होती; पण कॉन्स्टँटिनोपलमध्यें नांवाला कां होईना सुलतान व त्यांची प्रभावळ होतीच. तुर्कस्थानामधील सर्वसाधारण जनता जुन्या विचाराची असल्यामुळें सुलतानांना तुर्कस्थानचा राजा म्हणून समजावे व कमालपाशांनीं त्यांचा मुख्य प्रधान म्हणून राहावे अशी तिची इच्छा होती. पण कमालपाशांची, एका सत्ताधारी राजाचा मुख्य प्रधान होण्याची इच्छा नव्हती. त्यांच्या कल्पना पुरोगामी व क्रांतिकारक होत्या. सुलतानशाही उखडून टाकून लोकशाही प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छा, नव्हे महत्वाकांक्षा होती. पण हे शक्य कसे व्हावे ? जनता इतक्या पुढारलेल्या विचाराची नसल्यामुळें तिच्या प्रकृतीला लोकसत्ताक राज्याची कल्पना कितपत मानवेल याची कमालपाशांना शंका होती; म्हणून कमालपाशांनीं या प्रकरणांत धीरे धीरे हात घालण्याचें योजिलें.

कांहीं दिवसांनीं लॉसेन येथें तहाची भाषा करण्यांकरितां एक शिष्टमंडळ पाठविण्याचें आमंत्रण, दोस्तराष्ट्रांनीं सुल्तानांना दिले व तेंच आमंत्रण नॅशनल ग्रँड असेंब्लीला पोहोंचविण्यास सुलतानांस फर्माविलें. सदर आमंत्रण पत्करल्याबद्दल तुर्कीजनता सुलतानांवर खळबळून गेली. दोस्तराष्ट्रांबरोबर संगनमत करून करून सुलतानानीं राष्ट्राचा घात करण्याचें योजिलें आहे असा गवगवा सगळीकडे झाला. सुलतानांचा पाठपुरावा करणारे जे लोक होते त्यांना बदडून काढण्याचा उपक्रम तरूण तुर्कांनीं सुरूं केला. सुलतानांनीं आमंत्रण स्विकारलें तेंच बरोबर केलें असा आक्रोश करणाऱ्या अली कमाल नांवाच्या पत्रपंडिताला दिवसाढवळ्या दगडांनीं ठेंचून ठार मारण्यांत आलें. सुलतानांच्या नोकरांना, मंत्र्यांना किंवा सेक्रेटरींना बाहेर उजळ माथ्यानें हिंडण्याची चोरी होऊन बसली.

अंगोरामध्यें असेंब्लीची बैठक सुरूं झाली. असेंब्लीच्या सभासदांचेंही पित्त खवळले होते. प्रत्येक सभासदाच्या तोंडून निषेधाचे उद्गार बाहेर पडूं लागले. ' कॉन्स्टँटिनोपलमध्यें असणारे नामधारी सरकार किती किंमतीचे आहे हें आम्हीं पूर्णपणें ओळखतो ! तुर्कस्थानाला वांचविण्याकरितां तुर्कस्थानाचे

बादशहा म्हणविणाऱ्या सुलतानानीं किंवा त्यांच्या मंत्रीमंडळानें काय परिश्रम केले आहेत? तुर्कस्थानातर्फे आमंत्रण स्वीकारावयाचा या सुलतानांस काय हक्क आहे? सुलतानांचे मंत्रीमंडळ म्हणजे अव्वलदर्जाचे देशद्रोही लोक आहेत. तुर्कस्थानमध्यें राज्य करणारे एकच खरें सरकार आहे आणि ते म्हणजे ग्रँड नॅशनल असेंब्ली होय.'

> "आपल्या राष्ट्रास परकीयांना विकणारा देशद्रोही म्हणून सुलतानांचा प्रत्येकजण तिरस्कार करूं लागला "×

कमालपाशांना चांगली सुसंधी मिळाली. सुलतानांना पदच्युत करावयाचा त्यांना सुंदर मोका मिळाला. असेंब्लीमधील वातावरण सुलतानांविरुद्ध अगोदरच गरम झालें होतें. अशावेळीं कमालपाशांनी सुलतानपद व खिलाफत निरनिराळीं करून या सुलतानांना बडतर्फ करावे असें सुचविलें. लगेच तो प्रश्न खास कायदा कमेटीकडे शिफारशीकरितां पाठविण्यांत आला.

---

× "Glimpses of World History" by Jawaharlal Neharu. Page 705

या महत्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां कायदा कमेटीची बैठक भरली. या कमेटींत कायदेपंडित व धर्मपंडित यांचा समावेश करण्यांत आला होता. या कमेटीचे अध्यक्षस्थान एका जाड्या धर्मपंडितांना देण्यांत आले होते. कमेटीमध्यें खूप जोराचा व कडाक्याचा वादविवाद सुरूं झाला. एका बाजूला कायदेपंडित व दुसऱ्या बाजूला धर्मपंडीत यामध्यें खडाजंगी सुरूं झाली. धर्मग्रंथांतील उतारे, जुन्या कागदपत्रांतील दाखले, बगदाद व कैरो येथील जुना इतिहास या सर्वांचा समाचार घेण्यांत येत होता. वाक्यांचा व शब्दांचा कीस निघूं लागला. कमालपाशा हा सर्व प्रकार पहात एका कोपऱ्यांत बसले होते. शेवटीं मुख्य प्रश्नाची वासलात होण्याचीं चिन्हें दिसेनात. कमालपाशा ताडकन उभे राहिले व म्हणाले, ' सद्गृहस्थहो, सुलतानपद व खिलापत यांची फारकत करण्याच्या प्रश्नावर जो तुमचा वादविवाद चालला आहे, त्यावरून हा प्रश्न तुमच्या हातून समाधानकारक सुटेल असें वाटत नाहीं. तुम्हीं आतापर्यंतची परिस्थती नीट लक्ष्यांत आणा. सुलतांनानीं जी सर्व सत्ता लोकांच्या हातून जबरदस्तीनें छिनावून घेतली होती, ती सत्ता लोकांनीं पुन्हां आपल्या सामर्थ्यावर परत मिळविली आहे. ती सत्ता पुन्हा सुलतांनास बहाल करण्याचे कांहींच कारण नाहीं. सत्ता असलेलें सुलतानपद हे खिलापतीपासून अलग झालेच

पाहिजे. तुम्ही यावर सहमत व्हा अगर न व्हा. जें घडावयाचें असेल तेंच घडेल; मात्र तुमच्यापैकीं कांहींचीं डोकीं मात्र उडविलीं जातील हें लक्ष्यांत ठेवा. "

कमालपाशांची दमदाटी ऐकतांच सर्व सभासद गांगरून गेले; विशेषतः धर्मपंडितांना तर दरदरून घाम सुटला. त्यांनीं पुन्हां वादविवादास सुरवात केली. शेवटीं सुलतानपद हें खिलाफतीपासून अलग झालेंच पाहिजे असा सर्वांनीं एकमतानें निर्णय दिला. दुसरे दिवशीं सुलतानपद व खिलाफत एकमेकांपासून अलग करण्याचा कमालपाशांचा ठराव कायदा कमेटीच्या निर्णयासह असेंब्लीमध्यें मतास घालण्यांत आला. असेंब्लीच्या अध्यक्षांनीं 'असेंब्लीनें एकमतानें सुलतानपद नष्ट करण्याचें ठरविलें, असें जाहीर केलें.

असेंब्लीचा निकाल जाहीर झाल्यावरोबर पांच दिवसांनीं रफेतपाशांनीं कॉन्स्टँटिनोपलचा कबजा घेतला आणि सुलतानांची गादी नष्ट केल्याची द्वाही फिरविली. कॉन्स्टँटिनोपलमध्यें थोडेसे इंग्लीश सैन्य होते. पण त्या सैन्यानें रफेतपाशास हरकत घेतली नाहीं किंवा सुलतानांस आपल्या पाठीशीं घातले नाहीं. यावेळीं सबंध राष्ट्र असेंब्लीच्या बाजूला होते. असेंब्लीचा निकाल हा राष्ट्राचा निकाल होता; तेव्हां त्या निकालामध्यें ढवळाढवळ न करणें हेंच शहाणपणाचे आहे, असें इंग्लीश सैन्याधिकारी कर्नल हॅरिंग्टन यानीं ठरविलें.

थोड्याच दिवसांनीं सुलतानांनीं आपला एक विश्वासू मनुष्य कर्नेल हॅरिंग्टनकडे पाठविला. तो विश्वासू मनुष्य अत्यंत गुप्तपणें इंग्लीश सैन्याच्या छावणींत आला व त्यानें कर्नेल हॅरिंग्टनची मुलाखत घेतली. आपला जीव धोक्यांत असून इंग्रजसरकारचें आपणांस संरक्षण मिळावें अशी सुलतानांनीं विनंती केली आहे, असें त्यानें कर्नेल हॅरिंग्टनला सांगितलें.

दोन दिवसांनीं पहांटेच्या वेळीं एक मोटारगाडी राजवाड्याच्या मागील दरवाज्यापाशीं उभी राहिली. सुलतान वहीदुद्दीन आपल्या मुलासह राजवाड्याबाहेर आले. त्यांच्याबरोबर एक नोकर असून त्या नोकराच्या हातांत एक थैली होती. त्या मोटारींत सुलतान, त्यांचा मुलगा व तो नोकर बसल्याबरोबर मोटार भरधांव निघाली. ती मोटार समुद्र किनाऱ्याजवळ जाऊन थांबली व एका लहानशा मोटारबोटीमधून सुलतान व त्यांच्या परिवारास इंग्रजांच्या लढाऊ बोटीवर नेण्यांत आले. एका तासानंतर लढाऊ बोट हालली व सुलतानांनीं तुर्कस्थानचा कायमचा निरोप घेतला.

त्यांचे पुतणे अबदुलमजीद यांना खलीफा करण्यांत आले; पण या नव्या खलीफाना अधिकार किंवा सत्ता अशी कांहींच नव्हती.

## प्रकरण २४ वें

—xx—

# लॉसेन परिषद्

कमालपाशांचा सुलतानपद नष्ट करण्याचा बेत सिद्धीस गेला; पण तो किती प्रयासानें, किती मुष्कीलीनें ! यापेक्षांही महत्वाचे बेत कमालपाशांना पार पाडावयाचे होते. तुर्की जनता पुराणमतवादी असल्याकारणानें कमालपाशांच्या प्रत्येक कृतीस ती संमत्ती देईलच अशी खात्री नव्हती. तुर्कस्थानांत प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित करावयाचें कमालपाशांचें ध्येय होतें. जनता सोडून द्या; पण असेंब्लीचे सभासद देखील तितक्याशा पुढारलेल्या मताचे नव्हते. अशा परिस्थितींत प्रजासत्ताक राज्याचा ठराव असेंब्लींत आणला तर तो फेटाळला जाईल, अशी त्यांना खात्री वाटत होती.

कुठल्याही गोष्टीची संथपणें तयारी करीत राहणें व वेळ आल्याबरोबर ती गोष्ट पार पाडून दाखविणें हा कमालपाशांचा स्वभाव होता. आपल्या मनांत आले कीं परिस्थितीचा विचार न

करतां एकादी गोष्ट ताबडतोब अमलांत आणण्याचा मुर्खपणा त्यांनीं कधींही केला नाहीं किंवा लष्कर आपल्या ताब्यांत आहे म्हणून लष्करी जोरावर आपल्या कल्पना लोकांवर लादण्याचा आततताईपणाही त्यांनीं केला नाहीं. जनतेची, राष्ट्राची नाडी धरूनच कुठलेंही कार्य करून टाकावयाचा त्यांचा बाणा होता. ध्येयपूर्तींकरितां जनतेच्या साहाय्याची त्यांना अत्यंत अपेक्षा होती. जनतेची मनोभूमिका तयार करण्याकरितां त्यांनीं " पीपल्स पार्टी " या नांवाचा एक राजकीय पक्ष तयार केला. या पक्षाचे धुरीणत्व कमालपाशांनीं स्वतः स्वीकारलें. सर्व राष्ट्रभर या पक्षाचा फार जोराचा फैलाव झाला. शहरोशहरीं, खेडोपाडीं त्याच्या संस्था पसरल्या. प्रत्येक शहरामध्यें, प्रत्येक खेड्यामध्यें कमालपाशांनीं दौरा काढला व आपल्या राजकीय पक्षाची समक्ष तपासणी केली. ते ज्या ज्या ठिकाणीं जात, त्या त्या ठिकाणीं आपल्या पक्षाच्या लोकांस बोलावून आणीत व सांगत, " आपली मजबूत संघटना करा. आपला शत्रू जरी निघून गेला तरी अद्याप आपल्या राष्ट्राचे अंतस्थ शत्रू फार आहेत. त्या शत्रूंचा निःपात करून आपलें राष्ट्र सुखी करावयाचें आहे. प्रत्येक नव्या दमाच्या तरुण तुर्काला तुमच्या पक्षांत सामील करून घ्या. तुम्हीं आपल्या राष्ट्राचे नेते आहांत ही गोष्ट विसरूं नका."

मात्र कमालपाशांनीं आपण क्रांतिकारक योजना पार पाडणार आहोंत याचें दिग्दर्शन चुकून देखील केलें नाहीं. लोक अजाण व पुराण्या विचाराचे असल्यामुळें अशा कल्पनामुळें ते बिथरून जातील म्हणून त्यांचा उल्लेख करण्याचें कमालपाशांनीं शहाणपणानें टाळलें. सर्व अनुयायांनीं कमालपाशाशीं इमानी राहण्याच्या शपथा घेतल्या. शेवटीं दौरा संपल्यानंतर ते अंगोरास परत गेले.

लॉसेन येथें बोलाविलेल्या शांतता परिषदेंत भाग घेण्याकरितां दोस्त राष्ट्रांनीं ग्रँड नॅशनल असेंब्लीला स्वतंत्रपणें आमंत्रण दिल्यामुळें कमालपाशानीं तें आमंत्रण स्वीकारलें व त्या परिषदेंत तुर्कस्थानतर्फे भाग घेण्याकरितां त्यांनीं जनरल इस्मतपाशा यांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळ नेमलें.

नोव्हेंबर महिन्यांत शांतता परिषद सुरू झाली. परिषदेच्या सुरवातीस दोस्त राष्ट्रांच्या प्रतिनिधींशी तुर्की शिष्टमंडळाचा खटका उडाला. परिषदेच्या हॉलमध्यें तुर्की शिष्टमंडळासह इस्मतपाशा प्रवेश करतांच त्यांच्या स्वागतासाठीं कोणीच पुढें आले नाहींत. मुसोलिनी, पाइंकारे व लॉर्ड कर्झन हे बडे मुत्सद्दी हॉलमध्यें बसले होते; पण त्यापैकीं एकानेंहीं शिष्टाचाराची वागणूक दाखविली नाहीं. इस्मतपाशांनीं समोंवार पाहिलें तों तुर्की शिष्टमंडळाला

बसण्याकरितां बिनहाताच्या खुर्च्या ठेविलेल्या दिसल्या. इस्मतपाशांना ही गोष्ट अत्यंत अपमानास्पद वाटली. या अपमानाचा अर्थ एवढाच कीं फ्रान्स, इंग्लंड आणि इटली ही तीन दोस्तराष्ट्रें तुर्कस्थानाला आपल्या बरोबरीचें राष्ट्र समजावयास तयार नाहींत! इस्मतपाशांनी आपला राग आवरून धरला व आमच्या शिष्टमंडळाला हाताच्या खुर्च्या कां नाहीत असा रोकडा सवाल विचारला. 'अतिशय गडबडीनें व्यवस्था करावी लागल्यामुळें व वेळ थोडा असल्यामुळें सर्वच हाताच्या खुर्च्यां मिळूं शकल्या नाहींत, असें उत्तर देण्यांत आले.

" असें कां! मग आमच्याकरितां हाताच्या खुर्च्या आल्या-नंतरच आम्हीं येऊं, " असा जबाब देऊन इस्मतपाशा आपल्या शिष्टमंडळासह परत जावयास निघाले. तें दृश्य पाहून त्या तीन बड्या धेंडांची धांदल उडाली. कसेंही करून ही परिषद झालीच पाहिजे या विचाराने ते त्या ठिकाणीं जमले होते. एका क्षणांत, डोळ्याचें पातें लवते न लवते तोंच, हाताच्या खुर्च्या हॉलमध्यें आल्या. झालेल्या दिरंगाईबद्दल व गैरसोयीबद्दल इस्मतपाशांची क्षमा मागण्यांत आल्यावर, इस्मतपाशा व त्यांचे सहकारी आसनस्थ झाले व एकदांचे परिषदेचें कार्य सुरू झाले. " आपण सर्वजण समान आहोंत असें समजून परिषदेच्या कामास सुरवात होत

असेल तरच आपण वादविवादांत भाग घेऊं, " असें इस्मतपाशांनीं स्पष्टपणें बजावलें. सर्वांनीं संमत्ती दिल्यावर वादविवादास सुरवात झाली. परिषदेंत वातावरण गरम करणारे प्रसंग उपस्थित होऊं लागले; विशेषत: लॉर्ड कर्झन यांच्याशी तर इस्मतपाशांचे सारखे खटके उडूं लागले. शेवटीं असेच खटके उडत राहतील तर शांतता परिषदेचा बोजवारा उडेल व पुन्हां एकाद्या युद्धास तोंड लागेल या भीतीनें लॉर्ड कर्झन सोडून इतर मुत्सद्यांनीं नरमाईचें धोरण स्वीकारलें.

या परिषदेंत तुर्की शिष्टमंडळातर्फे इस्मत इनून यांनीं अतिशय मुत्सद्देगिरीनें व धीमेपणानें काम चालविलें. दोस्तराष्ट्रांची भीडभाड न राखतां किंवा त्यांच्या धमकावणीस न जुमानतां आपल्या राष्ट्राची बाजू त्यांनीं उत्कृष्टपणें मांडली. लॉर्ड कर्झन व इस्मतपाशा यामध्यें वादविवाद चालला असतां लॉर्ड कर्झन एकदम गरम झाले व इस्मतपाशांना म्हणाले, " तुम्हीं जर आमचे म्हणणें मान्य केले नाहीं तर मी निघून जाईन."

" आपण जरी निघून गेलांत तर त्याची जबाबदारी आपल्या शिरावरच राहील," इस्मतपाशा शांतपणें म्हणाले.

" आतां ८ वाजले आहेत. आणखी एका तासानें म्हणजे ९ वाजतां गाडी सुटते. तेव्हां आपणांस विचार करावयास एक

तासाचा अवधी आहे," इतकें बोलून लॉर्ड कर्झन झणकाऱ्यानें निघून गेले. इस्मतपाशाही उठले व आपल्या निवासस्थानीं गेले. ताबडतोब फ्रेंच शिष्टमंडळाचा त्यांच्या भोवतीं गराडा पडला. "कांहीं झालें तरी लॉर्ड कर्झन यांचें म्हणणें मान्य करणें हे सर्वांच्या हिताचे आहे. ही परिषद् यशस्वी झाली नाहीं तर पुन्हां दुसरें महायुद्ध दत्त म्हणून उभे राहील आणि त्या महायुद्धांत सर्वांची आहुति पडेल. ही परिषद् यशस्वी करणें सर्वस्वी आपल्या हातीं आहे. अद्याप गाडी सुटावयास वेळ आहे. तेवढ्यांत आपण आपला अनुकूल निर्णय द्याल तर पुन्हां परिषदेचे कार्य सुरू होईल," अशी विनवणी फ्रेंच मुत्सद्यांनीं केली; पण इस्मतपाशांच्या चेहऱ्यावर कांहींच फरक दिसेना. विनवणीचा कांहीं उपयोग होत नाहीं असे पाहून इस्मतपाशांची प्रशंसा करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला; पण तोही वायां गेला.

"माझ्या राष्ट्राच्या इज्जतीला धक्का लागेल असें एकही कृत्य मी करणार नाहीं" निश्चितपणें इस्मतपाशांनीं उत्तर दिलें. बिचारे फ्रेंच मुत्सद्दी निराश होऊन येरझाऱ्या घालूं लागले.

इकडे स्टेशनच्या प्लॅटफार्मवर लॉर्ड कर्झन साहेबांची स्वारी हातांत घड्याळ घेऊन उभी होती. गाडी सुटावयास १५ मिनिटें राहिलीं, १० मिनिटे राहिलीं, ५ मिनिटे राहिलीं तरी इस्मतपाशांचा पत्ता नाहीं. त्यांना वाटले कीं आपल्या धमकावणीला भिऊन हा

बुटका मुसलमान धांवत स्टेशनवर येईल. शेवटीं गाडीची वेळ झाली; इतकेंच नव्हे तर, गाडी अर्धा तास स्टेशनवर मुद्दाम थांबविण्यांत आली. शेवटीं लॉर्ड कर्झनसाहेबांनीं संतापानें सुस्कारा सोडला व डब्यांत पाय टाकला. गाडी हलली व थोड्याच वेळांत अंधःकारांत नाहींशी झाली.

झालें! परिषदेचा बोजवारा उडाला व सर्व प्रतिनिधी आपआपल्या राष्ट्रांत निघून गेले. दुसरे दिवशीं "संकटाची पडछाया!" " पुन्हां युद्ध सुरू होणार काय?" " मानवता पुन्हां धोक्यांत!" "अखिल जग युद्धाच्या वणव्यांत!" असे मोठमोठे व भडक मथाळे युरोपमधील प्रमुख वृत्तपत्रांत झळकले.

महायुद्धानें जेरीस आलेल्या युरोपियन मुत्सद्यांची धांवपळ सुरू झाली. शेवटीं सुदैवानें पुन्हां परिषदेची बैठक एप्रील महिन्यांत सुरू झाली. याखेपेस लॉर्ड कर्झन यांचे ऐवजीं सर होरेस रमबोल्ड यांची ब्रिटिश शिष्टमंडळाचे मुख्य म्हणून नेमणूक झाली होती. सर होरेस हे शांत व उदारमतवादी असल्यामुळें फारसे खटके न उडतां परिषदेचें कार्य सुरळीत सुरू झालें. इस्मतपाशांनीं आपला पूर्वीचा खाक्या सोडला नाहीं. त्यांनीं आपल्या सर्व मागण्या व्यवस्थितपणें आपल्या पदरांत पाडून घेतल्या. तारीख २३ जुलै १९२३ रोजीं दोस्तराष्ट्रांच्या मुत्सद्यांनीं इस्मतपाशांच्या मागण्या असलेल्या तहावर सही शिक्का केला.

त्या मागण्यामुळें पुढील महत्वाच्या गोष्टी घडून आल्या.

( १ ) आशियामायनर प्रांतामधून ग्रीक सत्तेची हकालपट्टी करण्यांत येऊन, त्यावर तुर्कांचा अधिकार अबाधितपणें प्रस्थापित झाला. त्या प्रांतातील ग्रीक व आर्मीनियन लोकांस तुर्की राज्यांत राहावयाचे नसल्यास त्यांनीं तेथून आपले बिऱ्हाड हलवावें व ग्रीसच्या हद्दींत राहावयास जावे असें ठरले.

( २ ) कॉन्स्टँटिनोपलवर तुर्कांचा संपूर्ण ताबा बसला

( ३ ) पूर्व थ्रेस व आड्रियानोपल शहर ग्रीकांच्या हातचें सुटून, पूर्वीप्रमाणें तुर्कांसच मिळालें.

( ४ ) कॉन्स्टँटिनोपल मधील ग्रीक धर्मगुरू ( पॅट्रिआर्क ), ग्रीक व आर्मिनियन ख्रिस्त्यांवर जे राजकीय अधिकार चालवीत असे ते रद्द करण्यांत आले.

( ५ ) फार प्राचीन काळापासून तुर्की राज्यांत युरोपियन रहिवाश्यांस दिवाणी व फौजदारी न्यायदानाच्या बाबतींत स्वतासुभा मिळाला होता तो रद्द झाला.

( ६ ) कॉन्स्टँटिनोपलची सुरक्षितता व त्याजवरील तुर्की सत्ता यांस धक्का न लावतां, व्यापार व दळणवळण यांस दार्दानेलीस, मार्मोरा आणि बास्फरस यांतील पाणवठे सर्व राष्ट्रांस खुले झाले.

( ७ ) ग्रीस, तुर्कस्थान व बल्गेरिया यांच्या हद्दी परस्परांच्या मुलखाशी जेथें भिडतात तो प्रदेश सैन्यविहीन झाला.

( ८ ) आशिया खंडांत आशियामायनरमध्यें तुर्कांचा तीन लाख चौरस मैलांचा सलग एकधर्मी मुलूख बनला

( ९ ) तुर्कस्थानचे कर्ज कमी करण्यांत आलें.

दोस्त राष्ट्रांशीं सुलतानानीं सेव्हर्सचा तह करून तुर्की राष्ट्राच्या नरडीस नख लावलें तर कमालपाशांच्या पक्षानें लॉसेनचा तह करण्यास दोस्त राष्ट्रांस भाग पाडून तुर्की राष्ट्र जीवंत ठेवलें, असें प्रत्येक समंजस माणसास कबूल करावे लागेल. या परिषदेंत अपेक्षेबाहेर तुर्कस्थानास यश मिळाले याचे मुख्य कारण म्हणजे कमालपाशांचा विलक्षण दरारा हेंच होय. तुर्कांची मजबूत संघटना व त्या संघटनेस मिळालेलें कमालपाशांचे नेतृत्व यामुळें तुर्कस्थानच्या मागण्या फेटाळून लावण्याची दोस्तराष्ट्रांची छाती झाली नाहीं.

लॉसेनची शांतता परिषद यशस्वी रीतीनें पार पडली व विजयी मुद्रेनें तुर्की शिष्टमंडळ अंगोरास परतले. या परिषदेमुळें युरोपांत माजलेले अंतस्थ कलह एकदां कायमचे मिटले व सगळीकडे शांतता प्रस्थापित झाल्याचे जाहीर करण्यांत आलें.

प्रकरण २५ वें

—××—

# पहिले अध्यक्ष

नॅशनल ग्रँड असेंब्लीचे बरेचसे सभासद पुराणमतवादी होते हे आपण मागें पाहिलेच आहे. त्यांना कमालपाशांची प्रजासत्ताक राज्यपद्धती पसंत नव्हती. थोडाफार फरक करून आतांपर्यंत चालत आलेली राज्यपद्धतीच पुढें चालू करावी असा त्यांचा आग्रह होता. कमालपाशांनीं तर तुर्कस्थानामध्यें प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित करण्याचा निर्धार केला होता. हा निर्धार पार पाडण्या-करितां त्यांनीं एक राजकीय पेचप्रसंग निर्माण केला.

ग्रँड नॅशनल असेंब्लीनें नेमलेल्या सर्व मंत्र्यांना कमालपाशांनीं एक दिवस आपल्या घरीं जेवावयास बोलाविले जेवण झाल्यानंतर कमालपाशा म्हणाले, “ तुम्ही सर्वांनीं आपआपले राजिनामे द्यावे अशी माझी इच्छा आहे. मी असेंब्लीला सर्व राज्यकारभार हातीं घेण्यास सांगेन. अधिकार स्वीकार करा असा

असेंब्लीनें तुम्हांस आग्रह केला तरी तुम्ही स्पष्टपणें नकार दर्शवा. मग पाहूं असेंब्ली कसें काय राज्य चालवितें तें! शेवटीं आपण ठरवूं तें असेंब्ली कबूल केल्याशिवाय राहणार नाहीं"

दुसऱ्या दिवशीं मंत्रिमंडळानें राजिनामा दिला. दुसरें मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न असेंब्लीनें चालविला; पण त्यांत यश येण्याचें चिन्ह दिसेना. प्रत्येक सभासद आपआपली वर्णी मंत्रिमंडळांत लावण्याचा प्रयत्न करूं लागला. याचा परिणाम असा झाला कीं आपआपसांत चुरस सुरूं होऊन प्रकरण हातघाईवर येण्याचा रंग दिसूं लागला. ज्यांच्यावर सर्व सभासदांचा एकमतानें विश्वास होता ते लोक कमालपाशांच्या बाजूला पडल्यामुळे, त्यांनीं मंत्रिपद स्विकारण्याचें साफ नाकारलें. दोन दिवस कडाक्याचे वादविवाद झाले, भांडणें झालीं; पण मंत्रिमंडळ कांहीं बनलें नाहीं. उलट मंत्रिमंडळ बनविण्याचा नादांत असेंब्लीच्या सभासदांमध्यें लहान लहान गट मात्र पडले. प्रत्येक गट दुसऱ्या गटास शिव्यांशाप देऊं लागला; इतकेंच नव्हे तर एकमेकाच्या नरडीचा घोंट घेण्यास उठूं लागला!

शेवटीं कमालपाशांना बोलावून त्यांना नवीन मंत्रिमंडळ बनविण्यास सांगावें असें असेंब्लीनें एकमतानें ठरविलें. त्यावेळीं कमालपाशा असेंब्लीस मुद्दामच गैरहजर होते. त्यांना येण्याबद्दल

असेंब्लीनें निरोप पाठविला; पण कमालपाशांनी त्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. दुसऱ्या खेपेस पुन्हां निरोप पाठवून, " आमच्या हातून मंत्रिमंडळ बनविण्याचें कार्य होत नाहीं. आपण आमच्याकडे नाहीं तरी राष्ट्राकडे पाहून अवश्य येण्याची कृपा करावी, " अशी विनंती केली. ' आपण आज जे बिल मांडूं त्याला जर एक मतानें पाठिंबा मिळेल तर आपण मंत्रिमंडळ बनवूं, ' या अटीवर कमालपाशा असेंब्लीचा सभागृहांत आले.

ती वेळ फार आणीबाणीची होती. कमालपाशांची अट फेंटाळून लावली तर सगळीकडे पुन्हां अनावस्था माजेल व आतांपर्यंत मोठ्या मुष्कीलीनें जो विजय मिळविला तो वाया जाऊन पुन्हां तुर्कस्थान परकियांच्या घशांत जाईल, अशी सर्व सभासदांना भीती वाटली. त्यांनीं नाईलाजानें कमालपाशांची अट कबूल केली. त्या अटीनुसार कमालपाशा व इस्मतपाशा यांनीं तयार केलेलें प्रजासत्ताक राज्याचें बिल असेंब्लींत मांडण्यांत आलें व तें पास करण्यांत आलें; इतकेंच नव्हें तर, तुर्की प्रजासत्ताक राज्याचे पहिले अध्यक्ष म्हणून कमाल-पाशांना निवडण्यांत आले.

असेंब्लीच्या या निर्णयामुळें कमालपाशांना तुर्कस्थानचे पहिले अध्यक्ष होण्याचें भाग्य लाभलें. अध्यक्ष या नात्यानें, मुख्य प्रधान व

मंत्रिमंडळ निवडण्याचा कमालपाशांना अधिकार दिला गेला. मंत्रिमंडळाचे अध्यक्ष, असेंब्लीचे अध्यक्ष आणि कमांडर–इन–चीफ ही सर्व जबाबदारीची कामें कमालपाशांनींच करावींत, असें असेंब्लीनें ठरविल्यावर असेंब्ली बरखास्त झाली. दुसऱ्या दिवशीं सर्व प्रमुख वृत्तपत्रांत तुर्की प्रजासत्ताक राज्याविषयीं अभिनंदनपर अग्रलेख प्रसिद्ध झाले.

तुर्की राज्याचीं सर्व सूत्रें हातीं घेतल्यानंतर आपल्या राष्ट्रास युरोपियन राष्ट्रांच्या तोडीचें राष्ट्र कसें बनवितां येईल याचा कमालपाशांना निजध्यास लागला. आतांपर्यंत युरोपामधील "आजारी मनुष्य," म्हणून तुर्कस्थानाची हेटाळणी करण्यांत येत होती, बेबंदशाहीचा नमुना म्हणून तुर्कस्थानाकडे अंगुलीनिर्देश करण्यांत येत होता व अजागळपणाचे प्रतीक म्हणून तुर्कस्थानाची चेष्टा करण्यांत येत होती. आपल्या राष्ट्राची चाललेली ही हेटाळणी, बदनामी आणि चेष्टा पाहून कमालपाशांचें अंतःकरण तीळतीळ तुटत असे. हा दुर्लौकिक नाहींसा करून आपल्या राष्ट्रास आदर्श राष्ट्र बनविण्याची कमालपाशांना आकांक्षा लागून राहिली होती.

पण कमालपाशांच्या आकांक्षेच्या, हिमतीच्या आड येणारी एक प्रचंड धोंड उभी होती. ही धोंड म्हणजे तुर्कस्थानाला रसातळास नेणारे मुल्लामौलवी होत. या मुल्लामौलवींचे किती भयंकर प्रस्थ

तुर्कस्थानामध्यें होते हें आपण मागें पाहिलेंच आहे. ज्ञानाची पोकळ घमेंड, दिखाऊ लोकसेवा आणि धर्माचा खोटा अभिमान हीं त्या मुल्लामौलवींचीं आयुधें होतीं. कमालपाशा तरुण होते तेव्हांपासूनच ते व त्यांचे अनुयायी मुल्लामौलवींच्या विरुद्ध हो . या मुल्लामौलवींचें बंड मोडल्याशिवाय आणि त्यांचा बीमोड केल्याशिवाय राष्ट्राचा उत्कर्ष होणार नाहीं किंवा राज्यपद्धती सुरळीत चालावयाची नाहीं असा त्यांनीं बिनचूक आडाखा बांधला होता. आपल्या स्वार्थाकरितां समाजांमध्यें बेदिली फैलविण्यास किंवा धर्मभेदातीत राज्यपद्धतींत धर्मांचें खूळ माजवून तिचा विचका करावयास हे लोक मागेंपुढें पाहावयाचे नाहींत असा त्यांचा ठाम सिद्धान्त होता.

आणि कमालपाशांचा हा सिद्धान्त खरा ठरला. कमालपाशा सर्वाधिकारी झाल्याबरोबर या मुल्लामौलवींची पांचावर धारण बसली. हा गृहस्थ आपली पाळेंमुळें खणून काढल्याखेरीज राहणार नाहीं हें त्यांनीं पूर्णपणें ओळखलें. यालाच लोळवून टाकला म्हणजे आपलें बस्तान पूर्वीसारखें कायम राहील या दुष्ट हेतूनें मुल्लामौलवींनीं कमालपाशा व त्यांची राज्यपद्धती याविरुद्ध शिंग फुंकलें; कमालपाशांची व त्यांच्या सहकाऱ्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू केला. इस्लाम धर्माचा निःपात करून, तुर्कस्थानाला ख्रिस्ती राष्ट्र बनविण्याचा कमालपाशांचा विचार आहे; मशिदी

पाडून टाकण्याचा त्यांचा निश्चय आहे, पवित्र कुराण वाचावयास बंदी करावयाचें त्यांचें धोरण आहे; अशा एक ना दोन हजारों खोट्या गोष्टी जाहीरपणें समाजापुढें मांडून कमालपाशा व त्यांचे तरुण तुर्क अनुयायी याविषयीं लोकमत कलुषित करण्यास सुरवात केली. मशिदीमध्यें, बाजारपेठेंत, चौकाचौकांत 'या धर्महीन राज्यकर्त्यांपासून संभाळून असा, अशा तऱ्हेचीं पत्रकें लाविलीं गेलीं.

कमालपाशांचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या व त्यांना सदैव पाण्यांत पाहणाऱ्या त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनीं मुल्लामौलवींच्या या कृत्यास प्रोत्साहन दिलें. कमालपाशांच्या कानावर या सर्व गोष्टी गेल्या असून, त्यांनीं पूर्ण बंदोबस्त करण्याचें ठरविलें असल्याची बातमी, कमालपाशांचे राजकीय प्रतिस्पर्धी व मुल्लामौलवी यांच्या कानावर जातांच ते सर्व खलीफा अबदुल मजीद यांच्या आश्रयास गेले. खलीफा हे जगांतील सर्व मुसलमानांचे धर्मगुरु आहेत, तेव्हां त्यांच्या आश्रयास जाऊन राहिल्यास आपणांस काडीचीही भीति नाहीं असे त्या अर्धवट राजकारणी प्रतिस्पर्ध्यांना व खुळ्या मुल्लामौलवींना वाटलें. खलीफांच्या निशाणाखालीं जमल्यावर त्यांनीं निर्भयपणें कमालपाशांविषयीं लोकमत बिघडविण्याचें कार्य सुरू केलें; इतकेंच नव्हे तर, खलीफानाच तुर्कस्थानाचे बादशहा

बनवून कमालपाशांची प्रजासत्ताक राज्यपद्धती धुळीस मिळविण्याचे धाडसी बेत चालू केले.

बिचारे भोळे खलीफा! त्यांनीं मागचा पुढचा विचार न करतां या सर्व लोकांस आश्रय दिला. आपण देशद्रोह्यांस व समाजद्रोह्यांस आश्रय देऊन राष्ट्राचा अक्षम्य गुन्हा करीत आहोंत याची त्या बिचाऱ्या खलीफांना जाणीव देखील नव्हती. कमालपाशांना ही हकीकत कळल्या नंतर त्यांना फार संताप आला. खलीफानीं अभय दिलेल्या या घातकी लोकांचा निःपात करावा तर धार्मिक असणारी जनता खवळून उठेल; बरें न करावा तर खलीफा व त्यांच्या सभोंवार जमलेली देशद्रोह्यांची मजलिस, प्रजासत्ताक राज्यपद्धतीस केव्हां भोंवेल यांचा नेम नव्हता. कमालपाशापुढें जबरदस्त पेंच येऊन पडला. या पेंचातून मुक्त होण्याचा मार्ग त्यांना शोधणें आवश्यक होतें; कारण वाटेल तीं राष्ट्रद्रोहाची कृत्यें करावीं आणि खलीफांच्या आश्रयाला जावें असा प्रघात सुरू झाला तर राष्ट्रास स्वास्थ्य लाभणें केव्हांही शक्य होणार नव्हते. खलीफाभोवतीं जमलेल्या या लोकांना वेंचून काढून त्यांना देहांत शासन दिले

तर ! पण पुन्हां दुसरी मंडळी खलीफाभोवतीं जमतील; आणि त्यामुळें पुन्हा तोच त्रास, तोच धोका. यापेक्षां अशा लोकांचे आश्रयस्थानच उद्ध्वस्त केलें तर ? अशा राष्ट्रद्रोह्यांना आश्रय देणाऱ्या खलीफांचा कायम बंदोबस्त केला तर ?

कमालपाशांच्या डोक्यांत विचारचक्र सुरू झाले.

प्रकरण २६ वें

—××—

# खिलाफतीचा शेवट !

कमालपाशांच्या प्रभावी नेतृत्वाखाली तुर्कस्थानाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या नवजवान व सत्ताधारी तुर्कांमध्यें आणि जनतेमध्यें यादवी फैलावण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुल्लामौलवींस व राजद्रोह्यांस आश्रय दिल्याबद्दल खलीफांचा सर्वत्र निषेध होऊं लागला. असेंब्ली-मध्यें प्रत्येक सभासदानें, खलीफा व त्यांच्या आश्रयाखालीं जमलेल्या राष्ट्रद्रोही मुल्लामौलवींच्या विरुद्ध टीकेची झोड उठविली. खलीफा ही व्यक्ति कितीही श्रेष्ठ व वंद्य असली तरी ती राष्ट्रहिताच्या आड येत असेल तर त्या व्यक्तिचें महत्व बाजूला ठेवून तिचा बंदोबस्त केलाच पाहिजे अशी भाषा लोकप्रतिनिधींच्या तोंडून बाहेर पडूं लागली. शेवटीं ' तुर्की प्रजासत्ताक राज्याच्या विरुद्ध कोणीही चळवळ करील व खलीफांना सहानुभूती दाखवील तर तो राजद्रोह समजून त्याला देहांत शासन केलें जाईल ' असा कायदा असेंब्लींत पास झाला.

खलीफा अबदुल मजीद यांची आतां धडगत नाहीं तेव्हां कमालपाशांनींच अखिल मुसलमानांचे खलीफा व्हावे अशी विनंती प्रत्येक राष्ट्रांतून करण्यांत आली. हिंदुस्थान व इजिप्त या देशांतून मुसलमानांची शिष्टमंडळें कमालपाशांचे भेटीस आली. कमालपाशांनीं खलीफा बनावे अशी त्यांनीं आग्रहपूर्वक विनंती केली. खलीफांचा दर्जा मिळणें ही अत्यंत मानाची गोष्ट होती. शिवाय खलीफाना शोभण्यासारखे व्यक्तिमत्व त्यांच्या ठायीं होते. पराक्रमी योद्धा, महान मुत्सद्दी, स्वतंत्र मुसलमानांचा राज्यकर्ता व अखिल दुनियेमधील एक सर्वश्रेष्ठ व्यक्ति असा त्यांचा लौकिक होता. पण कमालपाशा हे तत्वनिष्ठ असल्यामुळें हा मिळणारा किंबहुना आपण होऊन चालत आलेला मान त्यांनीं साभारपूर्वक नाकारला. राजकारणी व्यक्तीनें धार्मिक अवडंबरापासून दोन हात दूर राहिले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. राजकारण व धर्म एकत्र येतां कामा नये अशी त्यांची मनीषा होती. शिवाय आजच्या नाजूक परिस्थितींत येथील खलीफाची गादी नष्ट करणें किती अगत्याचें आहे हेंही त्यांनीं बोलून दाखविलें. दुसऱ्या एखाद्या मुसलमानी राष्ट्रांत जावे व तेथील राज्यकर्त्यांना खलीफा होण्याची विनंती करावी असेंही त्यांनीं सुचविलें. कुठल्याही परिस्थितींत तुर्कस्थानामध्यें खलीफा किंवा त्यांची प्रभावळ आपण

टिकूं देणार नाहीं असें स्पष्ट बजावून कमालपाशांनीं शिष्टमंडळास रजा दिली.

शेवटीं कमालपाशांनीं ३ मार्च १९२४ रोजीं खलीफाची गादी नष्ट करून टाकण्याचें बिल असेंब्लीमध्यें मांडले. सदर बिल मांडतांना ते म्हणाले, "कांहीं झाले तरी आपण प्रस्थापित केलेलें प्रजासत्ताक राज्य आपणांस टिकविलेच पाहिजे. या आपल्या प्रजासत्ताक राज्याच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा निःपात करावयास आपण तयार झाले पाहिजे. आज नाहीं उद्यां आपल्यामधील धर्मवेडी मंडळी खलीफांच्या झेंड्याखालीं जमणार व आपल्या राज्याचा विध्वंस करावयास पहाणार हें नक्की! दुर्दैवानें अजून आपल्या देशांत धर्मानें अंध बनलेले लोक आहेत. खरा धर्म काय आहे व कशांत आहे हें त्यांना माहीत नाहीं. या लोकांना हातीं धरून व मुल्लामौलवींचे साहाय्य घेऊन खलीफा पुन्हां चळवळ करतील यांत शंका नाहीं. अशा तऱ्हेची चळवळ झाल्यास पुन्हा पूर्वीच्या अंधःकाराच्या युगांत आपणांस जाऊन पडावे लागेल. हा धोका टाळण्याकरितां आपणांस नाइलाजानें येथील खलीफाची गादी नष्ट करणें भाग आहे. आतांपर्यंत राजकारण व धर्म यांची सांगड होती. जो राज्यकर्ता तोच धर्माधिकारी अशी परिस्थिती होती.

ही परिस्थिती नष्ट करण्याकरितां राजकारण व धर्म यांची फारकत करणें हेंच आज शहाणणाचें ठरणार आहे. खलीफांच्या गादीचें उच्चाटण याचा अर्थ इस्लामधर्माचें उच्चाटण असा मात्र कोणी करूं नये. या आमच्या प्रजासत्ताक राज्यांत प्रत्येक व्यक्तिला आप-आपला धर्म पाळण्याची पूर्ण मुभा राहणार आहे. व्यक्तीचा धर्म छिनावून घेण्याची किंवा त्यांत ढवळाढवळ करण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. धर्माचें क्षेत्र राज्यापुरतें न राहतां तें व्यक्ति पुरतें राहील. राज्य हें धर्मभेदातीत राहावे व राहिलें पाहिजे. हेंच व्यापक ध्येय आम्हीं अमलांत आणणार आहोंत. आपल्यासमोर जें बिल मांडलें आहे त्याबद्दल जनतेनें आपला गैरसमज करून घेऊं नये. राष्ट्राच्या कल्याणाकरितां कांहीं गोष्टी करणें भाग असते. त्यापैकींच ही एक गोष्ट आहे हे आपण ध्यानांत धरा." अशा तऱ्हेचें बुद्धीप्रधान व कळकळीचें भाषण झाल्यानंतर तें बिल एकमतानें पास झालें. या महत्वाच्या बिलावर वादविवाद न होतां तें पास झालें ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

त्याच दिवशीं रात्रीं इस्तंबूलच्या गव्हर्नरास कमालपाशांनीं हुकूम पाठविला कीं, दिवस उजाडण्यापूर्वीं खलीफा अबदुल मजीद तुर्कस्थानची हद्द सोडून गेले पाहिजेत. हुकूम हातांत

पडल्याबरोबर त्याची अंमलबजावणी झाली. मध्यरात्रीं गव्हर्नर स्वतः लष्करी तुकडी घेऊन खलीफांच्या निवासस्थानीं गेला व त्यांना मोटारींत बसवून व थोडेसे पैसे प्रवासखर्चाकरितां देऊन दिवस उजाडण्याच्या अगोदर तुर्कस्थानाच्या सरहद्दीपलीकडे स्वित्झर्लंडच्या हद्दींत पोहोंचविलें.

अशा रीतीनें आज कित्येक वर्षें राज्यपद व धर्मपद विभूषित करणाऱ्या खलीफांचा शेवट करण्यांत आला. त्याचप्रमाणें खलीफांचा परिवार, त्यांचा प्रभावळ यांचीही सरहद्दीपलीकडे रवानगी करण्यांत आली. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या गोष्टीचा निषेध सबंध तुर्कस्थानभर एकाही जागीं झाला नाहीं.

खिलाफतीचें विसर्जन झालें तेव्हां तुर्की जनता मुग्ध कां राहिली याचें एका ग्रंथांत पुढील मार्मिक वर्णन आले आहे:—

"महायुद्धांत तरुण तुर्क पराभूत झाल्यावर कॉन्स्टँटिनोपल शहरीं १९१९ ते १९२२ पर्यंत दोस्तांच्या सैन्याची छावणी होती. त्यावेळीं जवळ ना पैसा ना सैन्य अशी सुलतानाची हलाखीची परिस्थिती होती. अशाही विपन्नावस्थेंत तरुण तुर्कांशीं मिळते घेऊन साम्राज्य शक्य तितके जतन करण्याची बुद्धि सुलतान व तत्पक्षीय यांस झाली

नाहीं, इतकेंच नव्हे तर, तरुण तुर्कांस व साऱ्या इस्लामी जगास नापसंत असलेल्या सेव्हर्सच्या तहावर सही करण्यासही सुलतानास दिक्कत वाटली नाहीं. लॉसनेच्या तहाचे वेळीं कमालपक्षास स्वतंत्रपणें दोस्तांशीं तह करण्याचा अखत्यार नाहीं असें म्हणून सुलतान आडवा आलाच होता. कमालपक्ष स्वतंत्रपणें भरभराट पावून ग्रीसला तंबी पोचविण्यास चुकला असता, तर सुलतानाचे तहानें तुर्कस्थानास सध्यांचे बरे दिवस खात्रीनें पहावयास मिळाले नसते. कोणताही सुलतान गादीवर असला तरी तो राष्ट्राची प्रगती अडवून धरतो व राष्ट्राचा घात करतो असा एक शतकभर अनुभव आल्या-मुळेंच कमालपाशास पदच्युतीचें निर्वाणीचे अस्त्र काढावे लागले. सुलतान या नात्यानें राजकीय सत्ता हातची सोडावयास नको आणि खलीफा या नात्यानें मुसल्मानांचें धार्मिक वर्चस्व ख्रिस्ती, यहुदी या परधर्मीयावर लादावयास पाहिजे हें सुलतानांचें जुनें पुराणें घातकी धोरण कमालपाशा आदिकरून उदारमतवादी मुत्सद्यांस मुळींच पटण्यासारखें नव्हतें.

म्हणून कमालपाशांनें प्रथम राजकीय व नंतर धार्मिक मुळें उपटून सुलतानात व खिलापत या दोन्हीं संस्थांची राष्ट्रास लागलेली कीड काढून टाकली. कमालपाशा व त्यांचे सहकारी यांच्या शहाणपणावर व सद्धेतूवर तुर्की मुसलमानांचा विश्वास आहे म्हणून त्यांनीं ही कडवट व तिखट गोळी मुकाट्यानें गिळली." *

"वतन, नांवाच्या प्रमुख तुर्की वृतपत्राचे उद्गार यापेक्षां स्पष्ट व सडेतोड आहेत. ते पत्र म्हणते,"

"आमच्या संकटकालीं खलीफाची मुसलमानांवर असलेली सत्ता आमच्या उपयोगी पडली नाहीं. महायुद्धांत खलीफानें जिहाद पुकारला तरी हिंदी मुसलमान आमच्या विरुद्धच लढले. आम्हींही धार्मिक गोष्टी बाजूस सारून आधुनिक पद्धतीचें राज्य प्रस्थापित करीत आहोंत. खिलापत चालत राहिल्यामुळें परराष्ट्रांतील मुसलमानांस आमच्या देशांतील राज्यकारभारांत लुडबूड करण्यास सवड सांपडली. परराष्ट्रांनींही या परिस्थितीचा फायदा घेतला व तुर्कांच्या राज्यकारभारांत बोट शिरकाव-

ण्यास मुसलमानीं राष्ट्रांस चिथावणी दिली. या सर्व उपाधि आम्हीं तोडून टाकीत आहोंत व सर्व धार्मिक लुडबुडीचा आमच्या राज्यव्यवस्थेशी संबंध न येईल अशी व्यवस्था करीत आहोंत. आधुनिक पद्धतीचें लोकसत्ताक राज्य स्थापण्यास खिलापतीचें उच्चाटण अगदीं रास्त व जरूर होतें."

प्रकरण २७ वें

—xx—

# कौटुंबिक आपत्ती !

आतां कमालपाशा एकमताने तुर्कस्थानाचे कर्णधार झाले. तुर्कस्थानच्या कानाकोपऱ्यामधून त्यांचा किर्तीघोष सुरूं झाला. तुर्कस्थानाच्या इतिहासांत आतांपर्यंत कुणीही मान मिळविला नाहीं इतका मान कमालपाशांनीं मिळविला. आपल्या मातृभूमीचा उद्धारकर्ता म्हणून तुर्कस्थानामधील आबालवृद्ध त्यांच्याकडे भरलेल्या डोळ्यांनीं पाहूं लागले. आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्यदीप म्हणून त्यांचा गौरव होऊं लागला. आपल्या देशाच्या नसनसांत नवचैतन्य ओतणारा महापुरुष म्हणून प्रत्येक तुर्क त्यांच्याकडे अभिमानानें पाहूं लागला.

कमालपाशांनीं आपल्या आयुष्याचें सार्थक केलें; आपल्या मातेचा कुसवा धन्य केला. आपल्या पोटच्या मुलानें मानाचा व

कितींचा उच्चांक गांठलेला पाहून जुबेदा खानम कृतकृत्य झाल्या व मोठ्या आनंदानें त्यांनीं या जगाचा शेवटचा निरोप घेतला. आपल्या आईच्या प्रकृतीला बरें वाटावे म्हणून कमालपाशांनीं अत्यंत परिश्रम घेतले. आपल्या परमपूज्य मातेचें दर्शन घेतल्या-खेरीज त्यांनीं एक दिवसही सुना घालविला नाहीं. आपल्या आईला अंगोराची उष्ण हवा मानवत नाहीं म्हणून कमालपाशांनीं त्यांना स्मर्ना येथें आणले. त्यांची प्रकृति सुधारावी म्हणून त्यांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले. पण त्याचा कांहीं उपयोग न होतां जुबेदा खानम कालवश झाल्या.

कमालपाशांचें आपल्या आईवर निरतिशय प्रेम होतें. ' जगांमध्यें विश्वास ठेवण्यासारखी एकादी व्यक्ति असेल तर ती आईच' असे नितांत सुंदर व अमर उद्गार कमालपाशांनीं काढले आहेत. आपल्यावर टीका करण्याचा अधिकार कुणाला असेल तर तो फक्त आपल्या आईलाच असें ते नेहमीं म्हणत. आपल्या आईखेरीज त्यांनीं कुणाचीही टीका सहन केली नाहीं, असें त्यांच्या आयुष्य कथेवरून आपणांस म्हणतां येईल. आपल्या आईचे साधुवृत्तीचे बोल ते अत्यंत आदरपूर्वक ऐकत असत. जगामध्यें आपणास कुणी जरी थारा दिला नाहीं तरी शेवटीं आपली आई आपणांस थारा देईल असे उद्गार कमालपाशांनीं आपल्या क्रांतिकारक आयुष्याच्या

सुरवातीस काढले होते. आपली आई म्हणजे आपल्या मागें असणारी एक प्रचंड शक्ति आहे, असें त्यांना वाटे. आज आपणांस आपली आई सोडून गेल्यामुळें या जगांत आपण एकाकी झालों या विचारानें कमालपाशांना अत्यंत दुःख झालें.

त्यानंतर थोड्याच काळांत कमालपाशांची व त्यांच्या सुविद्य पत्नी लतीफा खानम यांची ताटातूट झाल्यामुळें, त्या दुःखांत भरच पडली. लग्न झाल्यानंतर वर्षभर कमालपाशांचें आयुष्य सुखाचें गेलें. कमालपाशांचें लतीफा खानमवर अतिशय प्रेम होतें. लतीफा खानम याना ते क्षणभरही विसंबत नसत. पत्नी म्हणूनच नव्हे, तर सहचरी म्हणून ते त्यांच्याशीं मोकळेपणानें वागत. काम करतांना, रणांगणावर जातांना किंवा सैन्याची पहाणी करतांना लतीफा खानम सदैव त्यांच्या बरोबर असत. आपल्या पत्नीच्या अखंड सहवासांत त्यांना फार आल्हाद वाटत असे.

पण हे सुखाचे दिवस झटकन् निघून गेले. लतीफा खानम या स्वतंत्रवृत्तीच्या व बुद्धिमान् असल्यामुळें, राजकारणांत कमालपाशांशीं त्यांचे खटके उडूं लागले. जोपर्यंत त्या सामाजिक चळवळींत भाग घेत होत्या तोपर्यंत कमालपाशांनीं तोंडातून ब्र काढला नाहीं. पण राजकारणांत त्या भाग घेऊं लागल्या त्यावेळीं तसें न करण्याविषयीं कमालपाशांनीं सूचना केली; पण त्यांची

पर्वा व करतां लतीफा खानमनीं आपलें व्रत तसेंच पुढें चालविलें. कित्येक वेळां तत्वाकरितां त्या कमालपाशांवर कडक टीका करीत.

कमालपाशा व लतीफाखानम यामधील खटके सारखे वाढतच गेले. दोघेही करारी, बाणेदार व स्वतंत्र वृत्तीचे असल्यामुळें कुणीही हार खात नसे. दुर्दैवानें त्यांना अपत्य नसल्यामुळें, त्यांच्या मधील वाढत्या तेढीस पायबंद बसण्याजोगे आणखीं कांहीं साधन नव्हतें. शेवटीं कमालपाशांनीं लतीफा खानमशीं घटस्फोट केला.

आतां कमालपाशांना कसलेंही कौटुंबिक बंधन राहीले नाहीं. घरांत मन लागत नाहीं म्हणून कमालपाशा सरकारी कामकाज करण्यांत व तुर्कस्थानाची पुनर्घटना करण्यांत सर्व दिवस घालवूं लागले.

प्रकरण २८ वें

—xx—

# विरोधकांचा निःपात

कमालपाशा व त्यांचे मंत्री तुर्कस्थानाची पुनर्घटना करण्यांत गुंतले आहेत हें पाहून, तुर्कस्थानाच्या अगदीं पूर्वेकडील प्रांतांत मुल्लामौलवींनीं पुन्हां धुमाकूळ सुरूं केला. त्यांनीं त्या प्रांतांत राहणाऱ्या धर्मवेड्या कुर्दलोकांच्या भावना, कमालपाशा व त्यांचे मंत्रीमंडळ याविरुद्ध इतक्या चेतविल्या कीं, कुर्दलोकांनीं कमालपाशांच्या विरुद्ध एकदम बंड पुकारलें. शेख सय्यद नांवाच्या दरवेश म्होरक्यानें बंडाचें पुढारीपण स्वीकारलें. " अधर्मी प्रजासत्ताक राज्याचा नाश होवो व खलीफाचा विजय असो " अशा गर्जना करीत बंडखोरांनीं आसपासची लहान लहान गांवें आपला कबज्यांत घेतली. या बंडाची सर्व सूत्रें मुल्लामौलवींच्या हातीं होती. अर्धचंद्रांकित हिरवें निशाण हातीं घेऊन या बंडखोरांनीं कमालपाशांच्या लष्करी छावण्यांवर हल्ला केला, व तेथील लष्कराची निर्दयपणें कत्तल उडविली.

कुर्द लोकांच्या या बंडामुळें संबंध तुर्की जनता खडबडून जागी झाली. हें बंड यशस्वी झालें तर नुकतेच जमीन धरूं पाहणारें प्रजासत्ताक राज्याचें रोपटें जळून जाऊन पुन्हा तुर्कस्थानामध्यें भयंकर यादवी माजणार असे उद्गार समंजस तुर्कांच्या तोंडून निघूं लागले. हा बांका प्रसंग ओळखून कमालपाशांनीं संबंध राष्ट्रास हुशियार राहण्यास सांगितलें आणि मदतीची याचना केली. कमालपाशांनीं मदतीची पुकार केल्याबरोबर तुर्कस्थानाच्या प्रत्येक भागांतून, प्रत्येक प्रांतातून, प्रत्येक शहरांतून, सर्व दर्जाच्या तुर्की नागरिकांकडून इतकेंच नव्हें तर तुर्की स्त्रियांकडून 'आम्ही मदत करावयास तयार आहोंत,' अशा तारावर तारा येऊं लागल्या.

कमालपाशांनीं आपल्या सैन्यास आज्ञा दिली. दोन महिन्यांच्या आंत त्या सैन्यानें बंडाचा बीमोड करून टाकला. कमालपाशांनीं त्या प्रांतात लष्करी न्यायमंडळें पाठवून दिलीं. या न्यायमंडळांनीं चवकशी करून हजारों देशद्रोही कुर्द लोकांना भयंकर शासन दिलें. जवळ जवळ ४६ पुढाऱ्यांना भरचौकांत फांसावर लटकावण्यांत आले.

यानंतर कमालपाशांनीं आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर नजर फिरविली. या प्रतिस्पर्ध्यांना कमालपाशांचा फार हेवा वाटत

होता. कमालपाशांचा नाश कसा होईल व पूर्वीची सुलतानांची राजवट कशी प्रस्थापित करतां येईल याविषयीं त्यांचे रात्रंदिवस कट चालले होते. कमालपाशांना ठार मारण्याचे दोन वेळां प्रयत्न केले गेले. एकदां त्यांच्या अंगावर बॉंब फेकण्यांत आला; पण ते सुदैवानें बचावले. दुसऱ्या वेळीं त्यांच्या अन्नांतून विषप्रयोग करण्यांत आला, त्यांतून ते मोठ्या मुष्कीलीने वाचले.

कमालपाशांची नवी राजवट उलथून पाडण्याचे अराजकांचे कांहीं बेत उघडकीस आले. या अराजकांमध्यें असेंब्लीचे कांहीं सभासदही होते. त्यांचे पारिपत्य करण्याकरितां, सर्व राष्ट्रभर पसरलेल्या राष्ट्रद्रोह्यांना वठणीवर आणण्याकरितां, व राजकीय प्रतिस्पर्ध्यांना पायबंद घालण्याकरितां ग्रँड नॅशनल असेंब्लीनें सध्यां चाललेली राज्यघटना तात्पुरती तहकूब करून कमालपाशांना सर्वाधिकारी नेमले. आपल्या हातीं संपूर्ण सत्ता येतांच, कमालपाशांनीं मुद्रणावर नियंत्रण घातलें, सध्यांच्या राजपद्धतीवर नुसती टीका केली तर तो राजद्रोह ठरविला, राजद्रोह्यांची चवकशी करण्याकरितां स्वतंत्र न्यायमंडळें नेमलीं. या न्यायमंडळांनीं सबंध राष्ट्रभर फिरून चवकशी केली व अराजकांस सक्त शासन केलें. अराजकांच्या पुढाऱ्यांविरुद्ध अद्याप पुरावा गोळा झाला नव्हता, त्यामुळें या पुढाऱ्यांचा बंदोबस्त कमालपाशांना करतां येईना. त्यांच्यावर

सक्त नजर ठेवण्याचे हुकूम कमालपाशांनीं पोलीसखात्याला दिले. आज नाहीं उद्यां हे पुढारी पुराव्यासह सांपडल्याखेरीज राहावयाचे नाहींत अशी कमालपाशांची खात्री झाली.

कमालपाशांचा अंदाज, थोड्याच दिवसांत, बरोबर ठरला. स्मर्नाला भेट द्यावयाचा कमालपाशांचा कार्यक्रम नक्की ठरला होता. कमालपाशा स्मर्ना येथें येण्याच्या एक दिवस अगोदर कमालपाशांवर खिडकींतून बॉम्ब फेकून त्यांना ठार मारण्याच्या एक मोठा कट उघडकीस आला. या कटवाल्यांजवळ कांहीं पत्रेंही सांपडलीं. या या कटाची पूर्ण चवकशी केल्यानंतर, त्या कटामध्यें पुढाऱ्यांचा व अनेक मोठमोठ्या मंडळींचा हात आहे असें दिसून आले. सर्वांना पोलीसांनीं ताबडतोब गिरफदार केले.

स्वतंत्र न्यायमंडळासमोर चवकशी होऊन कमालपाशांच्या या सर्व राजकीय प्रतिस्पर्ध्यांना देहांत प्रायश्चिताची शिक्षा फर्माविण्यांत आलीं. मृत्युपत्रकांवर कमालपाशांनीं सह्या केल्यावर त्या सर्व गुन्हेगारांना एक मोठ्या चौकांत फांशी देण्यांत आले.

## प्रकरण २९ वें

—xx—

# सुधारणा.

कमालपाशांचा मार्ग एकदांचा निष्कंटक झाला. त्यांनीं दुप्पट उत्साहानें आपलें स्वीकृत कार्य सुरू केलें. आपलें राष्ट्र नमुनेदार केव्हां होईल याचा त्यांना ध्यास लागला होता. राजकारणाप्रमाणेंच तुर्कस्थानाच्या आर्थिक व सामाजिक रचनेंत आमुलाग्र क्रांति करण्याचा त्यांनीं निश्चय केला. तुर्की समाज म्हणजे अव्यवस्थित, अजागळ व पुराणमतवादी लोकांचा समूह असा जो दुर्लौकिक साऱ्या युरोपभर पसरला होता तो नाहींसा करून, आपला समाज कार्यक्षम व सुसंस्कृत करण्याचा त्यांनीं चंग बांधला. आपल्या राष्ट्राची सर्वांगीण उन्नती ज्या ज्या मार्गांनीं होण्यासारखी आहे ते सर्व मार्ग अमलांत आणावयाचा त्यांनीं कृतनिश्चय केला.

" साऱ्या जगाला आदर्शभूत होऊन राहील अशा प्रकारचें आपलें राष्ट्र बनविण्याचा आपण सर्वांनीं प्रयत्न केला पाहिजे.

जगांतील इतर संस्कृतींची भर आपल्या संस्कृतींत टाकली पाहिजे. जगामध्यें जें कांहीं सत्य, शिव आणि सुंदर असेल तें सर्व आपण आत्मसात करून आपल्या देशास सुसंस्कृत केलें पाहिजे. ”

वरील शब्दांत ग्रथित केलेलें ध्येय साध्य करण्याकरितां कमालपाशांनीं भगीरथ प्रयत्न सुरू केले. तुर्की जनता आचार विचारांत मागासलेली असल्यामुळें, तिला शिक्षित करण्याकरितां कमालपाशांनीं शिक्षकाची भूमिका स्वीकारली. एखाद्या शिक्षकाप्रमाणें सामोपचारानें जमले नाहींतर आग्रह करून किंवा वेळप्रसंगीं जबरदस्ती करून आपल्या देशबांधवांना शिक्षित करण्याचा कृतनिश्चय केला.

पूर्वीचा बेडौल, अव्यवस्थित वेष बदलून पाश्चात्य धर्तीचा सुटसुटीत, डौलदार व आकर्षक वेष घ्यावयास त्यांनीं आपल्या राष्ट्रास शिकविलें. जनतेच्या मनावर पूर्वसंस्कारांची इतकीं पुटें चढलीं होतीं कीं, तीं काढून टाकण्यास कमालपाशांना कायद्याचा आश्रय घ्यावा लागला. नवीन पद्धतीचा वेष करावयास लोकांची नाखुषी दिसतांच त्यांना सक्तीचा कायदा करावयास लावला.

कमालपाशांनीं परदेशाहून तज्ञ कायदेपंडीत बोलावून त्यांच्या साहाय्यानें इटालीयन व स्विस सिव्हील कायद्याच्या धर्तीवर नवीन कायदे जारी केले. या नव्या कायद्यामुळें तुर्कस्थानाचें सामाजिक स्वरूप पार बदलून गेलें. स्विस कायद्यामुळें कौटुंबिक

रचनेंत अमूलाग्र क्रांति झाली. प्रत्येक मनुष्यानें एकच बायको करावी व जनानखाना बाळगूं नये; स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असावें; त्यांची गोषांतुन मुक्तता करावी, म्युनसिपॅलिटीच्या व असेंब्लीच्या निवडणुकींत त्यांना हक्क असावा; नागरिकत्वाचे सर्व हक्क त्यांना मिळावे; असे कायदे अस्तित्वांत आले. कमालपाशांच्या भगिनी मकबुला बेगम यांच्या साहाय्यानें स्त्रियांमध्यें जागृती करण्यांत येऊन, त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यांत आली.त्यांनीं तयार केलेलें " लहान मुलांचे बिल " असेंब्लीत मांडण्यात येऊन तें एकमतानें मंजूर करण्यांत आलें. अंगोरामध्यें दोन तुर्की विदुषींना न्यायाधीशाची जागा देण्यांत आली.

याखेरीज कमालपाशांनीं असेंब्लीमध्यें अनेक लोक कल्याणाची बिलें पास करून घेतलीं. त्यामध्येंच मुल्लामौलवी व धर्मगुरू यांच्या संबंधीं एक बिल मंजूर झालें. हे लोक अत्यंत सधन होते. लोकांच्या धर्मभोळेपणाचा गैर फायदा घेऊन, त्यांच्याकडून या धर्ममार्तंडांनीं अतोनात संपत्ती उपटली होती. त्या बिलान्वयें कमालपाशानीं ही सर्व संपत्ती जप्त करून टाकली व तिचा विनियोग लोकांना शिक्षित करण्याकडे केला.

विवाहासंबंधी एक अत्यंत महत्वाचें बिल पास करण्यांत आलें. विवाहापूर्वीं वधूवरांस आपली प्रकृति डॉक्टराकडून तंपासून

घेऊन ती सदृढ आहे असें सर्टिफिकेट दाखल केल्याखेरीज त्यांना विवाह करण्यास बंदी करण्यांत आली. पूर्वी प्रमाणें वाटेल त्या रोगी, जर्जर माणसानें उठावें व लग्न करावे अशी जी परिस्थिती होती ती नष्ट झाली. सदृढ व वीर्यशाली प्रजा निर्माण व्हावी या हेतूनेंच सदर बिल पास करण्यांत आले. त्याजप्रमाणें तुर्की पुरुषांनीं परकी स्त्रियांशी लग्न न करतां, तुर्की स्त्रियांशींच लग्न केले पाहिजे अशी सक्ति करण्यांत आली.

शुक्रवार हा सुट्टीचा दिवस ठरविण्यांत आला. लहान लहान मुलांना आक्षिप्त सिनेमा पाहाण्याची किंवा हॉटेलमध्यें जाण्याची बंदी करण्यांत आली. रस्त्यांतून भीक मागत फिरणे हा गुन्हा समजण्यांत येऊं लागला.

स्वदेशी मालाला उत्तेजन मिळावे म्हणून कमालपाशांनीं आपले सर्व कपडे ओबडधोबड अशा स्वदेशी कापडाचेच बनविले. व्यापारी लोकांनीं आपला हिशेब व पत्रव्यवहार तुर्की भाषेतच ठेवावे असा कायदा जारी करण्यांत आला.

तुर्कस्थानामधील प्रमुख शहरांची रचना अद्यावत व सुंदर करण्याकरितां कमालपाशांनीं बर्लीनहून प्रोफेसर जेनसन आणि व्हीयन्नाहून प्रो. ओर्ली या तज्ज्ञांना बोलावून आणून त्यांच्या

नेतृत्वाखालीं शहरांची सुंदर आखणी केली. शहरांत ठिकठिकाणीं लहान लहान बगीचे उठविण्यांत आले. रस्त्यांच्या बाजूला सुंदर वृक्ष लावण्यांत आले.

कमालपाशांनीं शेतकीला उत्तेजन दिलें. एका दरीमध्यें त्यानीं एक सुंदर मॉडेल फॉर्म तयार केला होता. सकाळीं उठल्याबरोबर घोड्यावर बसून ते या फार्मकडे येत. शेतकी सुधारणेचे प्रयोग या फार्ममध्यें चालले होते. शेतकीला उपयुक्त अशीं आधुनिक अवजारें त्यांनीं मागविलीं होतीं. त्याचप्रमाणें उत्कृष्ट बैलांची पैदास व्हावी म्हणून त्यांनीं मोठमोठीं बक्षिसें लाविलीं. जनावरांना सकस अन्न कसें मिळेल, जनावरें धुष्टपुष्ट कशीं राहतील, उत्कृष्ट खत कसें तयार करतां येईल याचे प्रयोग शेतकी तज्ज्ञांकडून चालू होते. या शेतकी प्रयोग शाळेंत यशस्वी झालेले प्रयोग वर्तमानपत्रांचे द्वारा जाहीर केले जात. शेतकीकरितां एक भाग राखून ठेवलाच पाहिजे अशी कमालपाशांनीं वर्तमानपत्रकारांना सक्त ताकीद दिली होती. कोऑपरेटिव्ह सोसायट्या व शेतकी बँका यांनीं शेतकऱ्यांना उत्कृष्ट बी बीयाणें फुकट पुरवावीं असा

त्यांनीं हुकूम काढला होता. कमालपाशांना शेतकीचें इतकें महत्व वाटलें कीं, त्यांनीं जाहीरपणें सांगितलें, " आतां राष्ट्रानें कांहीं दिवस राजकारण अजिबात सोडून द्यावें व शेतकी आणि व्यापार याचा उत्कर्ष कसा होईल याच्याकडे लक्ष पुरवावें. "

शेतकी फार्मच्या कांठावरील मातीच्या ढिगावर बसून कमालपाशा आपलें राष्ट्र धनधान्यानें समृद्ध झालें आहे अशीं चित्रें मनःचक्षूसमोर आणीत व त्यांत दंग होऊन जात. शेतकीकडे पुढें पुढें तर त्यांचें इतकें लक्ष लागलें कीं, महत्वाचीं कामें देखील बाजूला ठेवून ते न चुकतां शेतकी फॉर्मकडे येत. हातांत नांगर धरून जमीन कुळविण्यांत, जमीनीची मशागत करण्यांत त्यांना अत्यंत आल्हाद वाटे. कित्येकवेळां चिखलानें भरलेले हात घेऊन, ते परराष्ट्रीय मंत्र्यांशी संभाषण करीत. जगांतील एक महान योद्धा आतां शेतकरी बनलेला पाहून त्या मंत्र्यांना सानंद आश्चर्य वाटे.

सगळीकडे उजाड व निकस झालेल्या जमिनींची मशागत सुरू झाली. ठिकठिकाणीं कालवे काढण्यांत येऊन शेतांमध्यें पाणी खेळविण्यांत आलें. आधुनिक पद्धतीच्या अवजारांचा अवलंब करण्यांत येऊं लागला. गरीब शेतकऱ्यांना मदत करण्याकरितां

शेतकी बँक काढण्यांत आली. सावकारांची मनधरणी न करतां, त्या शेतकऱ्यांना बँकेंतून, कोऑपरेटिव्ह सोसायट्यांमधून पैसा मिळूं लागला. इतकेंच नव्हे तर, त्यांना बीबियाणें देखील सरकारांतून फुकट मिळूं लागले.

अविश्रांत परिश्रम व चिकाटी यामुळें तुर्कस्थानांत शेतकीचा उत्कर्ष झाला. सकस व भरपूर धनधान्य तयार होऊं लागलें. सन १९२७ सालांत १३३३००० टन गहूं तयार झाला तर १९३१ सालांत २७१२००० टन गव्हाचें पीक आलें. त्याचबरोबर ठिकठिकाणीं कापूस व ताग यांची लागवड करण्यांत येऊन त्यावर सरकारी देखरेख ठेवण्यांत आली. अंगोरामध्यें 'शेतकी कॉलेज' स्थापन करण्यांत आलें.

निष्फळ बडबड किंवा वादविवाद न करतां, प्रत्यक्ष कृतीनें शेतकीचे प्रश्न तुर्कस्थानांत अत्यंत समाधानकारक रीतीनें सोडविण्यांत आले. शेतकीविषयीं तुर्कस्थानचे कृषिमंत्री शुक्री कया यांनीं फार मार्मिक उद्गार काढले आहेत; ते वावदूकांनीं तर लक्षांत ठेवण्या-सारखे आहेत. ते म्हणतात, "शेतकीचे प्रश्न सुंदर सुंदर वाक्यें व आल्हादकारक वादविवाद यांच्यामागें लपवून ठेवतां येत

नाहींत. ते प्रश्न जमिनीच्या पानावर स्पष्टपणें लिहिलेले असतात व कुठल्याही माणसास वाचतां येतात."

उद्योगधंदा व व्यापार वाढविण्याची खबरदारी घेण्यांत आली. लहान लहान खेड्यांत घरगुती धंदे सुरूं करण्यांत येऊन खेडुतांच्या पोटापाण्याची सोय करण्यांत आली. उद्योगधंदा कसा करावा याविषयीं ज्ञान देणाऱ्या धंदेशाळा ठिकठिकाणीं सुरूं करण्यांत आल्या. धंदेवाईक लोकांना भांडवल मिळावें म्हणून सर्व राष्ट्रभर बँका उघडण्यांत आल्या. मोठमोठे कारखानें व गिरण्या स्थापन करण्यांत येऊन राष्ट्रास लागणारा सर्व माल तेथें तयार होऊं लागला. विद्युतशक्ति खेड्यापाड्यांत देखील खेळविण्यांत आली. दुसऱ्या राष्ट्राच्या तोंडाकडे पहावयास लागूं नये म्हणून विमानांचा प्रचंड कारखाना सुरूं करण्यांत आला. कारखानदारांना भांडवल मिळावें म्हणून 'समर बँक' नांवाची एक मोठी बँक स्थापण्यांत आली.

मालाची वाहतूक करण्याकरितां सर्व भागांतून रेल्वे सुरूं करण्यांत आली. रेल्वेमुळें शेतीचे प्रांत व उद्योगधंद्याचे प्रांत जोडले गेले. तुर्कस्थानाच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत व पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत मुख्य फाटे पसरविण्यांत आले. काळ्या समुद्रापासून तो थेट भूमध्य समुद्रापर्यंत एक मुख्य रेल्वेलाईन सुरूं करण्यांत आली.

थोड्याच दिवसांत उद्योगधंद्याची व व्यापाराची भरभराट होऊं लागली. आतांपर्यंत मुख्य उद्योगधंदे, व्यापार, व बँकांचे व्यवहार ग्रीक लोकांच्या हातीं होते त संपूर्णपणें तुर्की लोकांचे हातीं आले. कमालपाशांच्या नेतृत्वाखालीं इतक्या लवकर तुर्कस्थानाचा उत्कर्ष कसा झाला हें मी सांगण्यापेक्षां एका जर्मन ग्रंथकारानें सांगितलेलें बरें. तो ग्रंथकार म्हणतो:--

"कमालपाशांच्या राजवटींत आर्थिक उत्कर्ष झालेला पाहून सारें जग आश्चर्यानें थक्क झालें आहे. हें शक्य कसें झालें? अंगोरामधील तुर्कांना हें कसें साधलें? याचें उत्तर अगदीं साधेसुधें आहे. त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले व बडबड करण्याचें काम दुसऱ्यावर सोपविलें. ऐक्य व प्रभावी नेतृत्व ही तुर्कस्थानाच्या आर्थिक उत्कर्षाची मुख्य कारणें आहेत. जें योग्य व व्यवहार्य आहे तें वाटेल तें करून तडीस नेण्याची ज्यांच्याजवळ हिंमत, अचुक निदान व जबरदस्त व्यवहारिक दृष्टी आहे त्या मुस्ताफा कमालपाशांचें नेतृत्व प्रत्येक बाबतींत मिळत होतें. आणि म्हणूनच थोड्या वर्षांत नव्या तुर्कस्थानानें जो उत्कर्ष व प्रगतीचा मार्ग आक्रमिला, तो मार्ग आक्रमावयास दुसऱ्या राष्ट्रांस कित्येक वर्षे—नव्हे शतकें—लागतील."×

× "Kemal AtaTurk" Page 233.

कमालपाशांनीं तुर्की जनतेस साक्षर करण्याकरितां अविश्रांत परिश्रम घेतले. तुर्कस्थानामध्यें शेंकडा ९ लोकांना देखील लिहितांवाचतां येत नव्हते. 'जनता अडाणी व अशिक्षित राहणें हें राष्ट्रास लांछनास्पद आहे' असें कमालपाशांना वाटत असे. कमालपाशांनीं तज्ज्ञांच्या साहाय्यानें सर्वसाधारण जनतेस सुगम होईल अशी सोपी लिपी तयार करून ती प्रथम आत्मसात केली. नंतर आपल्या देशबांधवांना साक्षर करण्याकरितां, स्वतःच्या नेतृत्वाखालीं, कमालपाशांनीं साक्षरतेची मोहीम सुरू केली.

एकाद्या शिक्षकाप्रमाणें फळा व खडूच्या कांड्याची पेटी घेऊन, कमालपाशांनीं सर्व राष्ट्रभर दौरा काढला. शहरांतील किंवा खेड्यांतील लोकांना चौकांत किंवा बाजारांत बोलावून, त्यांनीं साक्षरतेचे धडे देण्यास सुरवात केली. एकाद्या सरावलेल्या शिक्षकासारखी, त्यांची शिकविण्याची पद्धत पाहून तुर्की जनता चकित होत असे. कमालपाशांच्या अविश्रांत प्रयत्नामुळें पूर्वीं ज्यांना लिहितां वाचतां येत नव्हते ते लोक लिहूं व वाचूं लागले; सर्व देशांत साक्षरतेचे प्रयोग सुरू झाले. साक्षरतेपुढें महत्वाचीं कामेंही बाजूला पडूं लागलीं. मोठ्या उमेदींत सर्व जनता साक्षरतेमागें लागली. मशिदीमध्यें, उपहारगृहांत, सार्वजनिक ठिकाणीं, आपआपल्या घरच्या ओट्यावर अशिक्षित वृद्ध

तशीच तरुण मंडळी हातांत पाटी व पेन्सील घेऊन मुळाक्षरें घटवूं लागलीं.

जो कोणी भेटावयास येईल त्याला कमालपाशा तूं साक्षर आहेस कां म्हणून विचारीत. तुरुंगांत जे कैदी होते त्यांची सुटका होण्यापूर्वी त्यांना लिहितांवाचतां येते किंवा नाहीं यांची परिक्षा घेतली जात असे ज्यांना लिहितांवाचतां येतें त्यानांच बंधमुक्त करण्याचा कमालपाशांचा हुकूम असे.

तुर्की मुलांकरितां नवीन धर्तीच्या शाळा सुरूं करण्यांत आल्या. तुर्की मुलें ही उद्याच्या राष्ट्राचे आधारस्तंभ असल्यामुळें त्यांच्या शारिरिक व मानसिक विकासास वाव मिळेल असा शिक्षणक्रम आखण्यांत आला. कमालपाशांनीं मोठमोठ्या शिक्षण तज्ञांना बोलावून त्यांच्याहातीं शिक्षणाची सूत्रें दिली.

तुर्कस्थानामध्यें पुष्कळ हायस्कूलें होतीं; पण तीं परकियांनीं चालविलीं होतीं. त्यांपैकीं बरीच हायस्कूलें त्यांनीं बंद करून तुर्की लोकांनीं चालविलेलीं हायस्कूलें ठिकठिकाणीं प्रस्थापित केलीं. खेड्यापाड्यांमध्यें प्राथमिक शाळा उघडण्यांत आल्या.

शिक्षणाविषयीं कमालपाशांना किती आस्था वाटत होती त्याचें शब्दचित्र एका ग्रंथकारानें रेखाटलें आहे. तो म्हणतोः—

> कमालपाशा निरनिराळ्या शिक्षण संस्थास आकस्मिकपणें भेट देत; तेथील शिक्षकांची कशी काय तयारी आहे हें अजमावण्याकरितां त्यांना खोचक प्रश्न विचारीत; स्वतः मुलांची परिक्षा घेत; त्यांची अभ्यासांत किती प्रगती झाली आहे, त्यांची प्रकृति कशी आहे, त्याचे कौटुंबिक जीवन कसें चालले आहे याची काळजीपूर्वक चवकशी करीत आणि नंतर एका बाकावर विद्यार्थ्यांमध्यें बसून शाळेंत चाललेला पाठ ऐकत."×

कमालपाशांनीं शिक्षणाप्रमाणेंच स्काऊटच्या चळवळीस प्रोत्साहन दिलें; राष्ट्रीय तरुण दल स्थापन करण्यास मदत केली. शारीरिक शिक्षण व खेळ यांना उत्तेजन दिलें. अशा रीतीनें मुलांची बौद्धिक, मानसिक व शारीरिक वाढ व्हावी एतदर्थ कमालपाशांनीं अतिशय परिश्रम घेतले.

तुर्की भाषेचे पुनरुज्जीवन करण्याची चळवळ कमालपाशांनीं हातीं घेतली. त्याकरितां "तुर्की भाषेचें विद्यापीठ" प्रस्थापित करण्यांत आलें. तुर्की भाषेचा व इतिहासाचा अभ्यास करण्याचें

× "Kemal AtaTurk" Page 236.

कार्य या संस्थेनें सुरू केले. मूळ व जुने तुर्की शब्द हुडकून काढणें हा एक त्या संस्थेचा कार्यभाग होता. जुनी लोकगीतें, म्हणी यांची माहिती ज्यांना असेल त्यांनीं ती माहिती वरील संस्थेस कळविण्याची सरकारी आज्ञा झाली होती. त्या माहितीचे संशोधन करून त्याची प्रसिद्धी मासिकांमधून व वृत्तपत्रांमधून सदर संस्था करीत असे. अलिकडे तुर्की भाषा बरीच समृद्ध झाली आहे. पवित्र कुराण व हदीस यांचे भाषांतर तुर्की भाषेंत करण्यांत आले आहे.

तुर्की कलेला उत्तेजन देण्याकरितां ललितकला विद्यापीठ कॉन्स्टँटिनोपलमध्यें प्रस्थापित करण्यांत आलें. त्यामधून ललितकला, तज्ज्ञांकडून शिकविण्यांत येऊं लागल्या. संगीत कलेला प्रोत्साहन देण्यांत आले. तंतुवाद्यावर विशेष भर दिला जात असे. " संगीताची अवहेलना करणें म्हणजे राष्ट्रीय वृत्तीमधील एक महत्वाची उणीव दाखविणें होय " × असे उद्गार कमालपाशांनीं काढले आहेत. संगीताचा पद्धतशीर अभ्यास व्हावा म्हणून ' संगीत हायस्कूल ' सुरू करण्यांत आले. संगीतामधें हुशारी दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष अभ्यासासाठीं परदेशांत सरकारी खर्चानें पाठविण्यांत आले. तुर्कस्थानांमधील दोन वाद्यविशारद जमील रशीद व सैफुद्दीन यांनीं परदेशांत आपली कीर्ती गाजविली आहे.

× " Kemal AtaTurk " Page 240

त्याचप्रमाणें कमालपाशांनीं प्रशंसनीय लष्करी सुधारणा केल्या. तुर्कस्थानाचें लष्करी सामर्थ्य सर्व दृष्टीनें कार्यक्षम व्हावें याकरितां कमालपाशांनीं अतिशय परिश्रम घेतले. युरोपांतील अव्वल दर्जाच्या लष्करी सामर्थ्याबरोबर टक्कर द्यावयाचा प्रसंग आला तर आपणांस कच खाण्याचा प्रसंग येऊं नये किंवा हताश होऊन बसण्याची पाळी येऊं नये म्हणून कमालपाशांनीं आपल्या राजवटीच्या सुरवातीपासूनच अत्यंत खबरदारी घेतली. सैन्याप्रमाणेंच आरमार व हवाईदल यांमध्यें कमालपाशांनीं अद्यावत सुधारणा करून तुर्की लष्करास युरोपामध्यें पहिल्याप्रतीचे स्थान प्राप्त करून दिले.

एका आंग्ल साप्ताहिकांत × "How strong is Turky" या मथळ्याखालीं पुढील महत्वाचा मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

> "खास तज्ज्ञाकडून लष्कराचे प्रत्येक खातें अद्यावत केले गेले आहे..........तुर्कस्थानामध्यें दारुगोळा, स्फोटक द्रव्यें आणि हत्यारें-पात्यारें तयार करण्याचे अनेक कारखानें सुरूं झाले आहेत.

---

× "Illustrated Weekly of India", 3 Dec. 1939.

तुर्कस्थान निःसंशय बळवान झाला आहे. त्याच्या लष्करी सामर्थ्यानें इज्जत मिळविली आहे. तुर्कस्थानाचें हल्लींचें आरमार पूर्वीच्या बादशाही आरमारापेक्षां अत्यंत विश्वासाचें व कार्यक्षम आहे. तुर्की आरमार म्हणजे समुद्रावरील एक उत्कृष्ट प्रतीची व सन्मान्य अशी लहानशी शक्ति होय."

विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे तुर्कस्थानाच्या वैमानिक दलांत तुर्की स्त्रियांचा झालेला समावेश होय. तुर्की पुरुषांच्या बरोबरीनें व तितक्याच कार्यक्षमतेनें तुर्की मुसलमान स्त्रिया वैमानिक दलांत काम करीत आहेत. "या वैमानिक स्त्रियांचा पुढारीपणा कमालपाशांच्या मानलेल्या कन्यका लेफ्टनंट सबीहा गोकन या पराक्रमी व धाडसी मुसलमान स्त्रीकडे आहे." × अगदीं अलीकडे तर, तुर्की स्त्रियांनीं याहिपुढें मजल मारली आहे. हल्लीं तुर्की सैन्यांत हजारों पॅरॉशूट (छत्रीधारी) तुर्की स्त्री सैनिकांचा समावेश झाला आहे. आजपर्यंत, पॅरॉशूट सैनिक होण्याचे प्राणांतिक धाडस फक्त पुरुषच करीत; पण तुर्की स्त्रियांनीं

× "Illustrated Weekly of India", 23 Oct. 1938.

ते धाडस करून दाखवून, जगास चकित करून सोडले आहे. पॅरॉशूट स्त्री सैनिक होण्याचा मान तुर्की स्त्रियांनीं जगांमध्यें पहिला प्रथम पटकाविला आहे ही गोष्ट निःसंशय उल्लेखनीय आहे.

"लढाई पुकारली गेली तर हजारों पॅरॉशूट तुर्की स्त्रीसैनिक लढण्याकरितां आयुधांसह सुसज्ज आहेत."=

विमानांची घरघर ऐकल्याबरोबर घाबरून लपून बसणाऱ्या पूर्वीच्या तुर्की स्त्रिया व विमानांमध्यें बसून बॉम्बफेक करणाऱ्या व विमानांतून पॅरॉशूटच्या साहाय्यानें धडाधड उड्या टाकणाऱ्या हल्लींच्या धाडसी तुर्की स्त्रिया यांमधील आश्चर्यकारक फरक कमालपाशांच्या कर्तृत्वाची पुरेपूर साक्ष देत आहे.

---

= " The Sunday Standard ", 13 July 1941.

## प्रकरण ३० वें

—xx—

# अतातुर्क

कमालपाशांनीं केलेल्या सुधारणांचें स्वागत नवजवान तुर्कांनीं मनःपूर्वक केलें; पण जुनाट व अगतिक लोकांचें मात्र पित्त खवळलें. कमालपाशांच्या सुधारणा म्हणजे आपल्या धर्माला गळपास होय अशी त्यांनीं मुर्खपणाची कल्पना करून घेतली. प्रगती हें खऱ्या धर्माचें ध्येय असतें याचा त्यांना कायम विसर पडला होता. धर्म म्हणजे रूढी व गतानुगतिकत्व अशी त्यांची विचारसरणी असल्यामुळें, या लोकांनीं कमालपाशांविरुद्ध कोल्हेकुई सुरू केली. मुल्लामौलवींनींहि यांत आपला सूर मिळविला; इतकेंच नव्हे तर, कमालपाशांची नवी राजवट धुळीस मिळविण्याचा शेवटचा जोराचा प्रयत्न केला.

स्मर्नाजवळ असणाऱ्या मेनमन नांवाच्या खेडेगांवांत राहणाऱ्या एका धर्ममार्तंडानें या असंतुष्ट लोकांचें पुढारीपण

स्वीकारलें. हा धर्ममार्तंड नक्शबंदी या नांवानें ओळखला जात होता. कमालपाशांचें राज्य हें सैतानाचें राज्य आहे; या राज्याला नेस्तनाबूद करून अल्लाचें राज्य प्रस्थापित करण्याचा आपला इरादा आहे—नव्हे अल्लाची आज्ञा आहे—अशा प्रकारचा जाहीर प्रचार सुरू केला. दुर्दैवानें त्याला अनुयायी पण बरेंच मिळूं लागले.

एक दिवस भर बाजारांत या धर्ममार्तंडानें कमालपाशा विरुद्ध प्रचार चालविला होता. त्याचवेळीं लेफ्टनंट कुबला नांवाचे एक लष्करी अधिकारी जात होते. कमालपाशांची व त्यांच्या राजवटीची निंदा सहन न होऊन त्यांनीं त्या धर्ममार्तंडास आपलें भाषण बंद करण्यास सांगितलें. त्यांच्याकडे लक्ष्य न देतां धर्ममार्तंडानें आपलें प्रवचन पुन्हां सुरू करतांच लेफ्टनंट कुबला यानीं त्या धर्ममार्तंडास व्यासपीठावरून खालीं ओढले. त्याबरोबर तेथें जमलेल्या लोकांनीं व मुल्लामौलवींनीं लेफ्टनंट कुबला यांच्यावर हल्ला करून त्यांना ठार मारलें व त्यांचे शिर तोडून एका भाल्यावर अडकविलें. नंतर त्या धर्ममार्तंडानें व मुल्लामौलवींनीं प्रमुख रस्त्यांमधून तें शिर मिरवित नेलें.

अंगोरा येथें ही भयानक बातमी पोहोंचतांच ताबडतोब लष्कर पाठविण्यांत येऊन त्या धर्ममार्तंडाचा व त्यांच्या अनुयायांचा

पुरता बीमोड करण्यांत आला. ठिकठिकाणीं लपूनछपून प्रचार करणाऱ्या मुल्लामौलवींना अटक करण्यांत येऊन त्यांची तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. अशा रितीनें कमालपाशांच्या विरुद्ध निष्कारण उठविलेलें भूत एकदाचें कायम गाडलें गेलें, आणि कमालपाशा धर्मशत्रू आहेत अशी धादांत खोटी ओरड सारखी चालू होती ती आपोआप बंद पडली.

कमालपाशांच्या धर्मासंबंधीं कल्पना स्पष्ट व सडेतोड होत्या. राष्ट्रावर सर्व धर्मांच्या लोकांचा सारखाच हक्क असल्यामुळें कुठलेंही राष्ट्र एकधर्मीय होऊं शकत नाहीं किंबहुना धर्मभेदातीत राष्ट्र असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. धर्माबद्दल त्यांना अनादर नव्हता पण धर्माच्या नांवावर ज्या चीड आणणाऱ्या गोष्टी घडतात त्यावर आणि अशा गोष्टींना प्रोत्साहान देणाऱ्या धर्मांध, ढोंगी आणि प्रतिगामी मुल्लामौलवींवर मात्र त्यांचा रोष होता. खरा धर्म जाणणाऱ्या, उदारमतवादी मुल्लामौलवीं विरुद्ध त्यांनीं कधींही अनादर दाखविला नाहीं. कमालपाशांचे धर्मासंबंधीं खालील विचार अत्यंत मननीय आहेत. ते म्हणतात, " धर्माचा गैरउपयोग करून घेण्यामुळेंच सर्व संकटें उपास्थित होतात. राज्य करते वेळीं ज्याला धर्माचें साहाय्य अवश्यक वाटते तो मनुष्य

मी कमजोर समजतो. धर्म ही वैयक्तिक बाब आहे. प्रत्येकानें आपआपला धर्म खुशाल आचरावा. माझ्या राज्यांतील प्रत्येक व्यक्तीस मी पूर्ण धर्मस्वातंत्र्य दिलें आहे. "

कमालपाशा इस्लामधर्माविरुद्ध आहेत; त्यांनीं धर्म पायाखालीं तुडविला आहे असा जो आक्रोश केला जातो त्याच्या बुडाशीं बरेचसें राजकारण आहे. कमालपाशा सारख्या पराक्रमी व स्वातंत्र्यवीरास जगांतील मुसलमानांची व मुसलमान राष्ट्रांची सहानुभूती मिळूं नये या उद्देशानेंच कमालपाशा विरुद्ध जहरी प्रचार सुरू झाला होता; आणि या प्रचारास धर्मांध व अक्कलशून्य मुल्लामौलवींनीं हातभार लावल्यामुळें सबंध इस्लामी जग कमालपाशांविरुद्ध आहे, असें भासविण्यांत येत होते. पण कमालपाशांच्या मृत्यूनंतर कमालपाशांबद्दल इस्लामी जगाला किती आदर वाटतो हे स्पष्टपणें निदर्शनास आलें आहे.

तुर्कस्थानामध्यें दहा वर्षें वास्तव्य करणाऱ्या मिस् रूथ वुडस्माल या पाश्चात्य लेखिकेनें, कमालपाशांच्या धर्मविषयक धोरणाचें स्पष्टपणें आविष्करण केलें आहे. त्या म्हणतात:—

> " हल्लींचा सुधारलेला तुर्कस्थान धर्मांधता व धर्मवेड याविरुद्ध आहे; खऱ्या धर्माविरुद्ध नाहीं."×

खरा धर्म राष्ट्रीयत्वाच्या किंवा प्रगतीच्या कधींच आड येत नाहीं; किंबहुना राष्ट्रीयत्वाचा व प्रगतीचा पुरस्कार हेच खऱ्या धर्माचे लक्षण असते. जगांत सत्य, शिव व सुंदर असेल ते आत्मसात करण्याची शिकवण धर्म देत असतो. एकाच जागीं कुढत न बसतां जगाच्या प्रगतीबरोर मधांव जाण्याची हिंमत धर्माकडून मिळत असते. अशा सच्चा इस्लामधर्माचें कमालपाशा पुरस्कर्ते होतें. त्यांच्या बद्दल बॉम्बे क्रॉनिकल पत्राच्या मुसलमान संपादकांनीं एका अग्रलेखांत काढलेले उद्गार अत्यंत मननीय आहेत. ते म्हणतात, '

> " कमालपाशांनीं व नव्या तुर्कस्थानानें अमलांत आणलेल्या सुधारणा इस्लामधर्माविरुद्ध आहेत असा आरोप करणें म्हणजे कमालपाशांची निंदा करणें होय. खरे पाहिले असतां कमालपाशांनी व नव्या तुर्कस्थानानें इस्लाम धर्माच्या मूलभूत

---

× " Moslem Women enter a new world " by Miss Ruth Woodsmall.

> पावित्र्याचें पुनरुज्जीवन केलें आहे आणि बदलत्या काळाच्या प्रागतिक विचारसरणीचें स्वागत करणें हे परमपूज्य पैगंबरांच्या शिकवणीचें सार आहे, याची जगांतील साऱ्या मुसलमानांना आठवण करून दिली आहे. " ×

राष्ट्रांत आपल्याविषयीं व आपला राजवटीविषयीं अज्ञानपणामुळें असंतोष घुमसत राहूं नये म्हणून कमालपाशांनीं सर्व राष्ट्रभर दौरा काढला. ठिकठिकाणीं लोकांच्या मुलाखती घेतल्या, त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें व त्यांच्या गैरसमज दूर करून टाकला.

आणखी कांहीं तक्रारी असल्यास, त्या मांडण्यास जनतेला संधी मिळाली म्हणून कमालपाशांनीं असेंब्लीत एक विरोधी पक्ष तयार करण्यास आज्ञा दिली. त्याकरितां लंडन येथें कामगिरीवर असणाऱ्या फतेही नांवाच्या तुर्की अधिकाऱ्यास कमालपाशांनीं परत अंगोरास बोलावून घेतलें. फतेही यांनीं "इनडिपेंडंट रिपब्लीकन पार्टी" नांवाचा सरकारविरोधी पक्ष तयार केला. कमालपाशांच्या या नव्या योजनेस कांहीं पुढाऱ्यांनीं विरोध केला. हल्लींचें सरकार

× Bombay Chronicle, 12 Nov. 1938.

इतकें उत्कृष्ट कार्य करीत असतां विरोधी पक्ष असण्याचें कांहींच कारण नाहीं असा त्यांचा युक्तिवाद होता. कमालपाशांनीं त्यांच्या युक्तिवादाकडे लक्ष दिले नाहीं. विरोधी पक्ष असल्याखेरीज जनतेचें अंतःकरण कळणें शक्य नाहीं असा कमालपाशांचा ठाम ग्रह झाला होता. शिवाय आपण एकमेव सत्ताधिकारी आहोंत अशी जनतेला कुरकुर करण्यास संधि मिळूं नये व त्या संधिचा फायदा घेऊन अराजक लोकांना जनतेमध्यें असंतोष निर्माण करावयास जागा मिळूं नये हाच मुख्य उद्देश विरोधी पक्ष तयार करतेवेळीं कमालपाशांनीं आपल्यासमोर ठेवला होता.

नॅशनल ग्रँड असेंब्लीच्या नवीन निवडणुकीच्या नौबती वाजूं लागल्या. या निवडणुकींत निवडून येण्याकरितां विरोधी पक्षानें जोराचा प्रचार सुरू केला. जनतेनें आपल्या कल्याणाकरितां विरोधी पक्षांतील उमेदवारांस मतें द्यावींत अशी सर्व राष्ट्रभर याचना सुरू झाली.

आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या मतयाचनेचा जनतेवर उलटा परिणाम झाला. कमालपाशांच्या कर्तृत्वावर व नेतृत्वावर जनतेचा असीम विश्वास होता; कमालपाशांच्या प्रगतीपर राजवटीवर जनता निहायत खूष होती; त्यांच्या नेतृत्वावर अखिल राष्ट्राचा अढळ

विश्वास होता. कमालपाशांचे, आपल्या उद्धारकर्त्यांचें कर्तृत्व हाणून पाडण्याकरितां, त्यांचें नेतृत्व छिनावून घेण्याकरितांच हा विरोधी-पक्ष निर्माण झाला आहे अशी सर्वसाधारण जनतेची कल्पना झाल्यामुळें, विरोधीपक्षांतील उमेदवारांवर जनता खवळून गेली. विरोधीपक्षाचा उमेदवार भेटेल तेथें बडवून काढण्याचे प्रकार सर्वत्र सुरू झाले. मतयाचना करणें दूरच पण घराबाहेर पडण्याचे उमेदवारांना मुष्कीलीचें झालें. शेवटीं या उमेदवारांना पोलीसांचें संरक्षण द्यावें लागलें. नाईलाजानें, विरोधी पक्षाचे नेते फतेही यांनीं त्या पक्षाचा राजीनामा दिला.

अशा रीतीनें असेंब्लीमधील विरोधी पक्षाचा, निवडणूक होण्यापूर्वींच पुरता बोजवारा उडाला. शेवटीं नाईलाजानें असेंब्लीमध्यें एकच पक्ष कायम ठेवणें भाग पडले. या प्रकारामुळें, कमालपाशांच्या नांवानें अहर्निश खडे फोडणाऱ्या व त्यांच्या राजवटीवर बेगुमान टीका करणाऱ्या लोकांचीं तोंडें मात्र कायमची बंद झाली. "कमालपाशांच्या कट्टर विरोधकांना कबूल करावे लागेल कीं जगांत अशक्य वाटणारी गोष्ट कमालपाशांच्या राजवटींत शक्य होऊं शकते "× असे जे एका ग्रंथकारानें उद्गार काढले आहेत ते अगदीं यथार्थ आहेत, असें म्हणावें लागतें.

× "Kemal AtaTurk", Page 245.

आपल्यास विरोध करणारा एकही पक्ष नाहीं म्हणून मन मानेल तसा राज्यकारभार करण्याचा झोटींगशाही विचार कमालपाशांच्या मनास कधींहीं शिवला नाहीं; किंवा सर्वाधिकारी-त्वाच्या जोरावर वाटेल तो धिंगाणा घालण्याची बुद्धीही त्यांना झाली नाहीं. आपलें राष्ट्र उत्कृष्ट दर्जाचें कसें होईल, आपली राजवट आदर्शवत कशी बनेल या उच्चविचारांत ते सदैव गढून गेलेले असत. अविश्रांत परिश्रम करून कमालपाशांनीं ते विचार प्रत्यक्ष अमलांत आणून दाखविलें हें खालील उताऱ्यांवरून सिद्ध होईल.

> " राज्याची सबंध पद्धत दुरुस्त केली गेल्यामुळें कित्येक वर्षें त्रस्त झालेल्या तुर्कस्थानाला अत्यंत कार्यक्षम अशा राज्यपद्धतीचा लाभ झाला....गेलीं दहावर्षें कमालपाशांनीं तुर्कस्थानावर अत्यंत शहाणपणानें राज्य केलें आहे." *

> " तुर्कस्थानामधील राज्यपद्धती नुसती सुधारली गेली नाहीं तर तिनें थोड्या वेळांत व अशा पद्धतीनें इतकी झपाट्यानें प्रगती करून घेतली

---

* " Concise History of tho World ", Page 736.

आहे कीं, युरोपांतील कित्येक राष्ट्रांना त्याबद्दल हेवाच वाटावा." ×

कमालपाशांनीं तुर्कस्थानावर केलेल्या महान उपकारांतून अंशतः कां होईना, उतराई होण्याकरितां, नॅशनल ग्रॅंड असेंब्लीनें तारीख २४ नोव्हेंबर १९३४ इसवी रोजीं त्यांना "अतातुर्क" (तुर्कांचा पिता) अशी बहुमानाची पदवी अर्पण केली. कमालपाशांच्या सन्मानार्थ सर्व राष्ट्रभर आनंदोत्सव करण्यांत आला. कमालपाशांच्या दर्शनाकरितां राजधानींमध्यें तुर्की जनतेची रीघ लागून राहिली होती. कमालपाशांनीं तुर्की जनतेस दर्शन दिलें. कमालपाशांना पाहतांच जनता आनंदानें वेडी झाली व तिनें कानठळ्या बसेपर्यंत त्यांच्या नांवाचा जयजयकार केला. कमालपाशा म्हणाले:—

"माझ्या देशबांधवांनों, माझ्या मूर्तीकडे पाहून आनंद व्यक्त करूं नका. माझ्या ध्येयाशीं व कल्पनाशीं समरस होण्याचा प्रयत्न करा. माझें तुमच्यावरील प्रेम अढळ व शाश्वत आहे. आपल्या परस्पर प्रेमांतच खरें सामर्थ्य आहे. नव्या युगांत आपला देश, आपलें राष्ट्र श्रेष्ठ व उन्नत झाले पाहिजे."

---

× "Kemal AtaTurk", Page 245.

यानंतर लवकरच असेंब्लीमध्यें " कमालपाशांनीं तुर्की प्रजासत्ताक राज्याचे तहाहयात अध्यक्ष राहावे " असा अभूतपूर्व ठराव पास करून, अखिल तुर्की राष्ट्रानें कमालपाशांविषयीं वाटणारी आपली कृतज्ञता जाहीरपणें व्यक्त केली. हयात असेपर्यंत प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष होण्याचा मान जगामध्यें कमालपाशांनीं पहिल्या प्रथम मिळविला, हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे.

कमालपाशांच्या यशस्वी कारकिर्दींमधील अत्यंत महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनीं एकेकाळीं कट्टर दुष्मन असणाऱ्या राष्ट्रांशी केलेले अनाक्रमणाचे व स्नेहचाचे तह होय. महायुद्धांत तुर्कस्थानाचा लचका तोडण्यास तयार झालेल्या रशियांशीं कमालपाशांनीं सन १९२५ सालीं तटस्थतेचा व अनाक्रमणाचा तह केला. अशाच तऱ्हेचा तह फ्रान्सशीं सन १९२९ सालीं करण्यांत आला.

सर्वांत महत्वाचा तह म्हणजे तुर्कस्थानाला नेस्तनाबूद करूं पाहणाऱ्या ग्रीक राष्ट्राबरोबर सन १९३२ सालीं झालेला तह होय. ग्रीक व तुर्क यांचें अहितकुळवत सख्य होतें हें आपण मागें पाहिलेंच आहे. ग्रीकांनीं तुर्कांवर अनातोलियामध्यें केलेल्या भयंकर अत्याचाराची अद्याप विस्मृती पडली नव्हती. त्यांनीं तुर्कांच्या अंतःकरणावर केलेली जखम अद्याप भरून निघाली

नव्हती. कमालपाशांनीं ग्रीकांविषयीं आपला राग गिळून टाकला व मैत्रीचा हात त्यांच्यापुढें केला. कमालपाशा अभिजात शांततावादी असल्याकारणानें, त्यांच्या अंतःकरणांत द्वेषाला मूळ धरावयास जागा नव्हती. प्रसंगाबरोबरच सर्व कांहीं विसरून जाण्याची त्यांची खेळाडूवृत्ती होती. या वृत्तीला अनुसरून, त्यांनीं ग्रीक राष्ट्राबरोबर स्नेहाचें व प्रेमाचें नवें नातें जोडलें व तें यशस्वी करून दाखविलें.

अनेक अप्रिय स्मृतींना मूठमाती देऊन, कमालपाशांनीं अगदीं अलीकडे ब्रिटिश साम्राज्याशीं नवा व महत्वाचा स्नेहसंबंध जोडला. ब्रिटिश साम्राज्याचे बादशहा, हिज मॅजेस्टी आठवे एडवर्ड यांनीं सप्टेंबर १९३६ मध्यें तुर्कस्थानास भेट देऊन हे स्नेहसंबंध अधिक दृढ केले.

कॉन्स्टॅंटिनोपल (इस्तंबूल) मध्यें एडवर्ड बादशहांचा अभूतपूर्व असा सत्कार करण्यांत आला. भव्य अशा राजप्रासादांत एडवर्ड बादशहा व कमालपाशा यांनीं प्रेमानें हस्तांदोलन केलें. ब्रिटन व तुर्की राष्ट्र यामध्यें अभेद्य स्नेहसंबंध राहावा हाच त्या हस्तांदोलनाचा अर्थ होता. एकेकाळीं शत्रू असणाऱ्या दोन राष्ट्रांच्या प्रतिनिधींचा स्नेहसोहाळा पाहून, तेथून जवळच गॅलीपोलीच्या धारातीर्थी पडलेल्या लाखों ब्रिटिश व तुर्की सैनिकांच्या आत्म्यास खात्रीनें समाधान व सौख्य वाटलें असेल.

सन १९३६ साली तुर्कस्थानाच्या इतिहासांत सोन्याच्या अक्षरानीं लिहून ठेवण्यासारखा महत्वाचा प्रसंग घडून आला. महायुद्धानंतर दार्दानेलीस व बास्फरस सामुद्रधुन्या व त्या सामुद्रधुन्यावर असणाऱ्या किल्ल्यांचा ताबा तुर्कस्थानाकडून काढून घेण्यांत आला होता. हा अत्यंत महत्वाचा ताबा आपणांस मिळावा म्हणून कमालपाशांनीं प्रयत्न सुरू केले. सुदैवानें या प्रयत्नांस लवकरच यश येऊन तुर्कस्थानाला पूर्वीचें वैभव प्राप्त झाले. जुलै सन १९३६ साली मांट्रो कॉन्फरन्स भरून त्या कॉन्फरन्समध्यें सामुद्रधुन्या, तुर्कस्थानाच्या ताब्यांत, बिनशर्त देण्याबद्दल तहनामा झाला. या कॉन्फरन्समध्यें जमलेल्या युरोपीयन राष्ट्रांच्या प्रतिनिधींना तहनाम्यावर सह्या करण्यांकरितां तुर्की सरकाराकडून सोन्याची फाऊंटनपेन्स नजर करण्यांत आली.

> " मॉंट्रो कॉन्फरन्समध्यें बास्फरस व दार्दानेलीसवर ताबा मिळाल्याबरोबर एका क्षणांत तुर्की राष्ट्रास विलक्षण महत्व प्राप्त झालें. रशियासारख्या बलवान राष्ट्रास व भूमध्य समुद्रालगत असणाऱ्या प्रदेशांस तुर्की राष्ट्राची आराधना करण्याची जरूरी भासूं लागली." ×

× " Islam in the World ", Page 263.

## प्रकरण ३१ वें

—xx—

# आयुष्याचा शेवट

आपल्या राष्ट्राच्या उद्धाराकरितां अविश्रांत केलेल्या परिश्रमांचा परिणाम कमालपाशा यांच्या प्रकृतीवर होऊं लागला. डॉक्टरांनीं संपूर्ण विश्रांती घेण्याबद्दल त्यांना किती वेळां तरी बजावले असेल; पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. " आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत माझ्या परमप्रिय राष्ट्राकरितां झटणें हें माझें महान व पवित्र कर्तव्य आहे असें मी समजतो " अशा शब्दांत डॉक्टर लोकांची ते बोळवण करीत.

शेवटीं सन १९३८ सालच्या आक्टोबर महिन्यांत त्यांची प्रकृति ढांसळली व त्यांनीं बिछाना धरला. त्यांच्या प्रकृतीला आराम वाटेना. औषधी इलाजाची परमावधि होत होती. प्रत्येक मशिदीमध्यें अतातुर्क यांना आराम वाटावा म्हणून दररोज प्रार्थना सुरू झाल्या. युरोपमधील नामांकित डॉक्टरांचे उपचार सुरू झाले.

पण कमालपाशांना आराम वाटण्याचें चिन्ह दिसेना. कमालपाशांनीं अध्यक्षपदाचा राजिनामा २९ आक्टोबर रोजीं ग्रँड नॅशनल असेंब्लीकडे पाठवून दिला; परंतु असेंब्लीने कमालपाशांचा राजीनामा मंजूर केला नाहीं. 'कमालपाशा जिवंत आहेत तोपर्यंत ते तुर्की प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष राहिले पाहिजेत' असा कृतज्ञतेनें भरलेला ठराव असेंब्लीनें मंजूर केला. कमालपाशांच्या हयातींत दुसरा अध्यक्ष निवडावा ही कल्पनाही राष्ट्रप्रतिनिधींना सहन झाली नाहीं. कमालपाशांच्या लोकप्रियतेचा यापेक्षां जास्त पुरावा कोणता पाहिजे!

रमझानचा पवित्र महिना आणि ता.१०नोव्हेंबर १९३८चा तो दिवस. कमालपाशांचा अंतःकाल समीप आला. तुर्की जनतेच्या अंतःकरणाची कालवाकालव सुरू झाली. सबंध राष्ट्रावर दुःखाची व निराशेची घनदाट छाया पसरली. कमालपाशांच्या बिछान्या भोंवतीं डॉक्टर, त्यांची बहीण मकबुला, मुख्य प्रधान इस्मन इनून, असेंब्लीचे अध्यक्ष व सर्व मंत्री हजर होते. बाहेर अफाट जनसमुदाय जमला होता. सबंध वातावरणांत भयाण निस्तब्धता पसरली होती.

कमालपाशानीं डोळे उघडले; त्यांचे ओंठ हलूं लागले; क्षीण आवाज ऐकूं येऊं लागला; आणखी जास्त निस्तब्धता पसरली.

" माझ्या अत्यंत प्रिय व लाडक्या राष्ट्रास चांगल्या अवस्थेंत सोडून जात आहे याबद्दल मला अत्यंत समाधान वाटते. मी जें कार्य हातीं घेतलें होतें तें कार्य यथाशक्ति पूर्ण करून मी मोठ्या आनंदानें परमेश्वराच्या घरीं जात आहे. राष्ट्राचा संभाळ करा....".* आवाज क्षीण होत होत हवेंत विलीन झाला. जमलेल्या सर्व लोकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. कमालपाशांच्या भगिनींना हुंदका आवरेना. पुन्हां हालचाल सुरूं झाली. कमालपाशानीं डोळें उघडले व स्पष्ट आवाजांत 'कल्मे शहादत,' म्हणून कायमचे डोळे झाकले. जगास वंद्य होऊन राहणारा आत्मा परमेश्वर चरणीं विलीन झाला.

एका क्षणांत एकच हाहा:कार उडाला. रेडियोवरून कमालपाशांच्या मृत्यूची बातमी सर्व जगभर कळविण्यांत आली. सगळीकडे दु:खाची छाया पसरली. जगांतील प्रत्येक राष्ट्राकडून दुखवट्याचे संदेश पाठविण्यांत आले.

---

* " अतातुर्क " ले. मुनशी नदीम फिरोझपुरी, पृष्ठ १५७

ठिकठिकाणीं दुःखवट्याच्या सभा भरविण्यांत आल्या. हिंदुस्थानामध्यें तर सर्व मताच्या, सर्व धर्माच्या जनतेकडून शोक प्रदर्शित करण्यांत आला. राष्ट्राध्यक्ष बाबू सुभाषचंद्र बोस यांनीं ता. १९ हा दिवस " कमाल दिन " म्हणून सर्व हिंदुस्थानभर पाळण्यांत यावा असें फर्मान काढलें.

तुर्की जनतेच्या दुःखास तर पारावार राहिला नाहीं. राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून लोकांच्या थवेच्याथवे आपल्या उद्धारकर्त्याच्या दर्शनास येऊं लागले. पोलीसांना बंदोबस्त करणें अशक्य होऊन गेले. शेवटीं एका प्रशस्त जागीं कमालपाशांचे पार्थिव शरीर ठेवण्यांत आले. लाखों तुर्की प्रजाजनांनीं भरलेल्या डोळ्यांनीं आपल्या पित्याचे शेवटचे दर्शन घेतलें.

इस्लामी पद्धतीप्रमाणें शेवटची "जनाजा नमाज" पढविण्यांत आल्यावर स्मशानयात्रा निघाली. स्मशानयात्रेस लाखों लोकांचा जनसंमर्द लोटला होता. पावलागणीक शवास हार घालण्यांत येत होते. पुढें पुढें तर इतकी गर्दी वाढली कीं, " त्या गर्दीत ११ लोक चिरडून मेले "* शेवटीं एका सुंदर कबरीमध्यें कमालपाशांचा दफनविधी करण्यांत आला. दफनविधी झाल्याबरोबर निरनिराळ्या

---

* " Illustrated Weekly of India ", 18 Dec. 1938.

राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं कबरेवर आपआपल्या राष्ट्रातर्फें हार घातले. नंतर अफाट जनसमुदाय जड अंतःकरणानें परत फिरला.

कमालपाशांचें अभूतपूर्व व प्रभावी आयुष्य संपलें; पण त्या आयुष्यानें मृतप्राय झालेल्या एका राष्ट्रास नवजीवन दिलें, गुलाम व लाचार झालेल्या लोकांना गदगदां हलवून जागें केलें, ऐदी व बुरसलेल्या मनोवृत्तींना सप्तपाताळांत गाडून टाकले, धर्मांध झालेल्या लोकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले, आपल्या मर्जीप्रमाणें जगाचा नकाशा बदलला पाहिजे अशी वल्गना करणाऱ्या मुत्सद्यांचा दिमाख उतरून टाकला, पारतंत्र्यांत पिचत पडलेल्या अभागी लोकांत चेतना निर्माण केली आणि असंख्य स्वातंत्र्योपासकांच्या हृदयांत अढळ व उच्च स्थान मिळविलें.

तुर्कस्थानाच्या परिस्थितीचा व कमालपाशांच्या आयुष्यकथेचा बारकाईनें विचार केला तर अगदीं अलिकडच्या शतकांत कमालपाशांइतकें कीर्तिशिखर कुणी गांठलें नाहीं असें आपणांस निर्विवाद म्हणावें लागेल.

प्रकरण ३२ वें

—०—

# असामान्य विभूती

कमालपाशांचा उल्लेख केला कीं जगद्विख्यात झालेल्या हल्लींच्या मोठमोठ्या राष्ट्रधुरीणांची मालिका नजरेसमोर उभी राहते. आपल्या झोटिंगशाही वृत्तीनें या राष्ट्रधुरीणांनीं स्वतःविषयीं घृणा उत्पन्न केल्यामुळें सध्यांचे राष्ट्रधुरीण म्हणजे एका माळेचे मणी असा ग्रह होणें स्वाभाविक आहे. पण कमालपाशांच्या चरित्राचें काळजीपूर्वक परिशीलन केल्यानंतर वरील दूषित गृह बदलणें भाग पडतें.

कमालपाशांनीं आपल्या राष्ट्रांत आमूलाग्र क्रांति करण्याचें विचारपूर्वक ठरविलेलें ध्येय, तें प्राप्त करून घेण्याकरितां त्यांनीं स्विकारलेला प्राणांतिक धोक्याचा मार्ग, आत्यंतिक निराशेच्यावेळीं त्यांनीं प्रदर्शित केलेलें असामान्य धैर्य, भावनावश न होता त्यांनीं दाखविलेला प्रशंसनीय बुद्धिवाद, एकाच वेळीं त्यांनीं करून

दाखविलेलें अभूतपूर्व असें राजकीय, सामाजिक व धार्मिक परिवर्तन, सारें जग आश्चर्यानें थक्क होईल असा त्यांनीं केलेला आपल्या राष्ट्राचा कायापालट या सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार केला म्हणजे जगांतील मोठमोठे राष्ट्रधुरीण कमालपाशांपुढें निष्प्रभ ठरतात.

या राष्ट्रधुरीणांप्रमाणें हुकूमशहा बनून अनियंत्रित सत्ता गाजविण्याची कल्पना कमालपाशांस कधींही शिवली नाहीं किंवा राष्ट्रानें आपल्या टांचेखालीं राहावे असा उन्मत्त विचार त्यांनीं कधींही बाळगला नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या राष्ट्रास स्थैर्य लाभल्यानंतर,एकेकाळीं वैरी असणाऱ्या राष्ट्रांवर गुरगुरण्याची किंवा लहान लहान राष्ट्रांवर आक्रमण करण्याची दुष्टबुद्धि कमालपाशांना कधींही झाली नाहीं. ‘ जगांमध्यें राष्ट्र म्हणून तुर्कस्थानास सुखानें व इज्जतीनें कसें जगतां येईल ’ हा एकच एक उदात्त विचार त्यांच्यापुढें होता.

“ फक्त आपल्या राष्ट्राचा उत्कर्ष व सौख्य ” हें प्रधान ध्येय कमालपाशांनीं आपल्या समोर ठेविल्यामुळें दुसऱ्या राष्ट्रांच्या आत्यंतिक हितसंबधांस जपणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे असें कमालपाशा समजत. ज्या राष्ट्राचें ध्येय निर्भेळ राष्ट्रीयत्व असतें

किंवा ज्याचे उद्देश राष्ट्रीयत्वास पोषक असतात, तें राष्ट्र कधींही आंतर्राष्ट्रीय भानगडींत पडत नाहीं. आपल्या राष्ट्राच्या कक्षेबाहेर जे प्रश्न किंवा भानगडी असतात त्यापासून तें राष्ट्र सदैव अलिप्त असेंच असतें. या तत्वाला अनुसरून युरोपियन राष्ट्रांच्या सामर्थ्यसंघांत ( Group of Powers ) कमालपाशा कधींही सामील झाले नाहींत.

आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाकरितां किंवा कल्याणाकरितां झटावयाचें सोडून दुसऱ्या राष्ट्रावर विनाकारण आक्रमण करणें हा राजकीय गुन्हा आहे असें कमालपाशा समजत. याचकरितां तुर्कीसाम्राज्यांतून फुटून निघालेल्या इजिप्त, इराण, इराक वगैरे राष्ट्रांवर आक्रमण करण्याचा विचार त्यांच्या मनांत कधींही आला नाहीं. युरोपियन राजकारणांत तुर्कस्थानाचें प्रस्थ व सामर्थ्य वाढल्याबरोबर, तुर्कस्थान आपल्या साम्राज्यांतून फुटून निघालेल्या राष्ट्रांवर आक्रमण करणार, असें मोठमोठ्या मुत्सद्यांनीं भाकित केलें होतें; पण कमालपाशा पक्के तत्वनिष्ठ असल्यामुळें तें खोटें ठरलें. उलट त्या त्या राष्ट्रांना स्वातंत्र्य प्राप्त झालें याबद्दल त्यानीं समाधानच व्यक्त केलें. इतकी उदारवृत्ती प्रदर्शित केल्याचें हें युरोपियन राजकारणांतील पहिलेंच उदाहरण होय. सुप्रसिद्ध हिंदी पुढारी पंडित जवाहरलाल

नेहरू कमालपाशांच्या या तत्वनिष्ठेबद्दल म्हणतात:—

"तुर्कस्थानाकरितां स्वातंत्र्ययुद्ध करीत असतांना कमालपाशांनीं तुर्केतर राष्ट्रें किंवा प्रान्त जिंकण्याचें ध्येय आपल्यासमोर कधींच ठेविलें नाहीं. फक्त तुर्कस्थानापुरतेंच चिकटून राहण्यांत त्यांनीं अत्यंत शहाणपणा प्रदर्शित केला आहे."*

कमालपाशांमध्यें शौर्य व मुत्सद्देगिरी यांचा दुर्मिळ पण मधुर मिलाफ होता. कमालपाशा हे नुसते अव्वल दर्जाचे लढवय्ये नव्हते; तर बुद्धिमान मुत्सद्दीही होते. लढवय्या हा सर्वसाधारणपणें बुद्धिहीन समजला जातो. मुत्सद्यांनीं बेत करावे व ते लढवय्यानें पार पाडावे अशी वस्तुस्थिती असते. पण कमालपाशांमध्यें हे दोन्ही गुण उत्कटतेनें वसत होते. असहाय्य तुर्कस्थानाविरुद्ध सर्व दोस्त राष्ट्रें एकवटली असतां, आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर कमालपाशांनीं त्यांना नामोहरम करून टाकलें.

"एकट्या कमालपाशांनीं दोस्त राष्ट्रांच्या शक्तिस तोंड दिलें व धूर्तपणानें त्यांचा पराभव केला."×

---

* "Glimpses of World History" by Pandit Jawaharlal Neharu", Page 758.

× "One Hundred Great Lives", Page 751.

कमालपाशांनीं रणांगणावर ज्याप्रमाणें शत्रूसैन्य उधळून लावलें, त्याप्रमाणें टेबलाभोवतीं गंभीरपणें बसून काथ्याकूट करणाऱ्या मुत्सद्यांची मुत्सद्देगिरी धुळीस मिळविली आहे हें लॉसेन तहावरून आपणांस दिसून येईल. लॉसेन तह म्हणजे कमालपाशांनीं युरोपियन मुत्सद्यांवर मिळविलेला विजय होय. मि. हडसन नांवाच्या आंतर्राष्ट्रीय राजकारणतज्ज्ञानें पुढील यथार्थ उद्गार काढले आहेत.

> " २४ जुलै १९२३ रोजीं झालेल्या लॉसेन तहानें तुर्कांचा विजय आणि दोस्त राष्ट्रांचा पराभव जगजाहीर केला." *

कमालपाशांना वैयक्तिक मोठेपणाचे कधींच महत्व वाटलें नाहीं. आपण मोठे योध्दे आहोंत, आपल्या राष्ट्राचे उद्धारकर्ते आहोंत, किंवा आपण महान मुत्सद्दी आहोंत, असा सकारण गर्व त्यांना चुकून देखील शिवला नाहीं. 'आपण होतों म्हणूनच आपलें राष्ट्र जिवंत राहिलें, अशी फुशारकी मारून आपला कमकुवतपणा प्रदर्शित केला नाहीं. त्यांना किर्तीचा, मोठेपणाचा

* "Turkey, Grece & Eastern Meditarranean" by G. F. Hudson, Page 22.

किंवा बडेजावीचा मनापासून तिटकारा होता. एका जर्मन ग्रंथकारानें त्यांच्या मनोवृत्तीचें मोठें हृद्य वर्णन केलें आहे. तो म्हणतोः—

" ज्यांच्या पायाशीं राजमुकुटें वाहण्यांत आलीं, कल्पनारम्य साम्राज्यांचे आमिष ज्यांना दाखविण्यांत आले.....त्या कमालपाशांनीं आपला तोल जावूं दिला नाहीं. त्यांच्याजवळ नेपोलीयन सारखा मनाचा कमकुवतपणा नव्हता. कीर्तीच्या शिखरावर असतां त्या विजयी योद्धाचें रुपांतर शांततावादी नागरिकांत झालें. कीर्ती व बडेजाव याचा त्यांना तिटकारा होता. " ×

आपलें इच्छित ध्येय तडीस नेत असतां कमालपाशांनीं अत्याचाराचा अवलंब केला नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहे. परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतां अत्याचाराचे अस्त्र हातीं न घेतां कमालपाशांनीं जी क्रांति घडवून आणली ती जगाला आदर्शवत होऊन राहण्यासारखी आहे. कमालपाशांना रक्तपात करावा लागला; पण तो राष्ट्राच्या संरक्षणासाठीं परकीय शत्रूंशी झुंजतांना

× " Kemal AtaTurk ", Page 228

आणि आपद्धर्म म्हणून. नैसर्गिक हक्काचे संरक्षण करतांना नाईलाज म्हणून रक्तपात करावा लागला तर तो अत्याचाराच्या सदरांत येऊं शकत नाहीं. एका जर्मन ग्रंथकारानें कमालपाशांच्या अनत्याचारा-विषयीं स्पष्टपणें म्हटले आहे.:—

> " कमालपाशा हे अत्याचाराचे शत्रू होते. ....त्यांनीं रक्तपात न करतां किंवा रानटीपणा न दाखवितां क्रांति केली आहे. त्यांची क्रांति म्हणजे ध्येयाकडे ( स्वातंत्र्याकडे) नेलेला शिस्तीचा मोर्चा होय. " ×

शिस्त हा कमालपाशांच्या क्रांतीचा पाया होता. बेजबाबदार हुल्लड माजवून, आपल्या अनुयायांना पक्षांध बनवून, किंवा जनतेला टांचेखालीं तुडवून त्यांनीं क्रांति केली नाहीं. अत्यंत शांततेनें, विचारानें व गणितीच्या हिशेबी पद्धतीनें त्यांनीं तुर्कस्थानामध्यें आमूलाग्र क्रांति करून सोडली.

> " ज्या शिस्तीनें व पद्धतपूर्ण ध्येयानें कमाल-पाशांनीं आपलें राष्ट्र सुधारलें आहे, तें ध्येय अतुलनीय आहे. ज्या पद्धतीनें इटालियन लोकांच्या

× " Kemal AtaTurk ", Page 229.

> मनोरचनेंत मुसोलिनीनें क्रांति केली तिची तुलना कमालपाशांनीं तुर्कस्थानामध्यें अत्यंत शांततेनें केलेल्या क्रांतीशीं कधींही करतां येणार नाहीं....अवघ्या ११ वर्षांच्या काळांत कमालपाशांनीं आपल्या राष्ट्रास ६०० वर्षें पुढें नेलें आहे." ×

जगांतील मोठमोठ्या राष्ट्रधुरीणांना नुसत्या राजकीय परिस्थितीशी झगडावे लागलें; पण कमालपाशांना राजकीय, सामाजिक व धार्मिक अशा त्रिविध परिस्थितीला तोंड द्यावें लागले. स्थानिक राजकीय झगडा एवढें एकच कार्य इतर राष्ट्रधुरीणांनीं केलें; पण कमालपाशांना स्थानिक राजकीय परिस्थितीशी झगडावें लागलेच; शिवाय तसें करीत असतांना तुर्कस्थानावर अकस्मात हल्ला करणाऱ्या बाहेरील शत्रूशींही त्यांना तोंड द्यावें लागलें. सामर्थ्य, सहाय्य व सामुग्री तुटपुंजी असतां कमालपाशांनीं अंतर्गत व बाहेरील शत्रूवर जो विजय मिळविला तो तर जगांत अभूतपूर्व समजला जाईल.

त्याचप्रमाणें जनतेच्या सामाजिक आचारविचारांत क्रांति करण्याचें दुर्मिळ श्रेय कमालपाशांनीं मिळविलें आहे. अडाणी

× "Secrets of Kemal Pasha's success" by Michael Lorant.

जनतेच्या मनावर चढलेली रुढ आचारविचारांचीं पुटें फोडून काढतांना कमालपाशांना केवढें परिश्रम पडले असतील याची नुसती कल्पनाच केलेली बरी!

यापुढेंही जाऊन कमालपाशांनीं धार्मिक परंपरा व रूढी यांच्यावर जो जबरदस्त हल्ला चढविला तो तर इतिहासांत अमर होऊन राहण्यासारखा आहे. धार्मिक कल्पना व रूढी जनतेच्या हाडीमासीं खिळल्या असतां, त्याविरुद्ध मोहीम सुरू करून कमालपाशांनीं आपल्या कर्तृत्वमंदीरावर कळस चढविला आहे. प्रचलित धार्मिक भावनाविरुद्ध ज्याठिकाणीं ब्र काढण्याची सोय नव्हती, त्याठिकाणीं त्या भावना आमूलाग्र बदलण्याचें धाडस कमालपाशांनीं आपला प्राण पणाला लावून करून दाखविलें आहे.

राजकीय परिवर्तनापेक्षां सामाजिक व धार्मिक परिवर्तन करण्यांत जास्त धैर्य, धडाडी व निश्चय लागतो, अशी इतिहास आपणांस साक्ष देत आहे. राजकीय, सामाजिक व धार्मिक क्रांति एकाचवेळीं करून दाखविणारी जगांतील असामान्य विभूति म्हणून कमालपाशांचा इतिहासकारांना उल्लेख करावा लागेल.

" मृत्युशय्येवर पडलेल्या युरोपांतील आजारी तुर्कस्थानास उठवून बसवून त्याला आरोग्यपूर्ण

तारुण्याच्या उत्साहानें पळावयास व आनंदानें गावयास लावण्याचा कमालपाशांनीं चमत्कार करून दाखविला आहे....कुठल्याही देशांतील एकादा तरी माणूस आपल्या आयुष्याच्या अल्पशा काळांत इतकी आमूलाग्र क्रांति करण्याची नुसती आशा तरी दाखवूं शकेल काय? हा प्रश्न अत्यंत विचारार्ह आहे! आणि त्याचें उत्तर हेंच कीं, जर कुणी मनुष्य असें कार्य करूं शकेल तर तो मुस्ताफा कमालपाशा होय." ×

एका सुप्रसिद्ध पाश्चात्य लेखकाच्या वरील स्पष्ट व सडेतोड विचारा-वरून व कमालपाशांच्या जीवनक्रमावरून जगांमध्यें कमालपाशा ही एक असामान्य विभूती होऊन गेली असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय आहे काय?

---

× "Great Contemporaries", by Arnold Toynbee, Page 288–298.

समाप्त

# मुस्लिम मराठी साहित्य

आगामी आकर्षणें:—

## प्रसिद्ध हिंदी मुसलमान

## इस्लाम

## अकबर

खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा:—

**मुस्लिम-मराठी साहित्य ऑफिस,**

**सांगली.** ( S. M. C. )